# छत्रपती राजाराम महाराज यांचे प्रशासकीय कार्य (१९२२ – १९४०) : एक चिकित्सक अभ्यास

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्त्विक व सामाजिक शास्त्रे विद्याशाखांतर्गत
'इतिहास' विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)
पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध


संशोधक

नरेंद्र धावजी पाटील
P. R. No. : 02113007590

मार्गदर्शक
डॉ. भास्कर दाजी धाटावकर
इतिहास विभाग
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे


एप्रिल २०१९

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक नमूद करतो की, **'छत्रपती राजाराम महाराज यांचे प्रशासकीय कार्य (१९२२ – ४०) : एक चिकित्सक अभ्यास'** हा शोधप्रबंध मी डॉ. भास्कर धाटावकर यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेला आहे. या लिखाणासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन साधनांचा योग्य तो श्रेयनिर्देश प्रबंधात केलेला आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे या विद्यापीठात पीएच. डी. (इतिहास) पदवीसाठी प्रस्तुत शोधप्रबंध सादर करण्यात येत आहे. हा शोधप्रबंध इतर कोणत्याही पदवी किंवा पदविकेसाठी सादर केलेला नाही.

**(नरेंद्र धावजी पाटील)**
**संशोधक**

**ठिकाण : रायगड**
**दिनांक : एप्रिल २०१९**

## प्रमाणपत्र

मी असे प्रमाणित करतो की, **'छत्रपती राजाराम महाराज यांचे प्रशासकीय कार्य (१९२२–४०) : एक चिकित्सक अभ्यास'** या शीर्षकाचा प्रस्तुत शोधप्रबंध हा **श्री. नरेंद्र धावजी पाटील** यांचे स्वतःचे लिखाण असून, ते माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहेत. या लेखनासाठी वापरण्यात आलेल्या शोध साधनांचा योग्य तो श्रेयनिर्देश प्रबंधात केलेला आहे. हा शोधप्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथे पीएच. डी (इतिहास) पदवीसाठी सादर करण्यात येत आहे

**(डॉ. भास्कर धाटावकर)**
**मार्गदर्शक**

**ठिकाण :** मुंबई
**दिनांक** एप्रिल २०१८

Scanned by CamScanner

# ऋणनिर्देश

'छत्रपती राजाराम महाराज यांचे प्रशासकीय कार्य (१९२२–४०) : एक चिकित्सक अभ्यास' या विषयावर 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठा'तून पीएच.डी. पदवीसाठी संशोधन पूर्ण केले. या कामी मला अनेकांचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले, त्यासाठी सर्वांचे ऋणनिर्देश व्यक्त करणे, हे मी माझे कर्तव्य समजतो. पीएच.डी.साठी संशोधन करताना मला मार्गदर्शक म्हणून लाभलेले डॉ. भास्कर धाटावकर यांचे मी प्रथम ऋणनिर्देश व्यक्त करतो. सरांनी मला माझ्या संशोधनासाठी नेहमीच प्रोत्साहित केले. मी संशोधन करताना सरांनी आपला अमूल्य वेळ माझ्यासाठी तर दिलाच; पण त्यासोबत संशोधनाचे तपशील कसे नोंदवावे, संदर्भसूचीमध्ये कोणत्या प्रकारची काळजी घ्यावी यांसारखे बारकावे सरांनी सांगितले आहेत. संशोधनासाठी आवश्यक लागणारी ऐतिहासिक दुर्मिळ पुस्तकेही सरांनी त्यांच्या स्वतःच्या ग्रंथालयातून मला उपलब्ध करून दिली. विषयाच्या अनुषंगाने आमच्या चर्चा अगदी चार–चार तास चालत असत. साहजिकच त्यांनी दिलेला आपला अमूल्य वेळ हा संशोधन कार्य अधिक दर्जेदार होण्यासाठी साह्यभूत ठरला. सरांच्या अभ्यासू व शिस्तीचे वेळोवेळी दर्शन झाल्यामुळे ती प्रेरणा घेऊनच मी माझ्या संशोधनाचे काम सरांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केले आहे. त्यामुळे सरांचे मी मनःपूर्वक ऋणनिर्देश व्यक्त करतो.

संशोधन पूर्ण करण्यासाठी मला 'टिळक महाराष्ट्र विद्यापीठा'च्या इतिहास विभाग प्रमुख डॉक्टर नीलिमा वाघमारे यांनी सुद्धा वेळोवेळी प्रोत्साहित केले. इतिहास या विषयातील संशोधन पद्धती, संशोधनातील तपशील या संदर्भात वेळोवेळी मार्गदर्शन केल्यामुळे माझे लिखाण पूर्ण होण्यास मदत झाली. म्हणून मी त्यांचे सुद्धा आभार मानतो. पुराभिलेख संचालनालयाच्या कार्यालयातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी माझ्या संशोधनासाठी खूप मोलाचे योगदान दिले आहे. पुणे पुरालेखागार कार्यालयातील, संशोधन सहाय्यक श्री. स .दी. वाडकर, विदर्भ पुराभिलेखागार कार्यालयातील सहाय्यक संचालक श्री. ख. द. खंदारे आणि मुंबई पुरालेखागार कार्यालयातील संचालक, सहाय्यक संचालक आणि माझे सहकारी श्री. म. दि. रजपूत, सु. वि. पाटील (संशोधक सहाय्यक) यांनी वेळोवेळी सहकार्य केल्यामुळे माझे काम पूर्णत्वास जाण्यास मदत झाली. कोल्हापूर पुरालेखागार कार्यालयातून हुजूर ठराव, करवीर

सरकारचे गॅजेट, राजाराम महाराज छत्रपती दप्तर, शाहू दप्तर, यांसारख्या ऐतिहासिक दस्ताऐवजाबरोबर छत्रपती राजाराम चरित्रग्रंथ, राजा शाहू आणि समाज प्रबोधन, राजश्री शाहू स्मारक ग्रंथ, राजश्री शाहू छत्रपती – एक समाज क्रांतिकारक, कोल्हापूरची वरदायिनी राधानगरी धरण योजना, राजश्री शाहू छत्रपतींचे लोकाभिमुख प्रशासन असे अनेक महत्त्वाचे संदर्भग्रंथ उपलब्ध करून दिले. त्यांच्या या सहकार्याविना माझे पीएच.डी.साठीचे संशोधन कार्य पूर्ण होऊच शकले नसते. त्यामुळे कोल्हापूर पुराभिलेख कार्यालयातील संकलक श्री. विनायक पाटील आणि कर्मचारी संदीप उंबरे, मनोज पाटील, प्रशांत शिरोवलीकर इत्यादी अधिकारी–कर्मचारी यांचे मी मनापासून आभार मानतो. कोल्हापूर पुरालेखागार येथील अभिलेखाधिकारी श्री. गणेश खोडके यांनीसुद्धा माझे संशोधन पूर्ण व्हावे, या तळमळीतून नेहमीच मला सदिच्छा व्यक्त केल्या, त्याबद्दल त्यांचेसुद्धा मी आभार मानतो.

या संशोधन कामी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील इतिहास विभागाचे माजी विभागप्रमुख आर. बी. गायकवाड सर, श्री. दुधभाते सर यांनीसुद्धा नेहमीच मला मदत केली, तसेच एल्फिन्स्टन महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. बाळासाहेब खोमणे यांचेही भरीव सहकार्य आणि मार्गदर्शन लाभले. याबद्दल मी या सर्वांचे आभार मानतो.

संशोधनाचे काम करत असताना या संशोधनामध्ये माझ्या कुटुंबाचासुद्धा खूप मोठा वाटा आहे. माझे वडील श्री. धावजी नारायण पाटील आणि आई सौ. अनुसया धावजी पाटील यांनी मला संशोधनासाठी नेहमी प्रोत्साहित करून संशोधनासाठी ऊर्जा दिली, त्यामुळे मी त्यांचे आभार मानणार नाही पण त्यांच्या ऋणात राहणे मला जास्त आवडेल. संशोधन कार्यात माझी पत्नी श्रीमती नम्रता रामचंद्र पाटील यांनी केलेल्या सहकार्याचा खूप मोठा वाटा आहे. कौटुंबिक जबाबदारी सांभाळून संशोधन कार्यासाठी तिने दिलेल्या प्रोत्साहनामुळे हे कार्य सिद्धीस नेऊ शकलो. तिच्या पाठिंब्याशिवाय आणि सहकार्याशिवाय माझे संशोधन पूर्ण झाले नसते हेही तितकेच खरे.

माझ्या संशोधनामध्ये अनेक अनेक ज्ञात आणि अज्ञात प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष सहकार्य केलेले आहे, त्यामुळे त्यांचेसुद्धा पुनश्च आभार मानतो.

**(नरेंद्र धावजी पाटील)**

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | **प्रस्तावना** | १–१८ |
| २. | **प्रकरण पहिले :** राजर्षी शाहू महाराजांच्या निधनानंतर छत्रपती राजाराम महाराजांनी केलेले सत्ताग्रहण | १९–६५ |
| ३. | **प्रकरण दुसरे :** छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकिर्दीतील प्रशासन कार्यप्रणाली | ६६–१०८ |
| ४. | **प्रकरण तिसरे :** छत्रपती राजाराम महाराज यांच्या प्रशासकीय सुधारणा | १०९–१३८ |
| ५. | **प्रकरण चौथे :** छत्रपती राजाराम महाराज यांचे प्रशासन गतिमान करण्यासाठीचे धोरणात्मक निर्णय | १३९–१६८ |
| ६ | **प्रकरण पाचवे :** छत्रपती राजाराम महाराजांचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकासात योगदान | १६९–२२३ |
| ७ | **प्रकरण सहावे :** समारोप (सारांश आणि निष्कर्ष) | २२४–२६१ |
| ८ | **संदर्भसूची** | २६२–२६९ |
| ९ | **परिशिष्टे**<br>१. मुलाखती आणि प्रश्नावली – विद्यमान छत्रपती शाहू महाराज<br>२. छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकीर्दीतील निवडक ऐतिहासिक दस्ताऐवज<br>३. छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकीर्दीतील निवडक ऐतिहासिक छायाचित्रे<br>४. छत्रपती राजाराम महाराजांच्या निधनाची विविध वृत्तपत्रांनी घेतलेली दखल | २७०–२९९ |

# प्रकरण पहिले

## राजर्षी शाहू महाराजांच्या निधनानंतर छत्रपती राजाराम महाराजांनी केलेले सत्ताग्रहण

- प्रस्तावना

१) जन्म आणि कौटुंबिक पार्श्वभूमी

२) कोल्हापूर संस्थानचा इतिहास

३) करवीर छत्रपती भोसले घराण्याचा इतिहास

४) कोल्हापूरातील प्रशासकीय विभाग

५) शाहू महाराज पूर्व भारतातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घडामोडी

६) ब्रिटीश आणि कोल्हापूर संस्थान

७) शाहू महाराजांचा जन्म आणि वैचारिक जडणघडण

८) शाहू महाराजांचे योगदान

९) शाहू महाराजांच्या निधनानंतर कोल्हापूर संस्थानची आर्थिक स्थिती

१०) शाहू महाजांच्या निधनानंतर शैक्षणिक परिस्थिती

११) छत्रपती राजाराम महाराजांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण

१२) शाहू महाराजांच्या निधनानंतर राजाराम महाराजांनी केलेले सत्ताग्रहन

# प्रकरण पहिले

## राजर्षी शाहू महाराजांच्या निधनानंतर छत्रपती राजाराम महाराजांनी केलेले सत्ताग्रहण

### प्रस्तावना

छत्रपती राजाराम महाराज हे लोककल्याणकारी राजे होते. त्यांचे वडील छत्रपती शाहू महाराजांनी गाजवलेल्या कर्तृत्वाचा वसा आणि वारसा त्याच्यानंतर समर्थपणे चालवण्याचे कार्य छत्रपती राजाराम महाराजांनी केले. संस्थानातील गोरगरीब जनतेच्या विकासासाठी त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेऊन ऐतिहासिक योगदान दिले. छत्रपती राजाराम महाराजांच्या वैचारिक जडघडणीमध्ये त्यांच्या घरातील वातावरणाचा मोठा वाटा होता. पण हे कारक घटक केवळ कोल्हापूर राज्यापुरते मर्यादित नव्हते, त्यांचे व्यक्तिमत्त्व हे पाश्चात्त्य शिक्षणाच्या प्रभावातून आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या अनुभवातून घडले होते. त्यांची जी जडणघडण झाली, त्यातून छत्रपती राजाराम महाराज हे उच्चविद्याविभुषित, सुसंस्कृत आणि एक प्रगल्भ राजकीय व्यक्तिमत्त्व म्हणून उदयाला आलेले होते.

प्रस्तुत प्रकरणांमध्ये आपण राजाराम महाराजांच्या विचारांची व व्यक्तिमत्त्वाची जडणघडण याविषयी चर्चा करणार आहोत. सोबतच प्रस्तुत प्रकरणांमध्ये आपण कोल्हापूर संस्थान 'करवीर नगरी' या नावानेही ओळखले जाते. त्यामागची ऐतिहासिक पार्श्वभूमी, त्याची ऐतिहासिक उत्पत्ती आणि इतिहासाचा आढावाही या प्रकरणात घेण्यात येणार आहे. छत्रपती राजाराम महाराज कोल्हापूर संस्थानाची सुत्रे घेताना असलेली शैक्षणिक क्षेत्रामध्ये छत्रपती शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्यासाठी धोरणात्मक निणर्याची चर्चा करून सार्वत्रिक शिक्षणाचा आग्रह धरून कोल्हापूर संस्थान साक्षर करण्यामध्ये महत्त्वाचे जे योगदान दिले, त्याचीही चर्चा या प्रकरणात केली आहे. छत्रपती शाहू महाराजांनी केलेला वेठबिगारविरोधी कायदा, जातीव्यवस्थेविरोधी कायदा, आरक्षणाचा निर्णय, जातिनिहाय वसतिगृहे, आंतरजातीय विवाह चळवळ अशा विविध सामाजिक सुधारणांचा उहापोहही या प्रकरणात केला आहे. शेतीसाठी कर्जपुरवठा करण्यासाठी पतसंस्था आणि बँकाची उभारणी, शेतीसाठी सिंचनव्यवस्था निर्माण करण्यासाठी धरणे, विहीरी आणि कालवे बांधकामाचा प्रकल्प, औद्योगिक कारखाने , हस्तउद्योग व्यवसायाला चालना, पारंपरिक हस्तकौशल्याचा

विकास यादृष्टिकोनातून शाहू महाराजांनी घेतलेल्या धोरणांचीही चर्चा या प्रकरणात करण्यात आली आहे. स्थानिक बाजारपेठाला जागतिक बाजारपेठेशी जोडण्यासाठी उभारलेले रेल्वे जाळे, आयात–निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध व्यापारी क्षेत्रातील उत्पादन साधनांचे प्रदर्शने आणि विक्री अशी धोरणे घेऊन व्यापारी क्षेत्राला चालना देणाऱ्या शाहू महाराजांची धोरणांचा आढावा या प्रकरणातून घेण्यात आलेला आहे.

त्याचबरोबर संस्थानाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून त्यांनी दिलेले प्रशासकीय योगदान याविषयीची चर्चाही या प्रकरणातून करण्यात येणार आहे.

## १) जन्म आणि कौटुंबिक पार्श्वभूमी

छत्रपती राजाराम महाराज यांचा जन्म दि. ३१ जुलै, १८९७ रोजी झाला. त्यांना कनिष्ठ भाऊ आणि बहीण होते. भावाचे नाव प्रिन्स शिवाजी असे होते, तर बहिणीचे नाव राधाबाई उर्फ अक्कासाहेब महाराज असे होते. राजाराम महाराज यांचे दोन विवाह झाले होते. त्यांचा प्रथम विवाह बडोद्याच्या राजघराण्यातील ताराबाई राणीसाहेब यांच्याशी झाला. तर दुसरा विवाह तंजावर सरदार मोहिते घराण्यातील विजयमाला राणीसाहेब यांच्याशी झाला. त्यांना एक मुलगी होती. तिचे नाव पद्मा राजे असे होते.

## २) कोल्हापूर संस्थानाचा इतिहास

कोल्हापूर शहराला प्राचीन इतिहासाची गौरवशाली पंरपरा आहे. पन्हाळगडसारखा अत्यंत समृद्ध आणि पंचगंगेचा प्रसन्न असा परिसर येथे आहे. 'करवीर महात्म्य' या ग्रंथात कोल्हापूरचा उल्लेख 'दक्षिण काशी' या नावानेसुद्धा करण्यात आला आहे. दक्षिण भारतातील आध्यात्मिक केंद्र आणि प्राचीन संस्कृतीचे केंद्र म्हणून कोल्हापूरचा गौरव केला जातो. अगदी प्राचीन काळापासून कोल्हापूर शहराला राजधानीचे वैभव लाभले होते.[१]

कोल्हापूर हे राज्य अस्तित्वात येण्यापूर्वी या नावाची उत्पत्ती आणि विकास याबाबत विविध आख्यायिका असल्याच्या दिसून येतात. त्या पुढीलप्रमाणे :

- एका आख्यायिकेनुसार, असा एक भूप्रदेश होता जिथे आर्य आणि द्रविड वंशाचे लोक राहत होते. ते सर्वजन आपल्या अधिवासाचे प्रतीक म्हणून कोल्हा या प्राण्याचे चित्र असलेला ध्वज लावत असत. असा ध्वज असलेल्या प्रदेशाला पुढील काळात कोल्हापूर म्हणून ओळखले जाऊ लागल्याचे सांगितले जाते.
- पूर्वी या ठिकाणी कोल्ह्याची वस्ती जास्त होती, म्हणून त्याला कोल्हापूर असे म्हणू लागले.
- कोल्हापूरमधील राजाला 'शगाल' म्हणजे कोल्हा आणि त्याचे गाव ते पूर म्हणून कोल्हापूर हे नाव पडले असावे.
- येथील राजा कोळी जातीचा (कोल्हा) असावा, हे त्यांचे गाव म्हणून गावाचे नाव कोल्हापूर पडले असावे.
- कोल्हापूर हे 'कोल्हार' शब्दाचा अपभ्रंश असल्याचे वर्णन विविध कोशांमध्ये आढळून येते.
- डॉ. खरे यांनी कोहलू यापैकी कोणत्याही शब्दापासून 'कोल्हापूर' हे नाव या नगरीला पडले असावे की भौगोलिक उत्पत्ती मानले आहे.[२].'पद्मपुराणा'त अशी एक दंतकथा आहे की, कोल्हापूर नावाचा एक दैत्य होता. त्याला 'करवीर' नावाचा एक मुलगा होता. त्याने आपल्या राजधानीला आपल्या नावावरून 'कोल्हापूर' हे नाव दिले आहे. त्यांनी आपल्या राज्यातील सर्व धर्म नष्ट करण्यास सुरुवात केली. म्हणून लोकांनी त्यांच्या धर्माचे रक्षण करण्यासाठी महालक्ष्मीची प्रार्थना केली. महालक्ष्मीने कोल्हासुराला ठार मारले. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा करवीर यांच्यात पुन्हा लढाई चालू झाली; पण त्यालाही तिथे ठार मारले. मात्र मरण्यापूर्वी करवीरने महालक्ष्मीजवळ 'माझ्या मरणानंतर माझे वंश नष्ट होत असून, पुढील काळात माझे आणि माझ्या वडिलांचे नाव कुणालाही आठवणार नाही, अशी खंत व्यक्त केली. तेव्हा महालक्ष्मीने त्याला वचन दिले की, ''कोल्हापूर नगराला 'कोल्हापूर' व 'करवीर' अशा दोन्ही नावांनी संबोधले जाईल. कोल्हापूरचे वंद्यस्थान म्हणून या नगरीला कोल्हापूर हे नाव पडले असावे.''[३]

'करवीर'ची उत्पत्तीसुद्धा अशाच वेगवेगळ्या पद्धतीने झाली असल्याचे सांगितले जाते. त्यासंदर्भात येणाऱ्या आख्यायिका पुढीलप्रमाणे –

- महालक्ष्मीने स्वतःच्या उत्पत्तीने वसवलेले नगर म्हणून त्याचे 'करवीर' हे नाव लागले. करदारी (कर– गदा) कुरवीर, करवीर म्हणजे गदा धारण करणाऱ्या लक्ष्मीचे नगर अशी एक उत्पत्ती सांगितली जाते.
- कोल्हापूर व करवीर या पिता–पुत्रांना काबुली टेकडीवर महालक्ष्मीने ठार मारले म्हणून या राक्षसांच्या नावावरून 'करवीर' हे नाव पडले असावे.
- 'करवीर' या शब्दाची उत्पत्ती कृपान, हळदी, बेलवडी, चाफेवाडी, पडवळवाडी ही वनस्पतीवाचक, स्थलवाचक नावांमध्येही आढळते. कोल्हापूर भागात विपुल प्रमाणात कावेरीची झाडे दिसत होती, म्हणून कोल्हापूर नाव पडले असावे.'करवीर' राज्याविषयीच्या एका आख्यायिकेविषयी सन १८५४ च्या ग्रॅहम्स अहवालात असे म्हटले आहे की, ''पुराणांमध्ये या प्रदेशात राहणाऱ्या लोकांना 'करवीरवासी' या नावाने ओळखले जाते. करवीर याचा अर्थ महालक्ष्मीदेवीच्या प्रदेशात राहणारे किंवा महालक्ष्मीची गादी असणारा प्रदेश असा होता. महापूर आल्यानंतर त्या प्रदेशात राहणाऱ्या लोकांना महापुरापासून वाचवण्यासाठी कोल्हे या टेकडीवरून जो विधी केला जायचा त्यावरून कोल्हापूर हे नाव विस्तारले गेले, अशी आख्यायिका आहे.''[४]
- स. मा. गर्गे म्हणतात, ''कोल्हापूर हे 'कोल्हार' शब्दाचा अपभ्रंश असू शकतो. तसे असेल, तर कमलपुष्पांचे नगर असे त्याचे कलात्मक वर्णन करावे लागेल. कदाचित प्रलयंकर महालक्ष्मीच्या आशीर्वादातून निर्माण झालेले नगर म्हणून त्याला 'करवीर' हे नाव लाभले असेल. कदाचित कोल्हासुराचे वधस्थान म्हणून त्याला कोल्हापूर म्हटले गेले असावे[५].
- महालक्ष्मीचे मंदिर झाल्यापासून 'करवीर' हा शब्द वापरला गेला आहे. यापूर्वी कोल्हापूर कोरलागिरी, कोल्हा दक्षिण मी पटण इत्यादी नावाचा उल्लेख आढळतो याचा अर्थ असा आहे की, कोल्हापूरचे देवालय स्थापन होण्यापूर्वी व नंतर कोल्हापूर शहराचे

नाव कोल्हापूर असेच होते. कोल्हापूर म्हणजे शांततेचे गाव म्हणून ओळखले जाऊ लागले.[६]

## ३) करवीर छत्रपती भोसले घराण्याचा इतिहास

करवीर छत्रपती भोसले घराण्याचा इतिहास समजून घेताना तो शाहू महाराजांपासून चालू होतो आणि राजाराम महाराजांपर्यंतच येतो अशी शंका निर्माण होण्याची शक्यता आहे. म्हणून हा इतिहास समजून घ्यावा लागतो. त्यासाठी आपण शककर्ते शिवाजी महाराजांपासून ते छत्रपती राजाराम महाराज यांच्यापर्यंतचा इतिहासाचा धावता आढावा घेणार आहोत. हिंदवी स्वराज्याचे, मराठा साम्राज्याचे संस्थापक व एक लोककल्याकारी राजे म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांना ओळखले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेऊन मराठा साम्राज्याच्या अंतर्गत जनतेला सुरक्षितता निर्माण करून दिली. लोककल्याणकारी राज्य म्हणून आज जागतिक पातळीवर इतिहासामध्ये त्यांचा आदराने उल्लेख केला जातो. एका बाजूला मोगल साम्राज्याचा विरोधात छत्रपती शिवाजी महाराजांनी खूप मोठा संघर्ष केला. दुसऱ्या बाजूला अंतर्गत शत्रूंचा सुद्धा बंदोबस्त करून हिंदवी स्वराज्य स्थापन केले.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर हा वारसा छत्रपती संभाजी महाराज यांनी पुढे समर्थपणे चालवला. शिवाजी महाराजांना दोन मुले होती. पहिला मुलगा छत्रपती संभाजी महाराज आणि दुसरा मुलगा छत्रपती राजाराम महाराज. छत्रपती संभाजी महाराज यांनी आपल्या वडिलांनंतर मराठा साम्राज्याचा विस्तार अतिशय प्रभावीपणे केला. लोककल्याणकारी राज्यासाठी महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेतले. मोगल साम्राज्याच्या विरोधामध्ये रात्रंदिवस संघर्ष करून मराठा साम्राज्य अतिशय प्रभावीपणे वाढवले, विस्तारले. औरंगजेबाच्या प्रभावी डावपेचामुळे आणि धूर्त रणनीतीमुळे छत्रपती संभाजी महाराजांना पकडले. औरंगजेबाने अतिशय क्रूर पद्धतीने ठार केले.

मराठा साम्राज्य लयास जाईल का? आणि मोगल साम्राज्याचा विस्तार होईल का? असा प्रश्न तत्कालीन जनमानसामध्ये निर्माण झाला होता. त्यानंतर छत्रपती संभाजी यांनी १७१४ ते १७६० या कालावधीत कोल्हापूरमध्ये आपल्या साम्राज्याचा विस्तार केला. १७३१मध्ये सातारा छत्रपती घराणे आणि कोल्हापूर संस्थानच्या छत्रपती घराणे यांच्यामध्ये

एक करार झाला. तो करार वारणेचा तह या नावाने ओळखला जातो. या तहानुसार प्रादेशिक मुलुख विभागणी करण्यात आली. उत्तरेस वारणा, ईशान्येस कृष्णा व दक्षिणेस तुंगभद्रा हा प्रदेश संभाजी महाराजाकडे राहिला. संभाजी महाराजांच्या काळामध्ये कोल्हापूरच्या संस्थानामध्ये अंतर्गत कलह आणि अविश्वासाच्या वातावरणामुळे ऐतिहासिक भूमिका पार पाडू शकला नाही.[७]

नंतरच्या काळात कोल्हापूरच्या गादीवर छत्रपती शिवाजी महाराज (दुसरे) आले. त्यांनी १७६२ – १८१३ या काळात त्यांनी साम्राज्यविस्तारात मोलाचे योगदान दिले. दरम्यानच्या काळात गडकऱ्यांचे बंड, पावनगड बंड अशा अनेक बंडांना सामोरे जावे लागले. त्यांनी ही सर्व बंडे मोडून काढली. याच काळात ब्रिटिशानी स्वीकारलेल्या साम्राज्यवादी धोरणामुळे त्यांना ब्रिटिशांशी त्यांना अनेक करार करावे लागले. पण अल्पावधीतच त्यांचे १८१३ मध्ये त्यांचे निधन झाले. त्यांच्यानंतर कोल्हापूर संस्थानाच्या राज्यकारभाराची सुत्रे त्यांचे चिरंजीव छत्रपती संभाजी महाराज (दुसरे) उर्फ आबासाहेब यांच्याकडे आली. आबासाहेब महाराजांच्या कालावधीत कोल्हापूर संस्थानामध्ये असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले.

त्याचदरम्यान शंभू आप्पासाहेब महाराजांचा १८२१ रोजी त्यांचा खून झाला आणि सत्तेची सुत्रे शहाजी उर्फ बुवासाहेब महाराज यांनी आपल्या हातात घेतली. या काळामध्ये संस्थानाच्या कारभारामध्ये ब्रिटिशांचा हस्तक्षेप वाढत होता. विविध करारातून आणि खालसातून नियंत्रण प्रस्थापित करण्याचा ब्रिटिशांचा प्रयत्न चालला होता. त्यामुळे शहाजी महाराज आणि ब्रिटिशांचे संबंध नेहमीच तणावाचे राहिले होते. शहाजी महाराज यांचा कालावधी हा कोल्हापूर संस्थानासाठी फार चांगला नसल्याचा दावा अनेक इतिहासकार करतात. सन १८३८ मध्ये संस्थानाच्या कारभाराची सुत्रे छत्रपती शिवाजी महाराज (तिसरे) उर्फ बाबासाहेब यांच्याकडे आली. सन १८३८ ते १८६६ या कालावधीत त्यांना अंतर्गत बंडाळीला सामोरे जावे लागले. याच कालावधीत गडकरी लोकांनी बंड केले. या बंडाचा बिमोड करून शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला; मात्र त्यात त्यांना फारसे यश मिळाले नाही. याच काळात ब्रिटिशांच्या साम्राज्यविस्तार वाढत चालला होता. याच काळात ब्रिटिशांनी त्यांच्यावर दबाव आणून कोल्हापूर संस्थानात कोल्हापूरचे पॉलिटकल एजंट म्हणून मेजर ग्रॅहम

यांची नियुक्ती केली. अशा स्वरूपाची नियुक्ती कोल्हापूर संस्थानात पहिल्यांदाच करण्यात आली.[८]

१८६६ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज उर्फ बाबासाहेब यांचे निधन झाले. यानंतर कोल्हापूर संस्थानाची सूत्रे छत्रपती राजाराम महाराज यांच्याकडे आली. १८६६–१८७० या छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत कोल्हापूरच्या विकासाला खूप मोठ्या प्रमाणात चालना मिळाली. त्यांच्याच कारकिर्दीत १८७० मध्ये राजाराम कॉलेजची स्थापना झाली.कोल्हापूर संस्थानास दूरदृष्टी असलेला राजा भेटल्याची भावना तत्कालीन जनमानसात निर्माण झाली होती.

राजाराम महाराजांच्या निधनानंतर कोल्हापूर संस्थानिकांची सूत्रे छत्रपती शिवाजी महाराज (चौथे) यांनी स्वीकारली. चौथे शिवाजी हे सावर्डेकर घराण्यातून दत्तक घेण्यात आलेले होते. चौथे शिवाजी यांची कारकीर्द ही कोल्हापूर संस्थानाअंतर्गत एका शोकांतिकेच्या पातळीवर पाहिली जाते. कारण या काळात कोल्हापूर संस्थानाला भीषण दुष्काळाच्या परिस्थितीला सामोरे जावे लागले होते. या दुष्काळी काळादरम्यान भारतातील इतर प्रदेशात हजारो लोकांचा मृत्यू, उपासमार, स्थलांतर यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागले असते. मात्र चौथे शिवाजी महाराज यांनी आपल्या संस्थानात ही दुष्काळाची परिस्थिती खूप कौशल्याने हाताळली आणि संस्थानाला या दुष्काळाचे चटके बसवण्यापासून वाचविले. हे लक्षात घेऊन इग्लंडच्या महाराणीने त्यांना 'केसीएसआर' हा किताब देऊन त्यांचा गौरव केला[९]. पण अंतर्गत गटबाजी यामुळे चौथ्या शिवाजीना मनोरुग्ण ठरवून तुरुंगात टाकण्यात आले. तुरुंगातच त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर राणी आनंदीबाई यांनी यशवंतराव यांना दत्तक म्हणून स्वीकारले. यशवंतरावाचे 'शाहू' असे नामकरण करून कोल्हापूर संस्थानाची धुरा त्यांच्याकडे सोपविण्यात आली.[१]

---

[1] वरील सर्व खाली पुस्तकाच्या आधारे संदर्भ म्हणून घेण्यात आलेला आहे.

१. latthe A. B. - Memories of His Highness Shri. Shahu Chhatrapati Maharaja of Kolhapur, (Vol. I) Time Prss, Bombay, 1924 (pp. 1 to 22)

२. धनंजय कीरः राजश्री शाहू छत्रपती एक समाज क्रांतिकारक राजा : पाप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७९, पान क्र. १ ते १२

३.सूर्यवंशी के. जी. राजश्री शाहू राजा आणि माणूस : टोकल प्रकाशन, पुणे १९८४, पान क्र. १ ते २१

## करवीर छत्रपती घराण्यांचा वंशवृक्ष

छत्रपती शिवाजी महाराज, शककर्ते

छत्रपती संभाजी महाराज
(सातारा छत्रपती घराणे)
(१६८०–१६८९)

छत्रपती राजाराम महाराज
महाराणी ताराबाई
(१६८९–१७००)

छत्रपती शिवाजी महाराज (करवीर पहिले)
(१७००–१७१४)

छत्रपती संभाजी महाराज (करवीर पहिले)
(१७१४–१७६०)

छत्रपती शिवाजी महाराज (दुसरे), खानवटकर घराण्यातून दत्तक (१७६२–१८१३)

छत्रपती संभाजी महाराज (दुसरे) ऊर्फ
आबासाहेब (१८१३–१८२१)

छत्रपती शहाजी महाराज उर्फ बुवासाहेब
(१८२१–१८३८)

छ. शिवाजी महाराज (तिसरे) उर्फ (१८३८–१८६६)
बाबासाहेब

शाहू उर्फ चिमासाहेब

↓

छत्रपती राजाराम महाराज (पाटणकर घराण्यातून दत्तक) (१८६६ ते १८७०)

↓

छत्रपती शिवाजी महाराज (चौथे) सावर्डेकर घराण्यातून दत्तक (१८७१–१८८३)

↓

छत्रपती शाहू महाराज कागलकर घाटगे घराण्यातून दत्तक (१८८४–१९२२)

छत्रपती राजाराम महाराज
(१९२२–१९४०)

प्रिन्स शिवाजी

छत्रपती शिवाजी महाराज (पाचवे)
(चावरेकर घराण्यातून दत्तक)
(१९४२–१९४६)

छत्रपती शहाजी महाराज
(देवकर देवासकर पवार, थोरली पाती या
घराण्यातून दत्तक) (१९४७–१९८६)

छत्रपती शाहू महाराज नागपूरकर भोसले घराण्यातून दत्तक (१९८३)

युवराज संभाजीराजे (१९७१)

राजकुमार मालोजीराजे (१९७६)

## ४) कोल्हापूरातील प्रशासकीय विभाग

छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतल्यानंतर प्रशासन कार्यक्षम करण्याच्या उद्देशाने प्रशासनात काही महत्त्वाच्या सुधारणा केल्या. पेठा आणि महाल अशा दोन भागांमध्ये प्रशासनाचे विभाजन ही त्यातील एक महत्त्वाची सुधारणा होती. या प्रशासकीय विभाजनातून शाहू महाराजांनी एका पातळीवर प्रशासनाचे विकेंद्रीकरण करण्याचा प्रयत्न केल्याचे आपणास दिसते. पेठा आणि महाल ही तालुका पातळीवरील प्रशासकीय व्यवस्था होती.

कोल्हापूर संस्थानाचे १० प्रशासकीय विभाग होते. त्यात पेठा आणि महालांचा समावेश होता. १) करवीर २) पन्हाळा ३) आळते ४) शिरोळ ५) भुदरगड ६) गडहिंग्लज ७) रायबाग ८) कटकोल ९) चनवाड १०) राधानगरी या भागांवर शाहू महाराजांचे प्रत्यक्ष नियंत्रण होते. तेव्हा कोल्हापूर संस्थानाचे क्षेत्रफळ २,३३४ चौरस मैल होते. छत्रपती शाहू महाराज यांचे या क्षेत्रामध्ये स्वतःच्या नियंत्रणाखाली स्वतःचे प्रशासकीय मंडळ या आधारे प्रशासन चालत असे; तर दुसऱ्या बाजूला १) कापशी २) विशाळगड ३) बावडा ४) इचलकरंजी ५) कागल वरिष्ठ आणि कनिष्ठ ६) हिंमतबहादूर व सरलष्कर या काही जहागिरी होत्या; ज्यावर अप्रत्यक्ष सत्ता होती जहागीरदारांची आणि प्रत्यक्ष सत्ता नियंत्रण शाहू महाराजांचे होते. अशा जहागिरीचे क्षेत्र ८८३.१ चौरस मैल विस्तारले होते.[१०]

## ५) शाहू महाराज पूर्व भारतातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय घडामोडी

राजसत्ता कोणतीही असो, तिच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करताना किंवा त्या राजसत्तेकडे संशोधन विषय म्हणून पाहताना ती राजसत्ता अस्तित्वात येण्यापूर्वी असलेल्या सामाजिक, राजकीय, आर्थिक परिस्थिती आणि घडामोडींचा, सत्तास्थानांचा अभ्यास करणे गरजेचे असते. किंबहुना ती त्या संशोधनाची पूर्वअट असते. त्यामुळे शाहू महाराजांपूर्वी महाराष्ट्राच्या आणि देशाच्या पातळीवर कोणते महत्त्वाचे बदल होत होते, हे समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण राजर्षी शाहू महाराजांच्या पूर्वी ज्या महत्त्वाच्या सामाजिक आणि राजकीय घडामोडी घडत होत्या, त्या घडामोडींचा परिणाम एकूण शाहू महाराजांच्या सामाजिक, राजकीय

आणि आर्थिक धोरणांवर पडत होता. साहजिकच राजर्षी शाहू महाराजांनंतर छत्रपती राजाराम महाराज यांच्याही सामाजिक, आर्थिक आणि राजकीय धोरणांवर दूरगामी परिणाम करणाऱ्या होत्या. त्या पुढीलप्रमाणे :

१) सोळाव्या शतकापासून इंग्रजांनी आपल्या साम्राज्याचा विस्तार खूप वेगाने भारताच्या वेगवेगळ्या प्रांतांमध्ये करण्यास सुरुवात केली होती. 'व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते बनले' ही प्रचलित म्हण या साम्राज्यविस्ताराचे समर्पक विश्लेषण करणारे आहे. सन १८५७ पर्यंत ब्रिटिशांनी आपला साम्राज्यविस्तार हा खूप मर्यादित आणि टप्प्याटप्प्याने विकसित करत नेला. त्याचा परिणाम म्हणून १८५७ ला वेगवेगळ्या प्रांतातील संस्थानिक, आदिवासी समुदाय, शेतकरी यांनी साम्राज्यवादाच्या विरोधामध्ये खूप मोठा उठाव केला. त्याची परिणीती भारतातील या युद्धात झालेला पराभव. त्यामुळे ब्रिटिश साम्राज्यवादाला पोषक वातावरण मिळाले आणि आपले प्रत्यक्ष राज्य करण्याची सुरुवात ही १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्याने सुरुवात केली.

ब्रिटिशांनी आपल्या साम्राज्याचा विस्तार अधिक मजबूत आणि विस्तारित स्वरूपात या कालखंडापासून पुढे केला. त्यामुळे वेगवेगळ्या संस्थानिकांमध्ये आणि प्रांतांमध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष राज्य करण्यास सुरुवात केली. किंबहुना त्यांच्यावर नियंत्रण प्रस्थापित करणे हा त्यामागचा महत्त्वाचा उद्देश होता. याचा दूरगामी परिणाम शाहू महाराज यांच्या पूर्वी आणि शाहू महाराजांच्या नंतर म्हणजेच राजाराम महाराजांपर्यंत झाला.

२) ब्रिटिशांनी प्रत्येक प्रांतामध्ये आणि संस्थानामध्ये आपल्या साम्राज्यविस्ताराच्या धोरणाचा विस्तार करण्यास सुरुवात केली. त्याचवेळी त्यांनी भारताला त्यांनी अनेक आधुनिक मूल्यांचा आणि आधुनिक शिक्षण पद्धतीचा परिचय करून दिला. त्याचा परिणाम असा झाला की, भारतातील जनतेला विशेषतः संस्थानिकामधील आणि समाजातील अभिजात वर्गांना आधुनिक मूल्यशिक्षणाचा, इतिहासाचा, तत्त्वज्ञानाचा, प्रशासकीय व्यवस्थेचा, पाश्चिमात्त्य तत्त्वज्ञानाचा, मूल्यव्यवस्थेचा, शास्त्रांचा परिचय झाला. या आधुनिक मूल्यव्यवस्थेच्या आधारे भारतीय समाजातील सजग आणि जागृत जनता भारतीय परंपरेतील इतिहासातील खाच-खळगे समजून घेण्याचा प्रयत्न करू लागली. त्याचा परिणाम म्हणून शाहू महाराज आणि राजाराम महाराज

यांच्या काळात पाश्चिमात्त्य शिक्षण, शेती, औद्योगिकीकरण, दळणवळण यांसारख्या महत्त्वाच्या भौतिक सुविधेचा परिचय झाला .

३) ब्रिटिशांनी आपल्या धोरणाचाच भाग म्हणून भारतामध्ये पाश्चिमात्य शिक्षणासोबतच मुद्रणकला व वृत्तपत्र कला विकसित केली. सुरुवातीला त्यांनी ही साधने ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या प्रचार आणि प्रसार, ब्रिटिशांचे अहवाल लेखन, भारतीय समाजातील अंतर्विरोध, इतिहास, परंपरा समजून घेण्यासाठी वापरली. त्यानंतर भारतातील सुशिक्षित व पाश्चिमात्त्य ज्ञानाचा परिचय असलेल्या अभिजन वर्गाने मुद्रणकला, वृत्तपत्र कलेचा वापर भारतीय समाजात प्रबोधन करणे, जागरूकता निर्माण करणे यासाठी केला. त्याचा परिणाम असा झाला की मुद्रणकला आणि वृत्तपत्र याची सुरुवात इंग्रजी भाषेत केली होती, तरी पण भारतातील प्रादेशिक किंवा प्रांतीय सुशिक्षित वर्गाने आपल्या मातृभाषेत त्यांचा विकास आणि विस्तार केला. ब्रिटिशाने आणलेल्या या साधनांचा उपयोग एका बाजूला समाजात राजकीय जागृती निर्माण करण्यासाठी तर झालाच; पण दुसऱ्या बाजूला समाजातील, धार्मिक कर्मकांड, वाईट चालीरीती, जातीग्रस्त मानसिकता, शिक्षणाबद्दलची उदासीनता, निरक्षरता यावर प्रहार करण्याची जाणीव करून देण्यासाठी झाला. इंग्रजांनी परिचित करून दिलेल्या मुद्रणकला आणि वृत्तपत्र कला विस्ताराचा उपयोग भारतातील विविध समाजघटकांचे प्रबोधन करण्यासाठी झाला .

४) ब्रिटिश साम्राज्यवादाचा आणखी एक परिणाम भारताच्या सामाजिक आणि आर्थिक धोरणावरती झाला. तो म्हणजे भौतिक सुविधांची उपलब्धता. ब्रिटिशांनी आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्यासाठी भारतातील विविध प्रांतात नवीन महामार्ग, पोस्ट, तारायंत्र व रेल्वे यांचा विस्तार केला. याचा परिणाम असा झाला की, भारत हा देश एका विस्तारित स्वरूपामध्ये एकमेकांत दळणवळणाच्या सुविधेमुळे जोडला गेला. भारतातील प्रमुख शहरे आणि बंदरे एकमेकांशी जोडले गेले आणि त्यामुळे इतर प्रांतात होणाऱ्या घडामोडी किंवा गतिशीलता सर्वाधिक संधी विविध प्रांतातील आणि संस्थानातील लोकांना कळू लागल्या.

५) ब्रिटिशांनी भारतामध्ये कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे कारखाने निर्माण केले आणि इथे औद्योगिक क्रांतीची सुरुवात केली. मात्र या कारखान्यातून भारतातील श्रमजीवी आणि कच्चा माल उत्पादक घटक यांचे शोषण करणे शक्य झाले. कोलकाता शहरात ज्यूटचा आणि मुंबई

शहरात कापड गिरण्यांची सुरुवात झाली आणि कोल्हापूर व इतर संस्थांनातील हातमागावर कापड उत्पादित करणाऱ्या घटकांवर त्याचा विपरीत परिणाम झाला.

६) ब्रिटिशांच्या आधुनिक शिक्षणाचा परिणाम म्हणून भारतातील समाजात सामाजिक आणि राजकीय प्रबोधनाची गरज आहे, याची जाणीव अभिजनांमध्ये निर्माण झाली. या जाणीवेतूनच त्यांनी आधुनिकता, आधुनिक शिक्षण, आधुनिक मूल्यव्यवस्था यांसारख्या संकल्पना आपल्या जीवनात आणि व्यवहारात आत्मसात केल्या. त्यामुळे भारतातील सामाजिक आणि राजकीय सुधारणेला गती प्राप्त झाली. याचाच परिणाम म्हणून भारतात आणि महाराष्ट्रामध्ये विविध सामाजिक सुधारणेला सुरुवात झाली. ब्राह्मो समाज, आर्य समाज, सत्यशोधक समाज, प्रार्थना समाज यासारख्या सामाजिक आणि राजकीय सुधारणा चळवळींचा विकास होऊ लागला. आर्य समाजाचा परिचय छत्रपती शाहू महाराज यांना झाल्यामुळे जाती व्यवस्थेच्या विरोधात व अस्पृश्य प्रथा यांच्या विरोधात लढण्याची प्रेरणा त्यांना मिळाली.

७) १८१८ मध्ये महाराष्ट्रातील पेशव्यांची सत्ता संपुष्टात आली. इंग्रजांचा अंमल सुरू झाला. पेशव्यांची सत्ता संपुष्टात येणे ही जशी अंतर्गत बाब आहे तशी ती बाह्य सुद्धा बाब आहे, या घटनेचा दूरगामी परिणाम मराठा साम्राज्यावर झाला. दिल्लीची सत्ता काबीज करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगणारे पेशवे पराभूत झाल्याने मराठी साम्राज्याच्या अंतावर शिक्कामोर्तब झाले. अंतर्गत मतभेदामुळे शिंदे–होळकरांसारखे संस्थानिक एकमेकांचे प्रदेश लुटत असत. यातून मराठा साम्राज्य कमकुवत होण्यास तेव्हाच सुरुवात झाली होती. याचाच प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष फायदा ब्रिटिशांना झाला.

८) पेशव्यांची सत्ता संपुष्टात आल्यावर मराठी सत्तेमध्ये एक मोठी पोकळी निर्माण झाली. ही गोष्ट ब्रिटिशांच्या लक्षात आली. त्यामुळे त्यांनी ही पोकळी भरून काढली नाही, तर महाराष्ट्रातील तमाम मराठी भाषिक लोकांचा रोष आणि विरोध पत्करावा लागेल, ही बाब लक्षात घेऊन त्यांनी साताऱ्याच्या छत्रपतीचे पुनरुज्जीवन केले. म्हणजे छोटे मराठी राज्य निर्माण करून छत्रपती प्रतापसिंह यांचा राज्याभिषेक करून प्रतिकात्मक पातळीवर मराठी राज्य निर्माण केल्याच्या भास इंग्रजांनी केला.

त्यानंतर लगेच १८३९ मध्ये विविध कारस्थाने करून अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न केला; पण त्यात ते फारसे यशस्वी झाले नाहीत. मात्र साताऱ्याची गादी ही नेहमी अस्थिर कशी राहील, कट – कारस्थानांमध्ये व्यस्त कशी राहील, याची काळजी त्यांनी घेतली. लगेच १८३९ ला प्रतापसिंह यांना पदच्युत केले. दहा वर्षांनंतर दत्तक वारस नामंजूर करून साताऱ्याचे राज्य खालसा करून टाकले. पेशवाई अस्तानंतर सातारा आणि कोल्हापूर ही दोनच मराठी सत्ताकेंद्रे राहिली होती. त्यापैकी एक सातारा ब्रिटिशांनी संपुष्टात आणले आणि राहिली एक गादी ती म्हणजे कोल्हापूरची.[२]

## ६) ब्रिटिश आणि कोल्हापूर संस्थान

ब्रिटिशांनी आपला साम्राज्यविस्तार विविध प्रांतांमध्ये आणि संस्थानांमध्ये करण्यास सुरुवात केली. ब्रिटिश आपल्या राज्यकारभार प्रांतांमध्ये प्रत्यक्ष पद्धतीने चालवत असत तर संस्थानांमध्ये तो अप्रत्यक्ष पद्धतीने चालवतात. विशेषतः संस्थानिक व जहागिरदार यांच्याशी करार करून इंग्रजानी त्यांना पूर्णपणे आपल्या अंकित केले होते. त्याचा परिणाम इंग्रजांच्या सत्ता असलेल्या हिंदुस्थानाचे दोन भागात विभाजन करण्यात आले. १. इंग्रजी अंमलाखालील असणारा भाग म्हणजे खालसा प्रदेश २. संस्थानिकाच्या ताब्यात असणारा भाग म्हणजे संस्थानिक प्रदेश.

अशा दोन भागांमध्ये इंग्रजांची सत्ता भारतात नियंत्रित होत होती. दोन भाग जरी प्रशासनाच्या दृष्टिकोनातून वेगवेगळे असले, तरी त्यामध्ये इंग्रज सत्ता आपल्या प्रशासकाच्या माध्यमातून किंवा प्रतिनिधीच्या माध्यमातून संस्थांनात होती किंवा जहागिरदार यांच्यावरती नियंत्रण प्रस्थापित करत होती. यातून कोल्हापूर संस्थान हे अपवाद नव्हते. त्यामुळे कोल्हापूर संस्थानालासुद्धा त्यांनी आपल्या नियंत्रणाखाली आणले होते. छत्रपती शिवाजी महाराज (दुसरे) यांच्या कारकिर्दीत सन १८१२ मध्ये इंग्रजांनी लादलेल्या करारातून पूर्णपणे आपल्या नियंत्रणाखाली आणले होते. छत्रपती शिवाजी महाराज (दुसरे) आणि इंग्रज यांच्यामध्ये एक करार झाला होता 'इंग्रज सरकारचा सल्ला घेतल्याशिवाय छत्रपती कोणत्याही परकीय सत्तेशी

[२] वरील सर्व माहिती ही डॉ. जयसिंगराव पवार यांच्या 'भारताच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास, फडके प्रकाशन, पुणे; तसेच ए. आर. देसाई यांचे Social Background Power of indian Nationalism या पुस्तकांमधील संदर्भ दिले आहेत.

लढाई करू नये, असा काही प्रसंग उद्भवल्यास तर प्रथम इंग्रजाकडे ते प्रकरण सोपवावे आणि त्यांनी त्याची तड लावावी.[११] वरील कराराचे नियम पाहिले असता आपणास हे स्पष्टपणे सांगता येते की, कोल्हापूर संस्थानाचे बाह्य आणि अंतर्गत सार्वभौमत्व नष्ट झालेले होते. कोणत्याही प्रकारचा निर्णय हा इंग्रजांच्या सल्ल्याशिवाय आणि मदतीशिवाय घेतला जाऊ नये आणि घेतला असेल तर तो पूर्णपणे इंग्रजाच्या नियंत्रणाखाली घेतला जावा, असे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष नियंत्रण ब्रिटिश सरकारचे होते.

तेव्हापासून ब्रिटिशांचा कोल्हापूर संस्थानांमध्ये हस्तक्षेप वाढत जात होता. १८२९ मध्ये इंग्रजांनी आपल्या धोरणानुसार कोल्हापूर संस्थानाचा लष्कराचा महत्त्वाचा अधिकार काढून घेतला. किंबहुना असे म्हणता येईल की, लष्करी अधिकारावर ब्रिटिशांची मालकी किंवा नियंत्रण प्रस्थापित झाले. 'इंग्रजांनी कोल्हापूर राज्याच्या लष्करावर मर्यादा घातल्या आणि लवकरच छत्रपतींचा कारभार चांगल्या प्रकारे चालविता यावा म्हणून कंपनी सरकारच्या पसंतीच्या एका योग्य अधिकाऱ्याची नेमणूक केली जाईल. त्याच्याकडेच कारभारासंबंधीची मुख्य जबाबदारी देण्यात आली.[१२] त्यामुळे याचा परिणाम असा झाला की, कोल्हापूर संस्थानाने कोणताही राजा किंवा छत्रपती निवडला असला, तरी त्यांना छत्रपतींच्या लष्करी व मुलकी अशा दोन्ही महत्त्वाच्या क्षेत्राची सूत्रे ही कंपनी सरकारच्या हाती गेली. कोल्हापूर संस्थान अंतर्गत आणि बाह्य अस्थिरता निर्माण झाली.

ताराराणी यांनी कोल्हापूर संस्थान निर्माण केले. तत्कालीन परिस्थितीत एका स्त्रीने एक संस्थान निर्माण करणे ही बाब अत्यंत स्वाभिमानाची आणि आत्मसन्मानाची होती. औरंगजेबाशी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करून मराठा साम्राज्याचा विस्तार आणि स्थिरता निर्माण करण्यात ताराराणी यांचे महत्त्वाचे योगदान आहे. १८१५ ते १८८४ या कालखंडामध्ये कोल्हापूर संस्थानामध्ये नेहमीच अस्थिरता आणि गोंधळाचे वातावरण राहिले आहे. एका बाजूला नोकरशाही, दिवाणशाही यांच्या हातात कोल्हापूरचे राज्य असल्यामुळे बेबंदशाही आणि अराजकतेचे वातावरण निर्माण झाले होते.[१३] या अस्थिरतेला ताराराणी यांनी समर्थपणे प्रतिकार केला.

## ७) शाहू महाराजांचा जन्म आणि वैचारिक जडणघडण

शाहू महाराजांचा जन्म एका परिवर्तनवादी पुरोगामी वातावरणातील घरात झाला. शाहू महाराजांचे वडील आबासाहेब घाटगे हे अत्यंत उच्च शिक्षित होते. १८८२ मध्ये ते कोल्हापूरचे रिजंट होते. त्यांनी आपल्या जहागिरीमध्ये म्हणजेच कागल सारख्या छोट्या जहागीरमध्ये ११ मुलांच्या शाळा आणि एक मुलींची शाळा व दोन इंग्रजी शाळा स्थापन केल्या होत्या. यावरून आपल्याला लक्षात येते की, आबासाहेब हे किती सुसंस्कृत व पुरोगामी विचारांचे व्यक्तिमत्त्व होते. याचा प्रभाव शाहू महाराजांवर होता. त्यासोबत शाहू महाराजांचे लहानपणापासून अत्यंत संवेदनशील व विचारशील व्यक्तिमत्त्व होते,. असे निरीक्षण खुद्द शाहू महाराजांच्या वडिलांनी नोंदवले आहे.[१४] शाहू महाराज हे स्वभावाने निकोप व सरळ मनाचे साधे, दिलदार, सत्यनिष्ठ व निःस्वार्थी, एक उच्चकुलीन क्षत्रीय होते. सामान्य माणसाचे गुणधर्म बाळगणारे एक प्रसन्न असे गृहस्थ होते, असा दावा राजर्षी शाहू महाराजांच्या गुरु सर एस. एम. फ्रेझर यांनी केला आहे.[१५] यावरून राजर्षी शाहू महाराजांचे बालपण व व्यक्तिमत्व याचा विकास कोणत्या दिशेने होत होता, याची कल्पना आपणास येते. शाहू महाराजांना दत्तक वारस म्हणून स्वीकारल्यानंतर सर एस. एम. फ्रेझर आणि रघुनाथराव सबनीस या दोघांची शाहू महाराजांचे ट्यूटर व गार्डियन म्हणून नियुक्ती करण्यात आली. ती त्यांनी यशस्वीरीत्या पार पडली. शाहू महाराजांच्या एकूण धोरणांमध्ये आणि व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीमध्ये या दोघांच्या महत्त्वाच्या भूमिका आहेत, याबाबतीत शंकाच नाही. त्यासोबत राजर्षी शाहू महाराजांवर आधुनिक शिक्षणाचा प्रभाव होता .आर्य समाज व इतर अनेक पंडित यांनी शाहू महाराजांच्या विचारांची जडणघडण केली.

या सर्व अंतर्विरोधाच्या परिस्थितीमध्ये छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतली. सत्ता घेताना त्यांनी आपला निश्चय व मनोदय अभिव्यक्त करताना प्रजेला उद्देशून त्यांनी पहिला जाहीरनामा काढला आणि तो जाहीरनामा म्हणजे, ''आमचे प्रजाजन सदा सुखी व संतुष्ट असावे, त्यांच्या हितसंबंधाची एकसारखी अभिवृद्धी होत जावी व आमचे संस्थान सर्व बाजूने आबादीआबाद व्हावे, अशी आमची उत्कट इच्छा आहे. हा उद्देश सफल होण्याच्या कामी आमचे जहागीरदार, आप्तजन, सरदार, मानकरी, इनामदार, कामगार सर्व दर्जाचे शेठ, सावकार व इतर प्रजाजन यांच्या उज्ज्वल राजनिष्ठेची व सहकार्याची आम्हाला

आवश्यकता आहे. आज आमच्या आमदानीला सुरुवात होणार. या दिवशी आमचा राज्यकारभार दिव्य काळापर्यंत टिकून तो सुकर व्हावा, म्हणून आम्ही त्या परात्पर जगच्चालकाच्या अनुग्रहासाठी प्रार्थना करीतो.'' [१६]

## ८) राजर्षी शाहू महाराजांचे योगदान

दि. २ एप्रिल १८९४ रोजी राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे आपल्या हातात घेतली. त्यादिवसापासून भारताच्या इतिहासामध्ये कोल्हापूर संस्थानाचा इतिहास हा सोनेरी अक्षरात लिहिला गेला आहे. छत्रपती शाहू महाराजांनी जेव्हा संस्थानाच्या राज्यकारभाराची सुत्रे हातात घेतली, तेव्हा महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये अनेक सामाजिक सुधारणा केल्या. त्याचे राजकीय पुढाऱ्यांनी कौतुक केले आहे. गोपाळ कृष्ण गोखले याच्याकडून 'सार्वजनिक सभे'तर्फे पुण्यात शाहू महाराजांचे कौतुक करण्यात आले. त्यावेळी शाहू महाराजांबद्दल जे उद्‌गार काढले ते म्हणजे, ''कोल्हापूरची गादी म्हणजे मराठ्यांच्या पराक्रमाचे आज हयात असलेले दृश्य चिन्ह आहे. असे सर्वांना वाटत असून गादीवर आरूढ होणाऱ्या छत्रपतींविषयी अखिल महाराष्ट्रातील लोकांना व प्रत्यक्ष त्यांच्या छत्राखाली नसलेल्या लोकांना देखील नेहमी पराकाष्ठेचे प्रेम व आदर वाटत राहील. आपल्या प्रजाजनांचे सौख्य व प्रगती साधणे आपले पहिले कर्तव्य आहे यात तीळमात्र शंका नाही. तथापि सामान्यपणे आपण सर्वांच्या मातृभूमीच्या विशेषत: महाराष्ट्राचा अभ्युदयासाठी प्रयत्न करणे हे आपले कर्तव्य आहे. आपल्या संस्थानाच्या प्रजननांमध्ये संबंधित असलेल्या आपल्या कर्तव्याच्या खालोखाल हे एक महत्त्वाचे कर्तव्य आहे.''[१७] तर लोकमान्य टिळक यांनी आपल्या 'दै. केसरी'तील अभिनंदनपर लेखात लिहिले होते की, ''हा दिवस सर्व महाराष्ट्रीयन जनतेनी आनंदाचा तर कराच पण त्याहूनही कोल्हापूरच्या प्रजेस हा एक कपिलाषष्ठीचा अपूर्व योग होता.'' [१८] यावरून महाराजांकडून अपेक्षा आणि त्यांच्या कर्तृत्वावर असलेला ठाम विश्वास याची प्रचिती येते. शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हातात घेतली, तेव्हापासून कोल्हापूर संस्थानांमध्ये आणि महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये सामाजिक आणि राजकीय सुधारणेला गती मिळाली. पण त्यासोबत सामाजिक न्याय, स्त्री–पुरुष समानता, शेतीचा विकास, लोककल्याणकारी कार्यक्रम,

जातीव्यवस्था निर्मूलन यासारख्या महत्त्वाच्या धोरणाला भारतात सुरुवात झाली, हे महत्त्वाचे आहे.

## १. राजर्षी शाहू महाराज –उत्तम प्रशासक

छत्रपती शाहू महाराजांनी सत्ता हातात घेतल्यावर त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. एका बाजूला ब्रिटिश शासनाचा प्रशासकीय हस्तक्षेप होता. ब्रिटिशांनी वेळोवेळी केलेले बदल हे त्या संस्थानिकांना अंमलबजावणी करणे सक्तीचे होते. त्यामुळे त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. शाहू महाराजांनी आपल्या शैक्षणिक जीवनात ब्रिटिशांच्या प्रशासकीय व्यवस्थेचा अभ्यास केल्यामुळे त्यांच्या निर्णयाला आणि नियंत्रणाला सोडून अंमलबजावणी कशी करायची आणि लोककल्याणकारी कामे कशी करायची हे शाहू महाराजांना जवळून माहिती होते. सत्तेची सूत्रे हाती घेतल्यानंतर या समस्या निर्माण होतील, ही त्यांना जाणीव होती. त्यामुळे त्यांनी ब्रिटिशांच्या प्रशासकीय व्यवस्थेचा सखोल अभ्यास करून प्रश्न सोडवले. दुसऱ्या बाजूला प्रशासनामध्ये प्रचंड आर्थिक नियोजनाच्या समस्यांना सामोरे जावे लागते, खर्च कसा करायचा याचा ताळमेळ नव्हता. म्हणून शाहू महाराजांनी त्याच्या नियोजनासाठी स्वतः प्रशासन हाती घेतले आणि प्रशासनामधील पहिली आणि महत्त्वाची माहिती शाहू महाराजांपर्यंत कशी येईल याचे नियोजन शाहू महाराजांनी केले.

शाहू महाराज यांनी प्रशासनामध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडली. शाहू महाराज यांनी आपल्या हातात राज्यकारभाराची सूत्रे घेतल्यानंतर सर्व विभाग आणि राज्यकारभार त्यांच्या नियंत्रणाखाली होते. धोरणात्मक पातळीवर आणि अंमलबजावणीच्या पातळीवर त्यांचे नियंत्रण होते, त्यामुळे त्यांना प्रशासनात आमूलाग्र बदल करण्यात पुरेसा वाव मिळाला. त्यांनी केवळ प्रशासनात सुसूत्रता आणली नाही, तर प्रशासनाच्या धोरणात्मक पातळीवर आणि व्यवहाराच्या पातळीवर अतिशय समताधिष्ठित निर्णयाची अंमलबजावणी केली. ते उत्तम प्रशासक आणि दूरदृष्टीचे राजकीय नेतृत्व होते. राजर्षी शाहू महाराजांच्या पूर्वीपासून प्रशासनामध्ये अनेक अडचणी आणि विषम अशा धोरणांचा समावेश होता.

एका बाजूला त्यांच्या राज्यात अराजकतेचे आणि गोंधळाचे वातावरण होते. त्यामुळे त्यांनी सर्व अंतर्गत कलह मिटवून शांतता आणि सुव्यवस्था निर्माण केली. एका बाजूला

प्रशासनामध्ये अभिजन वर्गाचे वर्चस्व जास्त होते त्यामुळे लोकांपर्यंत जी माहिती, धोरणं यांची अंमलबजावणी करण्यात खूप मोठ्या अडचणी येत. दुसऱ्या बाजूला ब्रिटीशांचे राज्य असल्यामुळे त्यांना त्यांच्या मनाप्रमाणे व इच्छेप्रमाणे निर्णय घेता येत नसत. त्यामुळे शाहू महाराजांनी प्रशासनात खूप मोठे बदल केले.

शाहू महाराजांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेण्यापूर्वी प्रामुख्याने प्रशासनाची लोकांप्रती उदासीनता व ढिसाळ व्यवस्थापन आणि अनियोजनामुळे आर्थिक खर्च मोठ्या प्रमाणात होत असत. लोकांकडून अनेक शासकीय वसुल्या सक्तीने आणि जबरदस्तीने केल्या जात असत. त्यामुळे राज्याप्रती जनतेमध्ये असलेली उदासिनता दूर होऊ शकेल असे अनेक महत्त्वाचे आणि क्रांतीकारक निर्णय घेतले.

## २. लोकसंपर्क अभियान

लोकांच्या व्यक्तिगत अडचणी कोणत्या आणि कशा प्रकारच्या आहेत, त्यांना भेडसावणारे प्रश्न कोणते, त्यांचे शोषण कोण करत आहे व त्यांच्यावर अन्याय कोण करत आहे, हे समजून घ्यायचे असेल, तर लोकांशी प्रत्यक्ष बोलले पाहिजे, याची जाणीव छत्रपती शाहू महाराज यांना होती. त्यामुळे राज्यकारभाराची सुत्रे स्वीकारल्यानंतर संस्थानातील विविध भागातील लोकांशी प्रत्यक्ष बोलण्यासाठी लोकसंपर्क अभियान राबविले. सप्टेंबर १८९४ ला शिरोळ तालुक्यात आपला दौरा काढून त्यांनी लोकांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यांच्याच प्रशासन व्यवस्थेतील श्री लट्ठे यांनी आपल्या चरित्रात शाहू महाराजांच्या लोकांना प्रत्यक्ष भेटण्याबद्दलचे मत नोंदवले आहे की, "His Highness inspected the different Petas and visited some of the principal villages in each. The tour commenced with the inspection of the Gadhinglaj Peta wherein are situated sane of the places notorious for the depredations and other atrocities of the Berad gang. His Highness talked, as is his wont, to the prisoners under trial who were confined in the Peta Kacheri cells. Most of them, of course, piea dad innocence. One of them, however, complained that he had been under trial for months and only wished for speedy justice. His Highness took note of it and after due inquiry of the matter, a circular was issued calling upon all Magistrates to furnish monthly returns of prisoners, remaining under trial for more than a month, with statement of reasons for the same.''[१९] शाहू महाराजांनी पदाची सूत्रे

हाती घेतल्यानंतर संस्थानातील सर्व ठिकाणी प्रवास केल्याचे आपले अचूक निरीक्षण वरील विधानावरून मांडले आहे. किती बारीक व तपशीलवार निरीक्षण करून संस्थानातील सामान्य लोकांचे प्रश्न समजून घेण्याचा प्रयत्न आपल्या राजकीय जीवनाच्या पूर्वार्धात शाहू महाराजांनी किती प्रामाणिकपणे केला आहे हे आपणास वरील विधानावरून लक्षात येते.

## ३. बहुजनांचे प्रशासन

शाहूपूर्व काळातील प्रशासन व्यवस्था ही अभिजनांच्या हाती होती. त्यामुळे त्याचे व्यापक स्वरूप नव्हते. शिक्षित वर्गातील बहुजन समुदायांच्या आणि प्रशासकीय सेवेतील नोकराचे प्रमाण खूप कमी होते. ही बाब शाहू महाराजांना नेहमीच दखलपात्र वाटत होती. कोल्हापूर संस्थानात १८९१ मध्ये ९१३.१ हजार तितक्या लोकसंख्येपैकी ८०१.० हजार इतकी लोकसंख्या ही ग्रामीण भागात राहत होती. शेती हा त्यांचा प्रमुख व्यवसाय होता त्यावरच ते आपली उपजिविका करत असत. त्यामुळे नोकरी आणि शिक्षणाचे प्रमाणही अतिशय कमी होते. म्हणजे लिहिता आणि वाचता येणाऱ्यांची संख्या ही २६.५ हजार म्हणजे २.८% होती. यामध्ये महिलांची संख्या ही केवळ एक हजार होती. कोल्हापूरच्या एकूण लोकसंख्येपैकी ३.५ टक्के लोक सेवा क्षेत्रात कार्यरत होते. उरलेले ७५ टक्के लोक शेती करत होते.[२०] आठ टक्के लोक घरगुती लघुउद्योगावर गुजराण करीत होते. त्यामध्ये सूत कातणे, कातडी कमावणे, दोर वळणे, सुतारकाम, लोहारकाम किंवा शिवणकाम, मातीकाम यासारख्या छोट्या पारंपरिक उद्योगांचा समावेश होता.[२१] शाहू महाराजांच्या पूर्वी कोल्हापूर संस्थानामध्ये शिक्षण संस्था नव्हत्या. हजारो वर्ष शिक्षणाची संधी नाकारलेला हा समाज अंधश्रद्धाळू, जातीभेद, धर्मभेद व उच्चनीचता यांमध्ये विभागलेला होता. आपल्या धार्मिक कर्मकांडाच्या प्रभावामुळे शिक्षणाची गरज वाटत असली तरी त्यांना उपलब्ध संधी खूप कमी होती आणि त्याचे प्रतिबिंब शासकीय सेवेत आणि नोकऱ्यांमध्ये दिसत होते. ही सर्व वस्तुस्थिती पाहून शाहू महाराजांना बहुजनांसाठी कष्टकऱ्यांसाठी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली. त्यांना प्रशासकीय सेवेत नोकरी करण्याची संधी उपलब्ध करून दिली. त्यासाठी त्यांनी घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयापैकी एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे 'रघुनाथ सबनीस' यांची नेमणूक तर दुसरा महत्त्वाचा निर्णय म्हणजे सन १८९५ मध्ये भास्करराव विठोजी जाधव महसूल खात्यात सुरुवातीस

'असिस्टंट' म्हणून आणि नंतर 'फर्स्टक्लास मॅजिस्ट्रेट' म्हणून नेमणूक केली. त्यासोबतच दाजीराव विचारे या दुसऱ्या महत्त्वाच्या तरुणाची 'एक्सिक्यूटिव्ह इंजिनीअर' म्हणून निवड करण्यात आली.'[२२]

## ४. प्रशासकीय बदल

छत्रपती शाहू महाराजांनी सत्तेची सूत्रे हाती घेतल्यानंतर प्रशासनामध्ये खूप महत्त्वाचे बदल केले. जनसामान्यांना, कष्टकऱ्यांना न्याय मिळावा, समानतेची वागणूक मिळावी आणि प्रजा ही सुखी आणि समृद्ध व्हावी, हा त्यामागचा मुख्य उद्देश होता. शाहू महाराजांनी पूर्वीचे राज्य प्रतिनिधी मंडळ बरखास्त केले आणि त्याच्या जागी नवे प्रशासन मंडळ नेमले. सरन्यायाधीश, दिवाण आणि सरसुभे अशा तीन प्रमुख अधिकाराचे मंडळ होते. या प्रशासन मंडळासोबत शाहू महाराजांनी आणखी एक महत्त्वाचे खाते निर्माण केले आणि ते म्हणजे हुजूर ऑफिस. केवळ प्रशासकीय यंत्रणा श्रेणीबद्ध बदलली नाही, तर त्यासोबत त्यापेक्षा शाहू महाराज पूर्वी प्रशासनामध्ये अभिजन वर्गाचे प्रतिनिधित्व जास्त होते. शाहू महाराजांनी या प्रशासनामध्ये शोषित वंचित लोकांना प्रतिनिधित्व कसे मिळेल यासाठी त्यांनी महत्त्वाचे निर्णय घेतले. हा निर्णय जरी वरकरणी महत्त्वाचा वाटत नसला, तरी प्रस्थापित सत्तेला आव्हान देणारा होता. प्रशासनामध्ये अभिजन वर्गाची मक्तेदारी होती आणि तसा अविर्भाव अभिजन वर्गाकडून नेहमी केला जायचा. त्याला हे खऱ्या अर्थाने आव्हानच नाही, तर पर्याय म्हणून पाहत होते हे शाहू महाराजांचे महत्त्वाचे योगदान आहे.

## ५. लोककल्याणकारी प्रशासकीय धोरणे

राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतल्यानंतर अवघ्या १२ दिवसांमध्ये लोककल्याणकारी धोरणाची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली. त्या अनुषंगाने त्यांनी दिलेले काही निवडक आदेश खालीलप्रमाणेः

१) गहू, ज्वारी, तांदूळ, डाळ वगैरे धान्य, साखर, मसाला वगैरे सामुग्री खुद्द हूजूरचे मुदपाकखान्याकडे स्वारीच्या लोकांकरिता लागेल, ती यथाशक्य सर्व कोल्हापूरहून खाजगी खात्याकडून नेण्यात यावी.

२) बकरी, कोंबडी, अंडी हे जिन्नस घेण्याकरिता स्वारी निघण्याचे अगोदर खासगीकडील मुद्दाम एक कामगार पाठविण्यात यावा. त्याचे मुक्कामाचे ठिकाण नजीक जो बाजारगाव असेल त्या गावी बाजाराच्या दिवशी जाऊन सर्व जिन्नस मालकास रोख पैसे जेव्हाचे तेव्हा, जेथल्या तिथे देऊन घ्यावी, सर्पणाबद्दलही त्याचप्रमाणे आगाऊ तजवीज करावी. सामानाच्या पैशाचा बटवडा करणे तो त्यावेळी मुलकी कामगार गावी हजर असल्यास त्याच्यासमोर पैसा अदा करून त्याची सही घ्यावी. तसा कोणी नसल्यास गावकामगार पाटील – कुलकर्णी यांचे समक्ष पैसे अदा करून मालकाची पावती घ्यावी व कामगारांची साक्ष घ्यावी.

३) दुधाबद्दल खाजगी थट्टीपैकी म्हैशी स्वारीबरोबर नेण्याची तजवीज ठेवावी. कदाचित ही तजवीज न घडेल, तर खाजगी खात्याकडील वर नमूद केलेले कामगारांनी किंवा कारकुनाने नजीकच्या गावाचे इसमाकडून स्वतः दूध घेऊन मालकास गावी भाव असेल त्याप्रमाणे ताबडतोब जेथल्या तेथे सर्व पैसे चूकवून द्यावा. स्वारीचा कूच होईपर्यंत ठेवू नये.

४) गवत सरकारी कुरणे बहुतांश सर्व पेट्यानिहाय आहेत सबब लोकांकडून हे जिन्नस घेण्याचे कारण नाहीच. कदाचित प्रसंगोपात् खरेदी करावा लागल्यास रोख पैसा मालकास जेव्हाचे तेव्हा देऊन घ्यावा.[२३]

राजर्षी शाहू महाराज हे शिवभक्त होते. शककर्ते शिवाजी महाराजांच्या कार्याची प्रेरणा घेऊनच त्यांनी राज्यकारभार सुरू केला. शककर्ते शिवाजी महाराजांनी ज्याप्रमाणे रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका, अशा सूचना आपल्या सैन्याला केल्या होत्या, त्याप्रमाणे राजर्षी शाहू महाराजांनी वरील उल्लेखित आदेशात सूचना केल्या होत्या.

### ६. कुलकर्णी वतनाची बरखास्ती

कुलकर्णी वतन हे पारंपरिक प्रशासकीय रचनेतील महत्त्वाचे आधार होते. याच्या माध्यमातून गावाच्या पातळीवरील गावाचा महसूलसंबंधी दप्तर, जमीन नोंदणीची दप्तर, सरकारशी केलेला पत्रव्यवहार हा सर्व गावातल्या कुलकर्णी वतनाच्या माध्यमातून केला जायचा. तसे पाहता या सर्व बाबी प्रशासकीय रचनेशीनिगडीत असल्या तरी त्या माध्यमातून लोकांचे शोषण मोठ्या प्रमाणात केले जात होते. कुलकर्णी हे गावाच्या पातळीवरती सावकारी पैश्याच्या

माध्यमातून लोकांना मोठ्या प्रमाणात लुबाडत असत. त्यामुळे कुलकर्णी वतन हे केवळ प्रशासकीय वतन न राहता लोकांना लुबाडून, त्यांचे शोषण करून उभी राहिलेली प्रशासकीय व्यवस्था होती. शेतकऱ्यांची पैशाची नड आणि गरज पाहून व्याज आकारला जाई आणि अमाप असा व्याज आकारलेल्या पैशाच्या बदल्यात त्या शेतकऱ्यांची जमीनसुद्धा कुलकर्णीकडून बळकावली जात असल्याची नोंद अनेक इतिहासकारांनी आणि अनेक तज्ज्ञांनी घेतली आहे. त्यामुळे या कुलकर्णी वतन बरखास्तीचा निर्णय शाहू महाराजांनी घेतला. २८ फेब्रुवारी १९१८ मध्ये कोल्हापूर संस्थानात कुलकर्णी वतन खालसा करण्याचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. कुलकर्णी वतन नष्ट करून शाहू महाराजांनी ग्रामपंचायतीच्या माध्यमातून तलाठ्याची नेमणूक केली.

**७. आरक्षणाचा निर्णय**

राजर्षी शाहू महाराजांनी २६ जुलै १९०२ मध्ये शिक्षणात बहुजन समाजाला आरक्षणाचा निर्णय घेऊन महत्त्वाचे आणि क्रांतिकारक पाऊल उचलले. दलित आणि बहुजन समाज हा शिक्षणापासून वंचित आहे. त्याच्या गरिबीचे मुख्य कारण शिक्षण आहे. त्यांना जर पुढे घेऊन जायचं असेल, जर त्यांना शिक्षणात प्रगती करायची असेल, तर त्यांना शिक्षणामध्ये आणि नोकरीमध्ये आरक्षण असणे गरजेचे याची जाणीव राजर्षी शाहू महाराजांनी होती. या जाणिवेतूनच त्यांनी दि. २६ जुलै, १९०२ मध्ये शिक्षणात आणि नोकरीत बहुजन समाजाला आरक्षण ठेवण्याचा हुकूम जाहीर केला. या हुकूमात ते म्हणतात, ''सध्या कोल्हापूर संस्थानामध्ये सर्व वर्णाच्या प्रजेस शिक्षण देण्याबद्दल व त्यास उत्तेजन देण्याबद्दल प्रयत्न केले आहेत. परंतु सरकारच्या इच्छेप्रमाणे मागासलेल्या लोकांच्या स्थितीत सदरहू प्रयत्नात जितके हवे तितके यश आले नाही. हे पाहून सरकारास फार दिलगिरी वाटते, या विषयाबद्दल काळजीपूर्वक विचारांती सरकारने असे ठरविले आहे की, देशाच्या हिताच्या यशाच्या या अभावाचे खरे कारण उच्च प्रतीच्या शिक्षणास मोबदला पुरेसा दिला जात नाही हे होय. या गोष्टी काही अंशी तोड काढण्याकरिता व उच्चप्रतीच्या शिक्षणापर्यंत महाराज सरकारच्या प्रजाजनांपैकी मागासलेल्या व अभ्यास करावे म्हणून उत्तेजनादाखल आपल्या संस्थानाच्या नोकरीचा आजपर्यंत चालू असलेल्या पैकी बराच भाग, बराच मोठा भाग या लोकांकरिता राखून ठेवणे इष्ट

होईल, असे सरकारने ठरविले आहे. यास अनुलक्षून महाराज सरकार असा हुकूम करतात की, हा हुकूम पोहोचलेल्या तारखेपासून झालेल्या जागांपैकी शेकडा ५० जागा मागासलेल्या लवकर भराव्यात. ज्या ऑफिसमध्ये मागासलेल्या वर्गाच्या अंमलदाराचे प्रमाण सध्या शेकडा ५० पेक्षा कमी असेल, तर पुढची नेमणूक ह्या वर्गातील व्यक्तीची करावी. ह्या हुकूमाच्या प्रसिद्ध केलेल्या सर्व नेमणुकाही तिमाही पत्रक प्रत्येकी खात्याच्या मुख्य सरकारकडे पाठवाव्यात.''[२४] हा निर्णय सामाजिक न्यायाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा होता. ज्यामुळे प्रशासनामध्ये समता प्रस्थापित होणार होती. पारंपरिक अधिकार व नियंत्रण यांचे वर्चस्व नष्ट होणार होते. हे अचूक ओळखून शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून केलेला हा एक महत्त्वाचा प्रयत्न होता. धनंजय कीर यांनी या घोषणेचे वर्णन 'नव्या युगाच्या आगमनाची घोषणा करणारा अग्रदूत' अशा शब्दांत केलेले आहे.'[२५]

## ८. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक योगदान

राजर्षी शाहू महाराज यांनी शिक्षणामध्ये महत्त्वाची क्रांती घडवून आणली. समाजातील दलित – पददलित आणि बहुजन समाजाला मुख्य प्रवाहात आणायचं असेल, तसेच त्यांचा विकास करायचा असेल, तर त्यासाठी भौतिक सुविधा देऊन फारसे काही हाती लागणार नाही. हे शाहू महाराजांना पहिल्यांदा कळाले. शिक्षण हे बहुजन समाजातल्या मुक्तीचे महत्त्वाचे साधन आहे. त्यासाठी शाहू महाराजांनी बहुजन समाजाला शिक्षणाची संधी देण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला. शिक्षणामुळे बहुजन समाज, दलित समाज, महिला आपली मुक्ती करून घेतील समाजामध्ये जागरुकता निर्माण होईल. प्रबोधन करण्याची प्रेरणा निर्माण होईल हे शाहू महाराजांनी ओळखले होते. त्यासाठी त्यांनी शिक्षणासारख्या महत्त्वाच्या साधनांकडे समाज मुक्तीचे साधन म्हणून पाहिले. शिक्षणासाठी त्यांनी अनेक क्रांतिकारक निर्णयसुद्धा घेतले. त्यांनी आपल्या राज्यव्यवस्थेतील पैसा हितसंबंध याकडे न बघता सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे, ही भूमिका घेऊन समाजामध्ये काम सुरू झाले आणि महत्त्वाचे धोरण आणि अंमलबजावणी कशी होईल, यासाठी प्रयत्न केले.

## ९. वसतिगृहाची चळवळ

कोल्हापूर संस्थानामध्ये जातीव्यवस्था ही अमानवीय आणि मागास पातळीवरती अस्तित्वात होती. जाती व्यवस्थेमुळे अस्पृश्यता हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक समाजात मानवी व्यवहार करताना निर्धारित केला जायचा. एकमेकांपासून रोटी–बेटी व्यवहार नाहीतर एकमेकाला पाहणे हासुद्धा धर्मशास्त्राच्या नियमानुसार गुन्हा होता. हे शाहू महाराजांनी ओळखले आणि त्यांनी जातीव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी क्रांतिकारक निर्णय घेतले. एवढेच नाही तर त्याची अंमलबजावणी अतिशय लवकर आणि मानवी पातळीवर व्हावी, यासाठी राजर्षी शाहू महाराजांचा कटाक्ष असायचा. त्याचाच एक भाग म्हणून शाहू महाराजांनी सुरुवात केलेली वसतीगृहाची चळवळ. शाहू महाराजांनी आत्तापर्यंत जे महत्त्वाचे प्रशासकीय धोरण राबवले होते त्या धोरणाची अंमलबजावणी होण्याकरिता प्रशासनामध्ये शोषित वंचित समाजाला जागा असली पाहिजे ही त्यामागची भूमिका होती. शोषित वंचित घटक या प्रशासनामध्ये येतील कसे, हा त्यांच्या पुढे प्रश्न होता. शोषित – वंचित समाजातील शैक्षणिक व आर्थिक परिस्थिती पाहता अत्यंत मागासलेली होती. त्यामुळे त्याचे प्रतिबिंब प्रशासनामध्ये दिसायचे. प्रशासनामध्ये फक्त शिक्षित व अभिजन वर्गाचे प्राबल्य होते. तत्कालीन कोल्हापूर संस्थानामध्ये सार्वजनिक भोजनालय सुद्धा जातीनिहाय होते. त्यामुळे राहण्याची व अभ्यास करण्याची सुविधा तर विचार न केलेलाच बरा. या परिस्थितीचे गांभीर्य ओळखून शाहू महाराजांनी वसतिगृहाची स्थापना केली. गरीब आणि वंचित समाजामध्ये उच्च शिक्षणाबद्दलची एक अनास्था तर होतीच; पण त्यासोबत उच्च शिक्षणासाठी बाहेरगावी जाऊन येऊन करण्यासंदर्भातील येणारी तत्कालीन जातीव्यवस्था हे एक महत्त्वाचे कारण होते. त्यामुळे शाहू महाराजांनी पुढाकार घेऊन मागासलेल्या समाजात उच्च शिक्षणाविषयी आस्था निर्माण व्हावी, उच्च शिक्षणात मागासलेल्या समाजाचे प्रमाण वाढावे, जेणेकरून त्याचे प्रतिनिधित्व प्रशासनामध्ये दिसेल. हा त्यामागचा उद्देश होता. मागासलेल्या समाजामध्ये आर्थिक मागासलेपणा हा उच्च शिक्षणातील आणखी एक महत्त्वाचा अडथळा होता. या सर्व परिस्थितीची जाणीव शाहू महाराजांना होती. त्यामुळे त्यांनी पहिल्यांदा वसतीगृहाची सुरुवात कोल्हापूर शहरात केली. व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हे पहिले वसतीगृह शाहू महाराजांनी कोल्हापूरमध्ये सुरू केले. हे वसतीगृह पहिल्यांदा ऐकताना जातीवाचक वाटेल पण शाहू महाराजांनी तत्कालीन समाजाची गरज ओळखून जातीवर

आधारित वसतिगृहांची स्थापना केली. ज्यामुळे आपले पालक आपल्या पाल्याला सहज विद्यार्जन करण्यासाठी पाठवतील. त्यांच्या मानसिकतेमध्ये असलेल्या जातिव्यवस्थेची शिक्षणासाठी कोणतीही अडचण निर्माण होऊ नये याची दखल शाहूमहाराजांनी घेतली आणि जातीनिहाय वसतिगृह सुरू केले.

## १०. राजर्षी शाहू महाराजांचे शेतीसुधारणा संबंधीचे योगदान

राजर्षी शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये शेतीच्या प्रश्नासंदर्भात ज्या समस्या शेतकऱ्यांना भेडसावत होत्या, त्यांचा सखोलपणे अभ्यास केला. शाहू महाराजांनी हे अचूक ओळखले होते की, जोपर्यंत शेतीचा विकास होत नाही, तोपर्यंत शेतकरी हा भौतिकदृष्ट्या संपन्न होणार नाही. सामान्य शेतकरी कधी तो दुष्काळात होरपळतो, तर , कधी तो प्लेगच्या साथीला बळी पडतो. कधी तो शेतीतील उत्पादन पद्धतीमुळे संकटात सापडतो. परिणामी तो नेहमी मागासलेला राहतो. अंधश्रद्धा आणि जातीय मानसिकतेत आधिकाधिक अडकत जातो. शेतकऱ्यांना या सर्व संकटातून बाहेर काढण्यासाठी शेतीतील सिंचन क्षमता वाढविण्याचा खूप महत्त्वाचा क्रांतिकारक निर्णय घेतला. त्याची अंमलबजावणी कोल्हापूर संस्थानमध्ये केली. म्हणून शाहू महाराजांना 'पहिल्या हरित क्रांतीचे जनक' म्हणतात.

## ११. सार्वजनिक पाटबंधारे धोरण

शाहू महाराजांनी १९०२ मध्ये सार्वजनिक पाटबंधारे धोरण जाहीर केले. ही जगातील किंबहुना भारतातील पहिले क्रांतिकारक पाऊल होते. शेतकऱ्यांच्या शेतीतील पाणी पुरवठ्यासाठी सिंचन क्षमता वाढवणारा क्रांतिकारी निर्णय होता. त्यासाठी सार्वजनिक पाटबंधारे धोरणाच्या माध्यमातून स्वतंत्र पाटबंधारे खाते निर्माण केले. 'पाटबंधारे विभागासाठी एक ड्राफ्ट्समन, एक मेस्त्री आणि एक कारकून यांची नेमणूक केली. त्यांच्या सामानाकरिता सहाशे रूपयाची ग्रँड मंजूर करण्यात आली व त्यासाठी त्यांनी तालुक्याच्या महसूल अधिकाऱ्यावर या सर्व कामाची जबाबदारी सोपविली.' प्रामुख्याने या जबाबदारीच्या माध्यमातून पाटबंधारे संदर्भातील माहिती व मदत देण्याची जबाबदारी त्यांची होती.[२६] स्वतंत्र पाटबंधारे खाते निर्माण करून त्या माध्यमातून कोल्हापूर संस्थानामधील प्रत्येक गावच्या पाटबंधाऱ्याच्या दृष्टीकोनातून तपशील मागून आढावा घेण्यात आला. स्वतंत्र पाटबंधारे खाते निर्माण करून इरिगेशन

ऑफीसरची नेमणूक करण्यात आली. जी पूर्वी कधीच अस्तित्वात नव्हती. इरिगेशन ऑफिसर म्हणून शेतीच्या व आधुनिक पद्धतीच्या पाठबंधाऱ्याचा अभ्यास असणाऱ्या तज्ज्ञ व्यक्तीची नेमणूक शाहू महाराजांनी केली. जेणेकरून पाठबंधारे खाते आणि त्या अंतर्गत करण्यात येणारे बांधकाम याला आधुनिक दृष्टिकोन आणि तंत्रज्ञानाचा आधार असावा, हा त्यामागचा उद्देश होता. कोल्हापूर संस्थानामध्ये नव्या-जुन्या विहिरी, छोटे-मोठे तलाव, छोटे-छोटे पाटबंधारे, यांचा आढावा घेऊन तातडीने विहिरी तलाव आणि पाटबंधारे यांच्या दुरुस्तीचे काम हाती घेतले. ज्यामुळे शेतीमध्ये सिंचनाची क्षमता अधिक वाढावी व शेतकऱ्यांना मुबलक पाणी उपलब्ध व्हावे हा त्यामागचा दृष्टिकोन होता.

## १२. राधानगरी धरणाच्या प्रकल्पाची निर्मिती

राधानगरी धरण निर्मिती प्रकल्प हा छत्रपती शाहू महाराजांचा हा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प होता. कोल्हापूर संस्थानाला जर दुष्काळापासून मुक्त करायचे असेल, तर अशा धरणाची अत्यंत आवश्यकता आहे, हे शाहू महाराजांनी लक्षात घेतले. त्यासाठी शाहू महाराजांनी या धरणाच्या निर्मितीअगोदर अनेक वर्षांपासून शेतीबाबतची आधुनिक दृष्टी आणि त्या अनुषंगाने जलसिंचन क्षमता, कोल्हापूरची भौगोलिक परिस्थिती यासारख्या महत्त्वाच्या घटकांचा अभ्यास केला होता. राधानगरी धरणाची निर्मिती करणे ही एक अत्यंत अवघड व आर्थिकदृष्ट्या खर्चिक बाब होती, हे शाहू महाराजांना लक्षात आले होते. पण शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने त्यांच्या दुःखापासून वेदनेपासून मुक्त करायचे असेल, तर अशा धरणाची आवश्यकता आहे, हे शाहू महाराजांना मनोमन पटले होते. यासाठी मुबलक पैसा, आधुनिक तंत्रज्ञान आणि ब्रिटिशांच्या सल्लामसलतीची आवश्यकता शाहू महाराजांना जाणवली होती. त्यामुळे त्यांनी अनेकांशी चर्चा विनिमय करून हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबवण्यास सुरुवात केली. १९०९-१० कालावधीत सुरू केलेले राधानगरी धरण १९१८ मध्ये पूर्ण केले. अत्याधुनिक तंत्रज्ञान, तज्ज्ञांशी विचारविनिमय यासाठी अंदाजे १४ लाख रुपये खर्च करून राधानगरी धरणाचे काम पूर्ण केले. या धरणातून उपलब्ध झालेल्या पाण्याचा उपयोग कोल्हापूर संस्थानातील शेतीच्या सिंचन क्षमता वाढवण्यासाठी, वीजनिर्मितीसाठी, मत्स्यव्यवसायासाठी व अनेक शहर व गावांना पाणीपुरवठ्यासाठी झाला. या धरणामुळे अत्याधुनिक पीक पद्धतीचा लागवड करण्यासाठी मदत

झाली. धरणाचे लाभ थेट शेतकऱ्यांना मिळाल्याने त्यांचा खरा विकास होऊ लागला. शेतकरी हा खऱ्या अर्थाने या धरणाच्या लाभामुळे विकसित होऊ लागला. त्यांची क्षमता आणि क्रयशक्ती वाढण्यास सुरुवात झाली.

## १३. शेती क्षेत्रातील नावीन्यपूर्ण प्रयोग

शेती व्यवसाय हा पारंपरिक साधनाद्वारे आणि पारंपरिक पीकपद्धती वापरून केला जात होता. त्यामुळे शेतीतील शेतमालाचे उत्पादन आणि शेतीव्यवसायातून मिळणारे उत्पन्न अतिशय कमी होते. साहजिकच त्याचा परिणाम कोल्हापूर संस्थानाच्या अर्थव्यवस्थेवर होत होता. पूर, दुष्काळ यांसारखी अनेक नैसर्गिक संकटेही बऱ्याचदा येत असत. ज्यामध्ये पहिला बळी हा शेतकऱ्याचा  जात असे. उपजीविकेचे शेतकऱ्यांसमोर दुसरे कोणतेही ठोस साधन उपलब्ध नव्हते. त्यामुळे शेतीव्यवसायाला नावीन्यपूर्ण शेतीची जोड देणे आवश्यक आहे, ही गरज छत्रपती महाराजांनी ओळखली त्यामुळे शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानांमध्ये शेतीमधील नाविन्यपूर्ण प्रयोगाची शासकीय पातळीवर अंमलबजावणी केली. यामुळे कोल्हापूर संस्थानातील शेती क्षेत्रात आमुलाग्र बदल झाला. शेतीतील नाविन्यपूर्ण प्रयोगासाठी अद्यावत तंत्रज्ञानाची आणि नवीन नवीन प्रयोगांची आवश्यकता होती. त्यासाठी त्यांनी १९१२ मध्ये कोल्हापुरात 'किंग एडवर्ड ॲग्रीकल्चर इन्स्टिटट्यूट'ची स्थापना केली. ज्यामध्ये शेतीक्षेत्रातील पीक पद्धती, अवजारे यांसारख्या घटकांना प्राधान्य देऊन त्यांची अंमलबजावणी कोल्हापूर संस्थानात केली, इतका उदात्त हेतू शाहू महाराजांनी ठेवून या संस्थेची स्थापना केली. दुसऱ्या बाजूला कोल्हापूर संस्थानामध्ये ''शेतकऱ्यांना सुधारित अवजारे, बी–बियाणे, रासायनिक खते आणि आधुनिक मशागतीचे ज्ञान व प्रशिक्षण मिळावे यासाठी शाहू महाराजांनी अधिकाऱ्यांची नेमणूक केली. शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीची शेती करता यावी, त्यामध्ये त्यांना रुची निर्माण व्हावी व त्याची कास धरण्यासाठी सार्वजनिक स्वरूपामध्ये कोल्हापूर संस्थानात महालक्ष्मी रथोत्सव, ज्योतिबा यात्रा यासारख्या उपक्रमाच्या माध्यमातून शेतकी प्रदर्शन भरवले गेले. या प्रदर्शनामध्ये आधुनिक साधने उत्कृष्ट उत्पादन पद्धतीच्या धान्याचे नमुने माहितीपत्रके इत्यादीची मांडणी केली गेली.''[२७] यासोबत शेती क्षेत्रामध्ये पारंपरिक पीक पद्धतीचा प्रभाव जास्त होता. पारंपरिक पीक पद्धतीच्या प्रभावामुळे उत्पादकता नेहमी कमी असायची व बाजारपेठेमध्ये संधी उपलब्ध

नसायची. त्यामुळे शेतकऱ्यांकडे शेतीसाठी खेळते भांडवल कधीच नसायचे. पारंपरिक शेती बदलून आधुनिक शेती करणे हाच एक पर्याय शेतकऱ्यांना संकटातून मुक्त करून शेती ही नफ्यामध्ये येण्यासाठी होता. शेतीतील पीक पद्धतीमुळे शेतकरी हा मागास आणि नेहमीच तोट्यात राहिलेला आहे. त्यामुळे शाहू महाराजांनी तात्काळ पारंपरिक पीकपद्धतीमध्ये बदल केले. प्रामुख्याने जिथे भात, ज्वारी, भुईमूग ही पिके घेतली जायची, त्या ठिकाणी शाहू महाराजांनी चहा, कॉफी, रबर, वेलदोडे, कोको यासारख्या आधुनिक पीक पद्धतींचा वापर करण्यास सुरुवात केली. आधुनिक पीक पद्धतीच्या माध्यमातून शेतकऱ्यांकडे पैसा आणि खेळते भांडवल निर्माण होण्यास संधी उपलब्ध झाली. यासारख्या अनेक नाविन्यपूर्ण आणि आधुनिक पद्धतीच्या वापरामुळे कोल्हापूर संस्थानमधील शेती ही खूप पुढे आणि प्रगतीपथावर गेली. कोल्हापूर संस्थानातील शेतकरी हा एक प्रगतीशील व आधुनिक प्रयोगशीलतेच्या दिशेने गेला. हे शाहू महाराजांचे शेतीबद्दलचे ऐतिहासिक योगदान मानावे लागेल.

### १४. शेती आणि शेती पूरक व्यवसायांना चालना

शेतीचा विकास करायचा असेल, तर शेतीमध्ये उत्पादकता वाढवणे हा एक महत्त्वाचा उपाय आहे, असे छत्रपती शाहू महाराजांना वाटत होते. पण त्यापलीकडे जाऊन शाहू महाराजांनी शेती आणि शेतीतील उत्पादित मालावर प्रक्रिया करणाऱ्या संस्थांची निर्मिती करून शेती विकास साधला. शेतीतील उत्पादकता आणि त्याच्यावर उत्पादित मालावर प्रक्रिया करायची असेल, तर त्यासाठी भांडवल निर्मिती अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी शाहू महाराजांनी शेतकऱ्यांना भांडवल पुरवठा करणारी व शेतीच्या साधनसामुग्रीचा पुरवठा करणारी विविध कार्यकारी सहकारी संस्था निर्माण केली. शाहू महाराजांना ही बाब लक्षात आली होती की, शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीची शेती करायची असेल, तर त्यासाठी अर्थसाह्य पुरवठा व भांडवलाची उपलब्धता करून देणे गरजेचे आहे. त्यासाठी ग्रामीण भागामध्ये विविध अर्थसाह्य आणि भांडवल पुरवठा करणारे संस्थाचे जाळे निर्माण केले. शेतीसाठी पाणीपुरवठा करणाऱ्या सहकारी उपसा जलसिंचन संस्था, शेतकऱ्यांचे दूध संकलन करणाऱ्या सहकारी दूध संस्था, शेतकऱ्यांना बचतीची सवय निर्माण करण्यासाठी ग्रामीण पतपुरवठा संस्था यासारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले.

## १५. शाहू महाराजांचे व्यापार आणि उद्योग निर्मितीत योगदान

भारतामध्ये ब्रिटिश आले आणि औद्योगिकीकरणाला चालना देण्याचे धोरण त्यांनीच स्वीकारले. मुंबई आणि कोलकाता ही शहरे औद्योगिकीकरणाची प्रमुख केंद्र बनली होती. ब्रिटिशांच्या औद्योगिकीकरणाचे स्वरूप आणि व्याप्ती मर्यादित होती. ब्रिटिशांनी स्वीकारलेले औद्योगिक धोरण हे एका बाजूला कामगारांचे शोषण करायचे आणि दुसऱ्या बाजूला शेतकऱ्याकडून कच्चामाल निर्मिती करून स्वस्त दरामध्ये विकत घ्यायचे. त्यामुळे भारतातील कामगार आणि शेतकरी हा दारिद्र्यावस्थेत जगत होता. तिसरी महत्त्वाची बाब म्हणजे ब्रिटिशांनी स्वीकारलेले हे धोरण भारतातील पारंपरिक कौशल्य नष्ट करून उभे राहत होते. याचा व्यापक परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर पडत होता. भारतीय अर्थव्यवस्था मजबूत होण्याऐवजी बकाल होत होती. दुसऱ्या बाजूला बडोदा, कोल्हापूरसारख्या काही मोजक्या संस्थांनाचा अपवाद वगळता इतर संस्थांनामध्ये फारशी प्रगती नव्हती. कारण इतर संस्थांनांमध्ये राजे महाराजे ऐशोआरामात जीवन जगत होते. कोल्हापूर संस्थानामध्ये उद्योग, व्यापार आणि औद्योगिकीकरणाला मोठी चालना मिळाली ती राजर्षी शाहू महाराजांकडे असलेल्या दूरदृष्टीमुळे. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या राज्यकारभाराची सूत्रे हाती घेण्यापूर्वी कोल्हापूरचा व्यापार आणि उद्योग हे फारसे भरभराटीला आले नव्हते, याचे कारण त्यात नावीन्यपूर्णता व त्यासाठी आवश्यक असलेल्या भांडवल व दूरदृष्टीचा अभाव. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतल्यानंतर शेतीचा विकास, शिक्षणाचा विकास यापुरता मर्यादित न ठेवता कोल्हापूर संस्थान हे व्यापार आणि उद्योगासाठी चालना देणारे ठरावे यासाठी शाहू महाराजांनी अनेक महत्त्वाचे धोरणे अंगिकारली. कोल्हापूर संस्थानामध्ये बाजारपेठ उपलब्ध नव्हती. शाहू महाराजांनी व्यापारासाठी विविध बाजारपेठा निर्माण केल्या. रेल्वे स्थानकाजवळ 'शाहूपुरी' ही नवी बाजारपेठ निर्माण केली. कोल्हापूर कागल आणि निपाणी या भागातील व्यापारी वर्गांना अनेक सवलती देऊन वखारी स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले. शेती आणि शेतीपूरक मालाच्या खरेदी-विक्रीसाठी अनेक मोठमोठ्या बाजारपेठा उपलब्ध होणे गरजेचे आहे. शाहू महाराज पूर्वी कोल्हापूर संस्थानाच्या अनेक ठिकाणी गुळाचे उत्पादन होत असत व त्यासाठी त्यांना मुंबईच्या बाजारपेठेवर अवलंबून रहावे लागत असे. ही बाब शाहू महाराजांच्या लक्षात आली आणि कोल्हापूर हे शहर गुळाची बाजारपेठ म्हणून शाहू महाराजांनी वसवली.

आज भारतातच नाही तर जगाच्या पातळीवर कोल्हापूर हे शहर गुळाच्या बाजारपेठेसाठी प्रसिद्ध आहे.

## १६. पारंपरिक हस्त उद्योगाला चालना

कोल्हापूर शहर हे अनेक भागांत कापड विणण्याच्या कलेबद्दल अतिशय प्रसिद्ध होते. शाहू महाराजांपूर्वी कोल्हापूर संस्थानमध्ये या हस्त उद्योगाला चालना देण्यासाठी उत्तेजन देण्यात आले नाही. त्यामुळे अशा प्रकारचे हस्त उद्योग नष्टप्राय किंवा कोल्हापूर संस्थानाच्या बाहेर जाण्याच्या मार्गावर होते. संस्थानातील अंतर्गत कलह, अशा हस्तव्यवसायासाठी लागणाऱ्या भांडवल पुरवठ्याचा अभाव अशी अनेक महत्त्वाची कारणे त्यामागे होती. ही बाब शाहू महाराजांच्या लक्षात आली आणि कापड विणण्याचे मुख्य कौशल्य असणारे मुस्लिम विणकर यांना त्यांच्या गावी हस्त उद्योग–व्यवसायासाठी हवी ती मदत करून व्यवसायात भरभराट आणण्यासाठी चालना दिली. प्रगती करण्यासाठी चालना दिली. त्यासाठी त्यांनी 'वेव्हर्स असोसिएशन'ची स्थापना केली. या असोसिएशनच्या माध्यमातून विणकामाचा हस्तव्यवसाय करणाऱ्यांना पाच वर्षांसाठी बिनव्याजी भांडवल दिले आणि उद्योगासाठी जागा उपलब्ध करून दिली. याचा परिणाम असा झाला की, कोल्हापूर संस्थानामध्ये धोतरे,लुगडी,चोळखण यांसारख्या कपड्यांची महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध बाजारपेठ निर्माण झाली. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात सुगंधी औषध, तेल उद्योग, मधुमक्षिका पालन उद्योग, कास्टक उद्योग आणि सुती कापड उद्योगाला चालना दिली.

## १७. शाहू छत्रपती मिलची स्थापना

छत्रपती शाहू महाराज यांनी इ. स. १९०६ मध्ये 'शाहू छत्रपती स्पिनिंग ॲण्ड व्हिविंग मिल्स' या नावाची गिरणी स्थापन केली. या मिलची स्थापना करण्यामागचा उद्देश शाहू महाराजांनी स्पष्ट केला होता. या गिरणीच्या माध्यमातून लोकांना रोजगार भेटेल, कपडा व्यवसाय विकासित करता येईल आणि कोल्हापूर संस्थानाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करता येईल त्यासोबतच त्यांनी कोल्हापूर संस्थानमध्ये अनेक छोट्या–मोठ्या कापड गिरण्या सुरू केल्या होत्या. इचलकरंजी, शिरोळ, खडकी, गडहिंग्लज याठिकाणी जिनिंग फॅक्टरीची स्थापना केली

होती. पहिली जिनिंग, इलेक्ट्रिकल कंपनी, पहिली मोठी ट्रान्सपोर्ट कंपनी असे अनेक उद्योग तयार करून कोल्हापूर संस्थानाला आणि व्यापारी उद्योगाला चालना दिली.

## १८. राजर्षी शाहू महाराजांचे सांस्कृतिक आणि कलेच्या क्षेत्रातील योगदान

शाहू महाराज कलेच्या आणि संस्कृती क्षेत्रातील पारंगत व्यक्तिमत्व आणि भोक्ते होते. मानवी जीवनामध्ये कला माणसाच्या व्यक्तिमत्वाला आणि जीवनाला परिपूर्ण बनवते. त्यासाठी त्यांनी अनेक सांस्कृतिक कला–कौशल्यास प्रोत्साहन दिले. हे योगदान केवळ ऐतिहासिकदृष्ट्या कोल्हापूर संस्थानापुरते मर्यादित नसून, अखिल भारतीय मानवजातीला दिलेले एक महत्त्वाचे योगदान म्हणून पाहता येते. त्यासाठी त्यांनी शिकार, मल्लविद्या, संगीत, नाट्य, चित्रपट, चित्रकला यांना प्रोत्साहन दिले. व्यक्तिशः शाहू महाराजांना शिकारीची आवड होती. चित्त्याची शिकार करणे हा त्यांचा आवडता छंद होता. त्यासाठी त्यांनी अनेक ठिकाणी संरक्षित वने तयार केली होती. डुकराची शिकार, वाघाची आणि अस्वलाची शिकार हे शाहू महाराजांचे छंद होते.

मल्लविद्या हीसुद्धा कोल्हापूर संस्थानामध्ये शाहू महाराजांनी शासकीय स्तरावर विकसित केली. लहानपणापासूनच शाहू महाराजांना मल्लविद्येची आवड आणि संस्कार होते. त्यामुळे लहानपणच्या आवडीच्या विस्तार व विकास शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या सूत्रे हाती घेतल्यानंतर केली. यासाठी त्यांनी अनेक तालमी चालू केल्या. त्यातील मोतीबाग ही एक तालीम त्यांनी स्थापन केली होती. बाहेरील राज्यांतील मल्लांना शाहू महाराज आमंत्रित करून त्यांच्या मार्गदर्शनाखाली प्रोत्साहन देत असत. मल्लविद्येला प्रोत्साहन मिळावे म्हणून गावागावांमध्ये तालीम स्थापन करण्याचा निर्णय महाराजांनी घेतला होता. शाहू महाराजांनी मल्लविद्येला प्रोत्साहन दिल्यामुळे अनेक मल्ल तयार झाले. त्यापैकी ''शिवाप्पा बेरड, व्यंकप्पा बुरुड, गणपत शिंदे, गोविंद कसबेकर, नारायण कसबेकर, बाबू गोविंद, परीट ज्ञानू, माने देवा, मदनगर देवाप्पा, हरी गवळी यांसारख्या अनेक पिढ्या निर्माण केल्या.'' [२८] संगीत हा पारंपरिक अर्थाने सर्व राजे राजवाडे यांच्या आश्रयाखाली अस्तित्वात असलेला एक महत्त्वाचा घटक होता. शाहू महाराजांपूर्वी कोल्हापूर संस्थानामध्येसुद्धा कीर्तन, तमाशा, लावणी, साकी, दिंडी, फटका, भजन, वाघ्या–मुरळीची गाणी यांसारख्या अनेक लोकसंगीताचे प्रकार अस्तित्वात होते. पण शाहू महाराजांनी संस्थानाचे सूत्र हाती घेतल्यानंतर प्रामुख्याने 'देवल क्लब'ची स्थापना

केली. या संस्थेला इमारतीच्या बांधकामापासून आर्थिक मदत केल्याचे शाहू महाराजांनी दिसते. त्यासोबत गौरीशंकर या एका महान कलावंताने जयपूर घराण्याच्या गायकीचे दर्शन शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात इतर रसिकांना घडून आणले. शाहू महाराजांनी एक प्रकारे संगीताचे विद्यापीठ सुरू केले. शाहू महाराजांनी संगीताला प्रोत्साहन देण्याचे धोरण ठेवल्यामुळे पंडित भास्करबुवा बखले, केसरबाई केरकर, मोगुबाई कुर्डीकर, जरीवाला शाळीग्राम, निवृत्तीबुवा सरनाईक, अल्लादियाँ खान अशा अनेक कलाकारांना शाहू महाराजांच्या संगीताविषयक धोरणामुळे मोठे पाठबळ मिळाले. शायरी, शास्त्रीय संगीत, भजन, गायकी यांसारख्या सांस्कृतिक कलेला शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात स्थान दिले आहे. शाहीर विठ्ठल, रामचंद्र माळी, विश्वरा माळी, शाहीर लहरी हैदर यासारखे नामवंत कलाकार हे कोल्हापूर संस्थानामध्ये शाहू महाराजांच्या एकूण शाहिरी या गायकी प्रकाराला प्रोत्साहन दिल्यामुळे घडले आहे. नाट्यकला यांनासुद्धा शाहू महाराजांनी मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिल्याचे दिसते. बालगंधर्व आणि केशवराव भोसले यांसारखे महान कलाकार हे कोल्हापूरच्या मराठी रंगभूमीने तयार केले. 'नरहरबुवा कोल्हापूर नाट्य मंडख' यांसारख्या व्यावसायिक नाटक कंपनी अस्तित्वात येण्याचा महत्त्वाचा भाग हा राजर्षी शाहू महाराजांनी दिलेली पोहोच आहे. त्याचबरोबर १९१५ मध्ये छत्रपती राजाराम महाराज यांच्या हस्ते उद्‌घाटन झालेल्या पॅलेस थिएटर उभारणीत त्यांचे मोठे योगदान राहिले. संगीत नाट्य मंडळ, लोकनाट्य मंडळ यासारख्या बाहेरच्या नाटक कंपन्या कोल्हापूरला येऊन आपली नाटके प्रदर्शित करू लागल्या. याचे कारण शाहू महाराजांनी नाटकाला आणि नाट्यकलेला खूप मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले होते. नाटकाचे प्रयोग जुना राजवाडा, लक्ष्मीप्रसाद टेंट्स, हिम्मतबहादर पागा, जिवबानाना वाडा यांसारख्या ठिकाणी केले जायचे.

राजर्षी शाहू महाराज यांचे निधन मुंबई येथे दिनांक ६ मे, १९२२ मध्ये झाले. एक महत्त्वाचा समाजसुधारक देशाने गमावलेला होता. अहोरात्र दलित–बहुजनांसाठी आपल्या संस्थानामध्ये हक्काचे, स्वाभिमानाचे जीवन मिळवून देण्यासाठी आयुष्यातला सर्वाधिक वेळ त्यांच्यासाठी दिलेला होता. म्हणून धनंजय कीर यांनी शाहू महाराजांबद्दल अत्यंत महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले आहे 'शाहू महाराज हा खरोखर एक अनन्यसाधारण आत्मशक्तीचे पुरूष होते. त्याचे मोठेपण साधेपणाने शोभले. ते जनक राजासारखे राजर्षी होते. कारण ते सामान्य जनतेचे

तत्त्वज्ञ होते. महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर लक्षावधी गरीबांच्या व दलितांच्या ह्रदयात त्यांनी आशेचा दिवा पेटवला. त्यांच्या कार्यामुळे त्यांना भारताच्या इतिहासात उच्च स्थान प्राप्त झाले आहे.'' भारतातील सामाजिक व आर्थिक लोकशाही जशीजशी यशस्वी व सामर्थ्यशाली होत जाईल तशीतशी शाहूंची ऐतिहासिक मूर्ती अधिकाअधिक तेजस्वी दिसत जाईल. जनता आपल्या अपार प्रेमाने आणि अखंड कृतज्ञतेने त्याचे स्मरण करीत राहील, यात संदेह नाही. अर्थात छत्रपतींचे नाव इतिहासात सुवर्णाक्षरात लिहिले जाईल. आपल्या दुर्दम्य, त्यागी आणि विरक्त आत्मशक्तीने राजर्षी शाहू महाराज शिवछत्रपतीनंतरचे महान राज्यकर्ते ठरले आहेत.[२९] य. दि. फडके म्हणतात, ''गेल्या शतकात महात्मा ज्योतिबा फुले यांनी स्वाभिमानाचे व समतेचे बी पेरून एक झाड लावले. त्याला खतपाणी घालून काळजीपूर्वक वाढविले. शाहू छत्रपतींनी या झाडाला कर्मवीर भाऊराव पाटील, केशवराव जेधे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कर्तृत्वाच्या रूपाने पुढील काळात नवीन नवीन धुमारे फुटले. शतकानुशतके ज्यांना अन्याय व विषम समाजव्यवस्थेमुळे अपार दुःख व अपमान सोसावे लागले, अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या तसेच मागास जातींच्या लोकांना माणूस म्हणून स्वाभिमानाने जगता यावे, शिकता यावे आणि विकासाच्या वाटा खुल्या हव्यात यासाठी शाहू छत्रपतींनी महान ऐतिहासिक कार्य केले. त्याची नोंद अर्वाचीन काळातील महाराष्ट्रातच नव्हे, तर भारताचा इतिहास लिहिणाऱ्यांना करावीच लागेल हे निःसंशय.''[३०]

माजी न्यायाधीश पी. बी. सावंत म्हणतात, इतिहासात समाजक्रांतीचा झेंडा खांद्यावर अवचितच दिसून येतो. समाजसुधारक राजे अनेक होऊन गेले; परंतु समाज क्रांतिकारक राजे शोधूनही सापडणे कठीण. असा दुर्मिळ राजा होण्याइतके कार्य शाहू महाराजांकडून घडले म्हणून त्यांचे नाव आजही सर्वांच्या स्मरणात आहे आणि ते पुढेही राहील.[३१]

शाहू महाराजांच्या निधनानंतर कोल्हापूर संस्थानांमध्ये आणि भारतामध्ये शोककळा पसरली. एक सामाजिक समतेचा पुरस्कार करणारा राजा, कल्याणकारी राज्याची स्थापना करणारा राजा, जातिव्यवस्थेच्या विरुद्ध संघर्ष करणारा राजा आज काळाच्या पडद्याआड झाला आहे. दलितांना आरक्षणाची तरतूद करून जगामध्ये किंबहुना भारतामध्ये सामाजिक समतेची मुहुर्तमेढ रोवणारा राजा म्हणून शाहू महाराजांचा गौरव केला जातो. राजर्षी शाहू महाराजांनी

आपल्या कर्तृत्वाने कोल्हापूर संस्थान एक आदर्श संस्थान म्हणून निर्माण केले. अविरतपणे भारताच्या दलित बहुजन समाजासाठी संघर्ष करणारा, सहकार क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन करून पायाभरणी करणारा, शिक्षण हे दलित बहुजनांच्या मुक्तीचे साधन आहे त्यासाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करणारा, जगातील पहिली हरितक्रांती आपल्या संस्थानात घडवून आणणारा, सामाजिक न्यायाचा आणि समतेचा पुरस्कार करणारा असा हा राजा होता. इ. स. १९२२ मध्ये मुंबई येथे पन्हाळा विश्रामगृहावर त्यांच्या जीवनाची अंतिम प्राणज्योत मालवली. छत्रपती शाहू महाराजांचा भारताच्या इतिहासामधील हा एक समाज क्रांतिकारक आपली जीवन यात्रा संपवून जगाला सामाजिक न्यायाचे धडे देऊन गेला. लोककल्याणकारी राज्य कशाप्रकारे असले पाहिजे याचा आदर्श व परिमाण घालून दिले. छत्रपती शाहू महाराज यांच्या निधनामुळे भारत व कोल्हापूर संस्थानात वादळापूर्वीची शांतता पसरली होती. त्यांच्या सामाजिक न्यायाचा हा वारसा पुढे जाणार का नाही याबाबतची संभ्रमावस्था कोल्हापूर संस्थानमध्ये किंबहुना भारतामधील माणसांमध्ये निर्माण झाली होती.

## ९) राजर्षी शाहू महाराजांच्या निधनानंतर कोल्हापूर संस्थानाची आर्थिक स्थिती

शाहू महाराजांच्या काळात पायाभूत सुविधांचा विकास खूप मोठ्या प्रमाणात झाला होता. पायाभूत विकासामध्ये रस्ते बांधकाम, रेल्वेच्या सुविधा आणि सिंचनाच्या सुविधा यामध्ये खूप मोठ्या प्रमाणात विकास होता. रस्त्याच्या विकासामध्ये ग्रामीण भागातील शहरी आणि कच्चे आणि पक्के रस्त्याचे बांधकाम केले होते. त्यामुळे त्याचा परिणाम ग्रामीण भाग हा शहरी भागाशी जोडला गेला होता. ग्रामीण भागातील लोकांना शहरांमध्ये येण्यासाठी ही सुविधा उपलब्ध झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात लोकांना गतिशील केले होते. बाजारपेठेशी जोडणाऱ्या पक्क्या रस्त्यांमुळे ग्रामीण भागातील शेतीतील उत्पादने बाजारपेठेपर्यंत पोहोचविण्याची संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाली. शाहू महाराजांनी त्यांच्या काळामध्ये १८५ मैल रस्त्याचे बांधकाम केले होते.[३२]

शाहू महाराजांनी रेल्वे सुविधा उपलब्ध करून दिली होती. त्यांच्याच काळामध्ये रेल्वेचा विस्तार करण्यात आला होता. १८९१ मध्ये त्यांनी रेल्वे स्थानकाचे उद्घाटन केले होते. त्यातून कोल्हापूर संस्थान हे भारतातल्या प्रमुख शहरांशी जोडले जाणार होते. शाहू महाराजांनी रेल्वेची

सुरुवात ही केवळ लोकांच्या प्रवासासाठी यापुरती मर्यादित केली नव्हती, तर रेल्वेच्या माध्यमातून कोल्हापूर शहरामध्ये व्यापार, उद्योग आणि औद्योगीकरणाला चालना मिळणार होती. शाहू महाराजांचा रेल्वेची सुविधा उपलब्ध करून देण्यामागे कोल्हापूर संस्थानामध्ये आयात आणि निर्यात यांना चालना मिळेल आणि कोल्हापूर संस्थानाचे आर्थिक वैभव भरभराटीला लागेल हा प्रमुख हेतू होता.

सिंचनाची सुविधा हा शाहू महाराजांच्या एकूण विकासाचा एक उदात्त हेतू होता .सिंचनाच्या सुविधा निर्माण करण्यामध्ये शाहू महाराजांचा आर्थिक दृष्टिकोन आणि विचार स्पष्ट होतो. कोल्हापूर संस्थानामध्ये ८० % लोकसंख्या ही शेती आणि शेतीपूरक व्यवसायावर अवलंबून होती. त्यामुळे सिंचनाची सुविधा उपलब्ध करून दिली, तर एक प्रकारे शेतीच्या विकासाला चालना मिळू शकेल आणि शेतकरी आर्थिकदृष्ट्या समृद्ध आणि स्वावलंबी होईल ही त्यामागची भावना होती. शाहू महाराजांनी राधानगरी धरण, ग्रामीण भागातील इतर छोटी–मोठी धरणे, विहिरी, कालवे यांचे बांधकाम करून सिंचनाची क्षमता वाढवून शेती क्षेत्राचा विकास घडवून आणला. १९१९–२० या कालावधीमध्ये एकूण विहिरी व विहिरीवर आधारित शेतीसाठी जलसिंचन क्षमता ही २१,०२१ एकर जमीन इतकी सिंचनाखाली आली होती.[३३] नद्यांवर आधारित जलसिंचन क्षमता विचार करता ८,९३३ एकर जमीन जलसिंचनाच्या ओलिताखाली आली होती, तर तलावांमुळे २४१ एकर ही ओलिताखाली आली होती.[३४]

शेती विकासात शाहू महाराजांचे महत्त्वाचे योगदान होते. शाहू महाराजपूर्व परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या किंवा शेती विकास न होण्यामागे तेथील शेतकऱ्यांमधील निरक्षरता, शेतीसाठी लागणाऱ्या भांडवलाचा अभाव, शेतीचे विस्कळीत स्वरूप आणि असंघटित शेतकरी वर्ग ही चार प्रमुख कारणे होती. या सर्व कारणांचा परिपाक म्हणून शेतकऱ्यांना दारिद्र्याचे आणि मागासपणाचे जीवन जगावे लागत होते. शिवाय तो अंधश्रद्धेत पूर्णतः गुरफटलेला होता. शाहू महाराजांनी या चारही कारणांचा अचूक वेध घेऊन शिक्षण भांडवलाची उपलब्धता, शेतीचे संघटित स्वरूप व शेतीला बाजारपेठेची उपलब्धता आणि शेती करण्यासाठी शेती पूरक व्यवसायाला चालना यांची निर्मिती करून शेतकऱ्याची भरभराट करून दिली. शाहू महाराजांच्या काळामध्ये शेतकरी हा समृद्ध जीवन जगत होता.

सहकार चळवळीचा विकास शाहू महाराजांनी केला. या चळवळीचा विकास कोल्हापूर शहरामध्ये मोठ्या प्रमाणात झाला. 'विना सहकार नाही उद्धार' ही तत्त्व पहिल्यांदा शाहू महाराजांनी अमलात आणले. आजच्या सहकार चळवळीचे जे काही सकारात्मक परिणाम आपणास दिसतात त्याचे मूळ शाहू महाराजांची दूरदृष्टीमध्ये आणि सहकार चळवळीचा विस्तारामध्ये दडल्याचे दिसून येते. कारण हेच तत्त्व केंद्रस्थानी ठेवून सन १९०४ मध्ये 'को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी कायदा आणला. त्यानंतर शाहू महाराजांचे स्वकीय आणि विश्वासू अधिकारी असलेल्या भास्करराव जाधव यांच्या पुढाकारातून इ. स. १९१३ मध्ये 'कोल्हापूर अर्बन को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड'ची सुरुवात केली १९१७–१८ मध्ये कोल्हापूर संस्थानामध्ये एकूण ७७७ सहकारी सोसायट्या होत्या, ज्याच्या उद्देश व्यापार–उद्योग आणि शेतीला भांडवल पुरवणे हा होता. याच कालावधीमध्ये सहकारी संस्थांचे खेळते भांडवल १,०३,३४८ इतके होते. १९१९–२० मध्ये खेळते भांडवल याचे प्रमाण आणखी वाढले ते प्रामुख्याने ३,७९,९४१ इतके वाढले.[३५]

राजर्षी शाहू महाराजांनी शेतीचा अर्थिक विकास हा जलद गतीने केला. ब्रिटिशांच्या वाढत जाणाऱ्या विस्तारामागचे औद्योगिक अर्थकारण हे शाहू महाराजांनी अचूक वेधले होते. त्यासाठी त्यांनी औद्योगिकीकरणाला चालना दिली आणि औद्योगिक क्रांती कोल्हापूर संस्थानामध्ये घडवून आणली. ज्याच्या माध्यमातून गरीब वंचित घटकांना रोजगार उपलब्ध झाला. औद्योगिकरणामुळे अत्याधुनिक सुविधेची उपलब्धता कोल्हापूर संस्थानामधील लोकांना झाली. शाहू महाराजांनी आपल्या औद्योगिक धोरणास १८९५ पासून सुरुवात केली होती. त्यात लहान आणि मोठ्या या दोन्ही क्षेत्रांतल्या औद्योगिकीकरणाला चालना दिली होती. यामुळे औद्योगिकीकरणाचे सामान्य माणसापर्यंत विकेंद्रीकरण होणे आणि विस्तार होणे महत्त्वाचे ठरले. शाहूपुरी बाजारपेठ हा त्याचाच एक अत्यंत महत्त्वाचा भाग होता. ज्या माध्यमातून बाजारपेठेमध्ये जास्त दरामध्ये औद्योगिक उत्पादन उपलब्ध करून देण्यासाठी प्रदर्शन आयोजित करण्यात आले. औद्योगिकरणासाठी आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे कच्चा माल. जो कोल्हापूर संस्थानामध्ये उपलब्ध नव्हता. त्यामुळे शाहू महाराजांनी रेल्वेच्या माध्यमातून कच्चामाल आयात करणे आणि पक्का माल निर्यात करणे सुरू केले होते. शाहू महाराजांनी यात आणखी एक महत्त्वाची भर घातली ती म्हणजे औद्योगिकीकरणासाठी शिक्षित कामगार मजूर

आणि प्रशासकीय अधिकारी उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यासाठी महाराजांनी अनेक व्यवसाय कॉलेजची निर्मिती केली. जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिटट्यूट आणिराजाराम इंडस्ट्रियल स्कूल यांची स्थापना महाराजांनी केली. औद्योगिकीकरणाला कोल्हापूर संस्थानामधील दलित–बहुजन घटक उपलब्ध व्हावा, ज्यांच्या माध्यमातून औद्योगिकीकरणाला अधिक गतीने चालना मिळेल; पण त्यासोबत कौशल्यपूर्ण व व्यावसायिक परिपूर्ण मनुष्यबळाची अवलंबित्व हे इतर संस्थानिकांकडून किंवा ब्रिटिशांकडून न होता कोल्हापूर संस्थानमधूनच व्हावे, ही त्यामागची धारणा होती. घुगे यांच्या मताप्रमाणे 'शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या संयुक्त विद्यमाने सार्वजनिक आणि खाजगी औद्योगिकरणाला चालना दिली. या माध्यमातून औद्योगिकरणाचे विकेंद्रीकरण होईल ही शाहू महाराजांची भूमिका होती.[३६] शाहू महाराजांनी अनेक ठिकाणी उद्योग उभारणीसाठी संस्थानच्या माध्यमातून प्रोत्साहन दिले. आर बी एन किंवा राजश्री ही त्यांची कंपनी स्थापन करण्यात आली होती. उद्योग करणाऱ्यांना चालना देऊन शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची भरभराट घडवून आणली. यामुळे अनेक पारंपरिक हस्त उद्योग करणाऱ्याा जातींना आपले अस्तित्व आणि विकास करण्याची संधी या माध्यमातून उपलब्ध झाली. आकडेवारीच्या भाषेमध्ये सांगायचे असेल, तर सन १९२१–२२ मध्ये १३४९ हजार रेल्वेपासून आयात–मिळकत तर निर्यात ९७६ हजार इतकी झाल्याचे दिसून येते.[३७] गोविंद पानसरे यांनी आपल्या पुस्तकात शाहू महाराजांच्या औद्योगिक धोरणाबद्दल चर्चा करत असताना शिरपूर, जयसिंगपूर आणि गांधी लालजंग यांचा पुरावा देत नमूद केले की, शाहू महाराज यांनी राज्याची सुत्रे स्वीकारल्यानंतर म्हणजे सन १८९५–९६ मध्ये एकूण राज्याची निर्यात सहा लाख रुपये होती ती १९२१ मध्ये तीस लाखापर्यंत गेली.[३८]

## १०) राजर्षी शाहू महाराजांच्या निधनानंतर शैक्षणिक परिस्थिती

शाहू महाराजांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. शाहू महाराजांनी शिक्षण हे दलित आणि बहुजन समाजाच्या मुक्तीचे साधन मानले होते. त्यांच्या माध्यमातून स्वाभिमान, आत्मसन्मान आणि विकासाची प्रेरणा निर्माण होईल. हजारो वर्ष समाज जातीव्यवस्था, अंधश्रद्धा आणि मागासलेपणाचा बळी आहे. त्याला आपल्या विकासाच्या माध्यमातून सन्मानाचे जीवन जगता येईल. यासाठी त्यांनी खूप महत्त्वाचे प्रयत्न केले. त्यात

शाहू महाराजांनी मोफत आणि सक्तीचे शिक्षण हा कायदा पास करून सर्वांना शिक्षण उपलब्ध करून दिले. लोकांनाकेवळ अक्षरज्ञान, देऊन भागणार नाहीतर त्यासाठी व्यवसायिक कौशल्याचा आधार द्यावा लागेल. त्यांच्या माध्यमातून ते आपली उपजिविका भागवू शकतील व जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होतील, याची शाहू महाराजांना पुरेपूर जाणीव होती. या जाणिवेतूनच त्यांनी व्यवसाय शिक्षणाला चालना देणाऱ्या जयसिंगराव घाटगे तांत्रिक संस्था, राजाराम औद्योगिक शाळा अशा शिक्षणसंस्थाची सुरुवात केली. ही विद्यालये कौशल्याचा विकास आणि ज्ञानाबाबत समज विकसित करून देण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडत होत्या. याबरोबरच महाराजांनी अनेक शाळासुद्धा सुरू केल्या. पाटील शाळा, पुरोहित शाळा, लष्करी शाळा यासारख्या शाळा उघडून त्यांनी दलित–बहुजन समाजाला शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. सर्व शिक्षण मोफत आणि सक्तीचे असे. त्यामुळे शिक्षणसुविधा सर्वांना सहज उपलब्ध होईल याचीसुद्धा सोय केली. त्यासोबत त्यांनी आपल्या संस्थानाच्या एकूण आर्थिक तरतुदीत शिक्षणाची तरतूद ही जास्त वाढवली. शाहू महाराजांनी दलित–बहुजन समाजासाठी जवळपास २५ वसतीगृहांची सुरुवात केली. त्या वसतीगृह जातीनिहाय असले, तरी तीच त्या काळाची मर्यादा होती. शाहू महाराजांना हे नक्की माहित होते की, समाज जसा शिकतो, तशा प्रकारे आपल्या जीवनामध्ये आणि विचारांमध्ये प्रगती करतो. ही त्यामागची धारणा होती. १८९४ मध्ये कोल्हापूर संस्थानमध्ये एकूण २२४ शाळा सुरू केल्या होत्या. त्या शाळेमध्ये एकूण १८९४ विद्यार्थी होते. ही १९२१–२२ मध्ये विद्यार्थीसंख्या १४ हजार ८१९ पर्यंत पोहोचली होती. त्या काळामध्ये कोल्हापूर संस्थानाची एकूण लोकसंख्या ही ९ लाख १०हजार इतकी होती, म्हणजेच एकूण लोकसंख्येच्या दीड टक्के विद्यार्थी या शाळेमध्ये प्रवेश घेतलेले होते. हे शाहू महाराजांचे महत्त्वाचे योगदान आहे. शैक्षणिक सुविधेसाठी म्हणजे शाळा व वसतीगृहासाठी खर्च हा ७०,००० इतका होता. तो वाढवून त्यांनी १९२१–२२ पर्यंत रुपये ३,०१,५८३ इतका केला. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढ झाली.[३९] यात मुलींच्या शाळेचा समावेश होता. मुलींसाठी शाळा शाहू महाराजांनी प्राधान्यक्रमाने स्थापन केल्या होत्या. १९२१–२२ मध्ये ३३ मुलींच्या शाळांचे निर्माण केले होते. त्यामध्ये एकूण १ हजार ८१९ विद्यार्थिनींनी प्रवेश घेतला होता. ही बाब याठिकाणी आवर्जून नोंद घेण्यासारखी आहे.[४०]

## ११) राजाराम महाराजांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण

### १) पाश्चिमात्य शिक्षणाचा अनुभव

राजाराम महाराज यांचे प्राथमिक शिक्षण हे कोल्हापूर संस्थानात आपल्या आईच्या देखरेखीखाली पूर्ण झाले. राजाराम महाराज हे लहानपणापासूनच अत्यंत संवेदनशील आणि हुशार मानले जायचे. प्राथमिक शिक्षण चांगले आणि व्यवस्थित व्हावे, यासाठी शाहू महाराजांनी डॉक्टर आर्यविन आणि त्यांची पत्नी यांची शिक्षक म्हणून नेमणूक केली. श्रीमती आर्विन यांनी राजाराम महाराजांबद्दल महत्त्वाची निरीक्षणे नोंदवले आहेत. मातोश्री आईसाहेब यांच्याविषयी भक्ती व निष्ठा आणि त्यांचे वडील राजर्षी शाहू छत्रपती महाराज यांच्याविषयी आदर व तद्नुसार वागण्याची तत्परता हे त्यांच्या स्वभावातील दोन प्रमुख गुण होते. बालपणी आज्ञाधारक असणे हा जर चांगल्या राज्यकर्त्याचा आधारभूत गुण समजायचं असेल तर महाराज सर्वोत्कृष्ट ठरवले पाहिजेत.[४१] प्राथमिक शिक्षण पूर्ण केल्यानंतर राजाराम महाराज आपले कनिष्ठ बंधू शिवाजी महाराज यांच्यासह पुढील शिक्षण संपादन करण्यासाठी १९१२ मध्ये इंग्लंडला गेले. मिसेस आर्यविन यांच्या देखरेखीखाली शिक्षण पूर्ण झाले. बनहम हाऊस याठिकाणी शिक्षणासाठी सुरुवात केली. तत्कालीन परिस्थितीत प्रिन्स शिवाजी आणि राजाराम महाराज एकत्र एका शाळेमध्ये शिकत होते. नंतरच्या काळात राजाराम महाराजांना 'ऑक्सफर्ड' विद्यापीठातील 'सेंट एडवर्ड' या शाळेत घालण्यात आले. या काळात त्यांना मिळालेला इंग्लंडमधला पाश्चिमात्य शिक्षणाचा अनुभव पुढील जीवनामध्ये महत्त्वाचा आणि निर्णायक वळण देणारा होता.कारण पाश्चिमात्य जगातील विज्ञान–तंत्रज्ञान आणि भौतिक परिस्थितीचा विकास पाहून राजाराम महाराजांच्या वैचारिकतेत आमूलाग्र बदल झाला. पाश्चिमात्य शिक्षण पूर्ण करून राजाराम महाराज हे भारतात परत आले.

### २) शेतकी शिक्षणाचा अनुभव

पाश्चिमात्य शिक्षणाचा अनुभवाच्या आधारे त्यांनी शेतकी शिक्षणाचा निर्णय घेतला. अर्थातच शाहू महाराजांच्या सल्ल्याशिवाय अशक्य होते. शाहू महाराजांनी सुद्धा त्यांना पाठिंबा दिला. त्यानंतर त्यांनी आलाहाबाद येथे युविंग ख्रिश्चन कॉलेजमध्येप्रवेश घेतला. शेती आणि

शेतीवर आधारित आधुनिक तंत्रज्ञान यावर अभ्यास केला. पुढे शेती क्षेत्रामध्ये नवीन व नावीन्यपूर्णता तंत्रज्ञानाचा महत्त्वाचा प्रयोग पूर्ण केला.

### ३) राज्यकारभाराचे शिक्षण

शाहू महाराजांनी राजाराम महाराज यांना राज्यकारभारात पारंगत करण्यासाठी महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सोपवल्या. ज्यामुळे त्यांच्या नियंत्रणाखाली आणि देखरेखीखाली हा राज्यकारभार त्यांनी पूर्ण केला. त्यासोबतच त्यांना महत्त्वाच्या पदाची जबाबदारीसुद्धा देण्यात आली. दरबाराच्या न्याय खात्यामध्ये काही महत्त्वाची खाती त्यांच्याकडे सोपवण्यात आली. आणि काही स्वतंत्र खाते देऊन राज्यकारभारामध्ये त्यांना पारंगत करण्याचे प्रयत्न शाहू महाराजांनी केले. त्यामुळे राजाराम महाराजांना त्यांच्या कालावधीमध्ये उत्तम प्रशासन कशा प्रकारे चालवावा, लोकांमध्ये समन्वय कसा ठेवावा, राज्य कारभारात सुसूत्रता कशी निर्माण करावी, लोककल्याणकारी कार्यक्रमाची रूपरेषा कशी असावी यासारखे महत्त्वाचे विषय त्यांनी शिकून घेतले.

श्री. युवराज राजाराम महाराज व श्री. शिवाजी महाराज यांस राज्यकारभाराची चांगली माहिती व्हावी व जबाबदारीने त्यांस पुढे येणाऱ्या कामाचे हुकूम देता यावे म्हणून मे.रा.ब.सबनीस दिवाण यांच्या देखरेखीखाली काम सोपविण्यात आले होते. सदरहू काम त्याचेकडून समाधानकारक होत असल्याने निदर्शनास आल्यानंतर युवराज राजाराम महाराज यांना खालील प्रमाणे स्वतंत्र अधिकार देण्यात आले.

१) ॲडमिनिस्ट्रेशन रुल्स यांत राखून ठेवलेले कलम १६,१७,१८,२०,२१,२३,२४,२६,२८,३०,३१ या अकरा कलमांचे सर्व अधिकार श्री. युवराज महाराज यांना व्यक्तिश: दिले होते.

२) खाजगी खात्याचे सर्व अधिकार श्री. युवराज महाराज यांस दिले आहेत. फक्त स्वारी शिकार, देणगी या दोन खात्यांचे सर्व अधिकार राखून ठेवले असून, पिलखाना, जवाहिरखाना, पैलवान या खात्यांत विशेष काम करावयाचे असल्यास मंजूरी घेऊन करण्याबाबत कळविले होते.

३) खाजगी खात्याचे बजेट मंजूर करणे, नवीन नेमणुका करणे किंवा नोकर लोक कमी करणे ही कामे तुर्त मंजूरीने करण्याचे तसचे बाकी सर्व खाती व तत्संबंधी बजेटास अनुसरून करण्याची सर्व व्यवस्था श्री. युवराज महाराज यांनी करण्याचे आदेशित होते.

४) खाजगी खात्याच्या श्री. युवराज महाराज यांस दिलेल्या अधिकारापैकी त्यास वाटतील ते अधिकार श्री. शिवाजी महाराज यांचेकडे हूजूर मंजूरीने सापविण्याची तरतूद केली होती.

५) कुरण कारखाना श्री. युवराज महाराज यांच्या ताब्यात पूर्णपणे राहण्याचा आहे त्या संबधाने रा. सा. गाईकवाड स्पे. ड्युटी यांनी त्यांची आज्ञा घेण्याची आहे.

६) खाजगी खात्यापैकी जी पोट खाती श्री. युवराज महाराज यांच्या साक्षात नजरेखाली देण्यात आली आहेत, त्या खात्याबद्दलचे हूकूम रा. सा. खाजगी कारभारी यांनी त्याजकडून घेऊन अंमल करण्याचा आहे.

७)ज्या खात्याबद्दल मंजूरी इकडून देण्यात येणार आहे त्या खात्यावर साक्षात नजर राहण्याची व ती खाली रा. सा.खा. कारभारी यांच्या ताब्यात राहण्याची आहेत. त्यातील कामाची जबाबदारी रा.सा.प्रा. सेक्रेटरी यांचेवर राहील.

इत्यादी जबाबदारी श्री. युवराज महाराज यांचेकडे सोपविण्यात आली असून सदरहू जबाबदारी त्यांनी सक्षमरित्या पार पाडली होती. तसचे महायुध्दामध्ये सैन्य भरतीच्या संदर्भात लोकांत उत्साह वाढावा म्हणून श्री. युवराज महाराज यांनी कोल्हापूर हद्दीमध्ये जागोजागी सभा भरवून सक्षमरित्या रिक्रुटमेंटचे कामकाज पार पाडले होते.[४२]

## ४) महाराणी लक्ष्मीबाई यांच्या सामाजिक सुधारणेचा प्रभाव

छत्रपती राजाराम महाराजांनी आपल्या सामाजिक सुधारणेचे आणि प्रशासकीय पारदर्शकतेचे धडे शाहू महाराजांकडूनच घेतले पण त्यासोबत त्यांची आई महाराणी लक्ष्मीबाई यांच्याकडून सुद्धा घेतल्याचे आपणाला लक्षात येते. म्हणून राजाराम महाराज यांनी आपल्या आईचा सामाजिक सुधारणेचा वारसा आपल्या भाषणामध्ये खूप अचूकपणे अधोरेखित केला आहे. छत्रपती राजाराम महाराज म्हणतात की "My mother interesting in promoting social intercourse and friendly feeling among the different communities and spares of the society here is known to all and this institution owes its original partly to her desire to bring its out." [४३] यावरून राजाराम महाराजांची आई म्हणजेच महाराणी लक्ष्मीबाई यांचासुद्धा

सामाजिक सुधारणेचा वारसा व कार्य किती व्यापक आहे हे यावरून लक्षात येते. तो वारसा पुढे चालवण्यासाठी छत्रपती राजाराम महाराजांनी अनेक वेळा धोरणात्मक पातळीवर महत्त्वाचे आणि क्रांतिकारी निर्णय सामाजिक सुधारणेच्या बाबतीत घेतल्याचे दिसून येते.

## १२) राजर्षी शाहू महाराजांच्या निधनानंतर राजाराम महाराजांनी केलेले सत्ताग्रहण

राजर्षी शाहू महाराजांच्या निधनानंतर अत्यंत दुःखद प्रसंगी कोल्हापूर संस्थानाचे सूत्र राजाराम महाराजांनी हाती घेतली. राजाराम महाराज आधुनिक शिक्षणाच्या प्रवाहात निर्माण झालेले एक व्यक्तिमत्त्व होते. त्यासोबतच आपल्या वडिलांच्या हाताखाली शासकीय आणि सामाजिक न्यायाचे धडे गिरवले होते.

जेव्हा राजाराम महाराज कोल्हापूर संस्थानाच्या राज्यकारभाराची सूत्रे हाती घेत होते, त्यावेळी त्यांनी प्रसिद्ध केलेल्या जाहीरनाम्यातून आपल्या भावना पुढील शब्दांमध्ये व्यक्त केल्या.

**जाहीरनामा**

**'स्वस्ति श्री राज्यभिषेक शके २४८ दुंदुभिनाम संवत्सरे वैशाख शुद्ध १० मंदवासरे श्री मन्महाराज राजाराम छत्रपती स्वामी यांजकडून:–**

''या जाहीरनाम्याद्वारे कोल्हापूर संस्थानातील आमच्या तमाम प्रजाजनांस जाहीर करण्यात येते की, आमचे परमप्रिय परमपूज्य व प्रजावत्सल तीर्थरूप श्री. मन्महाराज कर्नल हिज हायनेस शाहू छत्रपती जी. सी. एस. आय, जी. सी. व्ही. ओ, जी. सी. आय. ई. एल. एल. डी. एम. आर. ए. एस. हे आज रोजी सकाळी सहा वाजता मुंबई मुक्कामी कैलासवासी झाले. तीर्थरुपांच्या निधनाचा आमचेवर हा अत्यंत शोककारक प्रसंग गुजरला आहे. तथापि परमेश्वरी योजनेस धैर्याने तोंड देणे आम्हास अवश्य आहे. या दुःखद प्रसंगामुळे सर्व राज्यकारभार व प्रजाजनांचे संरक्षण करण्याचे कर्तव्य आमचेवर पडल्यामुळे आम्ही सर्व राज्यअधिकार सूत्रे हाती

घेतली असून राज्याचा पूर्ण अखत्यार आज म्हणजेच वैशाख शुद्ध दशमी शके १८४४ रोजी शनिवारी (तारीख सहा माहे मे सन १९२२) पासून चालविण्यास सुरुवात केली आहे.

आमची सर्व प्रजा संतुष्ट राहून सुखी असावी, तिचे कल्याणाची सतत वृद्धी व्हावी व आमचे राज्याची हर एक प्रकारे सदोदित भरभराट होत जावी, अशी आमच्या परमपूज्य कैलासवासी तीर्थ रूपांप्रमाणे आमचीही उत्कट इच्छा आहे. हा आमचा हेतू परिपूर्ण करण्यास आमच्या सर्व लहानथोर जागीरदार, आप्त, सरदार, मानकरी, इनामदार, कामगार आधी करून तमाम प्रजननास शुद्ध अंतकरणापासून मोठ्या राजनिष्ठेने आम्हांस सहाय्य करतील असा आम्हास पूर्ण भरवसा आहे. आमच्या परमपूज्य वडिलांनी ज्याप्रमाणे अहर्निष झटून प्रजननाचे कल्याण केले व व प्रेम संपादिले तोच कित्ता गिरवण्याचे आमचा दृढ निश्चय आहे. ब्रिटिश साम्राज्याशी आमचे संबंध आजतागायत चालत आल्याप्रमाणे पूर्ण सख्यात्वाने व निष्ठेचे राहतील.

आमचे पवित्र कर्तव्य करण्यास आम्हास ईश्वरी साहाय्य व्हावे. आमची कारकीर्द दीर्घकाळापर्यंत चालून प्रजाजनांस सर्व प्रकारचे सुखकर व्हावे अशी आम्ही त्या जगनियंत्या परमात्म्याची अनन्यभावे प्रार्थना करितो.''[४४]

## संदर्भसूची


१. भिडे ग. रं. आणि देशपांडे, पु. ल. (संपा.१९७१), कोल्हापूर दर्शन, गर्गे स. मा, कोल्हापूरचा इतिहास, दीक्षित इंटरनॅशनल पब्लिशिंग हाऊस पुणे, पृ.४१ .

२. सूर्यवंशी गणपतराव, १९७८, राजा शाहू आणि समाज प्रबोधन, रणजीत प्रकाशन इचलकरंजी पृ. २०३

३. कीर धनंजय,१९७९, राजर्षी छत्रपती शाहू एक समाजक्रांतिकारक राजा, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ.१२

४. Grahm D. C. , Statistical Reports of The Kolhakpur State, 1854, पृ. 1

५. सूर्यवंशी गणपतराव, १९७८, राजा शाहू आणि समाज प्रबोधन, रणजीत प्रकाशन इचलकरंजी पृ.१८

६. कित्ता पृ.१८

७. नाईक तु. बा., १९७८, छत्रपती राजर्षी शाहू महाराज , तरुण प्रकाशन, कोल्हापूर पृ.९

८. कित्ता पृ.१०

९. कित्ता पृ.११

१०. घुगे. व्ही. बी.१९७६, शाहूचे समाजवादी आर्थिक धोरण, द कोल्हापूर राईटर सोसायटी लिमिटेड, कोल्हापूर, पृ.६

११. डॉ. पवार जयसिंगराव, २००१, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ संपादक , महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर, पृ.१६

१२. कित्ता,१६

१३. जाधव रमेश, २०१२ राजषी शाहू छत्रपती, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, दिल्ली पृ.६

१४. कीर धनांजय,१९७९, राजर्षी छत्रपती शाहू एक समाजक्रांतिकारक राजा, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ.२३

१५. डॉ. पवार जयसिंगराव, २००१, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ संपादक , महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी कोल्हापूर पृ.२८५

१६. करवीर सरकारच्या गॅझेट भाग १ ,दिनांक २ एप्रिल १८९४ कोल्हापूर

१७. डॉ. पवार जयसिंगराव, (संपा), २००१, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ संपादक, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी कोल्हापूर, पृ.१८

१८. कित्ता पृ १८

१९. Latthe -. B. - Memories of his highness - Shri Shahu Chhatrapati Maharaj of Kolhapur - Volume I, Time Press, Bombay, 1924, पृ. ८४, ८५

२०. घुगे व्ही. बी.१९७६, शाहूचे समाजवादी आर्थिक धोरण, द कोल्हापूर राईटर सोसायटी लिमिटेड, कोल्हापूर, पृ. क्रमांक ८

२१. जाधव विलासराव – २०१३– संस्थान कोल्हापूर विस्मृतीतील, रावा प्रकाशन, कोल्हापूर, पृ.९

२२. डॉ. पवार जयसिंगराव, २००१, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ संपादक, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर, पृ.२५

२३. कित्ता पृ.२०

२४. करवीर सरकारचे गझेट, कोल्हापूर पुरालेखागार, कोल्हापूर , भाग १, २ ऑगस्ट १९०२,
२५. कीर धनंजय,१९७९, राजश्री शाहू छत्रपती – एक समाज क्रांतिकारक, पाप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ.१२२
२६. डॉ. पवार जयसिंगराव, २००१, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथसंपादक, कुलकर्णी मीना, कोल्हापूरची वरदायिनी – राधानगरी धरण योजना, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर, पृ.६९३
२७. कित्ता पृ.२०३
२८. कित्ता पृ.२१४
२९. कित्ता पृ.२६२
३०. कित्ता पृ.२६२
३१. Ghuge V. B., Chhatrapati Shahu's Socialist Economic Policies (1894 to 1922) : The Kolhapur Writers Co-operative Society Ltd, पृ. 84
३२. कित्ता पृ.८६
३३. कुलकर्णी मीना, कुलकर्णी ब. शि. १९७५ श्री शाहू छत्रपतीचे अर्थकारण, गौरी नंदन पब्लिकेशन, कोल्हापूर पृ.५३
३४. कित्ता पृ.५३
३५. कित्ता पृ.४२
३६. Ghuge V. B. Chhatrapati Shahu's Socialist Economic Policies (1894 to 1922), The Kolhapur Writers Co-operative Society Ltd, पृ. 85
३७. कित्ता पृ.२७
३८. डॉ. पवार जयसिंगराव, २००१, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ संपादक, पानसरे गोविंद, राजर्षी शाहू, आर्थिक धोरण आणि विचार, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर, पृ.६३०
३९. भगत आर. टी.,१९९९, शिक्षण महर्षी राजर्षी शाहू महाराज, सिद्धराज प्रकाशन, पुणे, पृष्ठ ३९
४०. Khane B. D. - Shri Shahu - study of Socio-Political Reforms, (1885 -1922), Shivaji University, Kolhapur, 1978. पृ. 31

४१. हेरवाडे श्रीधर, जानेवारी १९८३, छत्रपती राजाराम चरित्र–ग्रंथ लेखक, प्रकाशन ॲड. महादेवराव आडगुळे, चिटणीस छत्रपती राजाराम प्रतिष्ठान, कोल्हापुर, पृ.४५

४२. डॉ. देसाई संजीव, शाहू छत्रपतींचे निवडक आदेश, भाग–२, एप्रिल १९८९, संचालक, पुराभिलेख संचालनालय, कोल्हापूर, पृ. १ ते ३ आणि १९

४३. संपादक (२०१८) छत्रपती राजाराम महाराज यांचे विचार, संचालक, पुराभिलेख संचालनालय महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ.६

४४. हुजूर ऑफीस, करवीर सरकारचे गॅझेट भाग – १, दिनांक १३ मे, १९२२, कोल्हापूर पृ.३५, ३६

# प्रकरण दुसरे

## छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकिर्दीतील प्रशासन कार्यप्रणाली

- प्रस्तावना

१. राजर्षी शाहू महाराज पूर्व प्रशासन व्यवस्था

२. ब्रिटीश आणि कोल्हापूर संस्थान

३. शाहू महाराजकालीन कोल्हापुरातील प्रशासकीय विभाग

४. शाहू महाराजकालीन प्रशासकीय संरचना

५. छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकिर्दीतील प्रशासन कार्यप्रणाली आणि सरंचना

६. प्रशासकीय रचना व विभाग

## प्रकरण दुसरे

# छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकिर्दीतील प्रशासन कार्यप्रणाली

### प्रस्तावना

कोल्हापूर संस्थानामध्ये प्रशासनाबद्दलची सजगता, संवेदनशीलता आणि लोकांमध्ये असलेली जागरुकता ही नेहमीच कळीचा आणि अत्यंत महत्त्वाचा विषय राहिला आहे. राजाराम महाराजांनी जेव्हा कोल्हापूर संस्थानाचे सूत्र हाती घेतले, तेव्हापासून राजाराम महाराजांच्या एकूण शैक्षणिक जडणघडण व प्रशासकीय अनुभवाची व्यापकता ही अतिशय उपयोगी पडली. राजर्षी शाहू महाराजांच्या निधनानंतर ही प्रशासकीय व्यवस्था पुढे कायम असावी, यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले होते. राजाराम महाराजांनी प्रशासनामध्ये महत्त्वाचे बदल आणि सुधारणा केलेल्या होत्या. त्यातून प्रशासनाला एक सामाजिक न्यायाची भूमिका होती ती कायम ठेवली. राजाराम महाराजांनी आपल्या वडिलांच्या म्हणजे शाहू महाराजांच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांचा वारसा पुढे चालवला. दलित–बहुजनाना न्याय मिळण्याची भूमिका घेऊन राजाराम महाराजांनी प्रशासनामध्ये महत्त्वाचे बदल केले. प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण राजाराम महाराजांच्या काळातील प्रशासकीय संरचना आणि सुधारणा याचा आढावा घेणार आहोत. त्याचबरोबर शककर्ते छत्रपती शिवाजी महाराज ते छत्रपती राजाराम महाराज यांच्या काळापर्यंतच्या प्रशासकीय इतिहासाची तसेच संस्थानाच्या प्रशासकीय धोरणाच्या आणि संरचनाच्या विकासाची चर्चादेखील करणार आहोत. कोल्हापूर संस्थानाचा प्रशासकीय इतिहास आपल्याला प्रामुख्याने तीन टप्प्यांत पाहावे लागेल. हे तीन टप्पे कोल्हापूर संस्थानातील प्रशासकीय धोरणाच्या आणि संरचनेच्या विकासाचे टप्पे मानता येतील. त्यातील पहिला टप्पा हा शककर्ते छत्रपती शिवाजी महाराज ते तिसरे शिवाजी महाराज यांच्या काळापर्यंत दिसून येतो. या काळात पारंपरिक प्रशासकीय व्यवस्थेआधारे प्रशासकीय धोरणे घेतले जात असल्याचे दिसून येते. ती पारंपरिक प्रशासकीय व्यवस्था म्हणजे अष्टप्रधान मंडळ होय. ब्रिटिशांनी आपल्या साम्राज्यवादी धोरणातून विविध संस्थानावर नियंत्रण प्रस्थापित करण्याच्या हेतूने केलेल्या प्रशासकीय हस्तेक्षप आणि प्रशासनात घडवलेले बदल, केलेल्या

सुधारणा या बाबी प्रशासकीय विकासाच्या दुसरा टप्प्यात येतात. छत्रपती शिवाजी महाराज (तिसरे) यांच्या कारकिर्दीनंतर ब्रिटिशांच्या साम्राज्यवादी धोरणाचा विस्तार होऊ लागला. या धोरणातूनच त्यांनी अनेक संस्थाने खालसा केली तर काही संस्थानावर आपले राजकीय एजंट नेमून त्यांच्या कारभारावर आपले अप्रत्यक्ष नियंत्रण प्रस्थापित केले. यातून प्रशासकीय धोरणामध्ये झालेले बदल हा प्रशासकीय इतिहासाचा दुसरा टप्पा मानला जातो. लोकहित आणि लोककल्याणकारी राज्य निर्माण करण्याच्या हेतूने छत्रपती शाहू महाराज आणि त्यांचा वारसा पुढे चालवत राजाराम महाराज यांनी केलेल्या प्रशासकीय सुधारणा, निर्माण केलेल्या प्रशासकीय संरचना हे सर्व प्रशासकीय विकासाच्या तिसरा टप्प्याचा भाग समजले जाते. अशा सर्व बाबींची तपशीलवार माहितीबरोबर छत्रपती राजाराम महाराजांच्या काळातील प्रशासकीय यंत्रणा आणि त्यामाध्यमातून धोरणांची प्रभावी अंमलबजावणी या बाबीची चर्चाही या प्रकरणातून करण्यात आलेली आहे.

## १) राजर्षी शाहू महाराज पूर्व प्रशासन व्यवस्था.

शाहू महाराजांच्या पूर्वी प्रशासकीय व्यवस्था ही प्रामुख्याने दोन टप्प्यांमध्ये कोल्हापूर संस्थानात विकसित झालेली होती. पहिला टप्पा हा पारंपरिक प्रशासकीय व्यवस्थेचा होता. अष्टप्रधान मंडळ ही कोल्हापूर संस्थानातील पारंपरिक प्रशासकीय व्यवस्था होती. जी शककर्ते छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते छत्रपती शाहू महाराज यांच्या काळापर्यंत कार्यरत होती. या अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून राज्याचा कारभार पाहिला जात होता. ही पारंपरिक प्रशासकीय व्यवस्था १७ विभागांत विभागलेली होती, ज्याअंतर्गत वेगवेगळे विषय वेगवेगळ्या विभागांमार्फत हाताळले जात होते.

### १) राजकीय आणि इतर माहिती:

महाराजांचा प्रत्यक्ष राज्यकारभार आणि इतर राजकीय व्यवहार यांच्या निगडीत महत्त्वाच्या घडामोडी या विषयाअंतर्गत येत होत्या. प्रामुख्याने राजे किंवा कोल्हापूर संस्थानातील इतर यांच्यासोबत सगळा व्यवहार हा या कार्यक्षेत्राखाली केला जात होता. उदाहरणार्थ, संभाजी पवार,

संताजी सूर्यवंशी, बहिर्जी भोसले, कृष्णाजी नाईक यांच्याबाबतचा एकूण आर्थिक व्यवहार हा या कार्यक्षेत्रामध्ये येत असे. मोगलांच्या फौजा व त्यांचे भौगोलिक कार्यक्षेत्र व त्यांच्या हालचाली याबाबतचा एकूण व्यवहार हा या कार्यक्रमामध्ये केला जात असे. फौजेच्या कार्यक्षेत्राबाबतचा सेनापती आणि त्यांच्या लष्कराची एकूण संख्या व सेनापती किंवा लष्कर यांनी संस्थानासाठी करावयाची मदत याबाबतचा सर्व व्यवहार या ठिकाणी केला जात असे. युद्धात राजे एकमेकाला गणिमी शह देणे यांसारखे महत्त्वाचे विषय लक्षात घेतले जात. जमिनी इनाम देणे, वेगवेगळ्या धार्मिक कार्यक्रमासाठी व संस्थानासाठी जमिनीच्या जहागिरी व मोजपट्टी करून त्या संबंधित व्यक्तीना देणे, इनाम दिलेल्या जमिनीसंदर्भातील संबंधित व्यक्तीच्या मृत्यूची नोंद ठेवणे किंवा इतर व्यक्तीला किंवा संस्थांना जमीन इनाम म्हणून देणे, सातारकर महाराज, पेशवे, प्रतिनिधी, आंग्रे, सचिव, मंत्री, सुमंत, न्यायाधीश, दाभाडे, सेनापती, गायकवाड, रघुजी भोसले, होळकर, घोरपडे, अक्कलकोटकर, निजाम, पोर्तुगीज व इतर लहान संस्थाने यांचा समावेश या खात्यांतर्गत केला जात होता.

**२) लष्करी खाते:**

**अ) फौज:** वेगवेगळ्या जहागिरदारी आणि संस्थांमध्ये लष्करी सैन्य व त्यांचे कार्याचे विभाजन या खात्यांतर्गत केले जात असे. एखाद्या लढाईमध्ये प्रतिस्पर्धी संस्थानिकांचे वा प्रातांचे सैनिक हाती लागल्यास कोणती शिक्षा दिली जावी, त्यांच्यासोबत कसा व्यवहार केला जावा, हाती लागलेल्या सैनिकांसंदर्भात करावा लागणारा पत्रव्यहार अशा सर्व बाबी या खात्यामार्फत पाहिल्या जात असत. लढाईमध्ये एखादा शिपाई सापडला असेल तर त्यांना शिक्षेचे स्वरूप सुद्धा निश्चित केले जात होते. त्यांना परत पाठवण्याची किंवा कैदी ठेवण्याच्या संदर्भातील सर्व व्यवहार या खात्यांतर्गत केले जात होते. एखाद्या सैन्याला चाकरीला ठेवण्याबाबत उदाहरणार्थ पेशवे यांचे या संदर्भातील सर्व व्यवहार या खात्यातर्गत केले जात असे.

**ब) किल्ले:** किल्ले हा लष्करी खात्यातील महत्त्वाचा भाग होता. किल्ल्याची पाहणी आणि देखभाल करण्याची जबाबदारी स्थानिक पातळीवरील प्रमुख व्यक्तींकडे सोपवली जात असे. ती जबाबदारी

व्यवस्थित पार पाडली जात आहे का याबद्दलचा सर्व व्यवहार या खात्यामार्फत पाहिला जात असे. किल्ल्याची पाहणी करणे, किल्ले परिसरातील जमीन कसण्यास देणे हा व्यवहार किल्ल्याच्या अंतर्गत केला जात असे. शिवाजी महाराजांच्या काळात जे किल्ले होते, त्यांच्या नोंदी व्यवस्थित ठेवण्याबरोबर तेथील व्यवस्थापन कसे आहे, हे पाहण्याचे काम या विभागामार्फत केले जात होते. शिवाजी महाराजांनी किल्ल्यांची यादी केली होती. त्यामधील सातारा, गुणवंतगड, पावनगड, पन्हाळा, प्रतापगड, वितंडगड, राजगड, प्रचंडगड, पुरंदर व वज्रगड, सिंहगड, पांडवगड, वैराटगड, महिमानगड, मनमोहन, सज्ञनगड, वर्धनगड, कमळगड यासारख्या किल्ल्यांच्या नोंदणी व त्यांची देखभाल करण्याचे काम  या खात्यांतर्गत केली जात असे.

### ३) मुलकी खाते:

मुलकी खात्यांतर्गत जमिनीची पाहणी करणे व संस्थानाच्या भौगोलिक सीमा निश्चित करणे, त्या त्या क्षेत्रावरील शेतसारा वसुल करणे, जमिनी ताब्यात घेणे, शेतसाऱ्याची रक्कम निश्चित करणे, शेतसारा हस्तांतरीत करणे, ताब्यात घेतलेली जमीन दुसऱ्या व्यक्तीला कसण्यासाठी देणे अशी अनेक कामे या खात्याअंतर्गत केली जात असत. त्याचबरोबर मामलेदार व कामगार यांच्या संदर्भातील अधिकार व कराच्या वाटणीच्या संदर्भात स्वरूपाच्या बद्दलचे कर हे या बाबी ठरवण्याचे कामही याच खात्यांतर्गत केले जात होते.

**अ) जमिनीची पाहणी व जमाबंदी** : तत्कालीन परिस्थितीमध्ये जमीन पाहणी व जमाबंदी करण्याबाबतचे अधिकार कुलकर्णी आणि पाटील या दोघांना देण्यात आलेले होते.  गाव पातळीवर जमिनीचे सर्व व्यवहार करण्याचे अधिकार या दोघांना प्राप्त झाले होते. विशेषतः जमीन निश्चिती करणे, जमीन कसण्यासाठी देणे, जमिनीचा कर जमा करणे व त्यासाठीच्या आवश्यक सर्व नियंत्रण ठेवण्यासाठीची मुख्य जबाबदारी गावातील पाटील आणि कुलकर्णी यांच्याकडे होती.

**ब) साऱ्याच्या वसुली, सूट आणि हस्तेबंदी** : जमीन कसण्यासाठी दिल्यानंतर गावातील ज्या व्यक्तींना जमीन दिली आहे, त्या व्यक्तींकडून, व्यक्तीने संबंधित रयतेकडून त्या प्रकारची वाटणी घेणे व साऱ्याची वसुली करणे हे एक महत्त्वाचं काम या खात्यांतर्गत केले जात होते. त्यासोबतच

कोणत्या गावांमध्ये दुष्काळ आहे किंवा गावांमध्ये जमीन पडीक पडली आहे. त्या संदर्भातील सर्व माहिती उपलब्ध करून देणे व संबंधित जमिनीसंदर्भातील सारा वसूल करणे यासारख्या महत्त्वाच्या विषयांचा समावेश या खात्याकडे होता.

**क) मामलेदार आणि कमाविसदार :** मामलेदार हा तालुका पातळीवर किंवा प्रांताधिकारी म्हणून जमीन महसूलाच्या संदर्भात काम पाहणारा महत्त्वाचा घटक होता. त्या काळी वार्षिक खंडानुसार शेतजमीन शेतकऱ्यांना दिली जात होती. त्या जमिनीचा खंड किती असावा हे निश्चित करणे, तो खंड वसूल करणे वा माफ करणे हे ठरवण्याचे काम मामलेदार व कमविसदार करत असत.

**ड) गावाच्या सेवेसंबंधी तंटे:** सीमानिश्चितीवरून गावागावांमध्ये होणारे तंटे आणि वाद, गावातील जुने गावाच्या सीमेबाबतचे वाद यासारखे विषय गावातील पाटलांना किंवा पाटलाच्या माध्यमातून मिटवले जात असे.

**४) इतर कर**

**अ) जकात:** गावातील जमीन महसूला व्यतिरिक्त शहरालगत किंवा शहराच्या भागातील खरेदी-विक्रीचा व्यवहार हा या कर पद्धतीमध्ये समावेश केला जात. भिकारी, वेठबिगारी यांच्यावरील कराच्या बाबतीत सूट देण्याचा किंवा कर लावण्यासंदर्भातील निर्णय या खात्यांतर्गत घेतला जात असे

**ब) घासदाणा:** सरदेशमुख ही पद्धतसुद्धा  या खात्यांतर्गत होती. सरदेशमुखाच्या माध्यमातून त्या त्या भागातील लोकांना आपल्या जमिनीच्या महसूलाच्या किंवा गावाच्या एकूण कराची रक्कम देण्यासंदर्भात किंवा वसूल करण्यासंदर्भातील महत्त्वाचे निर्णय या पद्धतीत घेतला जात होता.

**५) महालाचे व गावाचे वतनदार:** पारंपरिक पद्धतीने ज्यांच्या गावातील, ज्यांच्याकडे कुलकर्णी वतनासाठी किंवा इतर महत्त्वाच्या वतनाची जबाबदारी आहे, ती जबाबदारी योग्य रीतीने पाडली जात आहे का? किंवा कोणत्या प्रकारच्या वतनाच्या बाबतीत हस्तांतर केले जाते. याबाबतचा निर्णय घेतला जात असे. कुलकर्णी हे एक वतन होते. या वतनाच्या मागे गावातील लोकांनी

कोणत्या प्रकारच्या सेवा व वस्तू दिल्या जात आहेत, याचा व्यवहार या खात्यांतर्गत केला जात होता. गावातील कुलकर्ण्याकडून वार्षिक खर्च केला जात असे. चांभाराकडून एक जोड चप्पल, तेल्याकडून तेल, दिवाळीला किंवा सणासुदीला महत्त्वाचे खर्चाची तरतूद या खात्याअंतर्गत कुलकर्ण्याला मान म्हणून दिले जात असे.

**६) न्याय खाते** : न्याय खात्यांतर्गत प्रामुख्याने प्रमुख व्यवसायातील भांडण, एखाद्या वतनाच्या संदर्भात झालेले वाद यांसारख्या महत्त्वाच्या बाबीत लक्ष घालून योग्य तो निर्णय देण्याचे काम गावातील पाटील, देशमुख आणि कुलकर्णी यांच्याकडून पार पाडले जात असे. वतनप्राप्त व्यक्तीच्या निधनानंतर ते वतन त्याच्या कुटुंबाकडे ठेवायचे की नाही यासंदर्भातील वादाचा न्यायनिवाडा या खात्याअंतर्गत केला जात असे.

**७) सरकारी कामगारांचे गैरवर्तन:**

परगाणा किंवा त्यांसबंधीचे सर्व निर्णय घेण्याचे अधिकार प्राप्त झालेली व्यक्ती, वतन मिळालेल्या वा वतनासंबंधीचे कर गोळा करण्याचा अधिकार प्राप्त झालेल्या व्यक्ती बेकायदेशीरपणे काही माणसे, स्त्री–पुरुष जवळ ठेवले असतील, तर त्याला योग्य ती शिक्षा या खात्याअंतर्गत दिली जात असे. एखादा चिटणीस बेकायदेशीररीत्या, मनाला वाटेल तसे वर्तन करत असेल, परस्त्रियांवर अत्याचार करत असेल, वा विनाकारण त्रास देत असेल, तर असे सरकारी कामगार शिक्षेस पात्र ठरत असे.

**८) इनाम – नेमणूकी – वतने वगैरे**

**अ) नोकरी केल्याबद्दल** : एखाद्या व्यक्तीचे शासकीय सेवेत असताना निधन झाले असेल किंवा एखादी व्यक्ती युद्धात मारली गेली असेल, तर त्याच्या कुटुंबाला विशिष्ट प्रकारचे इनाम दिले जात होते. ज्यामध्ये प्रामुख्याने जमिनीबरोबर इतर विविध प्रकाराच्या इनामांचा समावेश त्यात असे. स्वामी, चिटणीस किंवा अशा अनेक महत्त्वाच्या पदावर काम करत असेल त्यालासुद्धा जमिनीचा तुकडा उपजीविकेसाठी म्हणून दिला जात असे.

**ब) धर्मकृत्य अगर मेहेरबानी दाखल:** धार्मिक अधिकार किंवा सांस्कृतिक अधिकार प्राप्त व्यक्तीकडून धार्मिक विधी, सांस्कृतिक उपक्रमासाठी योग्य ती सेवा वा योगदान दिल्याबद्दल विशिष्ट प्रकारचे बक्षीस पात्र इनाम किंवा जमिनीचा तुकडा दिला जात असे. यासर्व बाबी या खात्यामध्ये समावेश होत असत.

**९) कित्तावती बहुमान:** राजदरबारामध्ये स्वामीचे एकनिष्ठ सेवक म्हणून व निष्ठेने सेवा केल्याबद्दल त्यांना वेगवेगळे किताब दिले जात होते. त्या किताबापैकी हिंदू राहीचा किताब किंवा यासारखी अनेक बहुमान देऊन त्यांचा सन्मान केला जात असे.

**१०) सार्वजनिक इमारती व लोकोपयोगी कृत्य:** सार्वजनिक कामकाजासाठी किंवा बांधकामासाठी सागवानाचा लाकूड उपलब्ध करून देण्यासाठीचा निर्णय खात्यांतर्गत घेतला जात होता. सार्वजनिक ठिकाणी पाणपोई बनविण्याकरिता, इमारत बांधण्याकरता लाकूड व त्यासाठी लागणारे साहित्य या खात्यांतर्गत दिले जातात.

**११) वैद्यकीय आणि शस्त्रक्रिया:** राजदरबारामध्ये वैद्यकीय सेवा निष्ठेने पार पाडल्याबद्दल तत्कालीन हकीम किंवा वैद्य यांना जमिनी इनामी पद्धतीने दिली जात असे. गावातील कोणत्याही व्यक्तीने आजारपणामध्ये किंवा एखाद्या शारीरिक त्रासातून मुक्त करण्यासाठी निष्ठने केलेले वैद्यकीय काम लक्षात घेऊन इनाम दिले जात असे. हे इनाम त्या मोबदल्यात त्यांना जमिनीचा काही भाग हा त्यांच्या उपजीविकेसाठी दिला जात असे.

**१२) व्यापारी व कारखाने :** कोणत्याही संस्थानाच्या भरभराटीत व्यापारी वर्ग मोलाचे योगदान देत असतो. हे लक्षात घेऊन आपआपल्या राजदरबारी व्यापारासाठी इतर संस्थानातील व्यापाऱ्यांना आमंत्रित केले जात. तसेच बाहेरून आलेल्या व्यापाऱ्यांना व्यापार करण्याचा परवाना दिले जाई. त्यासाठी पेठा वा बाजारपेठा उपलब्ध करून दिले जाई. अशा सर्व जबाबदाऱ्याबरोबरच व्यापार–उदीमाचा काही भाग करस्वरूपात त्यांच्याकडून गोळा केला जात असे. अशा प्रकारचे सर्व व्यवहार या खात्यांमार्फत पाहिले जात असत.

**१३) सरकारने घेतलेले कर्ज :** सरकारमार्फत काही मोठे उपक्रम राबवण्यासाठी बाहेरील संस्थानांकडून किंवा व्यापाऱ्यांकडून कर्ज उपलब्ध केले जात असत. ते कर्ज उपलब्ध करताना त्याचे व्याज, कर्जाची मुदत, परतफेड करण्याचे निकष अशा विविध प्रकारचे व्यवहार या खात्यांअतर्गत पाहिले जात असत.

**१४) वेट:** नदीकिनारी वा नदीच्या आसपासच्या प्रदेशात सरकारमार्फत विविध झाडे लावण्याचे उपक्रम हाती घेतले जात असत. मात्र या उपक्रमासाठी लागणारी रोपे विविध भागांतून मागवावी लागत असत. त्यासाठी लागणाऱ्यया खर्चाची तरतूद, झाडांची रोपे वेळेत उपलब्ध करण्यासाठीची उपलब्धता, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी रोपांची वाहतूक करण्याची व्यवस्था अशा सर्व बाबींशी निगडीत कामकाज या खात्यामार्फत पाहिले जाई.

**१५) धर्मासंबंधी व सामाजिक :** धर्माचे नियम किंवा परंपरा यांचे पालन करणे नैतिकदृष्ट्या बंधनकारक होते. त्यामुळे धार्मिक नियमपालनाचे वा परंपरेचे व्यवहार कोणीही मोडत नसे. प्रामुख्याने धर्माचे नियम, विविध धार्मिक चालीरीती, सण–उत्सवात विविध समाजघटकांचा सहभाग त्याअनुषंगाने पार पाडावी लागणारी धार्मिक जबाबदारी अशा सर्व बाबींशी निगडीत कामकाज या खात्यामार्फत पाहिले जात असत. धर्मनियमानुसार एखादा गुलाम वागत नसेल तर त्याला शिक्षा करण्याचा अधिकारही या खात्यातील प्रमुखांना होता. जाती व्यवस्था ही धर्मव्यवस्थेचा आधार होता. या जातीनुसार रोटी–बेटीचे व्यवहार करणे धर्मसुसंगत समजले जात असे. मात्र एखाद्या व्यक्तीने विवाहबाह्य किंवा गोत्रबाह्य संबंध ठेवले असतील किंवा जातीबाह्य विवाह केला असेल, तर त्यांना शिक्षा देण्याचे काम या खात्यामार्फत करण्यात आले

**१६) सार्वजनिक उत्सव :** राजदरबारी विविध सण–उत्सव मोठ्या थाटात साजरे केले जात असत. या सण–उत्सवात विविध जाती–जमातींच्या लोकांचा सहभाग असे. त्या सण–उत्सवात सहभागी होताना विशिष्ट जातसमुदायातील लोकांचा विशिष्ट कार्य करण्याचा मान दिला जात असे. त्याबद्दल त्यांचा यथोचित मान देऊन त्यांच्याविषयी आदर व्यक्त केले जात असे. [१]

## अष्टप्रधान मंडळः–

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून अष्टप्रधान मंडळ हे एक मंत्रिमंडळाचे महत्त्वाचे प्रशासनाचे केंद्र होते. अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून हा सर्व राज्यकारभार केला जात असे. अष्टप्रधान मंडळामध्ये आठ प्रमुख पदे होती. प्रतिनिधी, प्रधान, अमात्य, चिटणीस, पुरोहित, सेनापती, राजाज्ञा आणि सुमंत असे एकूण आठ मंत्रिमंडळ होते.

**१) प्रधान (**Prime Minister**):** हे पद प्रमुख पद मानले जायचे. राज्याचे प्रमुख या अर्थाने या पदाकडे मंत्रिमंडळ व त्या संस्थानामधील लोकांचा कारभार पाहिला जात असे. छत्रपती हे पद एका अर्थाने अंतिम निर्णय असाच घेतला जात असे. छत्रपतींच्या पुढे कोणीतरी असू शकते, ही कल्पनाच अमान्य होती. छत्रपतींचा निर्णय हा अंतिम असायचा, निर्णयाची अंमलबजावणी, धोरण निर्मिती ही अंतिम असणे हा छत्रपतींच्या पदाकडे पाहण्याचा दृष्टिकोन होता.

**२) प्रतिनिधी (**Interior Minister**):** प्रतिनिधी हे एक महत्त्वाचे मंत्रिमंडळातील पद होते, ज्याच्या कामाचे स्वरूप वकिली होते. राज्याच्या विस्तारापोटी वा विशिष्ट मुद्द्यावरून मतभेद होऊन बऱ्याचदा दोन शेजारी राष्ट्रांमध्ये एकमेकांच्या प्रदेशावर आक्रमणे करणे, युद्धे होणे यासारख्या बाबी घडत असत. यावेळी एकमेकांमध्ये बोलणी करण्याकरिता वा नियमांचे पालन करण्याकरिता आवाहन करण्यासाठी प्रतिनिधी हे अधिकारी सक्रिय असत. राज्यावर आलेल्या परकीय शक्तीचा मुकाबला करण्याच्या हेतूने त्यांच्याशी संवाद साधून मार्ग काढण्यासाठी केला जाणारा पत्रव्यवहार हा प्रतिनिधींमार्फत होत असे. कायदेशीर तहांचे पालन वा उल्लंघन याविषयाची आपापली बाजू मांडण्याचे काम वकील करत असत. ज्यांना प्रतिनिधी असे म्हटले जाई.

**३) चिटणीस (**Secretary**) :** अष्टप्रधान मंडळातील महत्त्वाची कागदपत्रे किंवा पत्रव्यवहार चिटणीसाच्या माध्यमातून केले जायचे. पत्र व्यवहार, लिखाण करणे व पत्रे पाठवणे हे चिटणीसाचे प्रमुख काम होते. दानपत्र देणे किंवा काढून घेणे, इनामपत्रे लिहून देणे, देशपांडे यांच्या नावाने विविध ठराव करून दिले जात असत.

**४) अमात्य (Finance Minister) :** छत्रपतीच्या मंत्रीमंडळात हे एक महत्त्वाचे पद होते. या पदाच्या माध्यमातून परदेशी किंवा बाह्य शक्तींची जो कारभार केला जायचा किंवा कारभारासाठीचे आवश्यक सल्ले, कराराचे नियम, तहाचे नियम, सरकारी कागदपत्रे, राजकीय मुत्सद्दी यासारखी अनेक महत्त्वाची कामे अमात्य यांच्याकडून केली जात. हे राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचे पद होते. त्यांच्या माध्यमातून संस्थांनिक अंतर्गत आणि बाह्य या दोन्ही पातळीवर समन्वय आणि समतोल साधण्याचे महत्त्वाचे काम या पदामार्फत मंत्रीमंडळाच्या माध्यमांतून केले जात असत.

**५) पुरोहित (High Priest) :** राज्याच्या मंत्रिमंडळात पुरोहितांना अत्यंत मानाचा दर्जा होता. वेदसंपन्न व संस्कृत पंडित अशी पुरोहितांची ख्याती होती. राजांना वेळोवेळी धार्मिक कर्मकांड व राज्यांतर्गत धर्माच्या नियमावलीचा सर्व अधिकार या पुरोहितांना असत. या पुरोहितांना राजा इनामी पत्रसुद्धा दिले असल्याचे अनेक उदाहरणे सांगता येतील.

**६) सेनापती (Commandar in Chief):** हा छत्रपतींचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग होता. सेनापतीकडे प्रामुख्याने संस्थानातील संरक्षणाची मुख्य जबाबदारी होती. संस्थांनाच्या अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेला बाधक ठरणाऱ्या घटकाचा शोध घेणे, संस्थानाचे बाह्य शत्रुपासून रक्षण करण्याच्या हेतूने आवश्यक असल्यास इतर संस्थानासोबत तह, करार करण्याच्या कामात छत्रपतींना मदत करणे असे मुख्य काम सेनापती करत होते. त्याचबरोबर कोणाशी युद्ध करावे, कोणाशी करू नये, युद्धप्रसंगी कोणते डावपेच आखले जावेत, युद्ध कराराच्या नियमांचे पालन वा उल्लंघन करण्याबाबतच्या जबाबदाऱ्या सेनापतीच्या माध्यमातून पार पाडल्या जात होत्या.

**७) न्यायाधीश (Chief Justiece) :** छत्रपतीच्या दरबारात महत्त्वाच्या मंत्र्याचे नवीन पद निर्माण केले होते. न्यायाधीश वा राजाज्ञा हा छत्रपतीच्या मंत्रिमंडळात छत्रपतींना राज्यकारभाराविषयी वेळोवेळी सल्ला देणे हे त्यांचे मुख्य काम होते. त्यासोबत लष्करी डावपेच, लढाया किंवा मुत्सद्देगिरी यांसारख्या विषयावर राजाज्ञाकडून केली जाणारी सल्लामसलत हे अंतिम असत. त्यामुळे छत्रपतींच्या एकूण निर्णयप्रक्रियेवर राजाज्ञा हा अतिशय महत्त्वाचा भाग होता.

**८) सुमंत** (Foreign Minister) **:** हे एक महत्त्वाचे पद होते. हे पद प्रामुख्याने पगार, स्त्रीया, मंत्रिमंडळ व मंत्री याबाबतची भूमिका निर्धारित करणारे पद होते. परराष्ट्रासंदर्भात अनेक व्यवहारासंबंधी छत्रपतींना सल्ला देण्याचे काम सुमंतच्या माध्यमातून केले जात असे. प्रामुख्याने सुमंत हे पद परराष्ट्रमंत्री हे ज्या पद्धतीने काम करत असत, त्या पद्धतीची जबाबदारी ही सुमंतांवर होती. अशाप्रकारे पारंपरिक प्रशासकीय यंत्रणा अस्तित्वात होती.

छत्रपती दुसरा यांच्या कालावधीपर्यंत या पद्धतीचा अवलंब राजदरबारी केला जात असे. राजांची किंवा छत्रपतींचे ध्येय धोरण अंमलबजावणी करण्याच्या संदर्भातील अष्टप्रधानमंडळ हे महत्त्वाची भूमिका पार पाडत असे.

## २) ब्रिटिश आणि कोल्हापूर संस्थान

ब्रिटिशांनी आपला साम्राज्यविस्तार हा प्रांतांमध्ये आणि संस्थानामध्ये करण्यास सुरुवात केली. प्रांतांमध्ये आपला राज्यकारभार प्रत्यक्ष पद्धतीने चालवत असत, तर संस्थानामध्ये अप्रत्यक्ष पद्धतीने चालवतात. त्यामुळे संस्थानिक व जहागिरदार असे सर्वच इंग्रजांशी झालेल्या करारांमध्ये पूर्णपणे अंकित केले. त्याचा परिणाम इंग्रजांची सत्ता असलेल्या हिंदुस्थानाचे दोन भागांत विभाजन झाले. एक इंग्रजी अंमलाखालील असणारा भाग म्हणजे खालसा प्रदेश आणि दुसरा भाग संस्थानिकाच्या ताब्यात असणारा भाग म्हणजे संस्थानिक प्रदेश. अशा दोन भागांमध्ये इंग्रजांची सत्ता भारतात होती व ती नियंत्रित होती. दोन भाग जरी प्रशासनाच्या दृष्टिकोनातून वेगवेगळे असले, तरी त्यामध्ये इंग्रज आपल्या प्रशासकाच्या माध्यमातून किंवा प्रतिनिधींच्या माध्यमातून त्या संस्थानात होती. जहागिरदार यांच्यावरती नियंत्रण प्रस्थापित करत असत. याला कोल्हापूर संस्थान हे अपवाद नव्हते, त्यामुळे कोल्हापूर संस्थानसुद्धा त्यांनी आपल्या नियंत्रणाखाली आणले होते. छत्रपती शिवाजी महाराज (दुसरे) यांना संस्थानाच्या सुरक्षेसाठी इंग्रजाशी करार करावा लागला. सन १८१२ मध्ये इंग्रजांशी झालेल्या तहामुळे संस्थान पूर्णतः इंग्रजाच्या नियंत्रणाखाली गेले. या तहामध्ये छत्रपतींवर अनेक जाचक अटी लादल्या. विशेषतः इंग्रज सरकारचा सल्ला घेतल्याशिवाय छत्रपती कोणत्याही परकीय सत्तेशी लढाई करून असा काही प्रसंग उद्भवल्यास तर

प्रथम इंग्रजाकडे ते प्रकरण सोपवावे आणि त्यांनी त्याची तड लावावी''[२] अशा प्रकारच्या अटी या तहामध्ये होत्या. ज्यातून  कोल्हापूर संस्थानाचे बाह्य आणि अंतर्गत सार्वभौमत्व नष्ट झालेले होते. कोणत्याही प्रकारचा निर्णय हा इंग्रजांच्या सल्लयाशिवाय आणि मदतीशिवाय घेतला जाऊ नये आणि जर घेतला असेल, तर तो पूर्णपणे इंग्रजांच्या नियंत्रणाखाली घेतला जावा असे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष नियंत्रण ब्रिटिश सरकारचे होते.

तेव्हापासून ब्रिटिशांचा कोल्हापूर संस्थानांमध्ये हस्तक्षेप वाढत गेला. सन १८२९ मध्ये इंग्रजांनी आपल्या धोरणानुसार कोल्हापूर संस्थानाचा लष्कराचा महत्त्वाचा अधिकार काढून घेतला. किंबहुना असे म्हणता येईल की, लष्करी अधिकारावर ब्रिटिशांची मालकी किंवा नियंत्रण प्रस्थापित झाले. इंग्रजांनी कोल्हापूर राज्याच्या लष्करावर मर्यादा घातल्या आणि लवकरच यापुढे छत्रपतींचा कारभार चांगल्या प्रकारे चालविता यावा म्हणून कंपनी सरकारच्या पसंतीच्या एका योग्य अधिकाऱ्याची नेमणूक केली जाईल. त्यास कारभारासंबंधीची मुख्यत्यारी देण्यात येईल असे स्पष्ट केले.[3] त्यामुळे याचा परिणाम असा झाला की, कोल्हापूर संस्थानाचे कोणतेही राजा किंवा छत्रपती निवडले गेले असले, तरी त्यांना छत्रपतींच्या लष्करी व मुलकी अशा दोन्ही महत्त्वाच्या क्षेत्राची सूत्रे ही कंपनी सरकारच्या हाती गेली. कोल्हापूर संस्थानात अंतर्गत आणि बाह्य अस्थिरता निर्माण झाली.

## ३) शाहू महाराजकालीन कोल्हापुरातील प्रशासकीय विभाग

छत्रपती शाहू महाराज यांच्या काळात व नंतर राजाराम महाराज यांच्या काळात जे प्रशासकीय विभाग तयार केले गेले, ते देशाला स्वातंत्र्य प्राप्त होईपर्यंत कायम होते. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतल्यानंतर प्रशासनाच्या उद्देशाने आणि सोयीने आणखीन एक महत्त्वाची सुधारणा केली. ते म्हणजे प्रशासकीय व्यवस्थेचे पेठ आणि महाल यांमध्ये केलेले विभाजन. या विभाजनातून शाहू महाराजांनी प्रशासनाचे विकेंद्रीकरण करण्याचा प्रयत्न केल्याचे आपणास दिसते. पेठ किंवा महाल हे तालुक्याच्या पातळीवर प्रशासकीय व्यवस्था होती. कोल्हापूरचा प्रशासकीय विभाग हा एकूण १० भागांमध्ये विभागलेला होता. कोल्हापूर संस्थानांतल्या

प्रशासकीय विभागात पेठा आणि महालांचा समावेश होता. १) करवीर २) पन्हाळा ३) अळले ४) शिरोळ ५) भुदरगड ६) गडहिंग्लज ७) रायबाग ८) कटकोळ ९) चनवाड १०) राधानगरी या भागावर शाहू महाराजांचे प्रत्यक्ष नियंत्रण होते. शाहू महाराजांचे प्रत्यक्ष नियंत्रण असलेल्या क्षेत्राचे एकूणे क्षेत्रफळ २ हजार ३३४ चौरस मैल होते. शाहू महाराज या क्षेत्रामध्ये स्वतःच्या नियंत्रणाखाली स्वतःच्या प्रशासकीय मंडळाच्या माध्यमातून प्रशासन पाहात असत. तर छत्रपती शाहू महाराजांची प्रत्यक्ष सत्ता नसली, तरी अप्रत्यक्ष सत्ता होती ती म्हणजे जहागिरी क्षेत्रावर. जहागीरदाराच्या माध्यमातून तिथले प्रशासन पाहिले जात असत. प्रामुख्याने पुढीलप्रमाण जहागिरी होत्या. १) कापशी २) विशाळगड ३) बावडा ४) इचलकरंजी ५) कागल वरिष्ठ आणि कनिष्ठ ६) हिंमतबहादूर व सरलष्कर.जहागिरी असलेल्या क्षेत्राचे क्षेत्रफळ हे ८८३.१ चौरस मैल होते.[४]

## ४) शाहू महाराज कालीन प्रशासकीय संरचना

राजर्षी शाहू महाराजांनी प्रशासनामध्ये खूप मोठ्या प्रमाणात बदल केले, पण हा बदल एका व्यापक सामाजिक बदलाचा भाग होता. राजर्षी शाहू महाराजांनी जेव्हा सत्तेची सूत्रे हाती घेतली तेव्हा, त्यांना प्रशासनाची उदासीनता आणि आर्थिक उधळपट्टी या दोन बाबी दिसत होत्या. अशा परिस्थितीत कोल्हापूर संस्थानाच्या राज्यकारभाराची सुत्रे हाती आलेल्या छत्रपती शाहू महाराजांना प्रशासनावर नियंत्रण प्रस्थापित करणे अतिशय जिकरीचे आणि त्रासदायक होते. कारण एका बाजूला संस्थानावर ब्रिटिश प्रशासनाचे वर्चस्व होते, तर दुसऱ्या बाजूला प्रशासनाअंतर्गत अनेक वादविवाद होते. शाहू महाराजांचे आद्य चरित्रकार ए. बी. लठ्ठे ही त्या काळातील वस्तुस्थिती अतिशय नेमक्या पद्धतीने मांडतात. Shahu Maharaj found in 1894 that the prestige of Kolhapur was reduced to a very low level - long series of years under Regency or Council rule had given rise to ambitions, fortified by precedents, which rendered the position of the Prince still weaker. Bereft of many of the powers and dignities of a first class Indian prince, the Maharaja found himself surrounded by an oligarchy accustomed to look upon power as its natural monopoly and expecting a continuance of the same domination in Kolhapur affairs even under the Maharaj. The political agent was for about two generations the virtual autocrat of Kolhapur and the change from the direct, header

ship of the state to the position of political Agent in a State of which the Maharaj desired to be the de facto as he was de jure ruler was a difficult one.[५] त्यामुळे शाहू महाराजांनी आपल्या प्रशासनातील सर्व लोकांशी बोलल्यानंतर किंवा संस्थानातील सर्व प्रमुख ठिकाणे, प्रत्यक्ष भेटी दिल्यानंतर शाहू महाराज नोंदवतात की, अनुभवांती असे दिसून आले आहे की, श्रीमहाराज सरकारची खुद्द स्वारी इलाके मजकुरी शिकारीकरिता होते, तेव्हा त्या पेठ्याचे हद्दीत मुक्काम पडतो. त्या पेठ्याचे मामलेदार त्याचे फौजदारास सरबराई ठेवण्याबद्दल हुकूम करतात, फौजदार आपल्या ताब्यातील पोलिसांकडे हे काम सोपवतात. मग ते पोलीस सभोवतालच्या खेड्यापाड्यात जाऊन एका ठिकाणावरून बकरी दुसऱ्या ठिकाणी आणि अंडी, कोंबडी वगैरे सापडेल ते घेतात. हुजुरचे स्वारीचा त्या तालुक्यातून कूच होण्याचे वक्ती स्वारीबरोबर जो खाजगी खात्यातील कारकून कामगारावर असतो. तो मामलेदार यांच्याकडून हिशोब घेतो आणि पोहोचल्या जिन्नसबद्दल पैसे अदा करतो. नंतर तो पैसे मामलेदार फौजदारांकडे फौजदार आपले शिपायाकडे, शिपाई गावगन्नाच्या पाटलाकडे आणि पाटील ज्या इसमाकडून जिन्नस घेतले, त्या इसमास अदा करतात, अशी काल्पनिक समज होती; परंतु ज्या इसमाकडून जिन्नस घेण्यात येतात, त्या इसमास तो सर्व किंवा त्यातील काहीतरी पैसा पोहोचतो किंवा कसे याबद्दल वानवा वाटतो. असे होऊ नये व ज्या गोरगरिबांचा माल घेतला, त्यात भरपूर पैसा पोहोचावा व आपल्या स्वारीच्या निमित्ताने उपसर्ग होऊ नये, अशी श्रीमंत महाराज सरकारची इच्छा आहे.[६] असे असल्याने शाहू महाराज लगेच प्रशासकीय आदेश काढतात. ते खालीलप्रमाणे

१. गहू, तांदूळ, ज्वारी, विविध पिठे, साखर, मसाला वगैरे सामुग्री खुद्द हुजूरचे मुदपाकखाण्याकडे स्वारीच्या लोकांकरिता लागेल ती यथाशक्य सर्व कोल्हापूरहून खाजगी खात्याकडून नेण्यात यावी.

२. बकरी, कोंबडी, अंडी हे जिन्नस घेण्याकरिता स्वारी निघण्याचे अगोदर खासगीकडील मुद्दाम एक कामगार पाठविण्यात यावा. त्याचे मुक्कामाचे ठिकाणानजदीक जो बाजारगाव असेल त्या गावी बाजाराच्या दिवशी जाऊन सर्व जिन्नस मालकास रोख पैसे जेव्हाचेतेव्हा जेथल्या तिथे देऊन घ्यावी. सर्पनाबद्दल त्याचप्रमाणे आगाऊ तजवीज करावी, सामानाच्या पैशाचा बटवडा करणे. तो त्यावेळी मुलकी कामगार गावी हजर असल्यास त्याच्यासमोर पैसा अदा करून त्याची सही घ्यावी.

तसा कोणी नसल्यास गावकामगार पाटील–कुलकर्णी यांचे समक्ष पैसे अदा करून मालकाची पावती घ्यावी व कामगारांची साक्ष घ्यावी.

३. दुधाबद्दल खाजगी थट्टीपैकी म्हैशी सवारीबरोबर नेण्याची तजवीज ठेवावी कदाचित ही तजवीज खाजगी खात्याकडील वर नमूद केलेल्या कामगारांनी किंवा कारकुनाने नजिकच्या गावाचे इसमाकडून स्वतः दूध घेऊन मालकास गावी भाव असेल त्याप्रमाणे ताबोडतोब जेथल्या तेथे सर्व पैसे चूकवून द्यावा स्वारीचा कूच होईपर्यंत ठेवू नये.

४. गवत सरकारी कुरणे बहुतांश सर्व पेट्यानिहाय आहेत, सबब लोकांकडून हे जिन्नस घेण्याचे कारण नाहीच कदाचित प्रसंगोपात खरेदी करावा लागल्यास रोख पैसा मालकास जेव्हाचे तेव्हा देऊन घ्यावा.[७]

**१. प्रत्यक्ष प्रशासन**

प्रशासन गतिमान होण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. शाहू महाराजांनी सत्ता हातात घेतल्यानंतर प्रशासनामध्ये खूप मोठ्या प्रमाणात बदल केले. उदाहरणार्थ प्रशासन मंडळ बरखास्त करून नवे हुजूर कार्यालय सुरू केले. प्रशासन मंडळामध्ये प्रामुख्याने तीन सदस्य असत. दिवाण, मुख्य न्यायाधीश आणि मुख्य मुलकी अधिकारी. यांच्या माध्यमातून शाहू महाराजांनी प्रत्यक्ष प्रशासन चालवण्यास सुरुवात केली. शाहू महाराजांनी प्रशासनामध्ये गतिमानता येण्यासाठी प्रामुख्याने प्रशासनाची प्रत्यक्ष माहिती ही महाराजांना मिळेल याची काळजी शाहू महाराजांनी घेतली. त्यामुळे हे तिन्ही अधिकारी प्रथम माहिती ही शाहू महाराजांना कळवत असत. प्रशासन मंडळ हे शाहू महाराजांना, सल्लागार मंडळ कायदेशीर मदत करत असत. शाहू महाराज आपले अंतिम प्रशासकीय आदेश या विभागामार्फत देत असत. या विभागाच्या प्रमुखांच्या माध्यमातून सर्व पातळीवरच्या अंमलबजावणीची प्रक्रिया चालत असत. शाहू महाराज वैयक्तिक प्रशासनावर आणि प्रशासकीय बाबीवरती पूर्णतः नियंत्रण ठेवत असत. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या शाहू महाराज हे प्रशासनावर अंतिम आदेश देऊन गतिमान करण्याचा प्रयत्न करत होते. कोल्हापूर

संस्थानातील शाहू महाराजांच्या पूर्वी जे प्रशासन होते ते प्रशासन अतिशय खर्चिक आणि लोकांच्या बाबतीत उदासीन होते. त्यामुळे शाहू महाराजांनी प्रत्यक्ष प्रशासनाची सुरुवात केली.

## २) हुजूर ऑफिस

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाचे सूत्र हाती घेतल्यानंतर हुजूर ऑफिसची निर्मिती केली. ज्याच्या माध्यमातून सर्व सचिवालयाची महत्त्वाची कामे या कार्यालयाच्या माध्यमातून केला जात. अंमलबजावणी व आदेशाची पूर्तता केली जात असत. हुजूर कार्यालय प्रामुख्याने कोल्हापूर संस्थानातील सर्व कार्यकारी बाबींच्या धोरणावर शाहू महाराजांना सल्ला म्हणून किंवा शाहू महाराजांनी तयार केलेल्या प्रशासकीय धोरणाच्या अंमलबजावणीसाठी काम करत असत. यासाठी शाहू महाराजांनी या कार्यालयाचा मुख्य कारभार करण्यासाठी व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी हुजूर चिटणीस या पदाची निर्मिती केली. कार्यालयाच्या प्रमुखपदी हुजूर चिटणीस म्हणून पूर्वीपासूनच राज्याच्या सेवेत असणाऱ्या रघुनाथ व्यंकाजी सबनीस यांची नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर भास्कर विठ्ठल जाधव यांची असिस्टंट म्हणून निवड करण्यात आली.[८]

## ३) आधुनिक प्रशासन:

शाहू महाराज यांची वैचारिक जडणघडणीत त्यांचे वडील आबासाहेब घाटगे यांच्याबरोबरच त्यांचे शिक्षक सर एस. एम. फ्रेजर यांचे मोठे योगदान आहे. राज्यकारभार, कायदेकानून व इतर व्यवहाराचे चांगले संस्कार त्यांनी केले. ज्याचा कोल्हापूर संस्थानाचा राज्यकारभार करताना शाहू महाराजांना चांगला उपयोग झाला.

शाहू महाराजांच्या अगोदर प्रशासन व्यवहार हा अतिशय मागास, ढिसाळ होता. नियोजन व शिस्तीचाअभाव तसेच वेळेचा अपव्यय  असे अनेक दोष त्यात होते. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतल्यानंतर पहिल्यांदा प्रशासनाबद्दल जी उदासीनता आहे, ती घालवण्यासाठी त्यांनी प्रशासकीय वेळेचे पारदर्शकतेने नियोजन केले.  कार्यालयीन कामकाजाचा

वेळ, सुट्टी, एकूण मासिक सुट्टी याबद्दलचे कालनिर्णय प्रशासनामध्ये राबवण्याचा प्रयत्न शाहू महाराजांनी केला, त्यामुळे प्रशासनामध्ये गतिमानता येण्यामध्ये महत्त्वाचा परिणाम दिसला.

**४) आधुनिक भरती प्रक्रिया:**

छत्रपती शाहू महाराजांच्या पूर्वीचे प्रशासन ही पारंपरिक संरचना होती. अष्टप्रधान मंडळ यांची नेमणूक कोणत्याही पात्रतेशिवाय, पारंपरिक धर्माच्या आणि जातीच्या नियमाच्या आधारे केली जात होती. त्यामध्ये जातीचा प्रभाव जास्त होता. दलित आणि बहुजन समाजाला प्रशासकीय योजनेमध्ये व रचनेमध्ये प्रतिनिधित्व नव्हते. शाहू महाराजांनी पहिल्यांदा शिधा लिहून आधुनिक प्रशासन नावाची संकल्पना कोल्हापूर संस्थानमध्ये सुरू केली. प्रशासनामध्ये शैक्षणिक पात्रता आणि गुणवत्ता यांसारख्या महत्त्वाच्या अटी घालण्यासाठी शाहू महाराजांनी प्रयत्न केला. त्यासोबत त्यांची परीक्षा घेऊन त्यांची प्रशासनामध्ये निवड करण्यात येऊ लागली. त्या शाहू महाराजांनी दलित बहुजनांचे प्रतिनिधित्व प्रशासनामध्ये असावे यासाठी शिक्षणामध्ये आणि नोकरीमध्ये राखीव जागा ठेवला. म्हणजेच प्रशासनात केवळ एका जातीचे किंवा धर्माचे वर्चस्व न राहता आधुनिक पद्धतीचे सर्वसमावेशक आणि गुणवत्तेच्या आधारे नेमण्यात येऊ लागले. त्यांच्या कामाचे स्वरूप आणि व्यापकता ही ठरवण्यात येऊ लागली. हे शाहू महाराजांचे महत्त्वाचे योगदान होते.

**५) आधुनिक कार्यपद्धतीचा समावेश**

पारंपरिक प्रशासनामध्ये प्रशासकीय काम हे विशिष्ट व्यक्तीशी एकनिष्ठ व अंतिम आदेश यापुरते मर्यादित होते. त्यामुळे प्रशासनात आधुनिक मूल्य यांची रुजवणूक होण्यास खूप मोठी अडचण निर्माण होत होती. प्रशासन हे त्या राज्याशी एकनिष्ठ असले पाहिजे. राजा यांच्याविरुद्ध किंवा राज्याला कोणत्याही प्रकारचे प्रश्नांकित उत्तर देण्याच्या पलीकडे त्याची जबाबदारी नसायची. त्यामुळे राजाचा अंतिम शब्द हा त्या प्रशासनासाठी अंतिम शब्द होता. शाहू महाराजांना लक्षात आले होते, शाहू महाराजांच्या ब्रिटिश दौऱ्यानंतर त्यांनी त्या देशातील बहुतेक भौतिक प्रगती व प्रशासकीय कामाबाबत बदल हा पाहिलेला होता. शाहू महाराजांनी प्रशासनासंदर्भात निवड आणि निश्चिती ही आधुनिक मूल्याच्या आधारे, राज्य कल्याणकारी या संकल्पनेच्या आधार केला

विस्तारले गेले. शाहू महाराजांनी प्रशासनासाठी काही महत्त्वाच्या सूचना दिल्या. त्या खालीलप्रमाणे आहेत :

१) छत्रपतीचा योग्य तो आदर आणि सन्मान राखला गेला पाहिजे.

२) कामाच्याबाबतीत काळजीपूर्वक आणि बांधिलकी जपली पाहिजे

३) आपण या राज्याचे सेवक आहोत, याची जाणीव ठेवली पाहिजे

४) कामाच्या गतीला चालना दिली पाहिजे.

५) कार्यालयीन कामकाज वेळेनुसारच झाले पाहिजे.

६) अतिरिक्त खर्च कमी केला पाहिजे, सुविधा उपलब्ध केली पाहिजे.

**६) कुलकर्णी परीक्षा**

पारंपरिक प्रशासकीय व्यवस्थेमध्ये कुलकर्णी हे पद गावाच्या पातळीवर प्रशासकीय कामात महत्त्वाचे होते. कुलकर्णी पदासाठी पारंपरिक आधार जातीवर आधारित होता. गावाचे प्रशासन पाहणे आणि गावातील दस्ता व कर गोळा करण्याची महत्त्वाची जबाबदारी कुलकर्णी या पदाकडे होती. कोल्हापूर संस्थानामध्ये कुलकर्णी वतनाच्या माध्यमातून लोकांना आर्थिकदृष्ट्या शोषण करण्याचे महत्त्वाचे पद होते. गोरगरीब लोकांचे जास्त व्याज दराने पैसे देऊन त्यांची जमीन बळकावण्याचा किंवा सक्तीने व्याज वसूल करण्याचा प्रकार कोल्हापूर संस्थानामध्ये चालत होता. त्यामुळे गावातील जनता ही कुलकर्णी या वतनाच्या विरोधात होती. शाहू महाराजांनी कुलकर्णी वतन नष्ट केले. कारण त्यामुळे एक प्रकारची प्रशासकीय पातळीवर एकाच जातीचे वर्चस्व होते. पण त्यासोबत गावातील गोरगरीब जनतेला या वतनाचा फायदा नव्हता, तर त्यांना जमिनीपासून बेदखल करण्याची व त्यांच्यावर अन्याय – अत्याचार करण्याचे महत्त्वाचे साधन म्हणून 'कुलकर्णी' या वतनाकडे पाहिले जात होते. शाहू महाराजांनी कुलकर्णी वतन नष्ट केले, पण कुलकर्णी हे पद डोळ्यासमोर ठेवून त्यासाठी परीक्षेद्वारे या पदावरील व्यक्ती निवडण्याचे आयोजन करण्यात आले.

या परीक्षेत पास होईल त्याची निवड तलाठी म्हणून केली जाईल, अशी तरतूद शाहू महाराजांनी केलेली होती. शाहू महाराजांची दूरदृष्टी भारतातल्या आधुनिक प्रशासनाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाची आहे. शाहू महाराजांचे राज्यकारभारामध्ये जातीविरहित व सर्व जात धर्मातील लोकांना प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी खूप महत्त्वाचे योगदान राहिले आहे.

### ७) प्रशासकीय खर्चातील कपात

कोल्हापूर संस्थानातील बहुसंख्य लोकांच्या उपजीविकेचे मुख्य साधन शेती व्यवसाय होता. त्यामध्ये शेती व्यवसायातून राज्यकारभारासाठी लागणारा कर गोळा करावा लागे. गावाच्या पातळीवर प्रशासनातील वरिष्ठ व्यक्ती हे गावातील एखाद्या प्रशासकीय कामासाठी जेव्हा येतात, तेव्हा ते लोकांची समस्या न सोडवता तेच लोकांसाठी समस्या होऊन बसतात, हे शाहू महाराजांनी प्रत्यक्ष पाहिले होते. त्यामुळे प्रशासकीय पातळीवर अधिकाऱ्यांचे अशा सहली वा बाहेरचे दौरे यावर नियंत्रण आणले. त्यातून महाराजांनी प्रशासकीय खर्च मोठी कपात केली. त्याचप्रमाणे लोकांकडून मिळणारे अतिरिक्त उत्पन्न शाहू महाराजांनी बंद केले. प्रशासनाचा खर्च अनाठायी खर्च (बोजा) न ठरता तो लोकांच्या हितासाठी खर्च झाला पाहिजे, ही शाहू महाराजांची भूमिका होती.

### ८) गावातील प्रशासन

गावातील प्रशासन हे कोल्हापूर संस्थानाच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे होते. शाहू महाराज येण्यापूर्वी या प्रशासनाकडे फारसे कोणी गांभीर्याने पाहिले नाही. गावातील एकूण अडीअडचणी शेतकऱ्यांना व कारागिरांना भेडसावणाऱ्या समस्या यांच्याकडे फारसे गांभीर्याने पाहिले जात नव्हते. दुष्काळ किंवा कोणतीही नैसर्गिक आपत्ती आली, तरी सहानुभूतीने किंवा मदतीच्या भूमिकेतून पाहिले गेले नाही. गावाच्या पातळीवर प्रशासनाच्या दृष्टिकोनातून पाटील आणि कुलकर्णी हे दोन महत्त्वाचे पद होते. पाटील हे प्रामुख्याने निरक्षर होते, त्यांना लिहिता आणि वाचता येत नव्हते. कुलकर्णी हे वतन सुशिक्षित व साक्षर, ज्याना लिहितावाचता येत होते.संस्थानाच्या छत्रपतींना कोणताही पत्रव्यवहार कुलकर्णी यांच्या माध्यमातूनच केला जात होता. दस्तऐवज करणे

व ते सांभाळून ठेवणे, वरिष्ठांना वेळोवेळी अहवाल सादर करणे हे त्याचे काम होते. ग्रामीण पातळीवरील प्रशासनाला गती मिळण्याच्या दृष्टिकोनातून शाहू महाराजांनी काही महत्त्वाचे धोरणे आखली, ज्यातून गावातील शेतकरी व कारागीर वर्ग सुखी होईलच पण त्याचसोबत संस्थानाचे प्रशासन हे अधिक जबाबदार बनू  शकेल. याचा परिणाम असा झाला की, गावाच्या पातळीचे प्रशासन हे लोकांबाबत संवेदनशील, तर झालेच पण गावातील प्रत्येक दस्तऐवज जपून ठेवणे, संस्थानाला वेळोवेळी अहवाल देणे हे शाहू महाराजांच्या काळात घडले. त्यासाठी कुलकर्णी वतन रद्द करणे, कुलकर्णी वतनाची परीक्षा घेणे अशा प्रकारची सामाजिक न्यायाची भूमिका घेऊन गावाच्या प्रशासनामध्ये आमूलाग्र बदल केला.

### ९.शासकीय क्रांतिकारक निर्णय

शाहू महाराजांनी प्रशासकीयदृष्ट्या खूप महत्त्वाचे निर्णय घेतले, ते निर्णय कोल्हापूर संस्थानात आदर्श नव्हे, तर भारतामध्ये आणि जगाच्या इतिहासामध्ये अत्यंत महत्त्वाचे आहेत हे निर्णय सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून क्रांतिकारी पाऊल होते. यामुळे कोल्हापूर संस्थान हे सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या अत्यंत समताधिष्ठित आणि न्यायाची वागणूक देणारे संस्थान म्हणून पाहिले जात होते. ती धोरणे खालीलप्रमाणे :

अ) वेठबिगारी कायदा रद्द करणे

ब) महार वतन रद्द करणे

क) कुलकर्णी वतन रद्द करणे

ड) प्रशासनामध्ये आणि नोकरीमध्ये राखीव जागा ठेवणे

वरीलप्रमाणे राजर्षी शाहू महाराजांची कार्यप्रणाली पाहिल्यानंतर आता राजाराम महाराजांच्या काराकिर्दीचा आढावा घेऊ.

## ५) छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकिर्दीतील प्रशासन कार्यप्रणाली आणि संरचना

राजाराम महाराज यांचे प्रशासन अतिशय कठोर आणि शिस्तीचे होते. आपल्या वडिलांच्या हाताखाली शासनाचे धडे घेतले होते. प्रशासकीय व्यवस्था ही बौद्धिक जडणघडणीचा भाग झालेली होती. प्रशासनाबद्दल कोणताही हलगर्जीपणा राजाराम महाराजांना सहन होत नसे. याच प्रशासकीय शिस्तीच्या आणि चिकाटीच्या आधारे राजाराम महाराजांनी शाहू महाराजांच्या कर्तृत्वाचा आणि कार्याचा वारसा पुढे चालवला. डॉक्टर भास्कर धाटावकर म्हणतात त्याप्रमाणे, 'राजाराम महाराज प्रशासकीय कामात शिस्तीचे भोक्ते होते. संस्थानातील लोकांना, नोकरांना नेमून दिलेले काम अत्यंत कार्यक्षमपणे करण्याकडे त्यांचा कटाक्ष होता.'[९]

राजाराम महाराज हे कोल्हापूर संस्थानाचे प्रमुख होते, कोल्हापूर संस्थानाचे सर्व निर्णय आणि धोरणाच्या निर्मितीमध्ये राजाराम महाराज हे अंतिम निर्णयाचे पद म्हणून किंबहुना छत्रपती हे पद कोल्हापूर संस्थानाच्या जनतेसाठी अंतिम होते. त्याआधारे कोल्हापूर संस्थानामधील राज्यकारभार चालवत असे. राजाराम महाराज यांचे आदेश वेगवेगळ्या विभागाच्या माध्यमातून पाठविले जात असत किंवा त्या आदेशाची किंबहुना धोरणाची अंमलबजावणी केली जात असे, म्हणून छत्रपती हे पद कोल्हापूर संस्थानासाठी अंतिम होते. ''राजाराम महाराजांच्या राज्यकारभाराची प्रमुख तीन खाती होती. १. जनरल, २. मुलकी आणि ३. न्याय खाते. जनरल खात्याचे प्रमुख दिवाण होते. मुलकी खात्याचे सरसुभे प्रमुख होते व न्याय खात्याचे प्रमुख सरन्यायाधिश होते. या प्रमुख ती खात्यांच्या प्रमुखांच्या अधिपत्याखाली इतर खाती होती. कोल्हापूर संस्थानातील राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर राजाराम महाराजांनी प्रामुख्याने महत्त्वाचा बदल केला, तो म्हणजे आपल्याला कारभारात मदत करण्यासाठी 'हुजूर चिटणीस' या महत्त्वाच्या अधिकाऱ्यास 'कार्यालयाचे प्रमुख' नेमले आणि राजाराम महाराजांचे सर्व आदेश हे चिटणीसाच्या सहीने पाठवली जात असत.''[१०]

राजाराम महाराजांच्या सर्व व्यवहारांची किंवा धोरणांची अंमलबजावणी प्रामुख्याने दिवाण, हुजूर चिटणीस यांच्याकडून होत असे. त्यासाठी आवश्यक तो पत्रव्यवहार हा दिवाण यांच्या नावाने

केला जात असे, त्यामुळे कोल्हापूर संस्थानामध्ये राजाराम महाराजांचा जो पत्रव्यवहार झाला आहे, तो पत्रव्यवहार हा या नावाने पाहण्यास मिळतो किंवा याचा उल्लेख आढळतो, हे या ठिकाणी लक्षात घेणे गरजेचे आहे. प्रशासकीयदृष्ट्या शासनाचे अंमलबजावणी करणे आणि धोरणाच्या अंमलबजावणीसाठीची एक प्रशासकीय यंत्रणा करणे हे राजाराम महाराजांच्या काळात अस्तित्वात होते. जनरल खाते, मुलकी खाते आणि न्यायालयीन खाते या तीन खात्यांचे प्रमुख यांच्या सहीने संबंधित अधिकाऱ्यांना व सेवकांना सही घेऊन या धोरणाची किंवा कायद्याची अंमलबजावणी करण्यास बांधील होते.

राजाराम महाराजांच्या काळामध्ये कोल्हापूरच्या संस्थानाचा प्रशासकीय विभाग हा एकूण दहा विभागांमध्ये विभागलेला होता. कोल्हापूर संस्थानांमध्ये प्रशासकीय विभागात पेठा आणि महालांचा समावेश होता. जे प्रामुख्याने तालुका पातळीवरचे प्रशासकीय विभाग होते किंवा कोल्हापूर संस्थानातील प्रशासकीय विभागणी ही : १० तालुक्याच्या अंतर्गत झालेली होती .ते पुढीलप्रमाणे १) करवीर २) पन्हाळा ३) अळले ४) शिरोळ ५) भुदरगड ६) गडहिंग्लज ७) रायबाग ८) कटकोल ९) चनवाड १०) राधानगरी. या भागावर राजाराम महाराजांचे प्रत्यक्ष नियंत्रण चालत असे. त्यासोबत १८६२ च्या तहानुसार काही भाग हा जहागिरदारीप्रमाणे चालत होता, तो सुद्धा राजाराम महाराजांच्या नियंत्रणाखाली होता. १) कपाशी २) विशालगड ३) बावडा ४) इचलकरंजी ५) कागल कनिष्ठ आणि वरिष्ठ ६) हिंमतबहादूरचा जहागिरदार आणि सरलष्कर जहागिरदार हा सुद्धा कोल्हापूर संस्थानाचा भाग होता. जहागिरदार (आजचा भाग) हा जरी (स्वातंत्र) आपल्या अधिकाराचा वापर स्वतंत्रपणे करत असला, तरी तो प्रामुख्याने कोल्हापूर संस्थानाच्या अंतर्गतच येत होता. त्यामुळे राजाराम महाराजांचा अंतिम शब्द हा त्यांच्यासाठीसुद्धा अंतिम होता. ते कोणत्याही धोरणाच्या बाहेर न जाता त्या धोरणाच्या क्षेत्रामध्ये काम करत असत. हे जहागिरदार पद्धतीचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते.

छत्रपती राजाराम महाराज यांची प्रशासकीय यंत्रणा आणि तंत्र हे प्रामुख्याने शाहू महाराजांच्या काळापासून सुरू आहे. ते पुढे राजाराम महाराजांनी त्यांच्या कालानुसार विकसित केले. शाहू महाराजांनी प्रामुख्याने शासकीय यंत्रणेमध्ये राज्य प्रतिनिधी मंडळ बरखास्त केले होते.

राज्य प्रतिनिधी मंडळ हे प्रामुख्याने पारंपरिक व जातीवर आधारित रचनेला मान्यता देऊन बहुजन आणि वंचित घटकांना आपल्या हक्कापासून नाकारणे हा त्यामागचा उद्देश होता. शाहू महाराजांनी एका बाजूला पारंपरिक राज्य प्रतिनिधी मंडळ बरखास्त करून त्याठिकाणी आधुनिक पद्धतीची प्रशासकीय यंत्रणा विकसित केली. तीच प्रशासकीय यंत्रणा राजाराम महाराजांनी सुद्धा आपल्या प्रशासकीय काळात कायम ठेवली. याचा मूलगामी परिणाम आधुनिक प्रशासन जे प्रामुख्याने शाहू महाराजांच्या काळात आणि नंतर राजाराम महाराजांच्या काळात ब्रिटिश शिक्षणाच्या परिणामामुळे विकसित करण्यात आले होते. ते शाहू महाराजांनी स्वीकारले जे चांगले आहे व लोकाभिमुख आहे ते शाहू महाराजांनी व नंतर राजाराम महाराजांनी आपल्या प्रशासकीय यंत्रणेमध्ये विकसित करण्यात महत्त्वाचे योगदान दिले. म्हणून राज्य प्रतिनिधी मंडळ बरखास्त करून प्रशासक नेमण्यात आले. राजाराम महाराजांच्या काळात प्रशासकीय यंत्रणा आणि व्यवस्था यांचे प्रामुख्याने तीन आधारस्तंभ किंवा खाती होती. दिवाणी, सरन्यायाधिश व सरसुभे अशाप्रकारे तीन आधारस्तंभ होते. या आधारे राजाराम महाराजांचे प्रशासकीय कामकाज व धोरणात्मक अंमलबजावणी केली जात असे. त्यामध्ये प्रत्येक खात्याचे प्रमुख नेमण्यात आले होते. प्रशासकीय श्रम विभाजन हे राजाराम महाराजांनी अतिशय अचूक वेधून प्रत्येक खात्याचा विभागप्रमुख हा त्या खात्याच्या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी व राजाराम महाराजांना प्रशासकीय सल्ला देण्यासाठी एक मध्यस्थ म्हणून व जबाबदारीचे पद म्हणून नेमण्यात आले होते. या तिन्ही विभागाचा प्रमुख अधिकाराने संपन्न व उच्चशिक्षित होता. त्याआधारेच राजाराम महाराज आपल्या प्रशासनाची कामकाज व अंमलबजावणी करत असत. जनरल खात्याचे प्रमुख दिवाण होते. मुलकी खात्याचे प्रमुख सरसुभे होते. न्याय खात्याचे प्रमुख हे सरन्यायाधिश होते. या प्रमुख तीन खात्याच्या नियंत्रणाखाली इतर अनेक छोटी मोठी खाती विभागवार करण्यात आली होती. छत्रपती राजाराम महाराजांनी प्रशासकीय यंत्रणा आणि त्याची मुख्य जबाबदारी आणि कार्य याचे सर्व स्पष्टीकरण व सुसूत्रीकरण करून प्रत्येक खात्याच्या विभागवार कार्यक्षेत्र हे ठरवून दिले होते. प्रत्येक विभाग हे इतर विभागाच्या कोणत्याही कार्यक्षेत्रामध्ये येणार नाही व प्रत्येक खात्यामध्ये त्याचे कनिष्ठ महत्त्वाचे पद नेमून दिले होते. त्यामुळे प्रशासनात गतिमानता येणे, यामध्ये व लोककल्याणकारी धोरणाची

अंमलबजावणी करण्यामध्ये गतिमानता निर्माण झाली. प्रशासन हे अधिक पारदर्शी व लोकाभिमुख झाले. राजाराम महाराजांनी जे काही महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेतले, त्याची अंमलबजावणी केली. प्रत्येक खात्याची कोणती कामे होती व त्यात कोणते महत्त्वाचे विभाग पाडण्यात आले होते, याची तपशीलवार माहिती खालील प्रमाणे आहे.

## ६) प्रशासकीय रचना व विभाग

छत्रपती राजाराम महाराजांनी त्यांचे प्रामुख्याने प्रशासकीय काम हे हुजूर कार्यालय यांच्यामार्फत चालत होते. छत्रपती राजाराम महाराजांपूर्वी या कार्यालयाची सुरुवात शाहू महाराजांनी केलेली होती. चिटणीस हे या सर्व कार्यालयाचे मुख्य अधिकारी होते. छत्रपती राजाराम महाराज यांच्याकडे सहीसाठी पाठवण्याअगोदर ती चिटणीसाकडे पाठवले जात होते. छत्रपती राजाराम महाराजांचे कार्यालय प्रामुख्याने तीन विभागाअंतर्गत विस्तारलेले होते किंवा विभागणी झालेली होती. पहिला सामान्य विभाग, दुसरा अबकारी विभाग, तिसरा न्यायालय विभाग या तीन विभागाच्या प्रमुखाची निवड करण्यात आली होती. या तीन विभागाचे प्रमुख त्या त्या विभागाची कार्यालयीन ध्येय धोरणे व त्यांची अंमलबजावणी आदेश त्यांच्या सहीने छत्रपती राजाराम महाराज यांच्याकडे पाठवत असले किंवा त्यांची सही झाल्यानंतर छत्रपती राजाराम महाराज सही करून त्या आदेशाला अंतिम स्वरूप देण्याचे काम करत असत. दिवाण कर विभागाचा प्रमुख हा यूतुबे कर अधिकारी हा होता तर न्याय विभागाचा प्रमुख हा मुख्य न्यायाधीश होता. विशेष अधिकारी यांची नेमणूक ज्याला प्रामुख्याने आदेश प्रमुख या नावाने ओळखले जात होते. त्याची निवड करण्यात आली होती. त्याची निवड ही प्रामुख्याने आदेशाची अंमलबजावणी करण्यासंबंधात करण्यात आली होती.[११]

१) जनरल विभाग (General Department) – दिवाण (Diwan)

२) न्यायालय विभाग (Judicial Department) – मुख्यन्यायाधिश किंवा सरन्यायाधिश (Chief Judge or Sarnyayadhish)

३) रेव्हेन्यू विभाग (Revenue Department) – मुख्य कर अधिकारी किंवा सरसुभे (Chief Revenue Officer or Sarsubhe)

४) मेडिकल विभाग (Medical Department) – दरबार सर्जन (Darbar Surgeon)

५) सार्वजनिक कार्य विभाग (Public Works Department) – कार्यकारी अभियंता (Executive Engineer)

६) अबकारी जकात विभाग (Bakari Excise Department) – जकात आयुक्त (Excise Commissioner)

७) शिक्षण विभाग (Education Department) – शिक्षण इन्स्पेक्टर (Educational Inspector)

८) किंमत नियंत्रण (Control of Prices) – किंमत नियंत्रण अधिकारी (Controller of prices.)

९) लष्कर विभाग (Military and Red Risala) – मेजर (His Highness Body Guard - Risaldar Major)

- **जनरल विभाग:**

छत्रपती राजाराम महाराजांनी जनरल विभागाअंतर्गत अनेक महत्त्वाची खाती तयार केली होती. या विभागाच्या माध्यमातून प्रामुख्याने राजकीय धोरणात्मक निर्णय घेतले जात. ज्याला राजकीय खाते किंवा पॉलिटिकल खाते या नावाने ओळखले जात होते. सार्वजनिक इमारती व कारखान्याचे बांधकाम व त्या अंतर्गत येणारी इतर महत्त्वाची कामे याच या खात्यांतर्गत समावेश होतो. वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे व त्या संदर्भातील अनेक महत्त्वाचे निर्णय जनरल खात्यांतर्गत येत होते. तुरुंगातील शिक्षा व त्या अंतर्गत येणाऱ्या अनेक महत्त्वाच्या नेमणुका, गावागावांमध्ये शाळा सुरू करणे, शाळेच्या संदर्भातील खर्च हा या जनरल खात्यांतर्गत येत होता. त्यासोबत स्टॅम्प ड्यूटी म्हणजे पोस्ट ऑफिस, छापखाना खाते या खात्यांचा समावेश होता. सर्व खात्यांच्या प्रमुख विभागाअंतर्गत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची प्रमुख जबाबदारी ही

या खात्यावर होती. या खात्याचे सर्व व्यवहार दिवाण यांच्या अधिमान्यतेने पार पाडले जात होते. दिवाणांकडून घेतल्या जाणाऱ्या सर्व निर्णयाच्या आदेशावर मात्र छत्रपती राजाराम महाराजांची सही असे. त्या काळामध्ये रावबहादूर सर आर. व्ही. सबनीस हे दिवाण खात्याचे प्रमुख होते. त्यांचे अभिप्राय मंजूर करूनच तो खात्याअंतर्गत कनिष्ठ पातळीवर त्याची अंमलबजावणी करण्यासाठी पाठवली जात होती.

## जनरल विभागात येणारी खाती (दिवाण यांच्या ताब्यातील)

**१) पॉलिटिकल (राजकीय) खाते:** जनरल विभागात येणारे हे एक अत्यंत महत्त्वाचे खाते होते. या खात्याअंतर्गत प्रामुख्याने राजकीय निर्णय घेतले जात असत. राजकीय निर्णय घेणारा हा विभाग विशेषतः राजाराम महाराजांच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा विभाग होता. या विभागाअंतर्गत एका संस्थानाचे दुसऱ्या संस्थानचे असलेले संबंध प्रस्थापित करण्यासाठीची नियमावली तयार करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय या खात्यांतर्गत घेतला जात असे. इतर संस्थानांसोबत आपल्या संस्थानाशी कशा प्रकारचे संबंध असावेत, व्यापारी, आर्थिक, सामाजिक व राजकीय सहकार्याची भूमिका कशाप्रकारे असावी, यासाठीची नियमावली खात्यांतर्गत करण्यात आलेली होती. छत्रपती राजाराम महाराज हे प्रामुख्याने शाहू महाराजांच्या विचाराचे वारसदार आहेत. त्यामुळे त्यांनी अनेक महत्त्वाच्या सामाजिक आणि राजकीय चळवळीला पाठिंबा दिला होता. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना आर्थिक आणि सामाजिक मदत करण्याचा निर्णय या खात्यांतर्गत घेण्यात आलेला होता. बहिष्कृत सामाजिक परिषदेला आर्थिक मदत करणे, ब्राह्मणेतर चळवळीला वैचारिक नेतृत्व प्रदान करणे, त्यासोबतच ब्राह्मणेतर चळवळ परिषद आयोजित करणे असे अनेक महत्त्वाचे राजाराम महाराजांनी घेतले. त्यासोबत राजाराम महाराजांच्या काळामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेचा विकास झालेला होता. गाव पातळीवर ग्रामपंचायतीची स्थापना करणे, ग्रामपंचायतीला आवश्यक असलेले मनुष्यबळ उपलब्ध करून देणे, ग्रामपंचायतीची स्थापना करण्यासंदर्भातील नियमावली तयार करणे. इलाका पंचायतीची स्थापना करणे. पंचायतीची एकूण लोकसंख्या व त्यावर आधारित सदस्यसंख्या यासारखे नियम या विषयांतर्गत घेण्यात आलेले होते. नवीन

ग्रामपंचायत बांधकामासाठीची परवानगी देणे व त्यासाठीचा खर्च निश्चित करणे. ग्रामपंचायतीच्या शिस्तीसाठी नियम तयार करणे. जर एखाद्या ग्रामपंचायतीने शिस्तीचे पालन केले नाही, तर इलाका पंचायतीच्या माध्यमातून शिस्त व नियम पाळण्यासाठीचे महत्त्वाचे निर्णय या विषयांतर्गत घेण्यात आलेले होते. ग्रामपंचायतीच्या इमारतींना बांधकामाची परवानगी देणे, ग्रामपंचायतीच्या पातळीवर होणाऱ्या खर्चाच्या नियोजनाचा आराखडा तयार करणे, ग्रामपंचायतीच्या पातळीवर कोणत्या बाबीसाठी किती आणि कशाप्रकारे खर्च झाला पाहिजे, यासाठीची नियमावली या विषयांतर्गत करण्यात आलेली होती. ब्रिटिश सरकारचे अप्रत्यक्ष नियंत्रण कोल्हापूर संस्थानावर होते, त्यामुळे वेळोवेळी त्यांच्यासाठी होणारा पत्रव्यवहार व ब्रिटिश सरकारकडून केल्या जाणाऱ्या कर प्रणालीच्या नियम व अटी या विषयींचा पत्रव्यवहार या खात्यामार्फत केला जात होता. ब्रिटिश सरकारमार्फत आयोजित विविध सामाजिक व आर्थिक परिषदांना (उदा. राउंड टेबल कॉन्फरन्स उपस्थित राहण्यासंबधीचे नियम या खात्यांतर्गत करण्यात येत होते. राजाराम महाराजांचा त्या काळात राष्ट्रवादी चळवळीमध्येसुद्धा सहभाग होता. देशाला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, यासाठी राजाराम महाराजांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. बेळगाव येथे भरलेल्या ‘नॉन ब्राह्मण कॉन्फरन्स’ला ‘हुजूरचे कॉन्ट्रीब्यूशन’ म्हणून पाचशे रुपयांचा चेक देण्यात आला.[१२]

**२) पब्लिक वर्कस (इमारत कारखाना) खाते :** या खात्यांतर्गत अनेक महत्त्वाचे निर्णय राजाराम महाराजांनी घेतलेले होते. आज सार्वजनिक बांधकाम विभाग हे शासनाच्या स्तरावर कार्यरत असलेला विभाग पाहतो. राजाराम महाराजांनीसुद्धा त्या काळामध्ये ‘पब्लिक वर्कस’ या नावाने हे खाते चालू केले होते. या खात्याच्या अंतर्गत रेसिडेन्सीच्या मार्गावर कंदील लावणे किंवा इलेक्ट्रॉनिक दिवे लावणे, पुतळा बांधकामास परवानगी देणे, त्यासाठी लागणारी सर्व तजवीज करणे उदा. शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासाठी लागणारा दगड संस्थानातूनच उपलब्ध करावयाचा की बाहेरच्या संस्थानातून मिळवायचा याबाबतचे निर्णय या खात्यामार्फत घेतल्याच्या नोंदी दिसून येतात. तोफखाना असणे कोणत्याही संस्थानासाठी आवश्यक बाब होती. मात्र कोल्हापूर संस्थानातील हा तोफखाना कालस्वरूप मोडकळीस येऊन संपला होता. त्यामुळे छत्रपती राजाराम महाराजांनी नवीन तोफखाना खरेदी करण्यासंदर्भात याच खात्यामार्फत निर्णय घेतला होता. शहारात

सुरक्षित वाहतुकीच्या दृष्टिकोनातून वाहतूक नियमावली करण्यात आली होती. याअंतर्गत शहरातील वाहनांचे प्रकार, वाहतुकीची दिशानिश्चिती, वाहतुकीच्या नियम असलेल्या पाट्या शहरातील दर्शनी भागात लावणे, रहदारीचा रस्ता निश्चित करणे, सार्वजनिक वाहतुकीसाठी मोटार गाड्या, वाहने, घोडागाड्या भाड्याने घेणे, त्याचे भाडे निश्चित करणे व त्या वाहनात एकूण प्रवाशांची संख्या निश्चित करणे, यांसारखे अनेक महत्त्वाचे निर्णय या खात्याअंतर्गत घेण्यात आलेले होते. राजर्षी शाहू महाराजांच्या स्मारकासाठी किंबहुना गोरगरीब वंचित शोषित घटकांसाठी त्याग आणि बलिदान करणाऱ्या महापुरुषाचे स्मारक बांधण्याचा निर्णय या खात्यांतर्गत घेण्यात आलेला होता. ''राजर्षी शाहू महाराजांचे स्मारक, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक बांधण्याचा क्रांतिकारी निर्णय या विषयांतर्गत घेतलेला होता.'' सार्वजनिक वाहतुकीचा सुद्धा महत्त्वाचा विषय या खात्यांतर्गत येत होता. या खात्यांतर्गत शासकीय इमारती बांधकामाचा निर्णय घेण्यात आलेला होता. राजाराम महाराजांच्या काळामध्ये ग्रामपंचायतींची स्थापना, इलाका पंचायतीची स्थापना यांसारखे महत्त्वाचे निर्णय घेण्यात आलेले होते. या निर्णयांनुसार ग्रामपंचायतीची इमारत, इलाका पंचायतीची इमारत किंवा मुन्सिपल कॉर्पोरेशनची इमारत यांसारखे इमारतीचे बांधकाम या खात्याकडूनच करण्यात आलेले होते. इमारतीसाठी किंवा शासकीय कार्यालयात टेबल-खुर्ची यांसारख्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे विषय या खात्याअंतर्गत समाविष्ट होत होते. लोकांना नवीन वसाहत स्थापनेसंदर्भात विषय खात्याअंतर्गत येत होते. नवीन कारखाने उभारणे, जुन्या कारखान्याची डागडुजी करणे अशा अनेक महत्त्वाच्या विषयांवरही या खात्याकडून निर्णय घेतले जात होते. या कामासाठी खात्यांतर्गत सार्वजनिक इमारती व कारखान्याचे बांधकाम या संदर्भातील धोरणात्मक निर्णय घेतले जात होते. कंदील लावणे, त्यासाठी लागणारे आर्थिक नियोजन करणे, त्यासाठीची मान्यता घेणे व त्याचा वार्षिक आर्थिक खर्च ठरवणे, यासारख्या अनेक बाबींचाही समावेश या खात्याअंतर्गत होत होता.[१३]

**३) वैद्यकीय (हॉस्पिटल, डिस्पेसरी व देवी) खाते** : हे खाते निर्माण करून छत्रपती राजाराम महाराजांनी आरोग्याच्या क्षेत्रामध्ये महत्त्वाचे योगदान दिले. वैद्यकीय क्षेत्रात कालानुरूप सुधारणासुद्धा केल्या. या खात्यामार्फत कोल्हापूर संस्थानातील सर्व लोकांच्या आरोग्याची काळजी

घेणे ही मुख्य जबाबदारी होती. संस्थानामधील गावागावांतील लोकांना आरोग्याची सुविधा उपलब्ध व्हावी, म्हणून राजाराम महाराजांनी गाव पातळीवर वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचा एक महत्त्वाचा निर्णय घेतला होता. या निर्णयानुसार डॉक्टर्स आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी गावागावांत जाऊन प्रत्येक घरातील नागरिकांची आरोग्य तपासणी करणे बंधनकारक केले. त्यानुसार डॉक्टर्स दवाखान्यातील कर्मचारी यांना वेगवेगळी गावे वाटून देण्यात आली. त्यानुसार हे डॉक्टर्स व कर्मचारी वर्ग आपल्या गावात घरोघरी जाऊन आरोग्य तपासणी करत. आजाराचे निदान झाल्यावर त्या रुग्णावर औषधोपचार करत. संबंधित रुग्ण कोणत्या आजाराने बाधित आहेत, त्याला कोणत्या औषधाची जरुरी आहे, याची तपशीलवार माहिती वरिष्ठांना तात्काळ कळवत असत. या खात्याअंतर्गत डॉक्टरांच्या जबाबदाऱ्याबरोबरच डॉक्टरांच्या नेमणुकीचे विषय, डॉक्टरांच्या कामाचा कालावधी, डॉक्टरांचे वेतन, रजा, त्यांच्या कामात सुधारणा होण्यासाठी करावयाचे प्रयत्न अशा सर्व बाबी येत असत. गावापातळीवर दवाखान्याच्या आवश्यकता असेल, तर त्याची सर्व तजवीज करण्याची व्यवस्था या खात्यामार्फत केली जात होती. कारण त्या काळात मोठ्या प्रमाणात लोक वेगवेगळ्या साथीच्या रोगांना बळी पडत असत. उदा. प्लेग. त्या काळात प्लेग या रोगांने कोल्हापूरात थैमान घातले होते. त्यात बरीच मनुष्यहानी आणि आर्थिक हानी झालेली होती. त्यामुळे रोगावर नियंत्रण मिळवण्याबरोबरच त्याचा प्रतिबंध करण्यासाठी राजाराम महाराजांनी गाव पातळीवर डॉक्टर्स व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचा महत्त्वाचा निर्णय या खात्याअंतर्गत घेतला गेला. गावपातळीवरील डॉक्टरांचे कार्यक्षेत्र निर्धारित करणे, कोणत्या व किती वेळेमध्ये डॉक्टर उपस्थित राहतील त्या संदर्भातली नियमावली तयार करणे व तसा आदेश देणे, गावपातळीवरील डॉक्टरांचे वेतन निश्चित करणे, डॉक्टरांना वेळेवरती वेतन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी घेणे यासारखे महत्त्वाचे विषय राजाराम महाराजांनी या खात्यामार्फत घेतले होते. प्लेगबरोबरच देवीच्या नियंत्रणासाठी महाराजांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. शासकीय सेवेत असलेल्या डॉक्टरांनी खाजगी दवाखाने चालवू नयेत, यासाठी सुद्धा नियमावली या विषयांतर्गत बनवली. डॉक्टरांना औषध उपलब्ध करून देणे, ती औषधे गाव पातळीवर लोकांना सहजरित्या उपलब्ध होतील याची सुविधा उपलब्ध करून देणे यांसारखे महत्त्वाचे निर्णयही राजाराम

महाराजांनी या खात्यामार्फत अंमलात आणले. कोल्हापूर संस्थानामध्ये कोल्हापूरमधील प्रत्येक नागरिकांना स्वच्छ पाणी उपलब्ध व्हावे यासाठी राजाराम महाराजांनी या विषयाच्या अंतर्गत अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यामुळे कोल्हापूर संस्थानामध्ये हवेद्वारे निर्माण होणारे रोग किंवा प्रदूषण, पाण्याच्या प्रदूषणामुळे निर्माण होणारे रोग यासारख्या संकटाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे शुद्ध हवा व शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्याची मुख्य जबाबदारी राजाराम महाराजांनी ग्रामपंचायत व पंचायत समिती यांच्यावरती सोपवण्याचा एक महत्त्वाचा निर्णय या खात्यामार्फत घेण्यात आलेला होता.[१४]

**४) तुरुंग खाते:** जनरल विभागाअंतर्गत येणारे तुरुंग खाते हे कोल्हापूर संस्थानातील अत्यंत महत्त्वाचे खाते होते. कोल्हापूर संस्थानमध्ये अनेक अपप्रवृत्ती, चोरी व मारामारी, दरोडे व खून होत असत. अपराध्यांना योग्य ती शिक्षा व्हावी आणि कोल्हापूर संस्थानमध्ये कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित व्हावी यादृष्टिकोनातून तुरुंग खात्याची निर्मिती केलेली होती. एकूण गुन्ह्याचे प्रमाण व त्यासाठीची शिक्षा निश्चित करण्याचा कालावधी या खात्यांतर्गत घेतलेला होता. राजाराम महाराजांनी तुरुंग खात्याअंतर्गत कैद्यांना शिक्षा करणे, त्या शिक्षेचा कालावधी निश्चित करणे, शिक्षेचे स्वरूप ठरवणे यांसारख्या महत्त्वाच्या बाबी या खात्यांतर्गत हाताळल्या. त्यासोबत त्या काळामध्ये काळ्या पाण्याची शिक्षा हे एक अत्यंत महत्त्वाचे शिक्षेचे स्वरूप होते. कोणत्या गुन्हेगाराला कशा प्रकारची शिक्षा द्यायची, काळ्या पाण्याची का नाही यासाठीचा महत्त्वाचा निर्णय या खात्यांतर्गत घेतला जात होता. तुरुंगासाठी बंदुकीचा बार खरेदी, तुरुंगाचे बांधकाम आणि डागडुजी करणे, एखाद्या कैद्याची शिक्षा कमी करायची असेल तर त्यासाठीचा निर्णय घेणे हे महत्त्वाचे विषय राजाराम महाराजांनी तुरुंग खात्याअंतर्गत समाविष्ट केलेले होते.[१५]

**५) नगदी खाते (खजिनासह):** या खात्यांतर्गत राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील सर्वसामान्यपणे आर्थिक बाबीची तरतूद केली होती. प्रत्येक विभागाचा आर्थिक ताळेबंद मांडणे, वर्षाचा आर्थिक खर्च या विभागांतर्गत ठरवण्याचा अधिकार दिवाणांना देण्यात आलेला होता. राजाराम महाराजांच्या परवानगीने तो ठराव पास करून कोल्हापूर संस्थानामध्ये अंमलबजावणी केली जात होती. कोल्हापूर संस्थानामध्ये शासकीय स्तरावर असणाऱ्यांचे पगार देण्यासंबंधी

महत्त्वाची धोरणे आखली जात होती. करप्रणाली निश्चित करणे, मालावर कर बसवणे, कोणत्या मालावर किती कर हे ठरवायचे पूर्ण अधिकार या खात्याला देण्यात आलेले होते. कोल्हापूर संस्थानाच्या अंतर्गत व बाह्य उत्पादित होणाऱ्या आयात व निर्यात मालावर शुल्क नेमण्याचे महत्त्वाचे अधिकार त्यांना देण्यात आले होते.[१६]

**६) शाळा खाते** : राजाराम महाराजांनी सर्वांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण हा धोरणात्मक निर्णय घेतला होता. त्यामुळे प्रत्येक गावात सक्तीचे आणि मोफत शिक्षण उपलब्ध करून देण्याची मुख्य जबाबदारी ही कोल्हापूर संस्थानातील या खात्यावर होती. त्यामुळे प्रत्येक गावात शाळा स्थापन करणे, शाळेसाठी निधी उपलब्ध करून देणे, शाळेसाठीचा वार्षिक खर्च यांना मंजुरी देणे, शिक्षकाची नेमणूक करणे यांसारखे महत्त्वाचे विषय या खात्याअंतर्गत येत असत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विशेषतः अस्पृश्य जातीतील मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये म्हणून त्यांना शिष्यवृत्ती देणे, वसतीगृहाची सोय उपलब्ध करून देणे असे अनेक महत्त्वाचे निर्णय छत्रपती राजाराम महाराज यांनी घेतले. त्या निर्णयाची अमंलबजावणी याच विभागामार्फत केली जात असे. छत्रपती राजाराम महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने अस्पृश्य वर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती देण्याची योजना सुरू केली. छत्रपती शिवाजी महाराजांनी गोरगरीब जनतेसाठी अठरापगड जातीतील सर्वांना समान वागणूक मिळावी, यासाठी खूप महत्त्वाचा प्रयत्न केला होता. हा वारसा पुढे चालावा व तो इतिहास समाजातील मुलांना या शिष्यवृत्तीच्या माध्यमातून कळावा, हाच त्यामागचा मुख्य हेतू होता. प्राथमिक शाळेच्या इमारतीचे बांधकाम शाळेतील शिक्षणासाठी शिक्षक व इतर कर्मचारी वर्गाने आपले मासिक वेतन देण्यासंदर्भात निर्णय या खात्यांतर्गत घेण्यात आलेला होता. राजर्षी शाहू महाराजांनी जी वसतिगृहाची चळवळ चालू केली होती. त्या चळवळीचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे सर्व बहुजन समाजातील वंचित घटकांना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी, म्हणून विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या, वसतीगृहाची उपलब्धता याबाबी होत. अशा सोयी राजाराम महाराजांकडून होस्टेलच्या नव्या बांधकामाचे काम या खात्यांतर्गत आले व त्यासोबत जुने हॉस्टेल्स यांच्या बांधकामासाठी, डागडुजीसाठीचे महत्त्वाचे निर्णय या खात्यांतर्गत घेण्याची परवानगी देण्यात आली होती. स्कॉलरशिपचे नियम तयार करणे, स्कॉलरशिप कालावधी

निश्चित करणे, स्कॉलरशिपसाठीं संख्या निश्चित करणे, शाळेतील निधीसाठी नियम तयार करणे, शाळा बांधकामासाठी इमारत उपलब्ध होत नसेल, तर इमारतीसाठी जागा भाड्याने घेणे, राजाराम महाराजांनी ट्रेनिंग स्कूल उपलब्ध व्हावेत, यासाठी प्रयत्न केले होते. राजाराम महाराजांनी पंढरपूर, नागपूर, अहमदनगर या ठिकाणी नवीन वसतिगृहाचा निर्णय या खात्यांतर्गत घेतला होता. कोल्हापूर संस्थानामध्ये एक ग्रंथ वाटप करून देण्याचा निर्णय या खात्यांतर्गत घेण्यात आलेला होता. त्यासाठी आवश्यक तो निधी वार्षिक निधी या नावाने उपलब्ध करून देण्याचा निर्णय या खात्यांतर्गत घेण्यात आलेला होता. शिक्षणासाठी आवश्यक ते नियम तयार करून शिक्षणाची संधी निर्माण करून जास्तीत जास्त मुलांपर्यत जाता येईल यासाठी प्रयत्न करणे, उच्च शिक्षणासाठी गरज असेल, तर कर्जाची उपलब्धता करून देणे, स्कॉलरशिप पुन्हा चालू ठेवणे असे अनेक महत्त्वाचे शैक्षणिक निर्णय या खात्यांतर्गत घेण्यात आलेले होते.[१७]

**७) स्टॅम्प खाते:** या खात्यांतर्गत कोल्हापूर संस्थानातील दळणवळणाच्या सुविधा प्रामुख्याने लोकसंपर्काचे माध्यम म्हणून या खात्याकडे पाहिले जात होते. राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानामध्ये दळणवळण किंवा संपर्काचे माध्यम हे पारंपरिक ठेवले नाही, कारण पारंपरिक संपर्काचे माध्यम हे वेळखाऊपणा व आर्थिकदृष्ट्या परवडणारे नव्हते. त्यामुळे या खात्यात शाहू महाराजांनी पोस्ट ऑफिसची निर्मिती केली. ते सेंट्रल पोस्ट ऑफिस या नावाने ओळखले जात होते. त्या सेंट्रल पोस्ट ऑफिसच्या माध्यमातून लोकांच्या संपर्कातून अत्याधुनिक सुविधा व तंत्रज्ञान आत्मसात करण्याचा धाडसी निर्णय राजाराम महाराजांनी घेतला. कोल्हापूर संस्थानामध्ये आधुनिक पोस्ट ऑफिस सुविधा उपलब्ध करून दिली. इतकेच नाही तर त्या पोस्ट ऑफिससाठी मनुष्यबळाची आवश्यकता होती. राजाराम महाराजांनी पोस्ट ऑफिससाठी महत्त्वाचे अधिकारी नेमले. त्यांना वेतनावर नेमणूक देण्यात आली. त्यामुळे कोल्हापुरातील सर्व भागांमध्ये संपर्क साधण्यासाठी महत्त्वाचा प्रयत्न केला. .पोस्ट ऑफिसमधील अधिकाऱ्याची नेमणूक करणे, अधिकाऱ्यांचा कालावधी ठेवणे, अधिकाऱ्यांचे वेतन निश्चित करणे, पोस्ट ऑफिसचे कार्यालय स्थापन करणे, प्रत्येक विभागात पोस्ट ऑफिसचे विभागीय कार्यालय सुरू करणे यासंबंधीचे निर्णय या खात्यांतर्गत घेतले गेले.[१८]

**८) छापखाना खाते:** एकोणिसाव्या शतकात ब्रिटिशांच्या मदतीने अत्याधुनिक दळणवळणाची व तंत्रज्ञानाची साधने विकसित करण्यात कोल्हापूर संस्थानांमध्ये शाहू महाराजांनी व शाहू महाराजांनंतर राजाराम महाराजांनी महत्त्वाचे प्रयत्न केले. त्यामुळे जनसामान्यांचे जीवन केवळ सुखी न होता प्रगतीच्या दिशेने कार्यशील झाले. एकोणिसाव्या शतकात छपाई मशीन हीसुद्धा एक अत्यंत महत्त्वाची क्रांती झाली. या छपाईच्या मशीनमुळे वृत्तपत्र ही चळवळ जास्त गतीने विस्तारली गेली. राजाराम महाराजांना वृत्तपत्राच्या क्षेत्रामध्ये या खात्याची निर्मिती करून खूप महत्त्वाचे योगदान दिले. त्यापैकी छापखाना मशीन कोल्हापूर संस्थानामध्ये सुरू करण्याचा धाडसी निर्णय या खात्यांतर्गत घेण्यात आला. अनेक महत्त्वाची पुस्तके, ठराव व वृत्तपत्रीय लिखाणाला चालना देण्यात आली. या विभागाअंतर्गत मराठीत भाषांतराची कामे, पुस्तक प्रकाशनाची कामे केली जात होती. संत तुकाराम महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज या सारख्या थोर समाज क्रांतिकारक महापुरुषांची चरित्रे लिहिण्यास व प्रकाशित करण्यास या विभागाने महत्त्वाचे योगदान दिले. सोळाव्या शतकातील अनेक दस्ताऐवज जे कालानुरूप नामशेष होण्याच्या मार्गावर होते, ते प्रकाशित करण्याचा निर्णय या विभागांतर्गत घेण्यात आला. हा एक ऐतिहासिक ठेवा आहे. इतिहास समजण्यास व इतिहास घडवण्यामध्ये या दस्ताऐवजाची एक महत्त्वाची भूमिका आहे, हे राजाराम महाराजांनी ओळखले होते आणि म्हणून त्यांनी या विभागाअंतर्गत सर्व दस्तऐवज छापून प्रकाशित करण्याचा आणि ते लोकांमध्ये वितरित करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला. राजाराम महाराजांच्या उत्तरार्धामध्ये छपाईचे महत्त्वाचे काम वृत्तपत्र छपाई, द टाइम्स ऑफ इंडिया यासारखे वर्तमानपत्र प्रकाशित करण्याचा निर्णय या विभागाअंतर्गत घेण्यात आलेला होता. राजाराम महाराजांनी छापखाना खात्याच्या अंतर्गत अनेक दुर्मिळ चरित्र व संस्कृत ग्रंथ प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला.[१९]

## मुलकी खाते

मुलकी खाते हे प्रामुख्याने कोल्हापूर संस्थानामध्ये आर्थिक राज्यकारभाराच्या महत्त्वाच्या व्यवहाराची नोंदणी आणि वाटप यावर देखरेख, नियंत्रण ठेवण्याचे काम करत असे. शाहू

महाराजांच्या काळापासून मुलकी खात्याला खूप महत्त्वाचे स्थान होते. मुलकी खाते हे महत्त्वाचे होते. शाहू महाराजांच्या एकूण राज्यकारभाराच्या दृष्टिकोनातून व नंतर छत्रपती राजाराम महाराजांच्या राज्यकारभारात अत्यंत महत्त्वाचे असे हे खाते होते. याचे कारण स्पष्ट आहे की, ते कोल्हापूर संस्थान हे कल्याणकारी राज्य होते आणि जगभरातल्या कल्याणकारी राज्याच्या निर्मितीचा आधार आर्थिक व्यवस्थापन व त्या राज्यकारभारातील करप्रणाली व लोकांच्या हितासाठीच्या कररचना ही होती. या धोरणामध्ये प्रामुख्याने किंमत मूल्य कर, अंतर्गत व्यापार आणि बाह्य व्यापार यांसारख्या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये शासनाचा हस्तक्षेप असेल. या हस्तक्षेपाच्या माध्यमातून लोककल्याणकारी राज्याची संकल्पना विस्तारली जाईल. ही त्या मागची तात्त्विक बाजू होती. ही तात्त्विक बाजू राजाराम महाराजांनीसुद्धा आपल्या प्रशासकीय यंत्रणेमध्ये राबवली होती. त्यामुळे मुलकी खात्यामध्ये प्रामुख्याने उत्पन्न आणि खर्च याचा एकंदरीत आढावा किंवा ताळेबंद घेतला जात असे. कोल्हापूर संस्थानाचे एकूण उत्पन्न व खर्च याचा समतोल साधून कल्याणकारी धनाची निर्मिती या विभागाच्या माध्यमातून केली जात असे. मुलकी खात्याच्या माध्यमातून संकट निवारण्यासाठी किंवा शेती, उद्योग, व्यापार, वैद्यकीय शिक्षण, मानवी गुंतवणूक, जंगले यासारख्या विविध विभागांत आणि उत्पन्नाच्या बाबतीत महत्त्वाच्या तरतुदी केल्या. सार्वजनिक कामेसुद्धा या खात्यांतर्गत केली जात असत. यात प्रामुख्याने रेल्वे इमारती, रस्ते व पूल, शैक्षणिक इमारती इत्यादी कामांचा समावेश या खात्यांतर्गत केला जात होता. लोकांनी महत्त्वाचा खर्च करणे, दवाखाना उपलब्ध करून देणे, नवीन बंधारे बांधण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प या विभागांतर्गत घेण्यात येत. कोल्हापूर संस्थानमध्ये दुष्काळाचा अनेक वेळा सामना करावा लागत होता. दुष्काळावर मात करण्यासाठी आवश्यक तो खर्च करून त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचा प्रयत्न या खात्याच्या माध्यमातून छत्रपती राजाराम महाराजांनी केलेला दिसतो.

मुलकी खाते म्हणजे मुलकी विभागाचे प्रमुख म्हणून मुख्य कर अधिकारी किंवा सरसुभे काम पाहात असत. प्रामुख्याने मुलकी विभागाअंतर्गत खालील खात्यांचा समावेश होता.

## १) जमीन महसुलाचे खाते:

जमीन महसूल खाते हा एक मुलकी खात्यातील अत्यंत महत्त्वाचा विभाग होता. या खात्याच्या माध्यमातून जमिनीवरती महसूल गोळा करणे, जमिनीची वहिवाट, मध्यस्थी रस्ता भरणे, तलाव आणि नाल्यांची व्यवस्था लावणे, गावाच्या मुलकी कामाच्या नकला उपलब्ध करून देणे, गावातील जमिनीवर कर आकारणी करून कर वसुली करणे हासुद्धा भाग या विभागांतर्गत समाविष्ट केला जात असे. जमीन महसूल हा कोल्हापूर संस्थानाचा एक महत्त्वाचा विभाग होता. याचे कारण म्हणजे एका बाजूला जमिनीचे प्रमाण हे जास्तीत जास्त बागायती होते या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत झाली. त्यासाठीची मूलभूत, पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात जमीन महसूल खात्याने मोठा पुढाकार घेतला. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढले आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नातील कर उत्पन्न म्हणून कोल्हापूर संस्थानाला उपलब्ध होत असे. या विभागाला शेतसारा विभाग म्हणून सुद्धा ओळखले जात होते. शेती, शेतीच्या खरेदी–विक्रीवर कर आकारणी केली जात असे. शेतकऱ्यांच्या शेती विषयाच्या नकला उपलब्ध करून देणे व त्यासाठी नाममात्र रक्कम घेणे. शेतीचा फेरफार किंवा खरेदी–विक्रीच्या माध्यम नावामध्ये बदल करणे अशा अनेक प्रकारे कोल्हापूर संस्थानामध्ये कर मोठ्या प्रमाणात जमा केला जात असे.[२०]

**२) वजई इनाम खाते:** जमीन हा प्रकार प्रामुख्याने राज्यसंस्थेच्या किंवा राजांच्या मालकीचा भाग होता. राज्याच्या मालकीच्या आधारे लोकांना किंवा धार्मिक गटांना, किंवा विशिष्ट अशा व्यक्ती समुदायांना जमिनी इनाम दिल्या जात असत किंवा कसण्यासाठी किंवा उपजीविकेसाठी किंवा मालकी हक्कासाठी दिले जात असत. कर संकलनाचा हा एक अत्यंत महत्वाचा विभाग आहे. वजई इनाम यामध्ये तगाई जमिनीचा मोबदला किंवा महार वतन यांच्यातील जमिनी गावातील गाव इनाम यांच्या जमिनी, देवालयाची व्यवस्थेसाठीच्या जमिनी, धार्मिक इनाम असलेल्या जमिनी, देवालयाच्या जमिनी, क्षेत्र गुरु यांच्या जमिनी यासारख्या विविध जमिनींचा समावेश या विभागांतर्गत होत असे. उदाहरणार्थ छत्रपती राजाराम महाराजांनी ''डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना पन्हाळा येथील जमिनीची मालकी त्यांच्या नावावर करण्याचा महत्त्वाचा निर्णय त्या काळामध्ये घेतलेला होता. शाहू महाराजांनी क्षेत्रीय शंकराचार्यांची नेमणूक करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतलेला

होता.'' त्या अनुषंगाने धार्मिक किंवा क्षेत्रीय शंकराचार्य यांच्या माध्यमातून जमिनीचे इनाम त्यांनासुद्धा देण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला होता. जमीन इनाम देणे, जमीन काढून घेणे, जमिनीच्या बाबतीतले मालकी हक्क या संदर्भातील महत्त्वाचे निर्णय या विभागांतर्गत घेतले जात असत. एखादी व्यक्ती किंवा धार्मिक समुदाय आणि गट यांना जमिनी इनाम स्वरूपात दिले असले, तरी त्या मोबदल्यात त्याची कररचना किंवा इतर मालकी हक्क यासंदर्भातील सर्व व्यवहार या विभागांतर्गत पाहिले जात असत. त्यामुळे जमीन नोंद करणे आणि जमिनी इनाम म्हणून देणे किंवा बक्षीस म्हणून दिली हे त्या विभागाच्या अंतर्गत येणारे विषय होते.[२१]

**३) अवकाते खाते:** अवकाते खाते या खात्यांतर्गत नवीन घरांना परवानगी देण्यासंदर्भातील महत्त्वाचा निर्णय घेतला जात असे. करवीरमध्ये घरांची नवीन वसाहत उभी करणे, नोकरदार लोकांना घराच्या बांधकामासाठी मंजुरी देणे, वसाहतीसाठी नवीन जागा घेण्यास मान्यता देणे, शासकीय कर्मचाऱ्यांना निवासस्थान उपलब्ध करून देणे, ग्रामीण भागातील महार, मातंग समुदायांच्या वसाहतीसाठी नवीन जागा उपलब्ध करून देणे किंवा नवीन घरकाम, बांधकाम करून देण्याबाबतचे महत्त्वाचे निर्णय या विभागांतर्गत घेतले जात असत. कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक वेळा दुष्काळ, दुष्काळसदृश्य महापूर किंवा अशा अनेक नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागत असे. त्यावेळी त्या संस्थानातील ग्रामीण भागातील जो शोषित आणि वंचित समुदाय आहे, त्याला त्या गावातल्या एकूण निवासाबाबतीत बेदखल व्हावे लागत होते. त्यामुळे या विभागाअंतर्गत ज्या गावातील नागरिक बेदखल झालेला आहे, त्याला निवारा आणि आपल्या उपजीविकेला पुन्हा हक्काची निवाऱ्याची जागा उपलब्ध करून देण्याचे महत्त्वाचे काम या खात्यांतर्गत केले जात असत.[२२]

**४) जंगल खाते:** जंगल खाते हा सुद्धा एक महत्त्वाचा विभाग होता. या विभागांमध्ये प्रामुख्याने कोल्हापूर संस्थानातील जंगलविषयक प्रशासन आणि जंगलाचे व्यवस्थापन केले जात असत. जंगलामधील विविध प्राणी आणि पक्षी यांच्या संरक्षणासाठी विशेष प्रकारचे संरक्षक नेमले जात असत. त्यासाठी मनुष्यबळाची वेतनावर आधारित निर्मिती केली जात असे. व त्यातून जंगलातील विविध प्राणी आणि पक्षी यांचे संरक्षण केले जात असे. जंगलातील महत्त्वाचे लाकूड याचा आयात–

निर्यातीचा मोठ्या प्रमाणात व्यापार कोल्हापूर संस्थानांतर्गत केला जात असे. उदाहरणार्थ, मोठ्या प्रमाणात सागवनाची लागवड करून सागवानी लाकडाची निर्यात केली जात असे. या आयात–निर्यातीत कोल्हापूर संस्थानाला खूप मोठ्या प्रमाणात पैसा म्हणजेच आर्थिक फायदा मिळत असे. छत्रपती राजाराम महाराजांना शिकारीची खूप मोठ्या प्रमाणात आवड होती. शिकारीसाठी विविध प्रकारचे मनुष्यबळ पदरी असणे आवश्यक आहे, त्यांच्या राहण्याची व्यवस्था व त्यासोबतच त्या मनुष्यबळासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून दिला जात असे.[२३]

**५) नोंदणी खाते :** शासकीय व्यवहाराची नोंदणी ठेवण्याचे काम करणारे हे खाते 'रेकॉर्ड ऑफ द राईट' या नावाने प्रचलित होते. गावातील तलाठी कार्यालय हे नोंदणी ऑफिसचे सर्वात कनिष्ठ कार्यालय होते. या कार्यालयामध्ये प्रामुख्याने गावातील जमिनीचा व्यवहार, शेती व शेतीपूरक व्यवसाय, इतर नैसर्गिक साधन संपत्ती या बाबींची नोंदणी तलाठी कार्यालयात तलाठ्याच्या माध्यमातून केले जात असे. त्यानंतर पाटील हा गावातील या सर्व प्रशासकीय व्यवस्थेला एक महत्त्वाचा आधार होता. गावातील सर्व व्यवहार तलाठी आणि पाटील यांच्या माध्यमातून चालत असत. त्यानंतर इलाका पंचायत हे सुद्धा नोंदणीचे महत्त्वाचे कार्यालय होते. तालुक्याच्या आणि त्या इलाख्यातील सर्व प्रशासकीय जमाखर्च याचा ताळेबंद या कार्यालयात ठेवला जात होता. त्यासोबतच इमारतीच्या बांधकामाची परवानगी, इनामी जमिनी हस्तांतर, नवीन इमारतीची परवानगी, जागेच्या इमारतीचे प्लान व इतर महत्त्वाच्या नोंदणी करणे अत्यंत महत्त्वाचे होते. नोंदणी खात्याच्या परवानगीशिवाय कोणत्याही नवीन बांधकामाला परवानगी दिली जात नसत. नोंदणी खात्याच्या या कारभारामुळे खूप मोठ्या प्रमाणात महसूल हा राज्याला मिळत असत.[२४]

**६) पोलीस खाते:** कोल्हापूर संस्थानातील आधुनिक प्रकारचे खाते होते. पोलीस खात्यामार्फत कोल्हापूर संस्थानातील कायदा आणि सुव्यवस्था पाहण्याचे काम केले जात होते. पोलीस खाते हे कोल्हापूर संस्थानांमध्ये आधुनिक प्रशासकीय व्यवस्थेच्या आधारे निर्माण केले जात असे. पोलिसांच्या परीक्षा घेणे व त्यांना त्या परीक्षेत उत्तीर्ण झाल्यानंतर महत्त्वाच्या खात्यावर नियुक्ती करणे या आधारे पोलिसांची निवड केली जात असे. पोलीस प्रामुख्याने इलाका पातळीवर कोल्हापूर संस्थानाच्या पातळीवर आपल्या कार्यालयाच्या माध्यमातून कोल्हापूर संस्थानात शांतता

आणि सुव्यवस्था निर्माण करत. कोल्हापूर संस्थानात चोरी आणि दरोडेखोरांचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात होते. त्याला पायबंद घालण्यासाठी पोलीस खात्याकडून खूप महत्त्वाचे प्रयत्न केले गेले. एखादी व्यक्ती चोरी करताना किंवा खून करताना पकडली गेली असेल, तर त्याला शिक्षा पोलीस खात्याने न्यायालयाच्या माध्यमातून तुरुंगात डांबण्याचे काम पोलीस खात्यांतर्गत केले जात असे. पोलीस खाते कोल्हापूर संस्थानात महत्त्वाचे खाते म्हणून ओळखले जात होते.[२५]

**७) रेव्हेन्यू सर्वे जमीन मोजणी व पाहणी खाते:** या खात्याच्या अंतर्गत वेगवेगळ्या जमीन कसणाऱ्या लोकांना जमीन देण्याच्या संदर्भातील नियम तयार करणे, जमिनीचा सर्व्हे करणे, जमिनीची शेतकऱ्यांना मोजणी करून देणे, दोन शेतकऱ्यांमधील जमिनीच्या संदर्भातील वाद सोडून मुलकी अधिकारी प्रत्यक्ष जमिनीवर जाऊन दोन्ही शेतकऱ्यांची व कायदेशीर जमिनीची नोंदणी करणे, याबद्दलची फेरतपासणी करून, जमिनीतील वाद विवाद सोडवणे व त्यासोबतच जमिनीची मोजणी झाल्यानंतर जमीन नावावर करून देणे. जमिनीच्या आकारावर कर आकारणी केली जात असे. त्यामुळे प्रत्येकाच्या जमिनीची योग्य ती नोंदणी व त्याअनुषंगाने कर आकारणी होते आहे का नाही, हे पाहणे, एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर त्या व्यक्तीचा वारसदार म्हणून जमिनीवर नोंदणी करणे, वारसदार नसेल तर इतर संबंधित नातेवाईकांच्या सहमतीने जमिनीतील नावाचा फेरफार करणे, या संदर्भातील अनेक महत्त्वाच्या विषयात कायदेशीर नियम तयार करण्याचे काम या खात्यामार्फत केले जात होते.[२६]

**८) दवाखाने खातेः** कोल्हापूर संस्थानमध्ये दवाखाना हेसुद्धा अत्यंत महत्त्वाचे खाते म्हणून ओळखले जात होते. कोल्हापूर संस्थानातील नागरिकांना आपल्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे काम या खात्याच्या अंतर्गत करण्यात आलेले होते. कोल्हापूर संस्थान हे त्या काळामध्ये दवाखाना खाते निर्माण करून नैसर्गिक आपत्ती, सामाजिक आपत्तीवर यशस्वीपणे तोंड देत. कोल्हापूर संस्थानातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेतली जात. पिसाळलेल्या कुत्र्याच्या चाव्यामुळे निर्माण होणारी विषबाधा ही मानवी जीवनाच्या अस्तित्वासाठी धोकादायक असे. त्यामुळे त्यावर उपाययोजना करण्यात दवाखाने खात्याने खूप महत्त्वाची भूमिका पार पाडलेली आहे. दवाखान्यातील सर्व कर्मचारी, सोबतच डॉक्टरसुद्धा हे

वेतनावर निवडले जात असत. त्यांच्या कामाची मुख्य जबाबदारी सरसुभे यांच्या मुख्य दिवाणाच्या माध्यमातून निश्चित केली जात. कोणत्या दवाखान्यात व कुठे काम करणे गरजेचे आहे यासाठी कामाचे नियोजन कोल्हापूर संस्थानाच्या प्रशासकीय विभागाकडून केले जात होते.[२७]

**९) म्युनिसिपालिटी** : १९२५ मध्ये कोल्हापूर नवीन मुनिसिपलिटी स्थापन करण्यासंदर्भातला कायदा तयार करण्यात आला. त्या कायद्याअंतर्गत कोल्हापूरसाठी एक मुनिसिपलिटी स्थापन करण्यासंदर्भात नियमावली तयार करण्यात आली. म्युनिसिपालिटी ही कोल्हापूरसाठी शहरी विभागाच्या प्रतिनिधित्वाची व प्रशासकीय कामकाजासाठी निर्माण केलेली महत्त्वाची स्थानिक स्वराज्य संस्था होती. कोल्हापूर संस्थानामध्ये स्थानिक स्वराज्य संस्था ही प्रामुख्याने प्रशासकीय आणि राजकीय पातळीवर काम करण्याच्या उद्देशाने निर्माण करण्यात आलेली होती. ग्रामीण भागातील लोकांना राजकीयदृष्ट्या प्रशिक्षित करण्यासाठी ग्रामपंचायत होती. ग्रामपंचायतीची निर्मिती करणे त्यासाठीची निवडणूक व सभासद निवड या संदर्भातही नियमावली तयार करण्यात आली. इलाका पंचायत ज्यामध्ये प्रामुख्याने गावापेक्षाही मोठी आणि शहरापेक्षाही लहान निम–शहरी अशा पातळीची एक प्रशासकीय रचना निर्माण करण्यात आली. ही रचना प्रामुख्याने ग्रामपंचायतीपेक्षा वरिष्ठ आणि मुनिसिपलिटीपेक्षा कनिष्ठ अशी करण्यात आलेली होती. ज्यामध्ये लोकनिर्वाचित सर्व सभासद व शासकीय सभासद यांना प्रतिनिधित्व देण्यात आलेले होते. १९२५ च्या कायद्यानुसार नवीन मुन्सिपलिटी तयार करण्यात आली होती. म्युनिसिपालिटीचा कारभार पाहण्यासाठी म्युनिसीपालिटीचे सदस्य म्हणून लोकांकडून २० आणि सरकारकडून २० असे एकूण ४० सदस्य निवडले जात होते. या संदस्यांच्या माध्यमातून प्रशासकीय आणि राजकीयदृष्ट्या राज्यकारभार पाहिला जात होता. छत्रपती राजाराम महाराजांच्या प्रशासकीय व्यवस्थेतील महानगरपालिका म्हणजेच मुनिसिपालिटी या नावाचे खातेसुद्धा स्वतंत्रपणे निर्माण करण्यात आले होते.[२८]

## न्याय खाते

न्याय खाते हे इतर दोन खात्यांपेक्षा स्वतंत्र खाते होते. न्याय खात्याचे प्रमुख मुख्य न्यायाधीश म्हणून काम पाहत होते. मुख्य न्यायाधिशाच्या आधारे सर्व न्यायदान होत असेल, पण

अंतिम अधिकार छत्रपती राजाराम महाराजांनाच होता. त्यांच्या माध्यमातून न्यायाची निश्चिती केली जात असे. न्याय खात्यामध्ये प्रामुख्याने दोन विभाग होते एक फौजदारी विभाग, तर दुसरा दिवाणी विभाग.[२९]

### सरन्यायाधीश यांच्या ताब्यातील

**१) दिवाणी खाते:** दिवाणी खात्यामध्ये प्रामुख्याने नुकसान भरपाई, कायद्याचे योग्य ते पालन न करणे, कायदेभंग करणे, कायदेशीर व्यवहार न करणे, सामाजिक शांतता आणि सुव्यवस्था भंग करणे, कोल्हापूर संस्थानाच्या बाबतीत नागरिकांबाबत अन्याय अत्याचार किंवा न्यायपूर्ण व्यवहार न करणे यासारख्या अनेक प्रकरणांचा समावेश दिवाणी खात्यामध्ये होईल.

**२) फौजदारी खाते:** फौजदारी खाते हे प्रामुख्याने एखाद्या व्यक्तीच्या जीवनाचे अस्तित्व अमान्य करणे. म्हणजेच एखाद्या व्यक्तीला मारहाण करणे, त्या व्यक्तीच्या सन्मानाचा अपमान करणे, खून करणे, मारामारी करणे, हत्या करण्याचा प्रयत्न करणे, शारीरिक हिंसा करणे, अशा बाबींचा समावेश फौजदारी न्यायालयामध्ये होता. छत्रपती राजाराम महाराजांच्या काळामध्ये कोल्हापूर संस्थानातील अनेक समूहामध्ये किंवा व्यक्ती व्यक्तींमध्ये हिंसात्मक कृती, मारामारी किंवा तत्सम गुन्ह्याच्या बाबतीत सर्व प्रकरणे हे फौजदारी न्यायालयामध्ये जात असत.

## संदर्भसूची

१. Selection from the Satara Rajas and the Peshwas Diary, South Chhatrapati Prepared by Rao Bahadur Ganesh Chimnaji, Sahakari Preess satara ही माहिती शाहू छत्रपती राव बहादुर गणेश चिमाजी वाद लिखित शहागड ते सातारा यांच्याकडून प्रकाशित पुस्तकाच्या आधारे घेण्यात आलेले आहेत.

२. डॉ. पवार जयसिंगराव, २००१, (संपा.) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर, पृ.१६

३. कित्ता, १६

४. घुगे. व्ही. बी., १९७६, शाहूचे समाजवादी आर्थिक धोरण, द कोल्हापूर राईटर सोसायटी लिमिटेड, कोल्हापूर, पृ. ३

5. Latthe B. - Memories of His Highness Shri Shahu Chhatrapati - Maharaja of Kolhapur (Vol. I), Time Press, Bombay, १९२४, P.84, 85

६. डॉ. पवार जयसिंगराव, २००१, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ संपादक, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर पृ. १९, २०

७. कित्ता २०

८. कित्ता २५

९. धाटावकर भास्कर (संपा.) एप्रिल २००६ छत्रपती राजाराम महाराज यांचे निवडक आदेश, भाग १, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन, कोल्हापूर, प्रस्तावना पृ.१

१०. धाटावकर भास्कर (संपा.) एप्रिल २००६ छत्रपती राजाराम महाराज यांचे निवडक आदेश, भाग १, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन, कोल्हापूर, प्रस्तावना पृ.१

११. हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅजेट, भाग १, फायनान्स डिपार्टमेंट विभाग, कोल्हापूर ९ ऑगस्ट १९२६ पृष्ठ १६

१२. हुजूर ऑफिस, जनरल खाते, आदेश क्रमांक ५५५, ठराव बुक क्रमांक, ३६१, दि. ७/०१/१९२५, कोल्हापूर

१३. हुजूर ऑफिस, जनरल खाते, आदेश क्रमांक, ६३, ठराव बुक क्रमांक, ३४६, दि. १३/०७/१९२३, कोल्हापूर

१४. हुजूर ऑफिस, जनरल खाते, आदेश क्रमांक, २१४, ठराव बुक क्रमांक, ३२२, दि. १२/०७/१९२२, कोल्हापूर

१५. धाटावकर भास्कर (संपा.), २००६ छत्रपती राजाराम महाराज यांचे निवडक आदेश, भाग १, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन, कोल्हापूर पृ. १६, १२६, १२८

१६. कित्ता पृ. २१

१७. हुजूर ऑफिस, शाळा खाते, आदेश क्रमांक१६२, ठराव बुक क्रमांक, ४४८, दि. ०३/०८/१९२७, कोल्हापूर

१८. हुजूर ऑफिस, जनरल खाते, आदेश क्रमांक ३७०, ठराव बुक क्रमांक, ३२२, दि. २४/०७/१९२२, कोल्हापूर
१९. हुजूर ऑफिस, जनरल खाते, आदेश क्रमांक ३२५, ठराव बुक क्रमांक,३५६, दि. १३/११/१९२४, कोल्हापूर
२०. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, आदेश क्रमांक ३७८, ठराव बुक क्रमांक, ३७८, दि. २५/११/१९२६ कोल्हापूर
२१. धाटावकर भास्कर (संपा.) २०१० छत्रपती राजाराम महाराज यांचे निवडक आदेश, भाग २, संचालनालय महाराष्ट्र शासन, कोल्हापूर पृ. ३९
२२. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, आदेश क्रमांक ५२२, ठराव बुक क्रमांक, ३७८, दि. २२/०१/१९२७, कोल्हापूर
२३. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, आदेश क्रमांक २४२, ठराव बुक क्रमांक, ३८०, दि. ०४/११/१९२७, कोल्हापूर
२४. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, आदेश क्रमांक १६०, ठराव बुक क्रमांक, ३८०, दि. ०९/०७/१९२७, कोल्हापूर
२५. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, आदेश क्रमांक १९३, ठराव बुक क्रमांक, ४४८, दि. २०/०८/१९२७, कोल्हापूर
२६. धाटावकर भास्कर (संपा.) २००६ छत्रपती राजाराम महाराज यांचे निवडक आदेश, भाग १, संचालनालय महाराष्ट्र शासन, कोल्हापूर पृ.१०३
२७. धाटावकर भास्कर (संपा.) २०१० छत्रपती राजाराम महाराज यांचे निवडक आदेश, भाग २, संचालनालय महाराष्ट्र शासन, कोल्हापूर पृ. १६५
२८. करवीर सरकारची गॅजेट भाग ४, दि. २१/११/१९२५ पृष्ठ क्रमांक ३६
२९. हजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट, भाग १, फायनान्स डिपार्टमेंट, दि. ०९/०८/१९२६, कोल्हापूर, पृ. १६, १७

प्रकरण तिसरे

# छत्रपती राजाराम महाराज यांच्या प्रशासकीय सुधारणा

- प्रस्तावना

१) कोल्हापूर स्टेट म्युनिसिपल अॅक्ट,१९२५

२) पंचायत संस्थेचा कायदा, १९२६

३) प्रशासकीय सुसूत्रता आणि सुधारणा

४) सेंट्रल पोस्ट ऑफिसची स्थापना, १९२२

५) हायकोर्ट आणि अपील कोर्टाची स्थापना

६) सुप्रीम कोर्ट स्थापना

७) सरकारी व्यवस्थेतील कनिष्ठ पदावरील नोकरांना प्रोत्साहन

८) प्रशासकीय यंत्रणेत अस्पृश्यांना संधी

९) शासकीय यंत्रणेत अनुंकपा धोरण निर्मिती

१०) नवीन व्यापारी पेठेची निर्मिती

११) कोल्हापूर संस्थानच्या अर्थसंकल्पात सुधारणा

१२) शेतकी व सहकार या स्वतंत्र खात्याची निर्मिती

## प्रकरण तिसरे

# छत्रपती राजाराम महाराज यांच्या प्रशासकीय सुधारणा

### प्रस्तावना

स्थानिक स्वराज्य संस्था ही लोककल्याणकारी राज्याच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाची संस्था आहे. याबाबत राजाराम महाराजांच्या मनामध्ये किंचितही शंका नव्हती. कोल्हापूर संस्थानांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्था रुजवायच्या असतील, तर त्यासाठी मानसिक, आर्थिक, सामाजिक आणि प्रशासकीय तयारी असणे गरजेचे असते, याची जाणीव त्यांना होती. तत्कालीन परिस्थितीत ब्रिटिश सरकारमार्फत अनेक प्रशासकीय सुधारणा होत होत्या. त्याअनुषंगाने प्रशासकीय सुधारणा या लोकशाहीविषयीची जाणीवजागृती आणि विकास यांचा एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे, हे महाराजांच्या लक्षात आले होते. कोल्हापूर संस्थानातील तत्कालीन परिस्थिती पाहता लोक अंधश्रद्धा, कर्मकांड, जातीय मानसिकता आणि मध्ययुगीन विचार याच्या पूर्णतः आहारी गेलेले होते. त्यामुळे लोकशाही मानसिकतेची जडणघडण करताना आणि लोकांना विकासाच्या प्रक्रियेत सामावून घेताना छत्रपती शाहू महाराज आणि छत्रपती राजाराम महाराज यांना सातत्याने अनेक अपप्रवृत्तींविरोधात लढा देत राहावा लागला. त्यातूनच त्यांनी संस्थानामध्ये अनेक सुधारणा केल्या. छत्रपती शाहू महाराजांनी अशा सुधारणांची पायाभरणी केली असली तरी –छत्रपती राजाराम महाराजांनी तरीही शिक्षण, प्रशासकीय नोकरभरती यांसारख्या क्षेत्रामध्ये आमूलाग्र आणि क्रांतिकारी बदल घडवून आणले. त्यातून खऱ्या अर्थाने कोल्हापूर संस्थानातील जनसामान्यांची मानसिकता लोकशाहीपूरक बनली आणि लोकशाही प्रशासकीय व्यवस्था समर्थपणे पेलण्यास अनुकूल झाली. अशा अनुकूल परिस्थितीमुळे संस्थानामध्ये सर्वदूर स्थानिक स्वराज्य संस्थेचे जाळे विस्तारू शकले. यातील सहभागी नागरिकांना उद्देशून राजाराम महाराजांनी सांगितले होते की, "Local self-government does not mean merely right to enjoy no burden to bear no duty to perform even a glance at the way in which your affairs are free if have been conducted in the past will show that great opportunity has been lost."[१] स्थानिक स्वराज्य संस्था ही आपल्या हक्काचा उपभोग घेणे यापुरती मर्यादित नसून नागरिकांनी आपल्या कर्तव्याची

अंमलबजावणी खूप चांगल्या प्रमाणात व गतिशीलपणे करणे हा सुद्धा स्थानिक स्वराज्य संस्थेचा अर्थ आहे आणि हे लक्षात घेऊन कोल्हापूर संस्थानातील सर्व नागरिकांनी या संधीचा वापर करून आपल्या जीवनाच्या भौतिक, सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक विकासामध्ये महत्त्वाचे योगदान पार पाडावे. असे आवाहन कोल्हापुरातील संस्थांना व नागरिकांना उद्देशून केलेले होते.

## १. कोल्हापूर स्टेट म्युनिसिपल ॲक्ट, १९२५

कोल्हापूर म्युनिसिपालिटीची स्थापना सन १८८९ मध्ये झाली. छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हातात घेतल्यानंतरचे हे एक महत्त्वाचे योगदान दिले. १९२० पर्यंत कोल्हापूर म्युनिसिपालिटीमध्ये सर्व सभासद हे सरकार नियुक्त होते. इथे असलेल्या शिक्षण सुविधांचा अभाव आणि निरक्षरतेचे असलेले मोठे प्रमाण हेच त्यामागचे मोठे कारण होते. त्यामुळे सरकारनियुक्त सदस्याच्या आधारे कोल्हापूर म्युनिसिपालिटी चालवणे अत्यावश्यक होते. त्यामुळे छत्रपती शाहू महाराजांच्या काळात समाजातील साक्षरतेचे प्रमाण वाढवण्याच्या दृष्टिकोनातून अनेक सकारात्मक निर्णय घेतल्याचे दिसून येते. त्याचे महत्त्व आणि गरज ओळखून छत्रपती राजाराम महाराजांनीसुद्धा आपल्या कारकिर्दीत इतर विविध लोककल्याणकारी उपक्रमाबरोबरच शाहू महाराजांच्या पुढाकारातून स्थापना झालेल्या कोल्हापूर संस्थानातील म्युनिसिपालिटीची घटना तयार केली. प्रशासकीय कारभारामध्ये सुसंगतता, सुसूत्रता यावी आणि लोकशाही मूल्यांची जपणूक केली जावी हा त्यामागचा एक व्यापक उद्देश होता. म्हणून राजाराम महाराज म्हणतात की, ‘‘इसवी सन १९२० च्या सुमारास कोल्हापूर शहरामधील लोकांमध्ये शिक्षण प्रसार बराच झाला आहे. स्थानिक स्वराज्याचे हक्क उपभोगण्याची इच्छा उत्पन्न झाली आहे, असे कैलासवासी हुजूरांचे निदर्शनास आल्यावर आतापर्यंत चालू असलेल्या नियमाप्रमाणे म्युनिसिपालिटीची घटना करण्यात आली. म्युनिसीपालिटीचे सर्व सभासद जातनिहाय मतदारसंघातून निवडून येण्याची व्यवस्था करण्यात आली. याप्रमाणे निवडणुकीत निवडलेल्या कोल्हापूरच्या नागरिकांचे प्रतिनिधी व त्यांच्या हातून म्युनिसिपालीटीचे कामे कोल्हापूर शहरात भूषणासारखी होतील, असे कैलासवासी हुजूरांस आशा वाटत होती. ती आशा सफल झाली असती, तर आमच्या कैलासवासी परमप्रिय

पित्यांप्रमाणे आम्हासही आनंद झाला असता; परंतु अलीकडे आलेल्या अनुभवावरून म्युनिसीपालिटीचे काम समाधानकारक रीतीने चालत नाही, असे दिसून येते. त्यामुळे या व्यक्तीविषयी तंटे होऊन कामाचे नुकसान होत असल्याचे दिसून आल्यामुळे १५/१२/१९२४ पासून पुन्हा दरबारच्या अधिकाराबद्दल आज्ञा द्यावी लागली, हा अनुभव निराशाजनक आहे, तथापि आपल्या आणखीन एक संधी देऊन त्याचप्रमाणे सार्वजनिक हिताचे काम करून घ्यावे अशा प्रकारची नागरिकत्वाचे जबाबदारी पार पाडण्याचे त्याप्रमाणे शिक्षण लोकांकडून द्यावे अशी श्रीमान महाराज छत्रपती यांची उत्कट इच्छा असल्यामुळे कोल्हापूरची व्यवस्था करावी यासंबंधी विचार करून योग्य त्या शिफारशी सादर करण्याकरिता रावबहाद्दूर सर रघुनाथराव सबनीस दिवाण, रावबहाद्दूर लट्ठे, इंदुलकर सरसुभे, भोसले फायनान्शियल सेक्रेटरी इत्यादींची कमिटी नेमली आहे. या कमिटीच्या आधारे नवीन व्यवस्था अमलात आणण्याचे ठरवण्यात आले.''[२] छत्रपती राजाराम महाराज हे दूरदृष्टीचे नेते होते. एका बाजूला दलित, बहुजनांमध्ये शिक्षणाचे वाढते प्रमाण याची दखल घेणे आणि दुसऱ्या बाजूला या वाढलेल्या शिक्षणाचा लोकशाही संस्थांसाठी उपयोग करून घेणे ही धोरणे हाती घेतली. त्यातूनच कोल्हापूर संस्थानामध्ये लोकशाहीची संरचना आणि जाळे विस्तारण्याचे व त्यात समाजातील वंचित शोषित घटकांना प्रतिनिधित्व मिळण्याचे ऐतिहासिक कार्य छत्रपती राजाराम महाराजांनी केले आणि तितक्याच गांभीर्याने ते पुढे घेऊन गेले.

राजाराम महाराजांचे स्थानिक स्वराज्य संस्था आणि कोल्हापूर म्युनिसिपालिटी को–ऑपरेशनच्या निमित्ताने किती व्यापक आणि समग्र दृष्टी होती हे यावरून लक्षात येते. छत्रपती राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानात स्थानिक स्वराज्य संस्थेची निर्मिती आणि लोकशाही संस्थेचे व्यापक असे महत्त्व लोकांपुढे सांगताना म्हणतात की, "I must all the up same appeal to you and to the people of Kolhapur to be alive to the duty which local self-Government implies problem to be solved by the municipality are so varied and so complicated that they would require quality of very high order as much in the member of municipality as in the citizen of all classes themselves unless this quality are the brought to be bear open your Municipal problems. I do not think that the difficulties and the troubles of your past will cases to obstruct your progress in the future. I hope you will remember that the failure of your municipality you was due firstly to the

Indifference of the public at large to their own right as a ultimate master of the municipality be the mistaken notion of member them self that they are responsible to themselves and on heels and that public activity consistence more in talk and debate that in the actual work and third to be want of co-operation and tolerance and the prevalence of the factious split amongst some of those who happen to the constitution the municipality."[३] स्थानिक स्वराज्य संस्था ही कोल्हापूरच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची संस्था आहे. ज्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून समाजातल्या सर्व घटकांना आपल्या हक्काचे व्यासपीठ मिळेल. महानगरपालिकेच्या माध्यमातून सर्वांच्या प्रश्नांची सोडवणूक होईल, असा आशावाद छत्रपती राजाराम महाराज वरील विधानातून व्यक्त करतात. त्यासोबत स्थानिक स्वराज्य संस्थेचे यश हे लोकांची जागरुकता आणि राजकीय समज यावरसुद्धा अवलंबून असते. त्यामुळे लोकांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या राजकीय व्यवहारामध्ये आणि घटनात्मक चौकटीमध्ये सक्रियपणे सहभागी होऊन लोकशाहीचा व्यवहार करावा ही अपेक्षा कोल्हापुरातील लोकांकडून छत्रपती राजाराम महाराज व्यक्त करतात.

### अ) कोल्हापूर म्युनिसिपालिटीसाठी घटनात्मक तरतूद

कोल्हापूर महानगरपालिकेची म्हणजेच म्युन्सिपलिटीची घटना निर्मिती करताना छत्रपती राजाराम महाराज म्हणतात की, "It's give me great pleasure to associate myself personally with the happy function of in inauguration your newly constituted municipality indeed your municipality is an old his suit which I which has a somewhat cheered history and through today it is a turning a new chapter in a long life I would have not consider it's my duty to summon you here this morning if your life as a corporations had smooth and continuous scores in the past as you are aware your constitutions has been now materially is changed and you inter up on your duties today it's new spirit of harmony and Public Service."[४] छत्रपती राजाराम महाराजांची वरील मांडणी ही किती व्यापक आणि लोकशाहीच्या उदात्त मूल्यांबाबतीत किती आग्रही होती, हे यावरून दिसते. कोल्हापूर म्युनिसिपलिटीच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांच्या भौतिक प्रश्नांची सोडवणूक कशा प्रकारे होईल, यासाठी घटनात्मक तरतूद किती महत्त्वाची आहे, हे आपल्या मांडणीतून छत्रपती राजाराम महाराज स्पष्ट करतात.

छत्रपती राजाराम महाराजपूर्व काळातील म्युनिसिपालिटीचे सर्व प्रशासन बॉम्बे डिस्ट्रिक्ट म्युन्सिपल ॲक्टसारखे विविध कायदे होते. ते सर्व कायदे छत्रपती राजाराम महाराजांनी आपल्या कारकिर्दीत रद्द केले आणि 'कोल्हापूर स्टेट म्युनिसिपल ॲक्ट, १९२५' हा कायदा आपल्या संस्थाना लागू केला. तसेच या कायद्यानुसार कोल्हापूर संस्थानात म्युनिसिपलची स्थापना केली. म्युनिसिपलचा सर्व प्रशासकीय कारभार पाहण्यासाठी राजाराम महाराजांनी याचा प्रशासकीय व्यवहार पाहण्यासाठी कमिशनरची नियुक्ती केली. जकात कराचे व्यवहार पाहण्याची जबाबदारी कमीशनरकडे सोपविण्यात आली. त्यामुळे तो जकात कर मुख्य अधिकारी म्हणून कमिशनर पदाला ओळखले जाऊ लागले. कमीशनर या शब्दाची व्याख्या घटनेतील कलम ३ मध्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आली. 'Commissioner shall means the chief revenue officer in the Kolhapur state or such other of his officers at the local government may up certification in the Kolhapur state gazette in this behalf'[५] अशी घटनात्मक तरतूद करून कोल्हापूरमध्ये म्युनिसिपल ॲक्ट राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखाली लागू केला. एका भक्कम राजकीय संस्थेचा मुख्य आधार लोकशाही हा आहे. त्यामुळे जनमानसामध्ये लोकशाही बद्दलची आस्था आणि लोकशाही बद्दलची मूल्ये निर्माण होतील आणि जास्तीत जास्त कोल्हापूर संस्थान हे पारंपरिक संरचनेच्या आधारे काम न करता लोकशाहीचा आधार लोकशाही संस्थेत संस्थात्मक आधारे काम करणे अत्यंत महत्त्वाचे आहे हे राजाराम महाराजांनी ओळखले आणि कोल्हापुरात कोल्हापूर मुनिसिपल ॲक्ट लोकशाही संस्थांची सुरुवात केली.

### ब) कोल्हापूर स्टेट म्युनिसिपल ॲक्टचे कार्यक्षेत्र

कोल्हापूर स्टेट म्युनिसिपल ॲक्ट यानुसार राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील कार्यक्षेत्र निश्चित केले. त्यात प्रामुख्याने कोल्हापूर सिटी म्युनिसिपल डिस्ट्रिक्ट बनवण्यात यावा. ज्यामध्ये प्रामुख्याने कोल्हापूर शहर म्युनिसिपालिटीच्या हद्दीत असलेले सर्व भाग आणि शाहूपुरी वसाहतीच्या हद्दीत असलेले सर्व भाग समाविष्ट असतील असा एक त्यांनी आदेश काढला.[६]

## क) कोल्हापूर म्युनिसिपल सभासद

छत्रपती राजाराम महाराजांनी कोल्हापूर म्युनिसिपल कायदा करून लोकशाहीत महत्त्वाचे योगदान दिले. कुठल्याही म्युनिसिपलमधील सदस्यांची संख्या आणि त्यांची निवड हा अत्यंत कळीचा प्रश्न असतो. त्यामुळे महाराजांनी केलेल्या कायद्यामध्येच हे नमूद केले की, ''म्युनिसिपलची सभासदसंख्या जास्तीत जास्त ४० राहतील. त्यातील निम्मे म्हणजे जास्तीत जास्त २० सदस्य हे लोकांकडून निवडले गेलेले असतील, तर उर्वरित २० सदस्य हे सरकारमार्फत निवडले जातील. म्युनिसिपालिटीच्या सभासदांमध्ये अस्पृश्यांना प्रतिनिधित्व मिळावे, या हेतूने राजाराम महाराजांनी 'दोन सदस्य अस्पृश्य समाजातील असतील याची तरतूद केली. अस्पृश्यांनासुद्धा राजकीय प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे हे राजाराम महाराजांनी जाणले होते. त्यांना पुरेसे प्रतिनिधित्व या कायद्यांतर्गत देण्यात आले.[७] शाहू महाराजांनंतर सामाजिक न्यायाचा खऱ्या अर्थाने वसा आणि वारसा राजाराम महाराजांनी तितक्याच गतिशीलतेने आणि आधुनिक राजकीय संस्थेच्या माध्यमातून दलित बहुजनांना मिळवून दिला हे राजाराम महाराजांचे ऐतिहासिक योगदान होते.

## ड) कोल्हापूर संस्थानातील म्युनिसिपालटीचे आदर्श प्रारूप

कोल्हापूर संस्थानामध्ये म्युनिसिपालिटी स्थापन झाल्यानंतर लोकांना मतदानाचा अधिकार प्राप्त होईल. जातीनिहाय मतदार संघाऐवजी वेगवेगळ्या जातीधर्माचे मतदारसंघ निर्माण होऊन सक्षम अशा व्यक्तीस आपला प्रतिनिधी म्हणून म्युनिसिपालिटी सदस्यासाठी निवडले जातील. लोकांतूनच आलेल्या म्युनिसिपालिटीच्या सदस्यांना आपआपल्या समस्यांची जाण असल्याने म्युनिसिपालिटीच्या जबाबदाऱ्या वाढतील, त्याचप्रमाणे जकात करातूनही म्युनिसिपालिटीला पैसा मिळू शकेल. असे अनेक सकारात्मक बदल म्युनिसिपालिटीच्या स्थापनेमुळे होतील, अशी छत्रपती राजाराम महाराज यांची धारणा होती. त्यासंदर्भात एके ठिकाणी ते म्हणतात, ''या नवीन व्यवस्थेप्रमाणे कोल्हापूर व शाहूपूरी येथील नागरिकांना अत्यंत महत्त्वाचे अधिकार प्राप्त होणार आहे, प्रेसिडेंट निवडण्याचा हक्क त्यांस आता प्रथमच प्राप्त होणार आहे. तसेच जातवार मतदार संघाऐवजी सर्व जातीधर्माचे एकत्र संघ स्थापन होऊन त्यांनी म्युनिसिपालीटीचे सभासद निवडावयाचे आहेत, याप्रामाणे संघटीत होणाऱ्या

म्युनिसिपालिटीचे अधिकारक्षेत्र यापुढे बरेंच विस्तृत होणार असून त्यांत लोकोपयोगी कामे करून सर्वांचे हित साधण्याची म्युनिसिपालिटीस मोठी संधी प्राप्त होणार आहे. म्युनिसिपालिटीचे उत्पन्न ऑक्ट्राय डयुटी बसविल्यामुळे बरेच वाढलेले आहे. चोख रीतीने म्युनिसिपालिटीचे काम चालविल्यास कोणासही त्रास न होता म्युनिलसिपालिटीचा वसूल हल्ली पेक्षाहि अधिक होण्याचा संभव आहे. तसेच म्यनिसिपालीटीवरील कामाची जबाबदारीही यापुढे अनेकपटीने वाढवणार आहे, हे कोल्हापूर व शाहूपुरीच्या नागरिकांनी विसरता कामा नये. पाणी पुरवठयाकरीता नवीन तलाव, ड्रेनेज वैगरे अनेक कामांमुळे हल्ली पेक्षा अधिक मोठया प्रमाणावर म्युनिसपिालीटीची जबाबदारीत वृध्दी होणार आहे. ही मोठी व महत्त्वाची जबाबदारी पार पाडण्यास समर्थ असे सभासद निवडून देणे हे मतदारांचे कर्तव्य असून निवडलेल्या आणि नेमलेल्या सभासदांनी कोल्हापूर व शाहूपुरीच्या सुशिक्षित एकनिष्ट लोकसेवादक्ष, आणि भरभराटीस आलेल्या छत्रपती सरकारच्या प्रजाजनांस शोभण्यासारखे वर्तन करून अधिकाधिक हक्क मिळविण्याची आपली पात्रता सिद्ध करावी, अशी महाराजांनी इच्छा आहे. अधिकाराबरोबरच जबाबदारी येते, हे तत्व लक्षांत ठेवून म्युनिसिपालिटीचे सभासद आपले कर्तव्य बजावतील आणि आपसांतील कलह आणि द्वेष यामुळे म्युनिसिपालीटीच्या कामांत व्यत्यय येऊ देणार नाहीत अशीही महाराजांना अशा वाटत आहे. म्हणून ही नवीन योजना मंजूर केली आहे.''[८] असे मत नोंदविताना छत्रपती महाराज नव्या व्यवस्था स्वीकारण्यातून कोल्हापूर संस्थानाची वाटचाल होत असल्याचे भाकीतच जणूकाही केले असल्याची कल्पना येते. महाराजांची यासंदर्भात किती दूरदृष्टी ठेवून विचार करत होते याचेच दर्शन घडते.

## २. पंचायत संस्थेचा कायदा, १९२६

राजाराम महाराजांनी एक ऐतिहासिक व राजकीय निर्णय घेतला. तो म्हणजे कोल्हापूर संस्थानामध्ये छत्रपती राजाराम महाराजांनी पंचायत संस्थेचा कायदा केला. ज्या कायद्याच्या माध्यमातून कोल्हापूर संस्थांनामध्ये लोकशाही संस्थांचे जाळे अधिकाधिक विस्तारित होऊन, लोकशाही जनमानसामध्ये रूजत होती व या माध्यमातून आधुनिक लोकशाहीचे मूल्य कोल्हापूर संस्थांमध्ये जास्तीत जास्त विस्तारले होते. सामान्य माणसाला लोकशाही या प्रक्रियेमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन मिळणार होते. पंचायत संस्थेचा कायदा करून राजाराम

महाराजांनी कोल्हापूर संस्थानमध्ये आधुनिक लोकशाहीची पायाभरणी केली. कायदेमंडळ विभागाच्या माध्यमातून .राजाराम महाराजांनी दि. २२ डिसेंबर, १९२६ रोजी या कायदा लागू होणार असल्याचे जाहिर केले. या कायद्याला **'कोल्हापूर इलाख्यातील पंचायत संस्थेचा कायदा १९२६'** असे संबोधण्यात येत होते. या कायद्यानुसार कोल्हापूर संस्थानामध्ये त्रिस्तरीय पंचायत व्यवस्था लागू करण्यात आली. ती त्रिस्तरीय पंचायत व्यवस्था म्हणजे इलाका पंचायत, तालुका पंचायत आणि ग्रामपंचायत होय. 'इलाका पंचायत' म्हणजे कोल्हापूर भागासाठी किंवा संस्थांनसाठी एक पंचायत अशा प्रकारची मांडणी करण्यात आली. प्रत्येक तालुक्यात किंवा महालासाठी एक 'तालुका पंचायत' आणि गाव पातळीवर 'ग्राम पंचायत' स्थापन करण्याचा निर्णय या कायद्यांतर्गत घेण्यात आला. त्यामुळे केंद्राच्या पातळीवर, तालुक्याच्या पातळीवर आणि गावाच्या पातळीवरती ग्रामपंचायत अशी त्रिस्तरीय प्रशासकीय व्यवस्था निर्माण करण्यात आली. या पंचायत व्यवस्थेमध्ये लोकांकडून सभासद निवडले जातील, अशी तरतूद कायद्याअंतर्गत करण्यात आली. 'इलाका पंचायत' किंवा तालुका पंचायत यांच्या माध्यमातून एखाद्या गावामध्ये ग्रामपंचायत स्थापन करण्याचा निर्णय करणे आवश्यक आहे का नाही, याबाबतचा अहवाल किंवा प्रस्ताव छत्रपती राजाराम महाराज यांच्याकडे करणे आवश्यक आहे. त्यानंतर हा प्रस्ताव मंजूर करण्याचा पूर्ण अधिकार महाराजांकडे होता. पंचायत स्थापन झाल्यापासून त्याठिकाणी त्वरित निवडणुका घेण्यात याव्या आणि निवडणुकीतील सदस्याची निवड केली जावी. तो सदस्य ज्या दिवशी निवडून येईल, त्या दिवसापासून ते तीन वर्षांपर्यंत या पदावर राहिल किंवा या पदाच्या अधिकार क्षेत्राच्या आधारे काम करेल. पंचायत सदस्य यांचा कालावधी हा तीन वर्षाचा कालावधी म्हणून राजाराम महाराजांनी निश्चित केला होता. तीन वर्ष कालावधी पूर्ण होण्याच्या एक महिना अगोदर त्या पंचायत सदस्यांच्या निवडीसाठी 'सरसुभे' यांनी निवडणुका जाहीर कराव्यात आणि निवडणुका घेणारी नवीन समिती निर्माण करावी. पंचायत समितीकडून व कार्यकारी मंडळाकडून पुढील पाच प्रकारचे अधिकारी निवडले जातील. अ) शिक्षण मंडळ ब) देवस्थान मंडळ क) जरुरीप्रमाणे विशिष्ट कामाकरिता नेमलेले मंडळ ड) इलाका पंचायतीचे चिप ऑफिसर ई) इलाका पंचायतीचे इंजिनिअर[९]

## अ) इलाखा पंचायत स्थापना

पंचायत संस्थेचा कायदा, १९२६ नुसार इलाका पंचायतीची स्थापना झाली. इलाका पंचायती कोल्हापूर संस्थांनासाठी एकच संस्था असेल, ज्यांची सभासद संख्या ही ४० पर्यंत ठेवण्याचा निर्णय करण्यात आला. सभासद संख्या जास्त असावी की कमी असावी हे ठरवण्याचा अंतिम अधिकार छत्रपती राजाराम महाराज यांना होता. १९२६–२८ साली इलाका पंचायतीची सदस्यसंख्या २८ होती. इलाका पंचायतीतील सदस्य निवडण्यासाठी राजाराम महाराजांनी काही अटी घातल्या होत्या. ज्यामुळे सभासदाचा इलाका पंचायतीतील कारभार आणि सक्रियता जास्तीत जास्त वाढेल व लोकशाही संस्थांचा सहभाग जास्त विस्तारला जाईल. या महत्त्वाच्या अटी राजाराम महाराजांनी आपल्या कायद्यामध्ये घातल्या होत्या. पंचायतीचे प्रमुख अध्यक्ष निवडण्याचा अधिकार हुजूर म्हणजेच राजाराम महाराज यांच्याकडे होता. त्यासोबत इतर सदस्य निवडले जातील. सदस्य हे निवडणुकीच्या माध्यमातून निवडले जातील हे एक अत्यंत महत्त्वाचे योगदान राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानासाठीच नाही, तर भारताच्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासामध्ये दिलेले दिसून येते.

## ब) प्राथमिक शिक्षण खाते ही इलाखा पंचायतीची जबाबदारी

छत्रपती राजाराम महाराजांनी करवीर संस्थानासाठी एक आदेश जारी केला. ज्या आदेशानुसार ०९ जून १९२७ ला शिक्षणाची जबाबदारी पंचायतीकडे सोपविण्यात आली. यांच्या माध्यमातून इलाका पंचायतीमधील हे एक महत्त्वाचे सत्तेचे विकेंद्रीकरण होते. त्या इलाका पंचायतीमध्ये शिक्षण मंडळाचे एकूण नऊ सदस्य निवडण्याची परवानगी देण्यात आली. त्यामध्ये महाराजांनी ती अतिशय महत्त्वाची तरतूद केली. एकूण नऊ सदस्यांपैकी एक महिला आणि एक अस्पृश्य असला पाहिजे. त्यासाठी या सर्व प्रशासकीय बाबीसाठी एज्युकेशनल ऑफिसर या वेतनावर आधारित अधिकाऱ्याची नेमणूक केली. या अधिकाऱ्यांची मुख्य जबाबदारी ही प्रशासकीय कामाव्यतिरिक्त आर्थिक व्यवहार इलाका पंचायतीच्या साह्याने पार पाडण्याची होती.[१०]

### क) शिक्षण मंडळाच्या अधिकारांचे वाटप

साधारणपणे पुढीलप्रमाणे शिक्षण मंडळाच्या अधिकारांचे वाटप करण्यात आले.[११]

- आपल्या ताब्यातील शाळा, नवीन शिक्षक नियुक्ती व आपण नेमलेल्या शिक्षकांचा पगार कमी जास्त करणे व नेमलेले शिक्षक पेन्शनीत काढणे.
- नवीन नियमांच्या शिक्षकांच्या नोकरीसंबंधी आवश्यक ते नियम करणे. नवीन शाळा स्थापन करणे.
- दरबाराच्या मंजुरीने आपल्या शाळेत चालू असलेला शिक्षणक्रम अगर नेमलेली पुस्तके बदलणे. क्रमिक पुस्तकांमध्ये सुधारणा घडवून आणणे.
- शिक्षणाचा अंमल सक्तीने करणे याकरिता दरबाराकडून करण्यात आलेल्या नियमानुसार आवश्यक ते बदल स्वीकारणे.
- ग्रामपंचायतीने आपल्या गावातील शाळेसंबंधी कोणती कामे व कशी करायची ते ठरवणे, आपल्या ताब्यातील शाळेवर देखरेख ठेवणे, दरबाराकडून शिक्षण मंडळाच्या कामासंबंधी मागवण्यात आलेली माहिती वेळोवेळी देणे.

### ड) तालुका पंचायत समितीची स्थापना

तालुका वा महाल स्तरावर पंचायत समिती स्थापन झाल्यानंतर पंचायत समितीतील सदस्यांची निवड ही लोकनिर्वाचित असावी, हाही एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय होता. त्यासोबत पंचायत समितीचे सदस्य दहा ते पंधरा असावेत. यातील निम्मे सदस्य लोकनिर्वाचित असावेत व निम्मे सदस्य सरकार नियुक्त असतील आणि म्हणून एका तालुक्याच्या पंचायत समितीचे सदस्य हे बारापर्यंत करण्यात यावेत, असे निर्देश राजाराम महाराजांनी त्या तालुक्यातील मामलेदारांना केला होता.[१२]

### इ) ग्रामपंचायतीची स्थापना

राजाराम महाराज लोकशाहीबद्दल अत्यंत संवेदनशील होते. आपल्या संस्थानामध्ये सर्वदूर लोकशाही व्यवस्था निर्माण झाली पाहिजे, लोकशाही प्रक्रियेत ग्रामीण भागातील प्रत्येक

नागरिक सहभागी झाला पाहिजे अशी त्यांची अपेक्षा होती. त्यासाठी त्यांनी गाव पातळीवर ग्रामपंचायतीची स्थापना केली. आधुनिक लोकशाहीचे आणि लोकशाहीवर आधारित संस्थात्मक जाळे निर्माण करण्याचे श्रेय हे राजाराम महाराजांकडे जाते. त्यासाठी त्यांनी १९२६ मध्ये कोल्हापूर संस्थानामध्ये ग्रामपंचायत निर्माण करण्याचा आणि त्याच्या अधिकाराची विभागणी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. त्यासाठी राजाराम महाराजांनी प्रत्येक गावामध्ये ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी गावातील लोकांना आवाहन करून ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी पुढाकार घेणे अत्यावश्यक असल्याचे नमूद केले आहे. ग्रामपंचायतीसाठी त्यांच्याकडे कोणते अधिकार असले पाहिजे, यासाठीसुद्धा नियमावली तयार केली. नियम ठरविण्याचे अधिकार ग्रामपंचायतीला, मामलेदाराला देण्यात आले.

### फ) ग्रामपंचायतीच्या अधिकाऱ्यांचे वाटप

१) गावातील आरोग्य व्यवस्था हे ग्रामपंचायतीच्या अधिकार क्षेत्राखालील प्रमुख जबाबदारी असेल.

२) गावातील व गावचे हद्दीतील जे रस्ते इलाखा नगर तालुका पंचायतीच्या ताब्यात नसतील त्याची दुरुस्ती.

३) गावाच्या हद्दीत असलेल्या शाळा, चावड्या, देवालये, धर्मशाळा वगैरे दुरुस्ती इलाखा पंचायतीचे देखरेखीखाली व हुकुमाखाली करावी.

४) गावातील शाळेच्या व देवस्थानाच्या व्यवस्थेवर देखरेख करणे.

५) गावातील जत्रा, सार्वजनिक उत्सव वगैरे होत असल्यास त्याचे नियमन करणे व त्यासंबंधी आरोग्य रक्षणासाठी जाणे आवश्यक असेल त्या कराव्यात.

६) या नियमाप्रमाणे कर वसूल करण्याचे ग्रामपंचायतीला अधिकार देण्यात येईल. ते कर वसूल करणे व त्यातील विनियोग आपल्याकडे सोपविलेल्या कामाकरिता करणे.

७) इलाखा पंचायतीचे सोपविलेली इतर कामे करणे हुजूरसंबंधीचे दिवाणी आणि फौजदारी अधिकार येतील ते असतील.

खाली लिहिल्याप्रमाणे कर वसूल करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला देण्यात आला आहे अ) घरपट्टी ब) ग्रामपंचायतीचा लोकल फंड क) जकात ड) यात्रेवरील कर [१३]

**ग) इलाखा व तालुका पंचायतीचे निवडणुकीचे नियम : –**

राजाराम महाराजांनी कोल्हापूर इलाख्यातील पंचायत सस्थेचा कायदा १९२६ लागू केल्यानंतर त्यात इलाखा पंचायत, तालुका पंचायत, आणि ग्राम पचायंतीची स्थापना केली यामध्ये सदस्यांची निवड करताना लोकनिर्वाचित आणि सरकार नियुक्त सद्भासंदांच्या माध्यमातून कारभार चालणार असताना तो पारदर्शीपणे चालावा, यासाठी इलाखा व तालुका पंचायतीमध्ये होणाऱ्या निवडणुकीबात नियम तयार करण्यात आले.

१) या नियमांना 'सन १९२९ च्या कोल्हापूर इलाख्यांतील इलाखा व तालुकापंचायतीच्या निवडणुकीबाबत कायदा' असे म्हणावे.

२) रिटनिग ऑफिसर (निवडणुक कामगार) कोणत्याही निवडणुकीच्या अथवा निवडणुकीच्या भागाच्या संबंधाने कलम १२ अनव्ये नेमलेल्या तालुक्याचा अधिकारी मामलेदार अगर महालकरी समजावा.

**३) निवडणुकीकरीता जागा व तारखा ठरविणे :–** सन १९२६ चा पंचायत संस्थाचा कायदा कलम २० अन्वये तालुका पंचायतीच्या मेंबर्संची निवडणुक पसंत केलेल्या एका अथवा एकाहून अधिक गांवी करण्यांत आली पाहीजे. सदरहू निवडणुक ज्या गांवी करण्यात आली पाहीजे ती गावे कलेक्टरने ठरविली पाहिजेत व निवडणुकीच्या पुढील पर्यायासाठी म्हणजे, नेमणुकीचे कागद घेणे, कागद तपसाणे, मते देणे, व मते मोजणे यासाठी तारीख वेळ व जागा ही ठरविली पाहिजेत निवडणुकी त्रबाबत ठरवून दिलेल्या तारखेपूर्वी नेमणुकीचे कागद घेण्याची तारीख सहा आठवड्यांहून कमी असता कामा नये.

**४) लोकनियुक्त सभासदांची संख्या :–** कलम ५ अन्वये प्रत्येक तालुका पंचायतीच्या सभासदांची संख्या बारा ठरविली आहे. त्यापैकी निम्मे म्हणजे प्रत्येक तालुका पंचायतीकरतां सहा सभासद कलम ७ मध्ये ठरविलेप्रमाणे लोकनियुक्त प्रतिनिधी म्हणून निवडावयाचे आहेत.

**५) उमेदवारांची नेमणुक :–** नेमलेल्या तारखेस किंवा तारखेपुर्वी व नेमलेल्या वेळी प्रत्येक उमेदवारांनी ठरविलेल्या नमुन्याप्रमाणे पूर्णपणे भरलेला व सदरहू आपली संमती आहे अशा अर्थाची उमेदवाराने स्वत: सही केलेला व पंचायत संस्थेचा कायदा ८ अन्वये निवडणुकीच्या तारखेपुर्वी ज्यांची नावे नोंदविलेली असतील अशा नाव सुचविणारा व अनुमोदन देणारा म्हणून दोन इसमांनी सह्या केलेला फॉर्म रिटर्निंग ऑफीसराच्या स्वाधीन केला पाहीजे.

अशा प्रकारे उमेदवारांची नेमणूक करणे, नेमणुकीच्या कागदपत्रांची तपासणी करणे, हरकतीचा निकाल करणे, नेमणूक नामंजूर करणे, तपासणी पुरी करणे, कायदेशीर नेमणूकीची यादी तयार करणे, उमेदवारी परत घेणे, मते देण्याच्या जागा, मतपत्रके टाकण्याच्या पेटीला सील करणे, मतदारांनी मते देण्याचे जागी हजर राहणे, मतदार तेच आहेत, अशाबद्दल खात्री करणे, मते देणे, मतपत्रकाचा नमूना, मतपत्रक देणे, मते देणचे जागी कामावर असलेल्या अंमलदारांनी मते देणे, मुखत्यार मार्फत मत देणे, मतदारास मदत, मते घेण्याचे बंद करणे, निकाल जाहिर करणे, निवडणुकीचे निकाल प्रसिध्द करणे, इत्यादी विषयी या नियमांत तरतुदी करण्यात आलया आहे याचा मुख्य उद्देश म्हणजे होत असलेली निवडणूक अगदी पारदर्शीपणे होणे, आणि योग्य प्रकीया पार पाडून मतदान होणे, जेणेकरून त्यात जनतेच्या विश्वासार्हतेला कुठे तडा जाणार नाही याची दखल राजाराम महाराजांनी घेतल्याचे दिसून येते.[१४]

## ३) प्रशासकीय सुसूत्रता आणि सुधारणा

प्रशासकीय सुसूत्रता आणण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी आणि राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानामध्ये निर्माण केलेले जे तीन प्रमुख विभाग होते, ते अनुक्रमे मुलकी, न्याय आणि दिवाणी. यामध्ये समन्वय निर्माण करणे व सुसूत्रता प्रस्थापित करणे हे महाराजांचे सूत्र राजाराम महाराजांनी मनावर घेऊन प्रशासनात सुसूत्रता निर्माण करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला, त्यामुळे राजाराम महाराज म्हणतात की आत्तापर्यंत हे तिन्ही विभाग कौन्सिल एकमेकापासून स्वतंत्र असून प्रत्येक कौन्सिल प्रत्यक्षात परंतु अनुभवांती असे दिसून आले आहे की, या पद्धतीमुळे दरबाराच्या वेगळ्या खात्यात परस्पर सुसंबद्धता आणि एकता राहात नाही आणि त्यामुळे त्याची कार्यक्षमता भविष्यात कमी होईल आणि एकच काम वेगवेगळ्या खात्यात परस्पर विरोधात चाललेले आढळून येईल, ही बाब राजाराम महाराजांच्या

लक्षात आल्यानंतर प्रशासनामध्ये सुसूत्रता निर्माण करण्यासाठी त्यांनी काही महत्त्वाच्या प्रशासकीय सुधारणा केल्या. त्या खालीलप्रमाणे.

अ) दरबाराच्या सर्व खात्यात सहकार्य आणि एकवाक्यता निर्माण करणे.

ब) दिवाण यांच्याकडे हल्ली असलेली बारीकसारीक कामे त्यांच्याकडून काढून दरबाराच्या सर्व खात्याच्या कामांवर हल्लीपेक्षा अधिक देखरेख ठेवणे

क) बारिकसारिक कामे कमी करून दिवाणांची कार्यक्षमता वाढवणे.

उपरोक्त तीन उद्दिष्ट्ये लक्षात ठेवून कौन्सिलमध्ये सद्यःस्थितीपेक्षा अधिक सक्रियरीत्या काम करू शकेल यासाठी खालील बदल स्वीकारण्यात आले.

१) दिवाण हे दरबारातील सर्व खात्याचे प्रमुख राहतील. फ्युडेटरी आणि पॉलिटिकल या दोन खात्याचाच फक्त त्यांच्याकडे प्रत्यक्ष चार्ज राहील आणि बाकीच्या खात्यांवर त्यांची देखरेख राहील.

२) दरबाराचे राज्यव्यवस्थेच्या सोयीकरता फ्युडेटरी व पॉलिटिकल खेरीज करून, रेव्हेन्यू, ज्युडिसियल व फायनान्स डिपार्टमेंटकडून अनुक्रमे रेव्हेन्यू मिनिस्टर, ज्युडिशियल मिनिस्टर आणि फायनान्स मिनिस्टर यांच्या ताब्यात देण्यात आलेले आहेत. या तीन खात्यांकडून जाणारी सर्व कामे दिवाण यांच्यामार्फत जाण्याची आहे.

३) कायदेकानून करणेसंबंधी कामे आणि इतर महत्त्वाची कामे कौन्सिलचे प्रेसिडेन्ट दिवाण यांनी अभिप्रायाकरिता कौन्सिलपुढे ठेवावीत आणि कौन्सिलच्या अभिप्रायासह हूजूरांस अभिप्राय सादर करावे.

४) दिवाण हे कौन्सिलचे प्रेसिडेंट असून, सरन्यायाधीश, फायनान्स मिनिस्टर कौन्सिलचे सभासद राहतील. अध्यक्षांनी पुढे ठेवलेल्या कामावर कौन्सिलने अभिप्राय ठेवणे आहे. आपल्या खात्यासंबंधी कोणती कामे, कोणते ठेवण्याइतकी महत्त्वाच्या आहेत हे प्रेसिडेन्ट त्यांना सुचवण्याची परवानगी कौन्सिलच्या इतर सभासदांना आहे .

५) सरसुभे सरन्यायाधीश यांच्याकडचे आपापल्या खात्यासंबंधी असलेले अधिकार त्यांचे त्यांच्याकडेच राहण्याचे आहे.

६) सरसुभे आणि सरन्यायाधीश यांना हल्ली आहेत, त्याप्रमाणे त्यांचे अधिकारी राहणेच आहे व फायनान्स मिनिस्टर यांनाही त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या खात्यापुरते याचप्रमाणे अधिकार देण्यात आले आहेत.[१५]

## ४) सेंट्रल पोस्ट ऑफिसची स्थापना, १९२२

राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानाचे सूत्र हाती घेतल्यानंतर प्रशासकीय व्यवस्थेमध्ये त्यांनी अनेक महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेतले. त्यापैकी हा एक निर्णय सेंट्रल पोस्ट ऑफिसची स्थापना करणे. या माध्यमातून अत्याधुनिक प्रशिक्षित कुशल मनुष्यबळ तंत्रज्ञानाच्या आधारे पोस्ट ऑफिस स्थापन करण्याचा महत्त्वकांक्षी व क्रांतिकारक निर्णय होता. राजाराम महाराजांनी आपल्या या पोस्ट ऑफिसमुळे सर्वसामान्य कोल्हापूर संस्थानातील नागरिकांना दळणवळणासाठी किंवा संपर्क साधण्यासाठी या पारंपारिक टपाल व्यवस्थेवर अवलंबून राहावे लागत असे. ते आता बंद झाले व जलदगतीने व अत्याधुनिक सुविधा असलेल्या ‘सेंट्रल पोस्ट ऑफिस’ची स्थापना राजाराम महाराजांनी केली, हे एक महत्त्वाचे योगदान म्हणता येईल. सेंट्रल पोस्ट ऑफिससाठी राजाराम महाराजांनी कारकून, शिपाई यासारखी महत्त्वाची पदे निर्माण केली. या पदाच्या माध्यमातून सेंट्रल पोस्ट ऑफिस कार्यालय चालू होईल व त्यासाठी त्यांनी महत्त्वाचे कार्यालयीन अधिकारीसुद्धा नेमण्याचा ठराव केला. २७-७-१९२२ मध्ये जनरल खात्याअंतर्गत हा महत्त्वाचा ठराव करून त्यात अनेक तरतुदी करण्यात आल्या.[१६]

## ५) हायकोर्ट आणि अपील कोर्टाची स्थापना

राजाराम महाराजांनी ३१ मे, १९३१ रोजी कोल्हापूर संस्थानामध्ये हायकोर्ट स्थापनेचा निर्णय घेतला. हा निर्णय कोल्हापूर संस्थानासाठी अत्यंत महत्त्वाचा होता. याचे कारण एका बाजूला गरीब आणि वंचित समूह हा न्यायव्यवस्था या आधुनिक लोकशाहीच्या महत्त्वाच्या अंगापासून वंचित आहेत, त्यासोबतच त्याला मिळणारा न्याय पारंपरिक जातिव्यवस्थेच्या जात

पंचायत या संस्थेकडून दिला जात होता. तो अत्यंत क्रूर आणि निष्ठूर होता आणि त्याचे निकष अत्यंत पारंपरिक होते. त्यामुळे त्याच्यामधली लोकशाही जाणीव विकसित होण्यास खूप मोठी अडचण निर्माण होत होती. त्यासाठी छत्रपती राजाराम महाराजांनी एक महत्त्वाचा जो क्रांतिकारी निर्णय घेतला तो क्रांतीकारी निर्णय म्हणजे हायकोर्ट स्थापण्याचा निर्णय होय. राजाराम महाराज यांनी हायकोर्टामध्ये तीन न्यायाधीश निवड करण्याचा निर्णय घेतला. हे तिन्ही न्यायाधीश एकूण न्यायदानाचे काम करतील. या न्यायाधीशाची निवड ही राजाराम महाराजांकडून किंबहुना छत्रपती महाराजांकडून केली जाईल, असे स्पष्टपणे नमूद केलेले होते. आवश्यकता पडल्यास राजाराम महाराजांना चौथा न्यायाधीश निवडण्याचा अधिकार देण्यात आला, त्यामुळे अतिरिक्त कामाचा भार व गरज म्हणून ठरवण्याचा पूर्ण अधिकार महाराजांचा होता, असे नियम करण्यात आले होते. या न्यायाधीशांसाठी एक शपथविधी ठेवण्यात आला. तो शपथविधी खालीलप्रमाणेः

''कोल्हापूर हायकोर्टाचे चीफ जस्टीसचे जागी मला नेमण्यात आलेले मी परमेश्वराचे स्मरण करून अशी प्रतिज्ञा करतो की, माझ्या जागेचे काम माझ्या पूर्ण समजुतीप्रमाणे माहितीप्रमाणे अक्कल हुशारीने व प्रामाणिकपणे करीन.''

राजाराम महाराज यांनी हायकोर्टाची स्थापना करताना त्यामध्ये एक अत्यंत महत्त्वाची तरतूद केली. ''श्रीमान महाराज छत्रपती साहेब सरकार करवीर यांचे सुप्रीम कोर्टाखेरीज फ्युडेटरी जहागिरदारसुद्धा कोल्हापूर जिल्ह्यातील इतर सर्व दिवाणी व फौजदारी कोर्टावर हायकोर्टाची देखरेख व ताबा राहील.'' कोल्हापूर या संस्थानांमध्ये हायकोर्टाची स्थापना झाल्यानंतर हायकोर्टाचा अधिकार आणि कार्याबद्दलसुद्धा येण्यासाठी महत्त्वाच्या काही सूचना देण्यात आल्या किंवा हायकोर्टाचे कार्यक्षेत्र निर्धारित करण्यात आले. प्रामुख्याने दिवानी आणि फौजदारीसंबंधी सर्व निर्णय हायकोर्टाकडे सुपूर्द करण्यात आले. त्यासोबत मृत्यूसंबंधी, विवाहसंबंधी व जन्म-मृत्यूसंबंधी नोंदीचे अधिकारसुद्धा त्यांना देण्यात आले. त्यासोबत हायकोर्टामध्ये फौजदारी अधिकारसुद्धा देण्यात आले. फौजदारी अधिकार यामध्ये प्रामुख्याने शिक्षा देण्याचा किंवा शिक्षेसंदर्भातील शिफारस करण्याचा मुख्य अधिकार हा हायकोर्टास देण्यात आला; मात्र फाशीची शिक्षा मंजूर करण्याचा अधिकार महाराजांनी स्वतःकडे राखून ठेवला.[१७]

## ६) सुप्रीम कोर्टाची स्थापना

कोल्हापूर संस्थानामध्ये हायकोर्टाची स्थापना झालीच होती; पण राजाराम महाराजांनी सुप्रीम कोर्टाचीसुद्धा स्थापना केली. याच्या माध्यमातून सर्व निर्णय हे कोल्हापूर राज्यांतर्गत होतील आणि सर्वसामान्य माणसाला न्याय प्रस्थापित होईल व अन्यायाचे परिमार्जन करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका होईल, इतकी उदात्त भूमिका घेऊन राजाराम महाराजांनी सुप्रीम कोर्टाची स्थापना केली होती.

राजाराम महाराजांनी आपल्या काळामध्ये 'श्रीमान महाराज छत्रपती साहेब सरकार करवीर यांचे सुप्रीम कोर्ट' याची स्थापना केली आहे. सुप्रिम कोर्ट या नात्याने श्रीमान महाराज छत्रपती साहेब सरकार करवीर यांनी या कायद्याचे कलम ३५ प्रमाणे सुप्रिम कोर्टाकडे जी अपिले होण्याची आहेत, त्या संबंधी किंग इन कॉन्सिलचे म्हणजे प्रिव्ही कॉन्सिलचे अधिकार चालवण्यसाचे अधिकार आहेत. याबाबत पुढीलप्रमाणे तरतूद केली आहे

''हायकोर्टाने अपिलात केलेल्या कोणत्याही अखेरच्या फैसल्यावर हुकूमावर आणि हुकूमनाम्यावर आणि त्या कोर्टाचे जज्जने अव्वल दिवाणी अधिकारात केलेल्या व ज्यावर या कायद्यातील कलम १८ प्रमाणे हायकोर्टाकडे अपील नाही. अशा अखेरच्या फैसल्यावर हुकूमावर सुप्रीम कोर्टाकडे अपील चालेल. मात्र या प्रत्येक बाबतीत विषयाची किंमत नऊ हजारांहून कमी असता कामा नये किंवा अशा फैसल्यात, हुकुमात अगर हुकूमनाम्यात त्याची किंमत पाच हजाराहून कमी नाही अशा मिळकतीसंबंधी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रीतीने हक्क मागणी अगर प्रश्न असला पाहिजे अथवा हायकोर्टाने अपिलात सांगितल्याप्रमाणे अन्यरीतीने केलेल्या, इतर कोणत्याही अखेरच्या फैसल्यावर हुकुमावरून सुप्रीम कोर्टाकडे अपील चालेल. मात्र असली बाब महाराज छत्रपती साहेब सरकार करवीर यांनी सुप्रीम कोर्टाकडे योग्य आहे असे हायकोर्टाने ठरविले पाहिजे.'' ही महत्त्वाची तरतूद घालून सुप्रीम कोर्टाची निर्मिती केली,[१८] हे लक्षात आल्यानंतर हायकोर्टातील प्रकरणी हे सुप्रीम कोर्टात येऊ शकतात. त्यासंबंधी काही नियमावली व कायदे तयार केले होते. या माध्यमातून महत्त्वाचे विषय व प्रकरणी सुप्रीम हायकोर्टात हवेत ही त्यामागची भूमिका होती. संबंधित प्रकरणाचा आशय हा रुपयांमध्ये अभिव्यक्त करण्यात आले. म्हणजे नऊ हजार रुपयांपेक्षा जास्त किंवा पाच हजारांपेक्षा जास्त असणारे दावे किंवा

जमिनीचे प्रकरणांचे दावे हे सुप्रीम कोर्टात चालू शकतात आणि त्यासाठी हायकोर्टाची मान्यता असावी लागते, ही अत्यंत महत्त्वाची अट राजाराम महाराजांनी आपल्या दाव्यांसदर्भात घातलेली होती. एकूण न्यायव्यवस्थेसंदर्भातही राजाराम महाराजांची दृष्टी किती व्यापक होती, हे लक्षात येते. उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय यासंदर्भातले नियम कायदे बघता, त्याची सुरुवात किंवा पायाभरणी कोल्हापूर संस्थानामध्ये राजाराम महाराज यांनी केली होती. किती व्यापक दृष्टी असलेला राजा आणि लोकशाही मूल्याबद्दल आणि आधुनिक राजकीय संस्थेबद्दल न्यायिक संस्थेबद्दल आस्था असणारा हा राजा आपल्या संस्थानामध्ये न्यायालयाची स्थापना करून एक जगाला आदर्श घालून दिला.

### ७) सरकारी व्यवस्थेतील कनिष्ठ पदावरील नोकरांना प्रोत्साहन

कोल्हापूर संस्थानामध्ये स्थानिक पातळीवरील तलाठ्यापासून वरिष्ठ पातळीपर्यंत अधिकाऱ्यांना छत्रपती राजाराम महाराज नेहमीच प्रोत्साहन देत असत. त्यामुळे त्यांच्यात कामाची गती आणि वेग आणि कोल्हापूर राज्याबद्दल बांधिलकीची भावना निर्माण होत असे. विशेषतः कोल्हापूर संस्थानातील कारकून आणि नोकर यांच्याबद्दल अत्यंत आदराची आणि प्रोत्साहनाची भूमिका राजाराम महाराजांनी नेहमीच घेतली होती. ती केवळ शाब्दिक नव्हती, तर धोरणात्मकदृष्ट्या होती. त्यांच्या श्रमाचा जो फायदा कोल्हापूर संस्थानात होत आहे, त्याबद्दल त्यांच्या मनामध्ये अत्यंत आदराची व आपुलकीची भावना होती. म्हणून राजाराम महाराज म्हणतात की, राज्यकारभाराची सर्व यंत्रे आपापली कामे चांगल्या प्रकारे करण्यास पात्र झाल्यावाचून कोणतीही सुधारणा यशस्वी होणे शक्य नाही. हे जाणून माझी आमच्या राज्यातील सर्व वरिष्ठ जागेवर सुशिक्षित, पदवीधर, उत्साही व कर्तव्यदक्ष लोकांचे नेमणुका केल्या आहेत; परंतु त्यांचे काम समाजात समाधानकारक होण्यास त्यांच्या हाताखाली काम करणारे नोकर वगैरे कर्तव्यदक्ष असणे आवश्यक आहे. त्यांचा त्यामुळे विचार करून खालीलप्रमाणे करण्याचे मंजूर केले आहे.

१) यापुढे कोणत्याही कारकुनाचा पगार दरमहा १५ रुपयापेक्षा कमी असू नये.

२) मॅट्रिक अथवा स्कूल फायनल परीक्षा पास झालेल्या कारकुनास कमीत कमी वीस रुपये पगार देण्यात यावा.

३) हल्ली १२ रुपये पगाराच्या असलेल्या १४५ जागा, १५ रुपयाच्या १०८ जागा व १८ रूपयाच्या ३२ अशा असलेल्या जागा २० रुपयांच्या २० जागा, ५७ रुपयाच्या २ जागा, २५ रुपयाच्या २५ जागा, २७ रुपयाच्या १ जागा आणि ३० रुपयांच्या असलेल्या ३५जागा करण्याचे मंजूर करण्यात येत आहे.

४) या योजनेप्रमाणे १ नोव्हेंबर, १९२६ पासून प्रत्येकाचा पगार निदान १५ रुपये होईल. १५ रुपयाच्या आणि उपरोक्त उल्लेखलिल्या कारकुनास नवीन वाढविलेल्या पगाराच्या ग्रेडमध्ये घालावायचे खुलासेवार पत्रक कौन्सिलने ताबडतोब सादर करावे. परीक्षा पास झालेल्या व कार्यक्षम नोकरास प्रथम बढत्या देण्यात याव्यात.

५) यापुढे शेवटची जागा १५ रुपयाचे असल्याने कोणतीही परीक्षा (मुलकी परीक्षेच्या खालची नाही.) पास झाल्यावाचून कोणताही नवीन कारकून नेमायचा नाही. पास नसलेल्या हल्लीच्या कारकुनाची सन १९२७ जूनमध्ये डिपार्टमेंटची परीक्षा घेण्यात यावी व ती पास होणाऱ्या हल्ली देण्यात येणारी बढती, भरती कायम समजली जावी.

६) पगार वाढीमुळे दरसाल सुमारे २१,००० रुपये खर्च वाढणार आहे. त्यापैकी चालू सालच्या राहिलेल्या सात महिन्याकरिता १२,२५० रुपये खर्च करण्याचे मंजूर केले असून, पुढील सालच्या बजेटमध्ये जरुर ती रक्कम दाखल करण्याचे मंजूर केलेले आहे.[१९]

राजाराम महाराजांनी प्रशासनातील कनिष्ठ वर्ग जो वेतनाच्या पातळीवर आणि शैक्षणिक पातळीवर अतिशय खालचा गणल्या जातो. त्याला शैक्षणिक गरजा भागवणे आपला उदरनिर्वाह भागवणे यामध्येसुद्धा तो मागास राहतो. त्यांना जर पुढे घेऊन जायचं असेल, तर प्रशासनामध्ये प्रमोशन किंवा बढती असली पाहिजे आणि वेतनवाढ असली पाहिजे. ज्यामुळे दलित–बहुजन समाजातील लोकांना प्रशासनाच्या या वरिष्ठ पदावर जाता येईल, आणि आपल्या शिक्षणाच्या कौशल्याचा विस्तार करून चांगले जीवन जगता येईल. त्यासोबतच राजाराम महाराजांनी आणखीन एक महत्त्वाचे योगदान केले, ते म्हणजे यामुळे कनिष्ठ वर्गातील प्रशासकीय वर्ग आहे. तो वर्ग सुद्धा एका वर्षापासून आपल्या पूर्ण गरजा व सन्मानाचे जीवन आर्थिक संपन्नता प्राप्त करेल आणि प्रशासनाप्रती आणि एकूणच संस्थांनाप्रती त्या कनिष्ठ वर्गातील कारकुनांची व

अधिकाऱ्यांची बांधिलकी वाढत जाईल अधिक व्यापक होईल असे राजाराम महाराजांनी धोरण राबवले.

## ८) प्रशासकीय यंत्रणेत अस्पृश्यांना संधी

राजाराम महाराजांनी दलित आणि बहुजन उन्नतीसाठी महत्त्वाचे प्रयत्न केले. आपल्या वडिलांचा उदात्त व ऐतिहासिक वारसा हा राजाराम महाराजांनी पुढे चालविला. शाहू महाराजांच्या काळात व शाहू महाराजांनंतर कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी त्याचे गांभीर्य लक्षात ठेवून प्रशासनामध्ये दलित आणि अस्पृश्य जातींना जास्तीत जास्त प्राधान्य देण्याचा प्रयत्न केलेला आहे. शाहू महाराजांनी १९०२ मध्ये एक महत्त्वाचा क्रांतिकारक जाहीरनामा काढला जो जाहीरनामा जगाच्या इतिहासामध्ये सामाजिक न्यायाच्या दिवसाचा इतिहास म्हणून मानला जातो. तो जाहीरनामा प्रशासनामध्ये आणि शिक्षणामध्ये बहुजनांना, दलितांना ५० टक्के आरक्षणाची तरतूद शाहू महाराजांनी केली. त्यामुळे प्रशासनात, शिक्षणात दलित आणि बहुजन यामध्ये खूप मोठी संधी प्राप्त झाली. आरक्षणामुळे आपल्या क्षमता विकसित करण्यात त्यांना खूप मोठे योगदान या निर्णयाने दिले. आपली आर्थिक प्रगती करून घेण्यात आपला सन्मान आणि आपला विकास करून घेण्यात यावा ही महत्त्वपूर्ण भूमिका मांडलेली आहे प्रशासकीय व्यवस्थेत दलितांना आणि बहुजनांना प्रतिनिधित्व मिळावे आणि त्यांच्या हक्काचे संरक्षण व्हावे ही व्यापक उदात्त भूमिका घेतली. वेळोवेळी राजाराम महाराजांनी प्रशासकीय व्यवस्थेमध्ये दलितांना प्रतिनिधित्व देण्याची भूमिका घेतली ज्यामुळे त्याचा परिणाम कोल्हापूर संस्थानामध्ये दलित–बहुजन अनेक पिढ्या या प्रशासकीय व्यवस्थेमध्ये येऊन आर्थिक प्रगती करून शैक्षणिक क्षेत्रामध्ये खूप महत्त्वाचे योगदान देऊन जगभरामध्ये आणि भारतीय देशांमध्ये करण्यात या समुदायाने महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. हे योगदान राजर्षी शाहू महाराज व त्यानंतर राजाराम महाराजांचे होते हे विसरता कामा नये. तलाठी पदे किंवा पंचायत समिती, इलाका पंचायत, कोल्हापूर नगरपालिका यामध्ये दलित आणि बहुजन समाजाची तरतूद करून त्यांचे प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी प्रयत्न केले.

अशाप्रकारे राजाराम महाराजांनी प्रशासकीय क्षेत्रामध्ये सुधारणा करून प्रशासकीय यंत्रणा व रचना अतिशय लोकशाही पद्धतीने व न्यायावर आधारित प्रस्थापित केली. राजाराम

महाराजांचे हे एक महत्त्वाचे योगदान आहे. राजाराम महाराजांनी अतिशय प्रामाणिकपणे व न्यायसंगत प्रशासन व्यवस्था निर्माण करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. इतकेच नाही तर प्रशासनाच्या माध्यमातून कोल्हापूर संस्थानांमध्ये आर्थिक विकासाला खूप मोठ्या प्रमाणात चालना दिली. त्याचा परिणाम असा झाला की, कोल्हापूर संस्थानामध्ये लोकशाही संस्था निर्माण होणे व ती जनमानसामध्ये रूजणे अतिशय सोपे झाले. त्यामुळे कोल्हापूर हे संस्थान आधुनिक लोकशाहीचे केंद्र म्हणून मानले जावे, इतके महत्त्वाचे कर्तृत्व राजाराम महाराजांनी केलेले होते. आपल्या वडिलांच्या निधनानंतर संकटाच्या काळामध्ये कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतल्यानंतर तितक्याच आत्मविश्वासाने आणि दृष्टीने कोल्हापूर संस्थानमधील प्रशासन व्यवस्था अतिशय मजबूत केली. कोल्हापूर संस्थानातील सर्व समाजघटकातील विकास घडवून आणण्यात राजाराम महाराजांचा खूप महत्त्वाचा वाटा आहे. हे त्यांचे ऐतिहासिक योगदान आहे. एका बाजूला ब्रिटिशांचे वर्चस्व व हस्तक्षेप व दुसऱ्या बाजूला आपल्या वडिलांनी म्हणजेच राजर्षी शाहू महाराजांचा अतिशय व्यापक आणि उदात्त वारसा होता. हा वारसा बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीमध्ये पुढे घेऊन जाणे अत्यंत महत्वाचे होते. ते राजाराम महाराजांनी हा वारसा पुढे नेण्यामध्ये आणि संस्थानाच्या विकासाला चालना देण्यामध्ये छत्रपती राजाराम महाराजांचे मोठे योगदान राहिले., हे त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे.

## ९) शासकीय यंत्रणेत अनुंकपा धोरण निर्मिती

स्वातंत्र्यानंतर भारताच्या राज्यघटनेमध्ये राज्य कल्याणकारी तत्त्वाचा समावेश करण्यात आलेला होता. राज्य कल्याणकारी याचा अर्थ नागरिकांचे शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराची हमी ही राज्य सरकार घेत असते. किंबहुना असे म्हणता येईल की, मुख्यतः राज्य सरकारचीच शिक्षण, रोजगार आणि आरोग्य उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आहे. देशाचा विकास व्हायचा असेल, तर जमीन, पाणी व इतर साधनसंपत्तीची आवश्यकता असते. स्वातंत्र्यानंतर देशाचा विकास होत असेल तर रस्त्याचे बांधकाम झाले पाहिजे, मोठ्या धरणांची निर्मिती झाली पाहिजे, छोट्या तलावाची निर्मिती झाली पाहिजे. किंबहुना सार्वजनिक पाण्याची सुविधा उपलब्ध झाली पाहिजे, या सर्व पायाभूत सुविधा देशाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. स्वातंत्र्यानंतर राज्याने या धोरणाच्या अंमलबजावणी करून ज्या शेतकऱ्यांनी, आदिवासी समुदाय यांनी आपल्या जमिनी आणि आपल्या हक्काचे पाणी देशाच्या

विकासासाठी देशाच्या पायाभूत विकासासाठी उपलब्ध करून दिले असेल, तर त्यांना शासकीय सेवेत सामावून घेण्याचे महत्त्वाचे तत्त्व स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने स्वीकारले. वेगवेगळ्या योजनेच्या माध्यमातून शासकीय सेवेत संधी उपलब्ध करून देण्याची, पुनर्वसन प्रमाणपत्र किंवा धरणग्रस्त प्रमाणपत्र यासारख्या प्रमाणपत्राच्या माध्यमातून शासकीय सेवेत आरक्षित जागा ठेवण्याची तरतूद भारत सरकारने व त्या त्या राज्यातील राज्य सरकारने घेतली होती. त्यामुळे अशा अनेक लोकांना शासकीय सेवेत संधी उपलब्ध झाली. त्यासोबत आणखीन एक महत्त्वाचे तत्त्व होते ते म्हणजे शासकीय सेवेत एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला, तर आलेल्या संकटाला त्याच्या कुटुंबियांना सामोरे जाता यावे आणि कुंटुबाचा पुढील चरितार्थ चालवण्यासाठी घरातील अन्य व्यक्तींना घेण्याचे धोरणे स्वीकारले, या धोरणालाच 'अनुकंपा' हे नाव वापरण्यात येऊ लागले. अनुकंपा किंबहुना शासकीय सेवेत सामावून घेण्याची सुरुवात ही छत्रपती राजाराम महाराजांनी केलेली होती.

कोल्हापूर संस्थानात मारुती यादव नामक व्यक्ती सेवक किंवा शिपाई या पदावर काम करत होती. एके दिवशी अचानक झाडावरून पडून मारूती यांचा मृत्यू झाला, त्यामुळे त्यांच्यावर अवलंबून असणारे सर्व कुटुंब म्हणजेच त्यांची दोन मुले आणि आई हे सर्व अनाथ झाले. त्यामुळे त्यांच्यावर ती उपासमारीची वेळ आली. घर चालवणे हे अशक्य झाले. कारण, त्यांच्यावरती अवलंबून असलेल्या शासकीय सेवेतील कर्मचाऱ्याचे निधन झाल्यामुळे त्यांना त्यांच्या उपजीविकेसाठी खूप मोठ्या प्रमाणात अडचणीला सामोरे जावे लागत आहे. ही बाब लक्षात ठेवून छत्रपती राजाराम महाराज यांनी त्यांचा मुलगा यांना शिपाई या पदामध्ये पुन्हा भरती करून घेण्यास परवानगी दिली व आपल्या वडिलांचा मृत्यू झाल्याच्या काळापासून शाळेत शिकत होता. त्यामुळे त्याला शिक्षणसुद्धा बंद करावे लागले. म्हणून छत्रपती राजाराम महाराजांनी त्याला पाच वर्षांकरिता शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी व शिक्षणासाठी प्रोत्साहित केले. एका प्रकारे त्यांनी त्या मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देऊन शासकीय सेवेतील पगार सुद्धा त्या मुलाला देण्याची महत्त्वपूर्ण तरतूद केली. या निर्णयाचा एक व्यापक परिणाम कोल्हापूर संस्थानातील किंबहुना भारतातील अनेक महत्त्वाच्या राज्यांमध्ये झाला आणि तो म्हणजे शासकीय सेवेतील एखाद्या व्यक्तीचा अचानकपणे मृत्यू झाल्यानंतर त्या

व्यक्तीच्या कुटुंबातील व्यक्तींना शासकीय सेवेत सामावून घेण्याचा महत्त्वाचा आदर्श राजाराम महाराजांनी घालून दिलेला होता.[२०]

## १०) नवीन व्यापारी पेठेची निर्मिती

राजर्षी शाहू छत्रपती महाराजांनी कोल्हापूरातील जिन्नसांना प्रामुख्याने कोल्हापूरी गुळाला हक्काची बाजारपेठ म्हणून शाहुपूरी व्यापारी पेठेची निर्मिती केली. या अगोदर हाच माल सांगली, मिरज, रत्नागिरी या ठिकाणी व्यापारासाठी नेला जात असे; पण कोल्हापूर रेल्वे स्टेशन व शाहूपूरी व्यापारी पेठेमुळे हक्काची बाजारपेठ व्यापारासाठी कोल्हापूरातच निर्माण झाली याच धर्तीवर छत्रपती राजाराम महाराजांनी त्यांच्या मातोश्री महाराणी लक्ष्मीबाई राणीसाहेब महाराज यांचे नावाने लक्ष्मीपुरी धान्य मार्केटची उभारणी केली राजाराम महाराजांच्या कार्यकाळाअगोदर लक्ष्मीपूरी हा भाग दलदलीचा असा होता त्या अनुषंगाने अनेक साथीचे आजारांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर होत होता. यावर कायमस्वरूपी उपायोजना व्हावी यासाठी लक्ष्मीपुरी वसाहत त्याचबरोबर धान्य मार्केटची योजना राजाराम महाराजांनी राबविली. रयतेच्या सर्वांगीण विकासासाठी प्रमुख स्त्रोत म्हणजे उद्योजक व वाणीज्य क्षेत्र आहे, असे राजाराम महाराजांचे प्रमुख मत होते. शेतीचे क्षेत्र हा आर्थिक जीवनाचा प्रमुख पाया असल्याचेही राजाराम महाराज विशेषतः नमूद करतात. लक्ष्मीपुरी वसाहत निर्माण करण्यासाठी सुमारे दोन लाख रूपये तसेच ड्रेनेज सिस्टीमच्या खर्चासाठी वाढीव एक लक्ष रूपयांची तरतुदही राजाराम महाराजांनी केल्याचे दिसून येते.

## अ. जयसिंगपूरी या नवीन वसाहतीच्या निमिर्ती करताना केलेल्या उपायोजना :-

शिरोळ रोड स्टेशनजीक जयसिंगपूरी नावाची नवीन वसाहत स्थापन केली होती. मात्र त्या भागात पाण्याची सोय नव्हती. त्या वसाहतीमधील लोकवस्ती होऊन व्यापाराची भरभराट व्हावी या उद्देशाने छत्रपती राजाराम महाराजांना दि. २२ फेब्रुारी १९२६ रोजी एक जाहीरनामा प्रसिद्ध केला. या जाहिरनाम्यात केलेल्या तरतुदीनुसार या भागात नवीन विहिरी खोदून पाण्याची उपलब्धता करण्यात येईल आणि ते इंजिनने लोकांना पुरवठा करण्यात येईल. त्यानुसार केलेल्या उपाययोजना पुढीलप्रमाणे :

१) वसाहतीमध्ये पाण्याची सोय करताना आणि इंजिन चालवून पाणी पुरवठा करण्यासाठी रु. पन्नास हजार खर्चाची तरतूद करण्यात आली, तसेच दरसाल अडीच हजार रूपये प्रमाणे खर्चास मान्याता देण्यात आली.

२) वसाहतीमध्ये पाणी पुरवठा करण्यासाठी ज्या विहीर बांधण्यात आल्या होत्या, त्यास पाणी विपुल प्रमाणात असल्याने खासगी जागेत पाणी देण्याची व्यवस्था केले, त्या पाण्याबद्दल त्याचा मोबदला घेण्याची व्यवस्था करण्यात आली.

३) वसाहतीमध्ये पाईपालाईन टाकून पाणी घरांत देण्याच्या उद्देशाने कार्यवाही करण्यात आली, अर्ध्या इंचाबद्दल दरसाल बारा रूपये व पाऊण इंचाबद्दल दरसाल चोवीस रूपये या प्रमाणे त्यांच्याकडून वसूल करण्याची तरतूद करण्यात आली होती.

४) घरातील नळ बसविण्याचा सर्व खर्च त्या इसमाकडून घेण्याची तरतूद करण्यात आली होती त्यानंतर दुरूस्तीचा खर्च असल्यास तोही खर्च त्यांनीच करावा, असे जाहिर करण्यात आले होते.

५) ज्यांना आपले घरी पाणी घ्यायचे आहे त्यांनी एक्स्टेशन ऑफिसर जयसिंगपूरी, यांचे नावे अर्ज करून आठ रूपये डिपॉझिटसह पाठविण्यासंदर्भात तजवीज करण्यात आली होती.

अशा प्रकारे नवीन वसाहतीमध्ये पाण्याची सोय करण्यात आली. तेथील लोकवस्ती होऊन व्यापाराची भरभराट व्हावी म्हणून मूलभूत गरजा भागविण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्यात आली. त्याचबरोबर पाणी वाया जाणार नाही याकडे कटाक्षाने लक्ष देऊन आग प्रतिबंधक उपयोजना करण्यासही ह्या पाण्याची उपयोग केला जावा, असेही लेखी आदेश दिला गेला. जयसिंगपूर पेठेचा विकास घडविण्यासाठी तेथे येणाऱ्या व्यापाऱ्यांना राजाराम महाराजांनी अनेक सवलती उपलब्ध करून दिल्या. त्या सवलतीतून जयसिंगपूर पेठेचा सर्वांगिण भरभराट झालेली आहे.[२१]

## ११) कोल्हापूर संस्थानच्या अर्थसंकल्पात सुधारणा

राजाराम महाराजांनी प्रशासकीय सुधारणा करताना कोल्हापूर स्टेटच्या बजेटमध्येही सुधारणा करण्याचे ओदश दिले. त्यानुसार कोल्हापूर स्टेटचे बजेट ज्या त्या खात्याचे

मिनिस्टरनी आपापल्या खात्यापुरते तयार करून ते मे. रा. ब. दिवाणसाहेब सरकार करवीर यांचेकडे पाठवावे, नंतर त्याचे एकत्रित प्रस्ताव महाराजांच्या मंजूरीसाठी १५ एप्रिलच्या आत पाठविण्याची तजविज करण्याचे निदेश दिले. त्यासाठी काही नियमावली तयार करण्यात आली.

१) प्रत्येक ऑफीसरने आपल्या ऑफीसचे बजेट काळजीपूर्वक तयार करून त्याची एक प्रत दरसाल वहिवाटीप्रमाणे रा. सा. चीफ ऑफीसर यांचेकडे व दुसरी प्रत आपाल्या खात्याच्या मिनिस्टरकडे १५ फेब्रुवारीचे आत पाठविले पाहिजेत. मुदतीचे उल्लंघन झाल्यास उशिराची जबाबदारी ज्या त्या ऑफिसवर ठेवण्यात येईल, अशी तरतूद करण्यात आली.

२) तयार करण्यात येणाऱ्या बजेटमध्ये मुख्यत्वे चालू सालातील मंजूर बजेटप्रमाणे जमा अथवा खर्च, जानेवारी अखेर पक्की जमा अथवा खर्च, वर्षाअखेर येणारा अंदाजित जमा व होणारा अंदाजित खर्च , रिव्हाइज एस्टिमेंट, पुढील वर्षी येणारी अंदाजित जमा व खर्च इत्यादी बाबी बजेट मंजूर करताना घेण्याच्या सुचना करण्यात आल्या.

अशा प्रकारे बजेट सादर करताना द्यावयाच्या बाबींचा समावेश करताना काटकसर करण्याकडे लक्ष न देता कित्येक अधिकाऱ्यांकडून खर्चाचे बजेट अधिक रकमेचे येऊ लागले असल्याचे निदर्शनास आले. त्यावर ज्या त्या मिनिस्टरनी आपआपले खात्यांतील बजेटांत काटकसर करुन त्याजबद्दल एक स्वतंत्र तक्ता बजेट समवेत पाठवावा, तसेच पुर्वीच्या बजेटमध्ये रक्कम आहे म्हणून आताही रक्कम दयावी असे करू नये, तर रक्कम शिल्लक आहे किंवा कसे आता पुन्हा गरज आहे का याची तपासणी करूनच रक्कम नमूद करावी. तसेच ज्या बाबी खाली मागील तीन सालास काही खर्च झाला नाही, अशा रकमा कमी करणेकडे व पक्के खर्चाची सरासरी काढून त्या मानाने रकमा दाखल करणेकडे बजेट करणारे अधिकाऱ्यांने लक्ष दिले पाहिजे, अशा रक्कम कमी करून विशेष बाब म्हणून पुन्हा स्पे. सँगशन करणेची जरूरी वाटल्यास त्यास मंजूरी देण्यात येईल, तसेच निरर्थक खर्चाचे बजेट फुगविले जाऊ नये तशी खबदारी घेण्यात यावी, अशा सुचना बजेट करताना महाराजांनी दिल्या.

तसेच मिनिस्टरकडे बजेट आल्यानंतर त्यांनी बारकाईने तपासून घ्यावी. त्यामध्ये काटकसर होण्यासारखी असलयास तसा तक्ता सोबत जोडावा, व शेवटी काटसरीचे कारणाचा शेरा लिहावा, तसेच त्यामध्ये काही वाढ करण्याची असल्यास कारणामिमांसा करून वाढ

कशासाठी आणि किती याचा स्वयं स्पष्ट अभिप्रायासह पाठविण्याची तजवीज करावी, अशी तरतूद करण्यात आली होती.

यावरून महाराजांनी आपल्या संस्थानामधील महत्त्वाच्या खात्याकडे किती बारकाईने लक्ष होते ते दिसून येते. बजेट मंजूर करताना घ्यावयाची काळजी, जास्त बजेट मंजूर करावयाचा असेत तर त्याचे कारण, नमूद करून मंजुरीकरिता पाठविण्याची घेतलेली काळजी यावरून प्रशासनामध्ये काटेकोरपणे शिस्त लावण्यात आली होती हे दिसून येते.[२२]

## १२) शेतकी व सहकार या स्वतंत्र खात्याची निर्मिती

गुरूकुल व आर्यसमाज संस्था कोल्हापूर यांना शेतकी व गुरांची जोपासना यांचे शिक्षण विद्यार्थ्यांना देण्याकरिता सुमारे ५० एकर जमीन देण्यात आली होती, परंतु सदर संस्थेकडून समाधानकारकरित्या काम होत नसल्याने सदर जमीन काढून घेण्यात आली, तसेच 'किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इन्स्टिट्युशन, कोल्हापूर' या संस्थेस जी वार्षिक ग्रॅंट मिळते, तीही बंद ठेवून सदरची रक्कम व किन व्हिक्टोरिया फंडच्या व्याजाची रक्कम यांचा उपयोग मूळ उद्देशासाठी करण्याचा निर्णय घेऊन राजाराम महाराजांनी शेतकी सुधारणेचे महत्व लक्षात घेऊन शेतकी व सहकार हे एक स्वतंत्र खाते सन १९२६ मध्ये निर्माण केले. या खात्याची प्रशासकीदृष्टया खालील नियमावली तयार करण्यात आली.

१) सहकारी सोसायटीचे काम रा.ब.सा. दप्तर-दार हे पहात आहेत; परंतु त्यांना आपली नेहमीची कामे सांभाळून हे काम समाधानकारक करता येणे शक्य नसल्याने इनस्पेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर ॲन्ड को-ऑपरेशन म्हणून एक स्वतंत्र अंमलदार दरमहा १०० रूपये पगार व ५० रूपये अलावन्स देऊन या खात्यावर नेमण्यात यावा, सदर खात्याचा पोर्टफोलीयो राव बहादूर दिवाण यांच्याकडे रहावा.

२) आर्य समाजाच्या ताब्यांत असलेल्या सर्व जमीनी रा.ब.सा. एज्यु. इन्स्पेक्टर यांच्या ताब्यांत देण्यात याव्यात, व त्याचा उपयोग त्यानी ट्रेनिंग कॉलेजमध्ये शिकत असलेल्या शिक्षकांस शेतकीचे शिक्षण देण्यासाठी करावा. सवडीप्रमाणे गुरूकुलमधील विद्यार्थ्यांसही शेतकीचे शिक्षण

द्यावे व त्याचप्रमाणे कोल्हापूर इलाख्यांतील शेतकऱ्यांना नवीन व प्रयोगसिद्ध शेतकी सुधारण्याचे शिक्षण शॉर्ट कोर्सेस काढून या मॉडेल फर्मवर देण्यात यावे.

३) किंग एडवर्ड ॲग्रिकलचर एज्यूकेशनची पुनर्घटना खालीलप्रमाणे करावी. दिवाण, सरसुभे, एज्युकेशन इन्स्पेक्टर, इन्स्पेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर ॲन्ड को–ऑपरेशन यांच्या पसंतीने पाच शिक्षित शेतकी मिळून नऊ मेंबरची एक कमेटी नेमणेंत यावी,

४) ॲग्रिकल्चर ॲन्ड को–ऑपरेशन इन्स्पेक्टर यांनीच या पुढे रजिस्टार ऑफ को–ऑपरेशन सोसायटीजचे काम करणेचे आहे. सेंट्रल को–ऑपरेटिव्ह बॅक काढणे, नवीन सोसायट्या स्थापन करणे, हल्लीच्या सोसायट्यांचे ऑडीट करणे वगैरे सर्व कामकाज यांनीच करणेचे आहे. या कामासाठी त्यांचे ४० रूपये पगार देण्याचे ठरविण्यात आले.

५) किन व्हिक्टोरिया मेमोरियल फंड व्यवस्था या नवीन खात्याकडे देण्यांत आले व या फंडाच्या व्याजाचा उपयोग सोसायट्या व शेती सुधारणा या दोन्हींच्या फायद्यासाठी कमेटीमार्फत करण्यात यावा.

६) सदर योजनेला २५८० रूपये इतका खर्च मंजूर करण्यात आला. त्यामध्ये इन्स्पेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर ॲन्ड को–ऑपरेशन यांना पगार व भत्ता रू. १८०० तर ऑडिटर यांचा पगार व भत्ता ६६० आणि कॉटिजन्सी वगैरे यांना १२० या प्रमाणे खर्चास मंजूरी देण्यात आली.[२३]

छत्रपती राजाराम महाराजांच्या या प्रशासकीय सुधारणा अत्यंत महत्त्वाच्या होत्या. कोल्हापूर संस्थानमध्ये राजाराम महाराजांनी राज्य कारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर त्यांनी केलेल्या सुधारणांमुळे प्रशासनात आमूलाग्र बदल झाला. प्रशासन ही लोकांसाठी आहे, राजा किंवा छत्रपती घराणेही कोणत्या प्रकारे लोकांप्रती जबाबदार असणार आणि लोकांच्या हितासाठी प्रशासकीय सुधारणा करून प्राधान्य देणार ही बाब छत्रपती राजाराम महाराजांनी करून दाखवली. छत्रपती राजाराम महाराज शाहू महाराजांचा खऱ्या अर्थाने वारसा तर आहेतच पण त्यासोबतच प्रशासकीय सुधारणांचे व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अंमलबजावणीचे जनक म्हटले, तरी अतिशोक्ती ठरणार नाही. प्रशासन हे लोककल्याणकारी असले पाहिजे, त्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेची निर्मिती, प्रशासनामध्ये दलित–बहुजन समाजाचे प्रतिनिधित्व,

लोकांच्या हिताला प्राथमिक प्राधान्यक्रम यासारख्या अनेक महत्त्वाच्या सुधारणा राजाराम महाराजांनी केल्या. म्हणून ही बाब भारताच्या इतिहासामध्ये किंबहुना जगाच्या इतिहासामध्ये आदर्श निर्माण करणारी आहे.

## संदर्भसूची :


१. संपादक (२०१८) छत्रपती राजाराम महाराज यांचे विचार, संचालक, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृष्ठ २५

२. करवीर सरकारची गॅजेट भाग ४, दि. २१ नोव्हेंबर, १९२५, लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट, कोल्हापूर, पृष्ठ क्रमांक ३६ ते ४९,

३. संपादक (२०१८) छत्रपती राजाराम महाराज यांचे विचार, संचालक, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई पृ. २४–२५

४. कित्ता पृष्ठ २४

५. करवीर सरकारची गॅजेट भाग ४, दि. २१ नोव्हेंबर, १९२५, लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट, कोल्हापूर, पृष्ठ क्रमांक ३७

६. कित्ता पृष्ठ ३८

७. कित्ता पृष्ठ ३८

८. कित्ता पृष्ठ ३९

९. करवीर सरकारची गॅजेट भाग ४, दि. २७ डिसेंबर, १९२६, लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट, कोल्हापूर, पृष्ठ क्रमांक २ ते ४.

१०. करवीर सरकारची गॅजेट भाग–४, १८ जून, १९२७, लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट, कोल्हापूर, पृष्ठ क्रमांक १४

११. कित्ता पृष्ठ १५

१२. करवीर सरकारची गॅजेट भाग–४, दि. ३० जुलै, १९२७, लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट, कोल्हापूर, पृष्ठ क्रमांक २८

१३. हुजूर ऑफिस, करवीर सरकारची गॅजेट, भाग–४, दि. ३० जुलै, १९२७, लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट, कोल्हापूर, पृष्ठ २८ ते ३०

१४. हुजूर ऑफीस, करविर सरकारचे गॅझेट, भाग–५, दिनांक १ फेब्रुवारी १९३०, कोल्हापूर पृ.१६ ते २४

१५. करवीर सरकारची गॅजेट भाग १, दि. ९ ऑगस्ट, १९२६, फायनान्स डिपार्टमेंट कोल्हापूर, पृष्ठ क्रमांक १६

१६. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव बुक क्रमांक, ३२२ ठराव नंबर २९०, दि. २७ जुलै, १९२२, कोल्हापूर

१७. करवीर सरकारची गॅजेट भाग ५, दि. २३ एप्रिल, १९३२, लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट कोल्हापूर, पृष्ठ क्रमांक २–९

१८. कित्ता पृष्ठ – ८

१९. करवीर सरकारची गॅजेट भाग १, दि. ४ नोव्हेंबर, १९२६, जनरल डिपार्टमेंट, कोल्हापूर, पृष्ठ क्रमांक २२,२३

२०. धाटावकर भास्कर (संपा.) २०१० छत्रपती राजाराम महाराज यांचे निवडक आदेश भाग २, संचालक, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन, कोल्हापूर, पृष्ठ क्रमांक ५०

२१. हुजूर ऑफीस, करवीर सरकारचे गॅझेट, भाग –१, दिनांक २७ फेब्रुवारी १९२६, कोल्हापूर, पृ.३६,३७

२२. हुजूर ऑफीस, करवीर सरकारचे गॅझेट, भाग– १ दिनांक १२ जानेवारी १९२९, कोल्हापूर, पृ. ४

२३. हुजूर ऑफीस, करवीर सरकारचे गॅझेट, भाग १, दिनांक २७ मार्च १९२६, कोल्हापूर, पृ. ५२

प्रकरण चौथे

# छत्रपती राजाराम महाराज यांचे प्रशासन गतिमान करण्यासाठीचे धोरणात्मक निर्णय

- प्रस्तावना

१) संस्थानातील नोकराच्या लोकांप्रती संवेदनशीलता

२) सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षमीकरणावर केंद्रीत

३) तलाठ्यांच्या चुकांना दंड

४) नोकरदारांना मुन्सिपलिटी प्रतिनिधीत्व

५) कार्यालयीन कामाच्या वेळेची नियमितता

६) लोककेंद्री प्रशासकीय निर्णय

७) नुकसान भरपाईची तरतूद

८) कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना शिक्षा

९) प्रशासकीय कामात हलगर्जीपणामुळे (खाडाखोड) सस्पेंड

१०) पूर्व रजा मंजुरीसाठी परवानगी

११) सरकारी मालमत्तेच्या अफरातफरीबद्दल शिक्षा व नुकसान भरपाई

१२) गायरानातील झाडे तोडणाऱ्यांना शिक्षा

१३) सार्वजनिक सुरक्षिततेसाठी प्राधान्य

१४) लाचलुचपत प्रतिबंधक धोरण

१५) शासकीय कामात वेळकाढूपणाला शिक्षा

१६) आर्थिक काटकसरीला प्राधान्य

१७) प्रशासकीय कामात सुधारणा व पारदर्शकता

१८) कार्यालयीन वेळेच्या शिस्तीला प्राधान्य

१९) आधुनिक अर्ज नमुन्याची सुरूवात

२०) प्रशासकीय कार्याचे विकेंद्रीकरण

२१) वेतनश्रेणी वाढ

२२) विमान सेवेचा प्रारंभ

२३) संस्थानातील सरकारी खजिन्यातील देवघेवीसंबंधी नियमावली

# प्रकरण चौथे

# छत्रपती राजाराम महाराज यांचे प्रशासन गतिमान करण्यासाठीचे धोरणात्मक निर्णय

## प्रस्तावना

राजाराम महाराजांचे प्रशासकीय धोरणात्मक निर्णय अत्यंत मूलगामी व क्रांतिकारक होते. महाराजांनी आपल्या कारकीर्दीत घेतलेली शासकीय धोरणे ही अत्यंत मानव केंद्री होती. म्हणून त्याची अंमलबजावणीसुद्धा खूप जलदगतीने व परिणामकारकरीत्या केली गेली. त्याचा परिणाम म्हणूनच एकूणच कोल्हापूर संस्थानामध्ये खूप व्यापक अर्थाने बदल दिसून आला. छत्रपती राजाराम महाराजांची एकूणच जडणघडण राजर्षी शाहू महाराजांच्या प्रभावातून व छत्रछायेत आणि पाश्चिमात्य शिक्षण व्यवस्थेच्या प्रभावातून झाली. शालेय शिक्षण घेत असतानाच्या काळात छत्रपती राजाराम महाराजांनी आपल्या आयुष्याची जवळपास पाच ते सहा वर्षे पाश्चात्य देशात घालवली. या काळात त्यांना शालेय शिक्षणाबरोबरच तेथील राजकीय व्यवस्था, प्रशासकीय व्यवस्था जवळून पाहता आली.

त्याचबरोबर त्यांना राजर्षी शाहू महाराजांचा राज्यकारभार अगदी जवळून पाहता आला. एवढेच काय शाहू महाराजांनी छत्रपती राजाराम महाराजांना मुलकी खात्यासारखी अनेक महत्त्वाची खाती सांभाळण्यासाठी दिली होती. साहजिकच यातून राजाराम महाराजांचे राजकीय प्रशिक्षण तर झालेच पण प्रशासन हे लोककल्याणासाठी कार्यशील कसे करता येईल, याचाही त्यांना राजर्षी शाहू महाराजांच्या मार्गदर्शनाखाली अनुभव घेता आला. साहजिकच छत्रपती राजाराम महाराजांच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण ठरलेल्या या दोन्ही घटकांचा प्रभाव कोल्हापूर संस्थानाची सुत्रे स्वीकारल्यानंतर त्यांनी घेतलेल्या प्रशासकीय धोरणांवर दिसून येतो. त्यामुळे त्यांचे प्रशासन हे गतीशील, शिस्तबद्ध आणि कार्यक्षम असल्याचे दिसून येते.

## १. संस्थानातील नोकराच्या लोकांप्रती संवेदनशीलता :

प्रशासन हे शिस्तबद्ध आणि पारदर्शक असले पाहिजे याकडे छत्रपती राजाराम महाराजांचा नेहमीच कल राहिला. त्यामुळे प्रशासनातील प्रत्येक घटक हा आपल्या कामाप्रती प्रामाणिक आणि स्वच्छ मनोवृत्ती असलेला असला पाहिजे. त्या घटकाकडून सार्वजनिक मालमत्तेचा अपहार न होता त्याचे संरक्षण झाले पाहिजे, ही राजाराम महाराजांची धारणा होती. याच मनोभूमिकेतून त्यांनी घेतलेल्या विविध प्रशासकीय धोरणामुळे प्रशासकीय कामात गतीशीलता आणि पारदर्शकता येऊ शकली. राजाराम महाराजांनी असे अनेक महत्त्वाचे प्रशासकीय निर्णय घेतलेले होते. ज्यामुळे कामात व प्रशासकीय व्यवहारात गतिशीलता प्राप्त करून देण्यासाठी व सार्वजनिक मालमत्ते प्रति संवेदनशीलता निर्माण करण्यात यश मिळाल्याचे दिसते. संस्थानातील प्रशासकीय कामकाजात सहभागी असलेल्या प्रत्येक अधिकारी आणि कर्मचाऱ्याने स्वतःच्या अंगी शिस्त बाणवलीच पाहिजे, याकडे त्यांचा कटाक्ष होता. साहजिकच शिस्तभंग करणाऱ्या कर्मचारी वर्गाला योग्य ती समज मिळण्यासाठी त्यांनी वेळेप्रंसगी अगदी कठोर निर्णयही घेतले. अशा अनेक निर्णयांपैकी एक निर्णय म्हणजे ‘कुरण तपासणीच्या वेळी राजाराम महाराजांना कोल्हापूर संस्थानातील हजारे व कवठेकर या दोन अधिकाऱ्यांना पार्कमध्ये जी जनावरे सापडलेली होती, त्या जनावरांच्या मालकांकडून पैसे घेताना पकडले गेले होते. ही बाब महाराजांना लक्षात आल्यानंतर अत्यंत कठोर असे निर्णय घेतले. त्यापैकी एक म्हणजे कोल्हापूर संस्थानातील या दोन अधिकाऱ्यांचा पगारातील एक रुपया कमी करण्याचा आदेश राजाराम महाराजांनी दिला. या निर्णयाचा परिणाम म्हणून कोल्हापूर संस्थानात कार्यरत प्रत्येक अधिकारी–कर्मचारी लोकाभिमुख राहून सामान्य माणसाच्या हिताप्रती आणि सार्वजनिक मालमत्ता सुरक्षित ठेवण्याप्रती कटीबद्ध राहील, सामान्य माणसाला लुबाडण्यास वा आर्थिक शोषण करण्यास धजावणार नाही, ही राजाराम महाराजांची धारणा होती.[१] त्याच्या अशा विविध निर्णयामुळे प्रशासनाप्रती असलेली त्यांची धारणा फलद्रुप होऊ शकली. सार्वजनिक मालमत्तेच्या व लोकांना अडवणूक करून, त्यांची फसवणूक करणाऱ्या नोकरांना आळा बसला. कोल्हापूर संस्थानातील सर्व सरकारी नोकर लोकांच्याबाबत किंवा लोकांप्रती संवेदनशील झाले. कोणत्याही लोकांना अशा प्रकारची आर्थिक किंबहुना कोणत्याही प्रकारचे शोषण केल्यानंतर याचे कोणते परिणाम भोगावे लागतील याची जाणीव झाली.

## २. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सक्षमीकरणावर भर

कोल्हापूर हे संस्थान शैक्षणिकदृष्ट्या प्रगतशील असावे, संस्थानाचा आर्थिक, सामाजिक, राजकीय असा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी छत्रपती राजराम महाराज नेहमीच कार्यशील राहिले. शिक्षण घेण्यासाठी इंग्लड, फ्रान्स येथे गेले असता तेथील शिक्षण व्यवस्थेचा, भौतिक आणि विकासाचा त्यांच्या मनावर दूरगामी परिणाम झाला. इंग्लंडमध्ये झालेली औद्योगिक क्रांती, त्या क्रांतीतून झालेला शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक विकास हा कौतुकास्पद होता. त्यासोबतच इंग्लंडमध्ये सार्वजनिक वाहतुकीची सुविधासुद्धा खूप विकसित होती. अशा प्रकारची सार्वजनिक सुविधा कोल्हापूर संस्थानात असणे हा महाराजांचा अत्यंत प्रगतिशील विचार होता. त्यासाठी त्यांनी खूप महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेतले. कोल्हापूर संस्थान हे शेतीच्या क्षेत्रात पुढे गेले आहे. सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात पुढे गेले आहे. पण सार्वजनिक सुव्यवस्था विस्कळीत असल्याची जाणीव राजाराम महाराजांना झाली. त्यांनी सार्वजनिक सुव्यवस्था व वाहतूक व्यवस्था चांगली व विकसित पद्धतीची असली पाहिजे. यासाठी त्यांनी महत्त्वाचे निर्णय घेतले. कोल्हापूर संस्थानामध्ये व कोल्हापूर शहरामध्ये वाहतूक व्यवस्थाही राजर्षी शाहू महाराजांच्या अगोदर पारंपरिक म्हणजेच बैलगाडी, घोडा गाडी व इतर प्राण्यांच्या आधारे केली जात होती. अशा पारंपरिक वाहतूक व्यवस्थेमुळे वेळेचा अपव्यय व पैशाचा अपव्यय खूप मोठ्या प्रमाणात होत होता. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेमध्ये आमूलाग्र बदल करायचा असेल, तर त्यासाठीचे नियम तयार करणे व वाहतूक व्यवस्थेचे माध्यम म्हणून बदलणे अत्यंत गरजेचे होते. तसा प्रयत्न राजाराम महाराजांनी केलेला होता. केवळ वाहतूक व्यवस्था उपलब्ध करून देणे इतकेच काम राजाराम महाराजांना महत्त्वाचे वाटत नव्हते. त्यासोबत कोल्हापूर शहरातील व संस्थानातील लोकांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचे नियम समजले पाहिजे व त्यांचे त्यांनी तंतोतंत पालन केले पाहिजे हा त्यांचा आग्रह होता. कोल्हापूर संस्थानातील लोकांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्था समजली पाहिजे. ती कशा प्रकारे चालते, तिचे नियम काय आहेत, हे सर्व समजले पाहिजे, त्यासाठी महाराजांनी वेळोवेळी अनेक महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेऊन कोल्हापूर संस्थानातील लोकांना सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेबद्दल जागृत करण्याचे, त्या सुविधेचा वापर करून प्रगती साधण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला होता. शहरांत मोटार व इतर वाहनांची वाहतूक कशी करावी, यासंबंधी नियमांच्या

पाट्या रहदारीच्या रस्त्यावर लावण्याच्या कामासाठी त्यांनी १०० रुपये मंजूर केले होते. सक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी त्याचा वापर करणारा घटक सुशिक्षित व साक्षर असणे गरजेचे होते. जेणेकरून सार्वजनिक वाहतूकीचे मार्ग, सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची साधने, त्यांचा वापर सार्वजनिक वाहतुकीचे नियम समजून घेऊ शकेल. त्यादृष्टिकोनातून महाराजांनी संस्थानातील साक्षरतेचे प्रमाण कसे वाढेल, यासाठी अनेक धोरणे राबवली. त्याचबरोबर लोकांना सुरक्षित व सक्षम वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टिकोनातून वाहतूक साक्षर करण्यासाठी वाहतुकीचे नियम असलेल्या पाट्या संस्थानातील दर्शनी भागात लावण्याचा निर्णय घेतला.[२] या धोरणामुळे कोल्हापूर संस्थानातील नागरिकांमध्ये सार्वजनिक वाहतुकीबद्दल जागरुकता निर्माण झाली. आधुनिक पद्धतीने सार्वजनिक वाहतूक नियम विकसित केली जात आहेत. याबद्दल कौतुक कोल्हापूर संस्थानातील प्रगतशील लोकांमध्ये स्वागत झाले. आधुनिक पद्धतीची वाहतूक सुव्यवस्था निर्माण करण्याचे व सामान्यांसाठी उपलब्ध करून देण्याचे प्राथमिक श्रेय हे कोल्हापूर संस्थानातील राजे छत्रपती राजाराम महाराज यांना जाते, हे ऐतिहासिक काम राजाराम महाराज यांनी केले हा इतिहास नाकारता येत नाही. कोल्हापूर संस्थान अत्याधुनिक वाहतूक व्यवस्थेमुळे व त्याचे नियमन करणाऱ्या व्यवस्था जन्माला घालून राजाराम महाराजांनी भारताला एक आदर्श घालून दिला.

## ३. तलाठ्यांच्या चुकांना दंड

कोल्हापूर संस्थानातील शाहू महाराजांपूर्वीची प्रशासकीय व्यवस्था जातीवर आधारित होती. अर्थात जातीव्यवस्था मानवी क्षमता आणि कर्तृत्वाला फारशा प्रमाणात पुढे घेऊन जात नाहीत. जातिव्यवस्थेच्या पारंपरिक संरचनेत शिक्षण आणि शिक्षणासाठी अधिकार हा भारतीय समाजात अभिजन वर्गात होता. त्यामुळे शिक्षणाचा प्रसार दलित, बहुजन समाजात नव्हता. याचा परिणाम असा झाला की, ब्रिटिश भारतात आल्यानंतर सर्व शैक्षणिक प्रगती अभिजन वर्गाने करून ब्रिटिश प्रशासकीय व्यवस्थेत प्रतिनिधित्व केले. दलित, बहुजन समाजातील लोकांना मोठ्या प्रमाणात शिक्षणापासून व प्रशासकीय संधीपासून वंचित राहावे लागते. शाहू महाराजांनी ही परंपरा मोडीत काढून दलित, बहुजन समाजाला शिक्षणासाठी शाळा उपलब्ध करून दिल्या. वसतीगृहाची सुरुवात शाहू महाराजांनी केली. त्यामुळे दलित, बहुजन

समाजातील लोकांना मिळालेल्या शिक्षणाच्या संधीमुळे त्यांना आपला बौद्धिक साधता आला, त्याचबरोबर त्यांच्यात एक वैचारिक प्रगल्भता व सांस्कृतिक भान निर्माण झाले. अशा नवशिक्षित वर्गाला शाहू महाराजांनी आपल्या प्रशासकीय सेवेत संधी उपलब्ध करून दिली. शाहू महाराजांच्या निधनानंतर हा वारसा छत्रपती राजाराम महाराजांनी समर्थपणे पुढे चालवला. प्रशासकीय व्यवस्थेत नवशिक्षित दलित–बहुजनांना स्थान देण्याबरोबरच प्रशासकीय भरतीला आधुनिक मूल्याची जोड दिली. त्याचाच एक भाग म्हणून कुलकर्णी हे प्रशासकीय पद रद्द करून त्या ठिकाणी तलाठी हे पद निर्माण केले. या पदासाठी जात वा अभिजन वर्ग हा निकष न ठेवता परीक्षा आणि शैक्षणिक गुणवत्ता हे निकष ठेवले. साहजिकच प्रशासकीय व्यवस्थेला आधुनिक रूप प्राप्त करून देण्याबरोबरच आधुनिक वेतनावर तलाठीसारखे पद निर्माण करण्याचे पूर्ण श्रेय छत्रपती राजाराम महाराज यांना जाते. साहजिकच तलाठी या पदाबद्दल दलित – बहुजन समुदायामध्ये एक आकर्षण निर्माण झाले. त्याचबरोबर तलाठी या पदावरील व्यक्तीने शिस्तीचे पालन केलेच पाहिजे, असा दंडक घालून देणारे काही नियम तयार केले. शिस्तभंग करणाऱ्या तलाठीसारख्या सर्व पदावरील व्यक्तीना कठोर शिक्षा करण्याचाही धोरणात्मक निर्णय घेतला. एखादा तलाठी जर कामात दिरंगाई करत असेल, तर दंड म्हणून त्या तलाठ्याच्या एक महिन्याचा पगार कपात करण्याचा निर्णय महाराजांनी घेतला.[३]

## ४. नोकरदारांना म्युनिसिपालिटी प्रतिनिधित्व

राजाराम महाराजांनी आधुनिक प्रशासन व्यवस्था कोल्हापूर संस्थानात सुरू केली. आधुनिक प्रशासन व्यवस्थेमुळे सर्वसामान्य लोकांना कामाच्या बाबतीत पारदर्शकता आणि जबाबदारीचे भान आले. यामुळे कोल्हापूर संस्थान हे ‘भारतीय लोकशाहीची जननी’ म्हणून सुद्धा विकसित झालेले संस्थान आहे. आधुनिक प्रशासन व आधुनिक लोकशाही या दोन बाबी केंद्रस्थानी ठेवून राजर्षी शाहू महाराज आणि त्यानंतर राजाराम महाराज यांनी आपल्या प्रशासकीय व्यवस्थेचा विकास आणि विस्तार केला. ब्रिटिश भारतात येण्यापूर्वी व ब्रिटिश भारतात आल्यानंतर भारतातल्या कोणत्याही संस्थानामध्ये अशा प्रकारच्या अत्याधुनिक संस्था व लोकशाही आकाराला आलेली नाही .राजाराम महाराजांच्या दूरदृष्टीमुळे या संस्थानाचा व लोकशाहीचा आकार, विस्तार कोल्हापूर संस्थानात झाला. इसवी सन १९२५ मध्ये कोल्हापूर

संस्थानात राजाराम महाराजांनी 'कोल्हापूर स्टेट मुन्सिपल ॲक्ट' लागू केला. कोल्हापूर स्टेट मुन्सिपल ॲक्टनुसार, कोल्हापूर संस्थानात महानगरपालिका किंबहुना नगरपालिका यांसारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांची सुरुवात झाली. मात्र या स्थानिक स्वराज्य संस्था या लोकाभिमुख असाव्यात आणि लोकांमध्ये लोकशाही प्रक्रिया रुजविली जावी या दृष्टिकोनातून छत्रपती राजाराम महाराजांनी स्थानिक स्वराज्य संस्थेशी निगडीत कायद्यांचा सखोल अभ्यास करून महत्त्वाच्या तरतुदी केल्या. त्यातील महत्त्वाची पहिली तरतूद म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांमध्ये लोकप्रतिनिधींना स्थान दिले जावे विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सदस्यांमध्ये लोकप्रतिनिधी असावेत, यासारखी महत्त्वपूर्ण तरतूद यामध्ये केली. त्याचबरोबर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सर्वांना प्रतिनिधित्व मिळावे यासाठी ''प्रत्येक म्युनिसिपलमध्ये लोकांनी निवडलेले आठ सदस्य असतील'' अशा प्रकारची महत्त्वपूर्ण तरतूद केली. त्यासोबत इतर लोकांना सुद्धा प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे म्हणून ''प्रत्येक म्युनिसिपलमध्ये सरकारकडून निवडलेले आठ सदस्य असतील.'' म्युनिसिपलने आपला अध्यक्ष निवडण्याची मंजुरी देणारी तरतूदसुद्धा या कायद्यामध्ये करण्यात आली.[४] त्यामुळे प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये लोकप्रतिनिधी म्हणून लोकांकडून निवडून गेलेल्या लोकांना स्थान देण्यात आले, तर संस्थानातील सरकारी लोकांनासुद्धा प्रतिनिधित्व मिळावे म्हणून त्यांचेसुद्धा तितकेच सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थेवर नेमण्यात आले. कोल्हापूर संस्थानामध्ये प्रतिनिधित्वाचे महत्त्वाचे निर्णय घेतल्यामुळे सरकारी कामकाजात कार्यरत असलेल्यांनासुद्धा प्रतिनिधित्व दिले गेले. याचा दूरगामी परिणाम असा झाला की, कोल्हापूर संस्थान व त्या अंतर्गत असलेली मुन्सिपलिटी यांनासुद्धा लोकप्रतिनिधी व सरकारी सदस्य या दोन्हीमुळे एका पातळीवर खूप मोठा प्रतिनिधित्वाचा निर्णय हा लोकशाही रुजवण्यासाठी व लोकशाहीची अंमलबजावणी करण्यासाठी महत्त्वाचा ठरला.

## ५. कार्यालयीन कामाच्या वेळेची नियमितता:

प्रशासकीय कामकाज हे निश्चित वेळेत पार पडले पाहिजे यासाठी छत्रपती राजाराम महाराज नेहमी आग्रही असत. वेळेच्या आत काम पूर्ण करणे हे आधुनिक प्रशासकीय व्यवस्थेचे महत्त्वाचे अंग आहे, याची त्यांना पुरेपूर जाणीव होती. त्यासाठी प्रशासकीय कामातील नोकरांना

प्रशिक्षित करण्याची गरज लक्षात घेऊन महाराजांनी प्रशासकीय कामकाजाचे वेळापत्रक निश्चित केले होते. एखादे काम वेळेत झाले नाही, तर महाराजांनी वेळोवेळी सदर प्रकरणातील नोकरांना दोषी ठरवून शिक्षा दिल्याची अनेक उदाहरणे आपणास दिसून येतात.

कोल्हापूर संस्थानाने प्रशासनाच्या दृष्टिकोनातून अत्याधुनिक तर असलेच पाहिजे, पण त्यासोबत प्रशासकीय कामकाजात वेळेचे महत्त्व किती आहे, हे नोकरांना कळाले पाहिजे, त्यासाठी त्यांनी अनेक वेळेस धोरणात्मक निर्णय घेतले. ठरलेल्या मुदतीच्या कालावधीमध्ये प्रशासकीय कामकाज झाले पाहिजे. कामकाज झाले नाही, तर महाराज त्यामागची कारणमिमांसा आणि त्याबाबतचा खुलासा मागवत असत. तत्कालीन परिस्थितीत प्रशासनातील नोकर नेहमीच कामाच्या बाबतीत चालढकल करत होते. आजचे काम उद्यावर करून कामाचे वेळकाढूपणा करत असत. ग्रामीण भागातील प्रशासकीय पदावरील व्यक्ती ही अत्याधुनिक व शिस्तबद्ध पद्धतीने प्रशिक्षित झालेली नव्हती. त्यांची जाणीव प्रशासनाबद्दल इतकी संवेदनशील नव्हती. प्रशासनामध्ये नोकरीला लागल्यानंतर एक प्रकारचा वेळकाढूपणा व चालढकल ही अंगात भिनलेली होती. त्याचा परिणाम कोल्हापूर संस्थानातील स्थानिक पातळीपासून ते राज्याच्या पातळीपर्यंत अतिशय मंद गतीने प्रशासन चालत असत. याचा परिणाम लोकांच्या जीवनमानावर पडत असे. सामान्य लोक न्यायाच्या, कामकाजाच्या किंवा वेगवेगळ्या मदतीसाठी जेव्हा येत असत, तेव्हा ते वेळेवर न झाल्यामुळे त्यांना एक दिवसाच्या कामासाठी दहा वेळेस किंवा त्यापेक्षा अधिकवेळा थांबावे लागे. प्रशासनाच्या कामासाठी चकरा माराव्या लागत होत्या. अशा प्रकारची दुःखद घटना व लोकांना त्रास देणारी प्रशासकीय यंत्रणा कोल्हापूर संस्थानाच्या दृष्टिकोनातून वाईट होती. त्यामुळे महाराजांनी कठोर अंमलबजावणी करून प्रशासकीय नियंत्रण कशाप्रकारे करता येईल, याची सोय कशी लावता येईल यासाठी प्रयत्न केले.

अशाच प्रकारची एक गोष्ट राजाराम महाराज यांच्या निदर्शनास आली. ती म्हणजे गडहिंग्लज पेट्यातील डॉक्टर तपासणीच्या संदर्भातील होती. राजाराम महाराजांनी या तपासणीच्या वेळेस मनाला त्रास देणारी दुःखद अशी घटना होती. पण प्रशासनामध्ये गतीशीलता आणल्याशिवाय पर्याय नव्हता. त्यामुळे महाराजांनी आदेश काढून अंमलदाराकडून

दिलेल्या मुदतीच्या आत कामकाज झाले नाही, तर त्यांचा पगार बंद करण्यात यावा, असा आदेश दिला गेला.[५] त्यासंदर्भात तीन महिन्यांच्या आत माहितीचा खुलासा झाला नाही, तर संबंधित अधिकाऱ्याच्या कामकाजावर खूप गांभीर्याने` विचार करण्यात येईल, अशा प्रकारची ताकीद देण्यात आली. सदर प्रकरणांमध्ये संबंधित अधिकारी दोषी आढळल्यास त्यांना शिक्षासुद्धा केली जावी, असा आदेश सर्व मामलेदार व अंमलदार यांच्याकडून पाठपुरावा करून अंमलबजावणी करून घेण्याचा निश्चय सुद्धा राजाराम महाराजांनी केला.

## ६. लोककेंद्री प्रशासकीय निर्णय

छत्रपती राजाराम महाराज यांनी वेगवेगळ्या पातळीवर कोल्हापूर संस्थानाचा विकास केला. त्यातही प्रामुख्याने कोल्हापूर संस्थानांमध्ये शेतीक्षेत्रासाठी पाणी उपलब्ध व्हावे या हेतूने धरणे बांधण्यासारखी बाब अतिशय महत्त्वपूर्ण होती. हे लक्षात घेऊन छत्रपती राजाराम महाराजांनी संस्थानातील विविध भागांत धरणे, रस्ते, तळे, मोठे पूल बांधून कोल्हापूर संस्थानातील शेती व शेतीपूरक व्यवसायाला गती प्राप्त करून दिली. यासाठी महाराजांना अनेक शेतकरी कुटुंबातल्या लोकांच्या जमिनी संपादित कराव्या लागल्या होत्या. जमीन संपादन करत असताना जमीन धारकाला त्याचा जमिनीचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे, याकडे महाराजांनी कटाक्षाने लक्ष दिले. सार्वजनिक हितासाठी प्रकल्प राबवताना त्या प्रकल्पामुळे कुणाचेही वैयक्तिक नुकसान होणार नाही, याची काटेकोर काळजी महाराज घेत असत.

याचेच उदाहरण करवीर येथील रामचंद्र अप्पाजी मुळे यांच्या जमिनीसंदर्भात देता येईल. पंचगंगा नदीच्या वरील भागात जागा घेतली होती. मात्र ती जागा रामचंद्र मुळे यांच्या ताब्यात दिल्यास तेथे बांधण्यात आलेल्या पुलाला धक्का बसण्याची शक्यता होती. त्यामुळे त्या जमिनीसाठी रामचंद्र मुळे यांनी दिलेले पैसे परत करण्याचा आदेश महाराजांनी दिलेला होता.[६] तत्कालीन समाज व्यवस्थेमध्ये ज्या काही भारतातील संस्थानिकांच्या इतिहासामध्ये एवढा इतका जबाबदार व पारदर्शक राजा इतिहासाने कधीच पाहिला नसेल. राजाराम महाराजांनी अशा प्रकारचा आदर्श घालून दिल्यामुळे प्रशासकीय व्यवस्था ही कुणा व्यक्तीच्या अधिपत्याखाली नसते, तर जनतेची जनतेकडून निवडली गेलेली व्यवस्था असते.

## ७. नुकसानभरपाईची तरतूद

जगभरामध्ये, भारतामध्ये अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी जबरदस्तीने हिसकावून घेण्याचा प्रयत्न केला जातो आहे. त्यांना त्याच्या शेतापासून जमिनीपासून दूर केले जाते. सध्याच्या परिस्थितीमध्ये विकासाच्या नावाखाली अनेक महत्त्वाचे प्रकल्प हाती घेतले जात आहेत. अलीकडील काळात वेगवेगळ्या विकास प्रकल्पांसाठी हजारो एकर जमीन संपादित केली जाते. अशा शेतजमिनीवर अनेक शेतकऱ्यांची उपजीविका अवलंबून असते; मात्र बऱ्याचदा संपादित केल्या जाणाऱ्या जमिनीचा योग्य मोबदला आणि त्यांचे योग्य पुनवर्सन होतेच असे नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या जमीन संपादनामुळे अनेक शेतकरी, शेतीआधारित छोटे व्यावसायिक यांची उपजीविका धोक्यात येताना दिसते. साहजिकच अशा प्रकल्पात जमिनी देण्याच्या विरोधात हा शेतकरी वर्ग दिसतो. याउलटची स्थिती छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात दिसून येते. आपले संस्थानामध्ये विकास प्रक्रिया सुरू होण्याच्या दृष्टिकोनातून विविध बांधकामे, धरणे, तलाव, रस्ते यांसाठी छत्रपती राजाराम महाराजांनाही जमिनींचे संपादन करावे लागले. पण या प्रकल्पांध्ये जाणारी शेतजमिनी जाणार असतील, तर त्यांचा योग्य आणि पुरेसा मोबदला देण्याबरोबरच त्या कुटुंबाचे योग्य पुनवर्सन करण्याचे काम त्यांनी केले. उदाहरण सांगायचे झाले, तर ''कोडोली ते पन्हाळा ते ज्योतिबा डोंगर असा नवीन रस्ता तयार करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प राजाराम महाराजांनी घेतला होता. त्या शेतकऱ्यांनी त्यासाठी आपल्या जमिनी स्वखुशीने दिल्या. पण राजाराम महाराजांनी त्वरित त्या जमिनीचा मोबदला दिला आहे.[७] छत्रपती राजाराम महाराजांनी कल्याणकारी राज्याची संकल्पना राबवली होती. कोल्हापूर संस्थानाचा विकास हा आवश्यकच आहे पण तो लोकाभिमुख व लोककेंद्री असला पाहिजे, हा राजाराम महाराजांचा आग्रह असायचा. त्यासाठी राजाराम महाराजांनी अनेक महत्त्वाच्या कल्याणकारी योजना हाती घेतल्या होत्या. शेतीचा विकास, शहरीकरण, औद्योगिक विकास, अत्याधुनिक बँक, शैक्षणिक सुविधा यासारखे अनेक महत्त्वकांक्षी प्रकल्प महाराजांनी हाती घेतले होते. त्याचा दूरगामी परिणाम कोल्हापूर संस्थानाच्या विकासामध्ये झालेला दिसतो. त्यापैकी राजाराम महाराजांनी तलाव बांधकामासाठी, धरण बांधकामाचे मोठे प्रकल्प हाती घेतले होते. त्यासाठी लागणारी जमीन शेतकऱ्यांकडून घेणे अपरिहार्य होते. कारण शेतकऱ्यांनी जमीन नाही दिली, तर रस्त्याचे बांधकाम कसे होणार, हा राजाराम महाराजांच्या पुढे अत्यंत

महत्त्वाचा प्रश्न होता. म्हणून शेतकऱ्यांनी कोल्हापूर संस्थानाच्या किंबहुना कोल्हापूरातील सर्व जनतेच्या हितासाठी जमिनी देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतलेला होता. त्यातील एक भाग म्हणून आपणास लक्षात येईल की, राजाराम महाराजांनी ज्या शेतकऱ्यांनी जमिनी कोल्हापूर संस्थानासाठी दिल्या आहेत, त्यांना योग्य तो मोबदला व त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. छत्रपती राजाराम महाराज यांचा दृष्टिकोन लोककल्याणकारी होता.

## ८. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांना शिक्षा

कायद्यापुढे सर्व समान व कायद्याचे पालन ही सर्वांची जबाबदारी या तत्त्वानुसार राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या अंतर्गत सर्व नागरिकांना कायद्याच्या दृष्टिने समान संधी देण्याच्या महत्त्वाच्या तत्त्वांची अंमलबजावणी केली होती. एखादा संस्थानिक राजा कायद्याच्या आधारे सर्वांना समान वागणूक देतो व समान संधी देतो, हे तत्कालीन परिस्थितीमध्ये खूप ऐतिहासिक व क्रांतिकारक होते. संस्थानिक म्हणजे जनमानसामध्ये अत्याचार करणारा असा समज होता. ती वस्तुस्थिती होती. संस्थानिकाचे राज्य हे राजाच्या ऐषोआरामासाठी होते. राजा म्हणेल ती पूर्व दिशा, राजाचा आदेश हा अंतिम आदेश, राजे आपल्या मर्जीनुसार आपले निर्णय घेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना राजाच्या जीवनामध्ये किंवा निर्णयांमध्ये फारसे स्थान नव्हते, ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. छत्रपती राजाराम महाराज त्यापूर्वी शाहू महाराजांनी आपल्या राज्याचा व प्रमुखपदाचा गैरफायदा कधीच घेतला नाही. उलट समाजामध्ये सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्यासाठी कशा प्रकारे प्रयत्न करता येईल, यासाठी त्यांनी प्रयत्न केला. त्यातीलच एक महत्त्वाचं म्हणजे राजा असो वा नागरिक सर्वांना कायदा समान आहे. सर्वांनी कायद्याचे पालन करणे आवश्यक आहे. कोणी कायद्याचे उल्लंघन करत असेल, तर त्यांना शिक्षा केली जाईल, असा निर्णय राजाराम महाराजांनी घेतलेला होता. त्यामुळे जनमानसांमध्ये कायद्याबद्दल आदरयुक्त भीती निर्माण झाली होती. कोल्हापूर संस्थानात सर्वांना जंगली प्राणी, जंगलाचे संपादन व संरक्षण करणे हे प्रमुख जबाबदारी होती. राजाराम महाराजांच्या काळात 'कोल्हापूर संस्थानामध्ये दोन व्यक्तींनी बळवंतराव हनुमंत देसाई आणि भीमराव आबा देसाई' हे उत्साळी महाल चंदगड ठिकाणी राहणारे होते. त्यांनी कोल्हापूर संस्थानाचा कायदा मोडला होता आणि तो कायदा म्हणजे यांनी

जंगलातील वाघ मारला होता. त्यासाठी राजाराम महाराजांनी या दोघांनाही शिक्षा केली व प्रत्येकी शंभर रुपये दंड करण्यात आला.[८]

## ९. प्रशासकीय कामात हलगर्जीपणामुळे (खाडाखोड) सस्पेंड

प्रशासन जलद गतीने चालवायचे असेल व त्यात पारदर्शकता निर्माण करायची असेल, तर कर्मचाऱ्यांनी काही नियमांचे पालन करणे अत्यंत महत्वाचे आहे. एखादे प्रशासन चांगले किंवा वाईट हे ठरवायचे असेल, तर त्या प्रशासनातील प्रशासकीय व्यक्ती कितपत जनसामान्यांशी बांधिलकी ठेवतात, यावर अवलंबून असते. आधुनिक पद्धतीचे प्रशासन व प्रशासकीय सिद्धांत यांचा मुख्य आशय हाच आहे की, प्रशासन लोकाभिमुख असले पाहिजे. त्यासोबतच प्रशासनातील व्यक्ती ही निरपेक्ष व लोकाबद्दल बांधील असली पाहिजे. राजाराम महाराजांनी या सर्व प्रशासकीय व्यवस्था व सिद्धांताचे अंमलबजावणी अठराव्या शतकामध्ये कोल्हापूर संस्थानामध्ये केली. किती दूरदृष्टी आणि प्रतिभावंत व्यक्तिमत्वाचा राजा होता हे यावरून लक्षात येते. प्रशासनामध्ये हलगर्जीपणा होता कामा नये, वेळकाढू असता कामा नये, प्रशासन पारदर्शी व भ्रष्टाचार मुक्त असले पाहिजे, हा राजाराम महाराजांचा प्रयत्न होता. एखाद्या व्यक्तीने जर अशा पद्धतीचा व्यवहार केला, तर राजाराम महाराजांनी त्या व्यक्तीला म्हणजेच प्रशासकीय सेवेतील अधिकारी नोकरांना काढून टाकण्याचा निर्णय घेतला.

एखाद्या अधिकाऱ्याने कशा प्रकारे राहणे आवश्यक आहे. प्रशासकीय नियमावली काय आहेत? प्रशासकीय पद्धती काय आहेत? या सर्वांचा नियम राजाराम महाराजांनी आपल्या कारकिर्दीमध्ये कोल्हापूर संस्थानांमध्ये घालून दिलेला होता, हे राजाराम महाराजांचे महत्त्वाचे योगदान आहे. असाच एक निर्णय राजाराम महाराजांनी घेतला होता आणि तो म्हणजे अनंत पांडुरंग सावंत ही व्यक्ती कोल्हापूर संस्थानाच्या जनरल खात्यामध्ये क्लार्क या पदावर ती होती. त्यांनी आपल्या कर्तव्याची अंमलबजावणी योग्य रीतीने न केल्यामुळे कामात खाडाखोड केल्याचा राजाराम महाराजांच्या लक्षात आले. त्यामुळे राजाराम महाराजांनी अनंत पांडुरंग सावंत यांना कामावरून सस्पेंड करण्याचा म्हणजेच काढून टाकण्याचा निर्णय घेतला गेला. या निर्णयामुळे कोल्हापूर संस्थानामध्येच नाही, तर कोल्हापूर संस्थानाच्या आसपास एक आदरयुक्त भीती निर्माण झाली.[९]

## १०. पूर्व रजा मंजुरीसाठी परवानगी

प्रशासकीय कामात गती येणे आवश्यक असेल, तर प्रशासकीय सेवेतील नोकर हा आपल्या शासकीय वेतन व कामात समाधानी असला पाहिजे. अशीच व्यक्ती भ्रष्टाचारमुक्त कामाच्या बाबतीत पारदर्शक व लोकांच्याबद्दल बांधिलकी असणारा असू शकतो. एखादा नोकर भ्रष्टाचाराला बळी का पडतो, याचे कारण त्यांच्या वेतनात असलेली तफावत, त्याला मिळणारे वेतन व त्यांच्या उपजीविकेचा खर्च यामध्ये जर तफावत निर्माण झाली, तर ती गरज पूर्ण करण्यासाठी तो भ्रष्टाचाराचे किंवा चुकीचे मार्ग अवलंबतो. त्याचा परिणाम प्रशासकीय कामावर पडतोच; पण त्यासोबतच प्रशासकीय व्यवहार हे पूर्णता भ्रष्ट व वेळकाढूपणाचे ठरतात. त्यासाठी कामाच्या वेळीची अनिश्चितता व त्याला मिळणाऱ्या सुविधा प्राप्त झालेल्या पाहिजेत; तरच तो कामांमध्ये पूर्ण लक्ष देऊन काम करू शकतो. राजाराम महाराजांनी या संकल्पनेची आपल्या संस्थानामध्ये आपल्या काळात अंमलबजावणी केली होती.

कोल्हापूर संस्थानातील प्रशासकीय नोकरांना वेतन वेळेवर उपलब्ध करून दिले पाहिजे. हा राजाराम महाराजांचा निर्णय होता. त्यासोबतच ते वेतन विशिष्ट एका खर्चापेक्षा जास्त असले पाहिजे, यासाठी सुद्धा राजाराम महाराजांनी महत्त्वाचे प्रयत्न केले. त्यातीलच एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना दोन प्रकारच्या रजा मान्य केल्या होत्या. एक रजा किरकोळ होती व दुसरी हक्काची रजा अशा दोन प्रकारच्या रजा होत्या. राजाराम महाराजांनी या दोन्ही रजांच्या माध्यमातून शासकीय नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना या दोन्ही रजा घेणे शक्य होते. तत्कालीन परिस्थितीत किरकोळ रजा व हक्काची रजा याचा अनेकदा आपल्या सोयीने कर्मचारी फायदा घेत होते. त्याचा दूरगामी परिणाम कोल्हापूर संस्थानाच्या प्रशासनावर पडत होता. अनेक महत्त्वाची कामे अधिकाऱ्यांच्या रजेमुळे पूर्ण होणे शक्य नव्हते. ही गांभीर्याची बाब लक्षात घेऊन राजाराम महाराजांनी दोन्ही रजा आपल्या परवानगीशिवाय घेता येणार नाही, असा आदेश दिला. असा आदेश देऊन राजाराम महाराजांनी एक प्रकारे प्रशासनात गतिमानता प्राप्त करून देण्यात महत्त्वाचा निर्णय घेतला.

## ११. सरकारी मालमत्तेच्या अफरातफरीबद्दल शिक्षा नुकसान भरपाई

कोल्हापूर संस्थान हे स्वायत्त संस्थान होते. या स्वायत्ततेच्या माध्यमातून कोल्हापूर संस्थानाचा प्रमुख म्हणजे छत्रपतींना आपल्या इच्छेप्रमाणे राज्यकारभार करण्याची संधी होती; पण ती संधी नाकारून राजर्षी शाहू महाराजांनी आणि त्यांच्यानंतर राजाराम महाराजांनी लोकांचे संस्थान, लोकांची संपत्ती, सार्वजनिक संपत्ती अशा पद्धतीची संकल्पना राबविली. कोल्हापूर संस्थान हे लोकांच्या दृष्टिकोनातून एक खाजगी संस्थान नव्हते, तर ते लोकांचे संस्थान होते. लोक त्या संस्थानामध्ये आपली संपत्ती, आपले संस्थान अशाच पद्धतीचा व्यवहार करत. ही भावना रुजवण्यात राजर्षी शाहू महाराज व राजाराम महाराजांना यश आलेले होते. त्यातील एक महत्त्वाचे म्हणजे कोल्हापूर संस्थानातील सर्व मालमत्ता ही सार्वजनिक आहे. कोल्हापुरातील शेती, पाणी, धरण औद्योगिक विकास, शैक्षणिक विकास हा लोकांच्या हितासाठी केला जात आहे, ही धारणा घेऊनच कोल्हापूर संस्थानाचा विकास झालेला होता. प्रशासकीय कामातील सर्व कर्मचाऱ्यांमध्ये ही भावना विकसित व्हावी म्हणून राजाराम महाराजांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. कोल्हापुरातील सरकारी नोकरांनी 'सरकारी मालमत्ता' ही सार्वजनिक संपत्ती म्हणूनच त्याची जपणूक करावी व त्यांचे संवर्धन करावे ही त्यामागची भावना होती. कोल्हापुरातील कोल्हापूर संस्थानातील कोणताही सरकारी नोकर जर चुकीच्या पद्धतीचा व्यवहार करत असेल, तर शिक्षा दिली जात होती. असाच एक व्यवहार ''मौजे बालींगे पेटा करवीर पाटलाने भाड्याची रक्कम देवबा येसबा पोवार, राहणार पिराची वाडी यांनी भरलेली होती. ती जमा केली नव्हती व ती रक्कम पाटलांनी स्वतःच्या हितासाठी वापरली होती. ही बाब राजाराम महाराज यांच्या लक्षात आली होती. त्यामुळे राजाराम महाराजांनी या पाटलांना कामावरून काढून टाकण्याचा व रकमेच्या तिप्पट दंड भरण्याची शिक्षा केली होती.''[१०] त्यामुळे कोल्हापूर संस्थानातील सरकारी भ्रष्टाचार किंवा आर्थिक अफरातफर ही सरकारी कर्मचाऱ्यांसाठी खूप मोठे आव्हान होते. अशा प्रकारचा व्यवहार दिसला असल्यास त्याला कामावरून काढून टाकले गेले, अशी शिक्षा झाली. या निर्णयामुळे कोल्हापूर संस्थानामधील कोणताही शासकीय पदावरील अधिकारी व कर्मचारी जनतेच्या पैशाचा गैरव्यवहार किंवा अफरातफरी करत नसत. उलट या निर्णयाचा एक सकारात्मक परिणाम असा झाला की, प्रशासकीय व्यवस्थेत पारदर्शकता व लोकाभिमुख प्रशासन आले. प्रशासनाच्या या

निर्णयामुळे गतिमानता प्राप्त झाली. कोणताही सरकारी अधिकारी भ्रष्टाचार न करता पारदर्शक प्रशासन या संकल्पनेचा विस्तार करत होता.

## १२. गायरानातील झाडे तोडणाऱ्यांना शिक्षा

प्रत्येक नागरिकांनी सार्वजनिक मालमत्तेबद्दल सजग असले पाहिजे. सार्वजनिक मालमत्तेचे संवर्धन करण्याची मुख्य जबाबदारी कोल्हापूर संस्थानातील नागरिकांची आहे, अलिखित नियम राजाराम महाराजांनी केला होता. या माध्यमातून कोल्हापूर संस्थानातील नागरिकांना सार्वजनिक मालमत्ता संवर्धन केली पाहिजे व त्यासोबतच कोल्हापुरातील सार्वजनिक संपत्तीत वाढ आणि विस्तार केला पाहिजे, ही राजाराम महाराजांची मनोभूमिका होती. या भूमिकेला काही प्रमाणात यश आले. पण अपयशाच्या पातळीवर सुद्धा अशा अनेक घडामोडी घडत होत्या, त्या अपयशावर प्रतिबंध आणण्यासाठी व कोल्हापूर संस्थानातील नागरिकांमध्ये प्रशासकीय शिस्त लागण्यासाठी महाराजांनी खूप कठोर निर्णय घेतले होते. कोल्हापूर संस्थानामध्ये ग्रामीण भागात राहणारी जनता निरक्षर होती. शिक्षणाचे प्रमाण फारसे नव्हते. शाहू महाराज यांच्या प्रयत्नामुळे अनेकांना पुढे जाण्याची संधी प्राप्त झाली; पण सर्वांनाच झाली नाही. याचे तत्कालीन कारण म्हणजे राजर्षी शाहू महाराजांचे अत्यल्प काळात झालेले निधन. ही सर्व जबाबदारी राजाराम महाराजांनी घेतली. त्यामुळे राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील नागरिकांनासुद्धा प्रशासकीय शिस्तीचे व सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या जबाबदारीचे भान आले पाहिजे, नागरिकांनीसुद्धा आपल्या कर्तव्याप्रती प्रामाणिक राहिले पाहिजे, अशी त्यामागची भूमिका होती. त्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्नसुद्धा केले. कोल्हापूर संस्थानात गायरान जमिनी, झाडे होती. ती एक सार्वजनिक संपत्ती होती. कोल्हापूर संस्थानाला गायरान जमिनीच्या पिकामुळे व झाडामुळे अनेक वेगवेगळ्या प्रकारचे उत्पन्न मिळत असे. ते उत्पन्न हे कोल्हापूर संस्थानातील दलित बहुजन, समाजावर खर्च केले जात होते. नीलकंठ बचाराम देसाई यांनी वाटंगी गडहिंग्लज येथील गायरानातील झाडे तोडली होती. कोल्हापूर संस्थानातील कोणत्याही अधिकाऱ्यांची व प्रशासकीय पातळीवरील कोणत्याही प्रकारची परवानगी घेतली नव्हती. त्यामुळे राजाराम महाराजांना ही बाब लक्षात आली व त्यांनी लगेच तोडलेली झाडे जप्त करून निळकंठ देसाई यांच्याकडून दोनशे रुपये किंमत वसूल

केली.[११] या निर्णयामुळे कोल्हापूर संस्थानमध्ये गायरान जमिनीच्या पिकावरती मालमत्ता हक्क सांगणे बंद झाले. त्यासोबतच गायरान ही सरकारची मालमत्ता आहे. म्हणजेच कोल्हापूर संस्थानाची मालमत्ता आहे. ती कोणतीही व्यक्ती व संस्था अतिक्रमण करू शकत नाही, अशी एक भावना या धोरणामुळे निर्माण झाली.

## १३. सार्वजनिक सुरक्षिततेसाठी प्राधान्य

राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानमध्ये शिक्षणाचा विस्तार केला. सर्व दलित आणि बहुजन समाजातील लोकांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. औद्योगिक विकास केला. शेतीचा विकास केला. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे धरणे बांधली. जातिव्यवस्थेच्या वेढ्यातून बाहेर काढले व आधुनिक विचाराचे व व्यवहाराचे राज्य म्हणून कोल्हापूर संस्थान नावारूपाला आले. त्याच्या पुढचा टप्पा म्हणून राजाराम महाराजांनी प्रशासनातील गतिमानता प्राप्त करण्यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. कोल्हापूर संस्थानातील नागरिकांमध्ये सार्वजनिक सुव्यवस्था विशेषत: वाहतूकव्यवस्था याबद्दलची उदासीनता आहे. जनमानसांमध्ये अत्याधुनिक वाहन आणि तंत्रज्ञान यांच्याबद्दलच्या प्रबोधनाच्या जागृतीचा अभाव होता. त्यामुळे कोल्हापूर संस्थानातील नागरिकांमध्ये सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसारख्या सुविधेविषयी उदासिनता होती. त्याचबरोबर या वाहनाद्वारे होणाऱ्या अपघातामध्येसुद्धा वेगवेगळ्या कारणांचा शोध होता. त्यापैकी पहिले म्हणजे वाहन चालवणारा वाहक हा प्रशिक्षित नव्हता. त्याचबरोबर वाहन कुणी चालवावे याचा परवाना देणारी अत्याधुनिक लायसनची सुविधा उपलब्ध नव्हती. त्यामुळे वाहन चालवताना अपघात घडण्याची सर्वाधिक शक्यता होती. त्या ठिकाणी वाहतूक कशी करायची, हा प्रश्न होता. वाहतूक करण्यासाठी सुविधा उपलब्ध होत नव्हत्या. राजाराम महाराजांनी आपल्या एक महत्त्वाच्या शहरातल्या मुख्य वस्त्यांमध्ये जो व्यक्ती वाहन चालवत आहे. त्या व्यक्तींना वाहनाचा वेग व गती निश्चित करण्यासाठी नियमावली तयार केली. तो वाहन चालवताना व अपघात टाळण्यासाठीच्या ज्या काही पूर्व काळजी घेणे आवश्यक आहे. यासाठी महाराजांनी धोरण तयार केले. हे धोरण वाहन चालकांसाठी व प्रवाशांसाठी आवश्यक होते.[१२] सार्वजनिक सुरक्षितता आणि मोटार वाहन चालविण्याचा परवाना देण्यासाठी त्यांनी काही महत्त्वाचे निर्णय घेतले. परवाना देण्याचा अधिकार सुरुवातीच्या काळात मेकॅनिकल इंजिनिअर

यांच्याकडे सोपवण्यात आला होता. मात्र नंतरच्या काळात तो अधिकार त्यांनी मेकॅनिकल इंजिनिअर व स्टेट गॅरेज सुपरिटेंडेंट यांना दिला. त्यामुळे वाहन चालकाचा परवाना मिळणे, वाहनावर नियंत्रण ठेवणे हे अतिशय सोपे गेले. वाहन चालकांना आवश्यक त्या सूचना देणे हे सुद्धा काम खूप सोपे झाले. राजाराम महाराजांच्या या धोरणामुळे कोल्हापूर संस्थानमध्ये प्रशिक्षित वाहनचालक निर्माण झाले. त्यासोबतच वाहनचालकावर नियंत्रण ठेवणे सोपे गेले. त्यांच्या क्षमता ओळखूनच वाहन चालकाला परवाना देणे हे कोल्हापूर संस्थानांमध्ये खूप सोप्या पद्धतीने केले व प्रशासनात होणारे अपघात टाळण्यासाठी खूप महत्त्वाची मदत या धोरणामुळे झाली.

## १४. लाच लुचपत प्रतिबंधक धोरण

छत्रपती राजाराम महाराजांच्या प्रशासनामध्ये भ्रष्टाचाराला अजिबात स्थान नव्हते. प्रशासनामध्ये भ्रष्टाचार होऊ नये, यासाठी राजाराम महाराजांनी खूप प्रयत्न केले. छत्रपती राजाराम महाराजांना माहीत होते की, आपले राज्य लोककल्याणकारी राज्य आहे. लोकांच्या हितासाठी लोकांच्या कल्याणासाठी आपले प्रशासन हे प्राधान्याने विचार करेल. याचाच विचार करून राजाराम महाराजांनी आपल्या प्रशासनामध्ये होणाऱ्या भ्रष्टाचारावर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न केला. आज आपण प्रशासनामध्ये शासकीय योजनेच्या पातळीवर खूप मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होताना पाहतो. राजाराम महाराज इतके दूरदृष्टीचे नेते होते की, प्रशासनामध्ये भ्रष्टाचार होता कामा नये यासाठी त्यांनी व्यक्तिगत लक्ष दिले. प्रत्येक कर्मचारी हा लोकांबाबत संवेदनशील आहे का? याचा विचार गांभीर्याने केला. त्यामुळे राजाराम महाराजांच्या प्रशासनामध्ये भ्रष्टाचाराला वाव नव्हता. एका बाजूला लोकांच्या हितासाठी धोरणाचा विचार करायचा आणि त्या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी रात्रंदिवस मेहनत घ्यायची. प्रशासकीय पातळीवर कोणताही एखादा अधिकारी भ्रष्ट वागत असेल किंवा लोकांकडून लाच घेऊन कामे करत असेल, हे टाळण्यासाठी राजाराम महाराजांनी भ्रष्टाचाराच्या विरोधामध्ये उघडपणे मोहीम राबवली होती. राजाराम महाराजांना माहीत होते की, कोल्हापूर संस्थान हे सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या समता प्रस्थापित करणारे आहे. एखादा भ्रष्ट अधिकारी भ्रष्ट कारभार करून या तत्त्वाला हरताळ फासत असेल, तर हे राजाराम महाराजांनी कदापि सहन

केलेले नाही. अशाच एका प्रकरणामध्ये संस्थानातील एका ''सब-रजिस्टारने आणि क्लार्कने लाच घेतल्याचे राजाराम महाराजांच्या निदर्शनास आले. राजाराम महाराजांनी त्या व्यक्तींना कामावरून बडतर्फ कडून प्रशासन स्वच्छ आणि पारदर्शक करण्याचा उत्तम आदर्श कोल्हापूर संस्थानामध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न केला, हे त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे.[१३] केवळ बडतर्फ करून भागणार नाही, तर त्या व्यक्तीवर ती कायदेशीर कारवाई करण्याचा आदेश होता. न्यायालयीन प्रकरणांमध्ये या विषयाला घेऊन संबंधित प्रशासनाबाबत एक पारदर्शक आदर्श घालून देण्याचा प्रयत्न राजाराम महाराजांनी त्या काळामध्ये केलेला होता.

## १५. शासकीय कामात वेळकाढूपणाला शिक्षा

कोल्हापूर संस्थानात शाहू महाराजांच्या पूर्वीपासून निरक्षरता व विषमता होती. ग्रामीण भागामधील आदिवासी, दलित, बहुजन समाजामध्ये मोठ्या प्रमाणात निरक्षरतेचे प्रमाण होते. त्यामुळे त्याचे कमी-अधिक प्रभाव राज्याच्या विकासावर पडत होता. त्याला पहिल्यांदा छेद राजर्षी शाहू महाराजांनी दिला. कोल्हापूर संस्थान प्रशासन गतिमान करण्यासाठी शिक्षण हे अत्यंत आवश्यक आहे ही बाब लक्षात ठेवून सर्वांना शिक्षणाची संधी उपलब्ध करुन दिली. इतकेच नाही, तर बहुजन-दलित समुदायातील शैक्षणिक सुविधा स्कॉलरशिप किंवा आरक्षणासारख्या महत्त्वाचा क्रांतिकारी प्रकल्प शाहू महाराजांनी व त्यानंतर राजाराम महाराजांनी हाती घेतल्यानंतर दलित-बहुजन मुलं-मुली प्रशासनामध्ये येऊ लागले. शासनाचा कोणताही अनुभव पाठीशी नसताना प्रशासकीय सेवेमध्ये येणे व प्रशासकीय गतिमानता प्राप्त होणे यामध्ये तफावत होती. वेळोवेळी राजर्षी शाहू महाराजांनी प्रत्यक्ष भेटी देऊन दूर करण्याचा प्रयत्न केला. पण त्यानंतर राजाराम महाराजांनी गतिमानता आणण्यासाठी अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प घेतले. त्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी आणि त्यानंतर राजाराम महाराजांनी प्रशासनातील गतिशीलता निर्माण होण्यासाठी खूप महत्त्वाचे प्रकल्प हाती घेतले. त्यातीलच हा प्रकल्प म्हणजे वेळेचे नियोजन व वेळेच्या पद्धतीने काम होणे हे प्रशासनाचे पहिले व गतिमान प्रशासनाची पूर्वअट असल्याची भूमिका राजाराम महाराजांनी वेळोवेळी घेतली. त्यामुळे कोणतेही काम वेळेच्या आत होणे हे सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना बंधनकारक होते. कोल्हापूर संस्थानातील एखाद्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्याने कामाच्या बाबतीत वेळखाऊपणाचे धोरण घेतले, तर

त्याला अशा प्रकारची शिक्षा केली जात असल्याचे महत्त्वाचे धोरण राजाराम महाराजांनी घेतले. मात्र गावकामगार आणि तलाठी सारखा ग्रामपातळीवरील सरकारी कर्मचारी वर्गाकडूनप्रशासकीय कामे वेळेच्या आत न होणे व वेळेच्या कामाबाबत हलगर्जीपणा निर्माण होणे यांसारखे गैरवर्तन होत असे. याला आळा घालण्यासाठी छत्रपती राजाराम महाराजांनी कामगार व तलाठी यांना दोन रुपये दंड भरण्याचा आदेश त्या काळामध्ये दिलेला होता.''[१४] याचा परिणाम सकारात्मक दृष्टिकोनातून कोल्हापूर संस्थानातील सर्व तलाठी, पाटील व मामलेदार व इतर महत्त्वाच्या शासकीय पदावर असणाऱ्या नोकरांवर झाला. कोणतेही काम वेळेत शिस्तबद्ध व नियोजनबद्ध करण्याचा प्रयत्न राजाराम महाराजांच्या काळामध्ये झाल्याचे दिसते.

## १६. आर्थिक काटकसरीला प्राधान्य

प्रशासन गतीमान होण्याच्या दृष्टिकोनातून छत्रपती राजाराम महाराजांनी घेतलेले एक महत्त्वाचे धोरण म्हणजे आर्थिक काटकसरीला प्राधान्य. प्रशासकीय स्तरावरील आर्थिक उधळपट्टीला पायबंद घालण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी शाहू महाराजांच्या काळात म्हणजेच शाहू महाराज सत्तेची सूत्रे हाती घेण्यापूर्वी प्रशासकीय, आर्थिक उधळपट्टी खूप मोठ्या प्रमाणात चालत होत, त्याला पायबंद घालण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी खूप महत्त्वाचे धोरण आखलेले होते. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाचे सूत्रे हाती घेतल्यानंतर अवघ्या १२ दिवसांमध्ये लोककल्याणकारी धोरणाची अंमलबजावणी करण्यास सुरुवात करतात.

१. गहू, तांदूळ, ज्वारी, डाळी वगैरे, साखर, मसाला, अशी विविध सामुग्री खुद्द हुजूरचे मुदपाकखाण्याकडे स्वारीच्या लोकांकरिता लागेल ती यथाशक्य सर्व कोल्हापूरहून खाजगी खात्याकडून नेण्यात यावी.

२. बकरी, कोंबडी, अंडी हे जिन्नस घेण्याकरिता स्वारी निघण्याचे अगोदर खासगी कडील मुद्दाम एक कामगार पाठविण्यात यावा. त्याचे मुक्कामाचे ठिकाण नजदीक जो बाजारगाव असेल, त्या गावी बाजाराच्या दिवशी जाऊन सर्व जिन्नस मालकास रोख पैसे जेव्हा, जेव्हा तिथल्या तिथे देऊन घ्यावी. सर्पनाबद्दल त्याचप्रमाणे आगाऊ तजवीज करावी. सामानाच्या पैशाचा बटवडा करणे. तो त्यावेळी मुलकी कामगार गावी हजर असल्यास त्याच्या समोर पैसा अदा करून

त्याची सही घ्यावी. तसा कोणी नसल्यास गावकामगार पाटील, कुलकर्णी यांचे समक्ष पैसे अदा करून मालकाची पावती घ्यावी व कामगारांची साक्ष घ्यावी.

३. दुधाबद्दल खाजगी थट्टापैकी म्हशी स्वारीबरोबर नेण्याची तजवीज ठेवावी. कदाचित ही तजवीज खाजगी खात्याकडील वर नमूद केलेले कामगारांनी किंवा कारकुनाने नजीकच्या गावाचे इसमाकडून स्वतः दूध घेऊन मालकास गावी भाव असेल त्याप्रमाणे ताबडतोब जेथल्या तेथे सर्व पैसे चूकवून द्यावा. स्वारीचा कूच होईपर्यंत ठेवू नये.

४. गवत, सरकारी कुरणे, कोणे बहुतांश सर्व पेट्या निहाय आहेत. सबब लोकांकडून हे जिन्नस घेण्याचे कारण नाहीच. कदाचित प्रसंगोपात खरेदी करावा लागल्यास रोख पैसा मालकास जेव्हा चे तेव्हा देऊन घ्यावा.[१५] राजर्षी शाहू महाराजांचा वारसा राजाराम महाराजांनी पुढे चालवला. अशा प्रशासकीय कामात स्थानिक पातळीपासून ते वरच्या अधिकाऱ्यापर्यंत आर्थिक काटकसरीचा हा प्रशासनाचा महत्त्वाचा निकष व नियम मानला गेला. हाच वारसा पुढे चालवत राजाराम महाराजांनी सुद्धा प्रशासकीय दृष्टिकोनातून अनेक अनावश्यक खर्चावरती प्रतिबंध करून प्रशासनाच्या पातळीवर आर्थिक काटकसरीचे महत्त्वाचे धोरण स्वीकारले. राजाराम महाराजांचे हे धोरण सार्वजनिक हितासाठी व सार्वजनिक धोरणावर अधिक खर्च करण्यावर भर होता. राजाराम महाराजांना लोकहितासाठी सर्वाधिक निधी खर्च झाला पाहिजे. लोकांच्या विकासाला प्राथमिकता दिली पाहिजे ही त्यांची महत्त्वाची भूमिका होती. त्यामुळे राजाराम महाराजांनी लोककल्याणकारी प्रशासनामध्ये लोकांच्या हितासाठी म्हणजेच लोकांच्या कल्याणासाठी प्राधान्य देऊन तो निधी सर्वाधिक खर्च करण्याचा हा प्रयत्न होता. कोल्हापूर संस्थानातील प्रशासकीय व्यक्ती किंवा अधिकारी यांचा एकूण खर्च यावर पायबंद घालण्यासाठी ''कोल्हापूर संस्थानातील अधिकाऱ्याला रेल्वेचे एकूण प्रवासामध्ये जो कोल्हापूर संस्थानाकडून मिळणारा निधी कमी करण्यात आला. अधिकाऱ्याचा प्रवासखर्च कोल्हापूर संस्थान करेल पण तो संबंधित अधिकाऱ्याचा प्रथम वर्गाकरता देण्यात येणारा प्रवासखर्च होता तो अधिकाऱ्याला दुय्यम किंवा दुसऱ्या वर्गाकरिता खर्च करण्यात परवानगी देण्यात आली.[१६] यामुळे कोल्हापूर संस्थानामधील अनेक प्रशासकीय अनावश्यक खर्चावर पायबंद घातला गेला. व तो निधी जनमानसाच्या कष्टकऱ्यांच्या विकासासाठी व उन्नतीसाठी खर्च करण्यात आला.

## १७. प्रशासकीय कामात सुधारणा व पारदर्शकता

प्रामाणिक आणि कष्टाळू कर्मचारांप्रती छत्रपतीची राजाराम महाराजांची भूमिका नेहमीच न्यायपूर्ण राहिली आहे. तो मग स्थानिक पातळीवरील कर्मचारी असो की वरिष्ट पातळीवरील कर्मचारी, त्याचे योग्यवेळी कौतुक तर करतच; वेतनामध्ये वाढ करणे; वरच्या पदावर बढती देणे यांसारख्या महत्त्वाची धोरणे घेऊन त्यांना त्यांच्या कामासाठी प्रोत्साहन देत. प्रशासनात कार्यरत असलेल्या प्रामाणिक कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या वेळी आर्थिक मदत करण्यासारख्या राजाराम महाराजांच्या धोरणांमुळे प्रशासकीय अधिकारी–कर्मचारी वर्गात चैतन्याचे वातावरण राहात असे. आपण प्रामाणिक काम केले तर आपल्याला नक्कीच पदोन्नतीसारख्या बाबीतून आपल्या कार्याची दखल घेतली जाणार याचा अधिकारी–कर्मचारी वर्गामध्ये विश्वास निर्माण झालेला होता. साहजिकच त्यांचे पूर्ण लक्ष आणि वेळ प्रशासकीय कामांमध्ये प्रामाणिकपणे सचोटीने खर्च करणे यात जात असल्याची स्थिती निर्माण झालेली होती. कोणता कर्मचारी प्रामाणिक आहे याची राजाराम महाराजांना पूर्णपणे जाणीव असे, कारण प्रत्येक कर्मचाऱ्यांकडे त्यांचे बारकाईने लक्ष असेत्यापैकी एक म्हणजे कोंडी लक्ष्मण चव्हाण यांना निवृत्तीवेतन देऊन सेवानिवृत्त करणे आणि त्यांच्या जागी अनुकंपा पद्धतीने त्यांचा नातू गोपाळा दत्तू चव्हाण यांची निवड करणे. कोंडी लक्ष्मण चव्हाण यांनी कोल्हापूर संस्थानाच्या राजदरबारात शिपाई म्हणून १९१७ पासून प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठ राहून सेवा केली. मात्र वार्धक्यामुळे त्यांना काम होत नसल्याने महाराजांनी त्यांना सात रुपये निवृत्तीवेतन देऊन त्यांना सेवानिवृत्त केले आणि त्यांच्या जागी त्यांचा गोपाळा दत्तू चव्हाण यांची निवड केली.[१७] इतकेच नाही तर त्यासोबत त्यांच्या निवृत्ती वेतनात वाढ करणे, त्यांना निवृत्ती वेतन वेळेवर मिळणे व त्यासोबतच एखादी प्रामाणिक व कष्टाळू व्यक्ती निवृत्त होते, तेव्हा त्यांच्या जागेवर त्यांच्या रक्तातील नातेवाईक एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीला महत्त्वाच्या पदावर घेण्याचे धोरण राजाराम महाराज यांनी घेतले. राजाराम महाराज किती दूरदृष्टीचे होते, हे आपणास लक्षात येते. आज प्रशासनामध्ये अनुकंपा किंवा पदोन्नती दिली जाते; पण एकोणिसाव्या शतकामध्ये राजाराम महाराजांनी ही संकल्पना कोल्हापूर संस्थानांमध्ये लागू केली होती. त्याचा परिणाम खूप व्यापक अर्थाने स्वातंत्र्यानंतरच्या प्रत्येक देशातल्या राज्यांमध्ये धोरण निर्मितीमध्ये या धोरणाचा एक आदर्श म्हणून घेण्यात आला.

## १८. कार्यालयीन वेळेच्या शिस्तीला प्राधान्य

प्रशासकीय कामांमध्ये हलगर्जी होता कामा नये. प्रशासन हे अत्यंत गतिमान व पारदर्शी असले पाहिजे. यासाठी राजाराम महाराजांनी नेहमीच प्रयत्न केले. यात राजाराम महाराज स्वतःहून लक्ष घालत होते. दुसरा एखादा शासकीय अधिकारी किंवा नागरिक यांच्या सांगण्यावर आपले मत बनवत नसत. त्यामुळे प्रत्यक्ष जाऊन राजाराम महाराजांच्या अनुभवाच्या आधारे ते प्रशासकीय निर्णय घेत असत. त्यातीलच हा एक प्रशासकीय निर्णय होता. राजाराम महाराजांनी प्रशासन गतीमान करण्यासाठी कोल्हापूर संस्थानातील कर्मचाऱ्यांना वेळेवर उपस्थित राहणे, वेळेचे नियम पाळणे यासाठी अनेक धोरणांची निर्मिती केली. प्रामुख्याने अशा धोरणामुळे कर्मचाऱ्यांत एक प्रकारे आदरयुक्त भीती निर्माण होऊन, कार्यालयीन वेळ आणि वेळेची शिस्त याची अंमलबजावणी केली. कार्यालयीन कर्मचारी वेळेवर उपस्थित राहतात का यासाठी टेलिफोनच्या आधारे तपासणी व पुनर्तपासणी केले जाई. जर कर्मचारी त्याच्या वेळेत कार्यालयामध्ये उपस्थित नसेल, तेव्हा त्यांच्यावर दंड आकारला जात असे. यामुळे कर्मचारी कार्यालयीन कामाच्या आणि वेळेच्या बाबतीत अतिशय जागरूक व सजग राहत असत. राजाराम महाराज प्रशासनाच्या बाबतीत आधुनिक होते. कार्यालयीन वेळेचे व्यवस्थापन योग्य रीतीने झाले पाहिजे. कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन वेळेचे नियम पाळणे आवश्यक आहे, यावर त्यांचा भर असे. ''कोल्हापूर संस्थानात कोल्हापूर संस्थानातील कोणताही शासकीय अधिकारी किंवा कर्मचारी हा कार्यालयीन वेळेची नियम योग्य रीतीने अंमलबजावणी केली नाही, तर त्यासाठी वीस रुपये दंड शिक्षा आकारण्याचा निर्णय राजाराम महाराज यांनी घेतला होता.''[१८] कोल्हापूर संस्थान राजाराम महाराजांच्या या आधुनिक आणि वेळेच्या व्यवस्थापनाबाबत अतिशय काटेकोरपणे अंमलबजावणी करत असे. कर्मचाऱ्यांना वेळेची शिस्त लागली पाहिजे. वेळेच्या व्यवस्थापनाचा कोल्हापूर संस्थानातील नागरिकांना फायदा होतो. नागरिकसुद्धा वेळेच्या आत आपल्या कामाची अपेक्षा करतात. ती अपेक्षा पूर्ण झाली पाहिजे. त्यासाठी कोल्हापूर संस्थान व त्यांचे प्रशासन हे जबाबदार आहे, हे लक्षात घेऊन राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या प्रशासनाची बांधणी केली होती. अशा प्रकारच्या कार्यालयीन वेळेच्या व्यवस्थापनामुळे कोल्हापूर संस्थानात प्रशासकीय व्यवस्था आधुनिक तत्त्वाच्या आधारे निर्माण करण्यात राजाराम महाराजांचे खूप मोठे योगदान आहे. प्रशासकीय पारदर्शकता व वेळेचे

व्यवस्थापन हे राजाराम महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेचे अंगभूत तत्त्व होते. त्या आधारेच कोल्हापूर संस्थान हे खूप गतिशील व व्यापक करण्यात राजाराम महाराजांचे ऐतिहासिक योगदान राहिले.

## १९. आधुनिक अर्ज नमुन्याची सुरुवात

प्रशासकीय पारदर्शकता हे राजाराम महाराजांच्या राज्यकारभाराचे एक मूलभूत वैशिष्ट्य होते. लोकांना त्यांना आवश्यक त्या कागदपत्रांच्या नकला उपलब्ध करून दिल्या पाहिजेत, त्यासाठी त्यांनी अनेक महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेतले. लोकांना माहिती मिळवणे हा त्यांचा मूलभूत हक्क आहे हे लक्षात घेऊन आवश्यक ती माहिती गरजूंना देण्याचा निर्णय त्यांनी घेतला. राजाराम महाराजांनी रेकॉर्ड सिस्टीममध्ये अनेक महत्त्वाच्या सुधारणा केल्या. त्यातीलच एक सुधारणा म्हणजे कोल्हापूर संस्थानातील नागरिक नकला मागण्यासाठी अर्ज देतात. तो अर्ज मूलत : अपूर्ण असतो किंवा अस्पष्ट असतो. यामुळे प्रशासकीय यंत्रणेला त्या अर्जाचा फारशा प्रमाणात उपयोग होत नाही. त्याचा परिणाम उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या नकला लोकांना वेळेवर उपलब्ध करून देता येत नव्हत्या. त्यासाठी राजाराम महाराजांनी अर्जदाराच्या अपूर्ण माहितीचा विचार केला जाऊ नये, असा एक निर्णय घेऊन ''कोल्हापूर प्रशासनामध्ये अर्जदाराला उपलब्ध होईल, तो अर्ज कोल्हापूर प्रशासन छापील स्वरूपात उपलब्ध करून देईल असा त्यांनी निर्णय घेतला.'' त्यामुळे सामान्यातल्या सामान्य माणसाला अर्जाबद्दल किंवा कसा लिहिला गेला पाहिजे, त्याची माहिती कशी मिळवली पाहिजे, याबद्दलच्या येणाऱ्या अडचणी प्रशासनाला सामोरे जावे लागत असे. ती अडचण छापील अर्जाचा नमुन्याद्वारे दूर झाली. आवश्यक ती माहिती उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी म्हणून महाराजांनी निश्चित केलेल्या छापील अर्जामध्ये अर्जदाराचा पूर्ण पत्ता, कामाची माहिती असा वगैरे सर्व बाबीचा समावेश करून अर्ज नमुना तयार करण्यात आला. छापील अर्ज हा मराठी भाषेत असावा हा महाराजांचा आग्रह होता व त्यासोबतच कागदाचा रंग शक्यतो भगवा असावा, असे महाराजांनी निश्चित केले, त्यामुळे सामान्यातल्या सामान्य माणसाला आपल्या मातृभाषेमध्ये अर्ज व अर्जावरील समावेश घटक याआधारे नकला उपलब्ध करून देण्यासाठी खूप सोपी

पद्धत झाली.[१९] याचा सकारात्मक परिणाम असा झाला की या अर्जाचे नमुन्यामुळे अर्जदारांमध्ये कोणत्याही प्रकारची भीती किंवा असुरक्षितता निर्माण होण्यास संधीच उपलब्ध नव्हती.

## २०. प्रशासकीय कार्याचे विकेंद्रीकरण

कोल्हापूर संस्थानाला ब्रिटिशपूर्व राजवटीत व ब्रिटिश राजवटीत पूर्णतः स्वायत्तता होती. किंबहुना भारतातील सर्व संस्थानामध्ये संस्थानिकांची सत्ता ही अंतिम होती. त्यामुळे संस्थानातील प्रमुख कोणती दिशा निश्चित करायची व कोणत्या मार्गाने जायचे, याचे पूर्ण स्वातंत्र्य होते. स्वातंत्र्याचा गैरफायदा भारतातील सर्व संस्थानिकांनी घेतला होता. अपवाद होते फक्त बडोद्याचे सयाजीराव गायकवाड व कोल्हापूरचे राजर्षी शाहू महाराज. राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थान व कोल्हापूर संस्थानातील सर्व कष्टकरी शोषित वंचित समुदायासाठी या सत्तेचा वापर केला. किंबहुना आधुनिक विचारांची आणि आधुनिक संस्थात्मक रचनेची निर्मिती करून लोकशाहीचा पाया घातला. तीच परंपरा पुढे चालवत राजाराम महाराजांनी सुद्धा कोल्हापूर संस्थान जगातल्या लोकशाही देशांमध्ये एक आदर्श निर्माण होईल. अशा प्रकारचे प्रारूप विकसित केले. त्यातीलच एक महत्त्वाचा घटक म्हणजे प्रशासकीय सत्तेचे विकेंद्रीकरण. स्वातंत्र्यपूर्व काळातील तत्कालीन स्थितीत शाहू महाराजांनी आणि त्यानंतर राजाराम महाराजांनी सत्तेचे विकेंद्रीकरण करून जनसामान्याला सत्तेच्या प्रक्रियेमध्ये समाविष्ट करून घेतले. त्याचा लोकशाही रूजवण्यासाठी व अंमलबजावणी करण्यासाठी खूप उपयोग झाला. प्रशासकीय विकेंद्रीकरण हा राजाराम महाराजांचा प्रकल्प किंवा दूरदृष्टी याच अनुषंगाने राजाराम महाराजांच्या काळामध्ये राजाराम महाराज यांच्या पुढाकाराने कोल्हापूर संस्थानामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थापना झालेली होती. त्यासोबतच इलाका पंचायतीची स्थापना झाली यांचीसुद्धा स्थापना राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूर संस्थानामध्ये झाली होती. दुसऱ्या बाजूला म्युनिसिपलची स्थापनासुद्धा राजाराम महाराजांनी केली होती. त्यासोबतच संस्थानामध्ये कोल्हापूर स्टेट म्युनिसिपालिटीची स्थापनाही केलेली होती. महाल वा पेठा पातळीवर तालुका पंचायत, तर ग्रामपातळीवर ग्रामपंचायत स्थापना केली. या त्रिस्तरीय पंचायत संस्थांच्या माध्यमातून सत्तेचे विकेंद्रिकरण करण्याचा महत्त्वाचा प्रयत्न छत्रपती राजाराम महाराजंनी केला होता. ग्रामपंचायतीला कोणते अधिकार असतील, इलाका

पंचायतीला कोणते अधिकार असतील, म्युनिसिपल कॉर्पोरेशनला कोणते अधिकार असतील याची व्यवस्थित विभागणी राजाराम महाराजांनी केली होती. प्रशासकीय सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे प्रशासकीय अधिकार तलाठी व पोलीस पाटलापासून ते चिटणीस मुलकी अधिकारी या सर्वांपर्यंत पोहोचले आणि या सर्वांना निर्णय प्रक्रियेत सामावून घेता आले. प्रशासकीय सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे प्रशासकीय गतिमानता निर्माण होण्यात महत्त्वाचे योगदान आहे. ग्रामपंचायतीकडे जमा होणारी रक्कम ही कशा पातळीवर व कोणाला खर्च करण्याचा अधिकार असेल, ग्रामपंचायत आणि इलाका पंचायत यांच्यात निर्माण होणारे उत्पन्न यांचा विनियोग कशाप्रकारे केला जाईल, या संदर्भातील ग्रामपंचायतीच्या निवडणुकीच्या संदर्भात नियमावली तलाठी, अंमलदार, इनामदार या सर्वांना कोणते अधिकार असतील या संदर्भातील व इतर अनेक अधिकारांचे विकेंद्रीकरण राजाराम महाराजांनी ग्रामपंचायतीपासून ते केंद्रातील म्हणजेच कोल्हापूर संस्थानातील प्रमुखांच्या अधिकार याबाबतची सर्व नियमावली तयार केली होते.[२०]

## २१. वेतनश्रेणी वाढ

कोल्हापूर संस्थानातील शासकीय कर्मचारी किंवा नोकर यांना बदलत्या परिस्थितीनुसार वेतनवाढ देणे ही एक लोकशाही राजवटीतील गोष्ट आहे. कोल्हापूर संस्थानातील नोकरांना अत्याधुनिक सुविधा भेटल्या पाहिजे, सुट्ट्या मिळाल्या पाहिजे; पण त्यासोबतच बदलत्या परिस्थितीनुसार त्यांच्या वेतनामध्ये वाढ झाली पाहिजे, याची राजाराम महाराजांना जाणीव होती. त्यामुळे त्यांनी कोल्हापूर संस्थानातील सर्व कर्मचाऱ्यांच्या वेतनामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ केली. कर्मचाऱ्यांच्या या पगार वाढीमुळे दरसाल सुमारे २१,००० रुपये खर्च वाढणार होता. त्यापैकी राहिलेल्या सात महिन्यांत १२,२५० रुपये खर्च करण्याचे मंजूर केले असून, पुढील सालच्या बजेटमध्ये हे प्रकरण मंजूर केले आहे.[२१] या वेतनवाढीमुळे कोल्हापूर संस्थानावर आर्थिक बोजा वाढून खूप मोठ्या प्रमाणात तिजोरीवर ताण पडणार होता. राजाराम महाराजांना कोल्हापूर संस्थानातील कर्मचारी हा सुद्धा कोल्हापूर संस्थानातील विकासामध्ये महत्त्वाचे योगदान देणारे घटक आहेत. त्यांना वेतनवाढ होणे आवश्यक आहे. त्यासोबतच वेतन वाढीमुळे कोल्हापूर संस्थानातील कर्मचाऱ्याची शासकीय कामाच्या बाबतीत व

वेळेच्या बाबतीत पारदर्शकता निर्माण होईल व काम स्वच्छ व चांगल्या गतीने होईल, ही राजाराम महाराजांची धारणा होती. त्यामुळे त्यांनी वेतनवाढ करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला. ती वेतनवाढ केवळ मोठ्या पहिल्या किंवा दुसऱ्या वर्गातील अधिकाऱ्याची नव्हती, तर त्यामध्ये कनिष्ठ पातळीवरील तलाठी व तत्सम इतर अनेक शिपाई व अशा अनेक महत्त्वाच्या व कनिष्ठ पातळीवरील पदासाठीसुद्धा राजाराम महाराजांकडून ही वेतनवाढ देण्यात आली होती.

## २२. विमान सेवेचा प्रारंभ

छत्रपती राजाराम महाराज यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये विमान सेवा सुरू करण्याचा निर्णय दि. ९ जानेवारी, १९३९ रोजी घेतला. विमान सेवा सुरू केल्यामुळे दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध होणार होती. त्यासाठी राजाराम महाराज यांच्या हस्ते 'वाडी उजळाई'जवळ माळावर विमानगृह सुरू करण्यासंदर्भात शुभारंभसुद्धा महाराजांनी केलेला होता. विमानसेवेचा प्रारंभ हा महाराजांची दूरदृष्टी व गतीमान प्रशासन याची प्रचिती देते. कोल्हापूर संस्थान जागतिक बाजारपेठेशी जोडले गेले पाहिजे, या उदात्त हेतूने महाराजांनी ही सेवा सुरू केलेली होती.[२२]

## २३. संस्थानातील सरकारी खजिन्यातील देवघेवीसंबधी नियमावली

राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची प्रशासकीय सुत्रे हातात घेतल्यावर ज्या–ज्या सुधारणा करणे प्रशासकीयदृष्ट्या आवश्यक आहेत, त्या सुधारणाकडे कटाक्षाने लक्ष देऊन प्रशासनात जे धोरणात्मक निर्णय घेतले, त्यामध्ये संस्थानातील सरकारी खजिन्यातील देवघेवीसंबधीसुद्धा काही नियमावली तयार करण्यात आल्या; जेणेकरून आर्थिक व्यवहारामध्ये सुसूत्रता येऊन प्रशासन गतिमान होण्यास मदत झाली.

संस्थानातील खजिन्यातील देवघेवसंबंधी व इतर ऑफीसांतील सरकारी पेट्या हुजूर खजिन्यांत ठेवण्यात येतात, त्यासंबधाने नियम करण्यात आला.

१) रक्कम जमा करण्यास अगर नेण्यास कोणत्याही ऑफिसातून घेता येईल. तो खजिन्यात एकच ठरावीक इसम पाठविणेचा आहे. त्यास रक्कम व नोटा पाहून घेण्यादेण्याची चांगली माहिती असावी.

२) दररोजची देवघेव ३ वाजता बदं करणेची आहे. सकाळचे ऑफीस असेल त्या दिवशी ९ वाजता बंद करणेची आहे. सबब ऑफीस सुरू झालेपासून होईल तितका लौकर भरणा पाठवावा व त्याप्रमाणे बिले वैगरे भरपाई करून वेळेवर पाठविणेची तजबीज ज्या त्या ऑफीसांतून होत जावी, देवघेव बंद होण्याच्या सुमारास लोक एकदम येतात त्या योगाने देवघेवीस अडचण उत्पन्न होते सबब शक्य तितकी लौकर तजवीज करणेची आहे.

३) भरणा रक्कमेत शक्य तितके करून नोटा रोख रूपये असावेत, रोख रक्कमेतून नाणे फार तर शेकडा तीन रूपये पर्यंत असावे सबंध भरण्यात खुर्दा चार आणयाचे आंत–असावा.

४) भरणा यादी डुप्लीकेट असावी, त्यांत रक्कम कोणते खाती जमा होणेची ते स्पष्ट लिहिलेले असावे, तसेच सालवार, सालमजकूर व खात्याच्या पोटबाबींचा तपशील लिहीलेला असावा, तसलमात जमेचे प्रसंगी पूर्वी कोणाचे नांवावर काय करणासाठी तसलमात घेतली होती व आता परत जमा करण्याचे कारण यादीत लिहीलेले असावे, तसेच भरणा रक्कमेत रोख किती नोटा व किती व तपशीलवार नमूद असावे, म्हणजे जमेस हरकत येणार नाही व डुप्लीकेट यादीवर पावती लौकर मिळेल.

५) बिलावर भरपाईची सही योग्य अधिकाऱ्यांची असली पाहिजे व बजेट मंजूर रक्कम दाखवलेली पाहीजे. हुकूमाचे तारखेपासून एक महिन्याचे आंत रक्कम नेली पाहिजे, मुदतीत मागणें केले नाही तर मुदतीपुढे पुन्हा इकडील मंजुरी घेतली पाहिजे, त्याशिवाय रक्कम मिळणार नाही.

६) ज्या ऑफिसच्या पेठया हुजूर खजिन्यांत राहतात, त्यांनी पेठया नेल्यास त्या ४.३० वाजेच्याआंत व सकाळचे ऑफीस असेल त्या दिवशी ९.३० वाजणेचे आंत परत आणून ठेविल्या पाहिजेत. या मुदतीपुढे त्या त्यांजकडे राहिल्यास त्यांची संरक्षणाची जबाबदारी त्यांजवर राहील.

अशा प्रकारे संस्थानातील खजिन्यासंदर्भात नियमावली तयार करून प्रशासनात सुसूत्रता निर्माण केली. त्यामुळे अशा धोरणांमुळे प्रशासन गतीमान होण्यास मदत झाली.[२३]

छत्रपती राजाराम महाराजांनी आपल्या राजकीय कारकिर्दीमध्ये प्रशासनामध्ये गतिमानता निर्माण करण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेतले. कोल्हापूर संस्थानमध्ये आधुनिक

नोकरशाही व त्यासाठीचे नियम तयार करून प्रशासकीय सुव्यवस्था प्रस्थापित केली. छत्रपती राजाराम महाराजांच्या या निर्णयामुळे शिस्तबद्ध व कटिबद्ध प्रशासकीय व्यवस्था निर्माण होण्यास मदत झाली. प्रशासनही लोकाभिमुख व पारदर्शी असले पाहिजे, लोकांबद्दल प्रतिबद्ध असले पाहिजे ही त्यांची धारणा त्यांनी प्रत्यक्ष व्यवहारात आणली. छत्रपती राजाराम महाराज यांच्या या निर्णयामुळे एकोणिसाव्या शतकामध्ये आदर्श लोकशाही निर्माण होण्यास मदत झाली. कोल्हापूर संस्थानाच्या प्रशासकीय गतिमानतेच्या निर्णयामुळे आर्थिक सामाजिक विकास यांना चालना मिळाली. कोल्हापूर संस्थानची आर्थिक भरभराट व सामाजिक न्याय या निर्णयामुळे प्रस्थापित झाली. हे छत्रपती राजाराम महाराजांचे आधुनिक प्रशासनाला महत्त्वाचे योगदान आहे.

## संदर्भसूची


१. हुजूर ऑफिस, रिसाला खाते, ठराव बुक क्रमांक ३१६, ठराव क्रमांक ७३८, दि. २४ ऑक्टोबर १९२२, कोल्हापूर

२. .हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव बुक क्रमांक ३४४, ठराव क्रमांक ५८८, दिनांक ११ मार्च १९२४, कोल्हापूर

३. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, ठराव बुक क्रमांक ३७१, मुलकी ठराव क्रमांक ३४८, दि. ८ नोव्हेंबर १९२६, कोल्हापूर

४. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव क्रमांक ४४९, ठराव क्रमांक ४३७, दिनांक १० डिसेंबर, १९२७, कोल्हापूर

५. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, ठराव बुक क्रमांक ३८०, मुलकी ठराव क्रमांक २९०, दि. ६ डिसेंबर, १९२७, कोल्हापूर

६. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, ठराव बुक क्रमांक ३८४, मुलकी ठराव क्रमांक ३०८, दि. २२ ऑक्टोबर १९२८, कोल्हापूर

७. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, ठराव बुक क्रमांक ३९०, मुलकी ठराव क्रमांक ५९४, दि. १४ मार्च,१९३१, कोल्हापूर

८. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, ठराव बुक क्रमांक ३९३, मुलकी ठराव क्रमांक ४९१, दि. १२ जानेवारी, १९३२, कोल्हापूर

९. धाटावकर भास्कर (संपादक), २०१०, छत्रपती राजाराम महाराज यांचे निवडक आदेश भाग २, संचालक, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन, कोल्हापूर, पृष्ठ क्रमांक ५२

१०. कित्ता पृ. ७४, ७५

११. कित्ता पृ. क्र. ९७

१२. कित्ता पृ. क्र. १०२

१३. कित्ता पृ. क्र. १०२

१४. कित्ता पृ. क्र. ११८

१५. डॉ. पवार जयसिंगराव, (संपा) २००१, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर, पृ. क्र. २०

१६. धाटावकर भास्कर, (संपादक), २०१०, छत्रपती राजाराम महाराज यांचे निवडक आदेश भाग २, संचालक, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन, कोल्हापूर, पृष्ठ क्रमांक १५१

१७. कित्ता पृ. क्र. १५९

१८. कित्ता पृ. क्र. १७०

१९. कित्ता पृ. क्र. ३५

२०. हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅजेट, भाग १, दि. ९ ऑगस्ट, १९२६, कोल्हापूर, पृ. क्र. १६–१७,

२१. हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅजेट, भाग १, दि. ४ नोव्हेंबर १९२६, पृष्ठ क्रमांक २३, कोल्हापूर

२२. राजाराम महाराज दप्तर, पत्र. जावक क्र. ६६, ए. इंजिनिअर ऑफिस, दि. ३ जानेवारी, १९३९, कोल्हापूर

२३. हुजूर ऑफीस, करवीर सरकारचे गॅझेट, भाग –१, दिनांक ११ मे १९२६, कोल्हापूर, पृ. ६१,६२

## प्रकरण पाचवे

# राजाराम महाराजांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकासात योगदान

- प्रस्तावना

- छत्रपती राजाराम महाराजांचे आर्थिक विकासातील योगदान

  १) शाहुपूरी मर्चंट असोसिएशन संस्थेची स्थापना

  २) शेतकी शिक्षणास प्रात्साहन

  ३) कोल्हापूर शुगर मिलची स्थापना

  ४) कोल्हापूर बँकेची स्थापना

  ५) ॲल्युमिनियम कारखाना

  ६) राजाराम तलावाचे बांधकाम

- छत्रपती राजाराम महाराजांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान

  १) गाव तेथे शाळा योजना

  २) लोक वाचन ग्रंथालयास प्राधान्य

  ३) वसतीगृह सुधारणा चालना

  ४) शैक्षणिक कर्ज मुदतवाढ

  ५) दलित आणि बहुजन विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क

६) मुक्त आणि मोफत पुस्तके

७) शाळेसाठी इमारतीचे मोफत बांधकाम

८) शाळेकरीता गायरानातील जमीन मोफत

९) खाजगी शाळेसाठी अनुदान

१०) स्कॉलरशिपची सुविधा

११) स्त्री शिक्षणास प्राधान्य

१२) ओब्रायन टेकनिकल स्कूलची स्थापना १९२८

१३) कौन्सिल ऑफ लीगल एज्युकेशन १९३२

१४) महाराणी ताराबाई टिचर ट्रेनिंग कॉलेज १९३४

१५) श्री. महाराणी लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूल १९२९

१६) विज्ञान शाखेत शिक्षणात प्रोत्साहन

१७) वसतिगृह चळवळींना चालना

१८) सक्तीचे, मोफत शिक्षण आणि स्त्रियांना शिक्षण

१९) व्यवसायिक शिक्षणाला प्राधान्य

२०) शेतकी शिक्षणाची मोफत सोय

o छत्रपती राजाराम महाराजांचे सामाजिक सुधारणांतील योगदान

१) जमीन संपादनाचा मोबदला

२) ब्राम्हणेत्तर चळवळीचे नेतृत्व

३) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना आर्थिक मदत.

४) सन १९२६ चा कोल्हापूरचा बालविवाह प्रतिबंध कायदा

५) पुरग्रस्ताचे पुनर्वसन

६) गरीब लोकांना रेल्वे प्रवासाची सुविधा

o सांस्कृतिक व वैचारिक योगदान

१) लोक उत्सवास प्राधान्य

२) छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाचा गौरव आणि इतिहासलेखन

३) राजर्षी शाहू महाराजांचा कर्तृत्वाचा गौरव

४) ग्रंथ निर्मितीस अर्थसाह्य

५) मराठी भाषेत प्रोत्साहन

६) संत तुकाराम महाराज यांच्या चरित्राचे लेखनाची अनुदान

७) महात्मा फुले यांच्या चरित्राची निर्मिती अनुदान

## प्रकरण पाचवे

# राजाराम महाराजांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकासात योगदान

### प्रस्तावना

छत्रपती राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतल्यानंतर अनेक महत्त्वाची धोरणे आखून त्याची प्रभावी अंमलबजावणी केली. राजाराम महाराजांनी राबवलेल्या धोरणामुळे कोल्हापूर संस्थानमध्ये आर्थिक, सामाजिक आणि राजकीय विकास तर झालाच; पण त्यासोबत समाजातील प्रबोधनाची चळवळ ही एक व्यापक अर्थाने पुढे गेली. राजाराम महाराज यांना आपल्या वडिलांच्या वारशाची पुरेपूर जाणीव होती. त्यामुळे त्यांनी तो वारसा पुढे नेला आणि बदललेल्या लोककल्याणकारी राज्याची धुरा त्यांनी समर्थपणे सांभाळली. राजाराम महाराजांचा दृष्टिकोन प्रशासकीयदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या किती महत्त्वाचा आणि आमूलाग्र होता हे या भाषणावरून स्पष्ट होते. राजाराम महाराज म्हणतात की, "I fully realise the heavy responsibilities that have devolved upon me by the untimely demise of my revered father-responsibilities, both as regards the administration of my State and the carrying on of the most useful and huminitarian work undertaken by my father for the up-lift of the Backward Classes and the social equalization of the different communities that from the backbone of the nation. It will not be out of place, here, I believe to allude to the kindly help generously given to my father by the various sympathetic political officers of the Government but for which the movement set on foot by him would not have achieved the success, it has."[१] राजाराम महाराजांकडे छत्रपती शाहू महाराज यांच्याकडून सामाजिक आणि आर्थिक सुधारणेचा वारसा मिळालेला आहे. तो वारसा जपत असताना, सत्तांतर करत असताना किंबहुना कोल्हापूर संस्थानाचे सूत्रे छत्रपती म्हणून हाती घेत असताना दलित, बहुजन समाजाबद्दल व्यापकता आणि त्यांच्या मुक्तीसाठीचा राजकीय कार्यक्रम या भाषणावरून स्पष्ट करतात. इतकेच

नाही, तर सामाजिक समता ही प्रशासकीयदृष्ट्या आणि राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा कृती कार्यक्रम आहे. हे यावरून स्पष्ट करतात. त्या सर्वांचा आढावा आपल्या प्रस्तुत प्रकरणांमध्ये घेणे आवश्यक आहे.

## छत्रपती राजाराम महाराज यांचे आर्थिक विकासात योगदान

### १. शाहूपुरी मर्चंट असोसिएशन संस्थेची स्थापना :

राजाराम महाराज यांनी कोल्हापूर संस्थानाच्या आर्थिक विकासामध्ये महत्त्वाचे योगदान दिले. त्यांच्या अगोदर शाहू महाराजांनी कोल्हापूर शेती आणि शेतीपूरक व्यवसायाला चालना देऊन संस्थानाला आर्थिकदृष्ट्या संपन्न केले होते. त्यासाठी त्यांनी संस्थानामध्ये विविध सहकारी संस्थांची निर्मिती करून कोल्हापूरमध्ये आर्थिक विकासाला चालना दिली होती. हाच वारसा आणि वसा पुढील काळात राजाराम महाराजांनी चालवला. वित्तीय विकासाशिवाय संस्थानातील व्यापारी क्षेत्र आणि उद्योग क्षेत्र भरभराटीला लागणार नाही, हे त्यांनी ओळखले होते. म्हणून त्यांनी दि. ६ एप्रिल, १९२७ रोजी जनरल खात्यामध्ये प्रशासकीय आदेश काढून 'शाहूपुरी मर्चंट असोसिएशन' या संस्थेची स्थापना करण्याचा निर्णय घेतला व त्याचे मुख्य ऑफिस शाहूपुरीत राहील, असे जाहीर केले. छत्रपती राजाराम महाराजांनी 'शाहूपुरी मर्चंट असोसिएशनची' स्थापना करताना त्यामागचा उद्देश आपल्या जाहीरनाम्यामध्ये स्पष्ट केले होते, ते खालीलप्रमाणे :

१) शाहूपुरीतील व्यापाऱ्यांच्या सर्व साधारण हितांशी ज्या बाबींचा संबंध येईल, त्या सर्व बाबींमध्ये व्यापारी वर्गात स्नेहभाव व एकमत उत्पन्न होण्यास उत्तेजन देणे.

२) प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीतीने शाहूपुरीतील व्यापारी वर्गाच्या हिताशी संबंधित असलेल्या बाबीसंबंधी संघटित प्रयत्न करणे.

३) शाहूपुरीत चालणारा व परदेशात होणारा व्यापार, जहाजावरील, रेल्वेतील व इतर मालवाहतूक उद्योगधंदे व कारखाने तसेच बँका व विमा उतरवण्याचा व्यवहार या सर्व गोष्टीतील शाहूपुरीतील व्यापारी वर्गाचे हेतू सिद्धीस नेणे.

४) असोसिएशनच्या मूळ हेतूंना पोषक अशी आकडेवारीविषयक व इतर माहिती गोळा करून तिचा प्रसार करणे आणि व्यापारविषयक व अर्थशास्त्रविषयक ज्ञानाचा प्रसार करणे.

५) सरकार किंवा सरकारचें एखादें खातें किंवा एखाद्या स्थानिक संस्था यांच्याकडून होऊं घातलेल्या एखाद्या कायद्यानें किंवा इतर एखाद्या कृत्यानें सदर संस्थेच्या व व्यापाराच्या हितसंबंधाच्या बाबीवर जर कांही नफा नुकसान येईल तर योग्य ते तद्विषयक उपाय योजून सदर कायद्यास चालना देणें, पाठिंबा देणें अगर सदर बद्दल दरबाराकडे दाद मागणें आणि याशिवाय इतर सर्वसाधारण बाबीबद्दल व्यापारी वर्गाच्या नफा नुकसानीबद्दल योग्य ते उपाय, अंमलबजावणी आणण्याची तजवीज करणें.

६) व्यापारधंदा, कारखाने, जहाजें, बँका व विमा याविषयी प्रतिनिधीमंडळ स्थानिक मध्यवर्ती सरकारकडे पाठवणे.

७) व्यापाऱ्याव्यापाऱ्यांतील तंटे–तक्रारी आपापसात तडजोड करणेचा प्रयत्न करणे आणि व्यापार धंदा चालत असताना किंवा वाहतुकीबद्दल जे तंटे उपस्थित होतील, ते लवादामार्फत सोडविण्याची तजवीज करणे आणि त्याबाबत जरूर किंवा योग्य वाटेल तद्विषयक तज्ज्ञ माणसाची मदत मिळवणे.

८) व्यापार व धंदेशिक्षण यांना सुरुवात करणे व उत्तेजन देणे आणि त्याकरितां मंडळ व संस्थांची स्थापना करून मदत करणे.

९) कोणताही व्यापार किंवा उद्योग धंदा यांच्या कोणत्याही शाखेंत योग्य तक्रार असेल, तर त्याचे परिमार्जन करण्याकरिता स्वतंत्र चौकशी करणे व योग्य ते उपाय योजणें आणि ह्याच तऱ्हेचे उपय योजून व्यापार, उद्योगधंदा किंवा कारखाने ह्यांचा प्रसार करणें.

१०) बाहेर असलेल्या शाहूपुरीतील व्यापाऱ्याचें हितसंबंध करणें.

११) आणि एकंदरीत वर लिहिलेल्या या असोसिएशनच्या हेतूंच्या सिध्यर्थ प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष जें जें करणें वाजवी दिसेल तें तें करणें.

१२) शाहुपूरी येथील व्यापाराच्या पद्धतीत तेव्हां सुधारणा करणे.

१३) सार्वजनिक स्वरूपाच्या जमा होणाऱ्या रकमेचा विनियोग देखरेख ठेवणे.[२]

राजाराम महाराजांनी इतका उदात्त उद्देश ठेवून शाहूपुरी मर्चंट असोसिएशन संस्थेची स्थापना केली. त्यांना माहिती होते, कोल्हापूरमध्ये वित्तीय क्षेत्रांना चालना द्यायची असेल, व्यापारामध्ये विकास निर्माण करायचा असेल, त्यासाठी असोसिएशन असणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे व्यापारी वर्गांमध्ये समन्वय निर्माण होईल. एकमेकांबद्दल सहकार्याची भावना निर्माण होईल. व्यापारामधला मतभेद आणि मनभेद हे सर्व सोडवून व्यापार याबद्दलची बांधिलकीची भावना निर्माण होईल. या उदात्त हेतूने राजाराम महाराजांनी 'शाहूपुरी मर्चंट असोसिएशन'ची स्थापना केली. राजाराम महाराजांनी 'शाहूपुरी मर्चंट असोसिएशन संस्था' संस्थेच्या सभासदासाठी काही महत्त्वपूर्ण प्रकार ठेवले. व्यापारी वर्गांमध्ये 'शाहूपुरी मर्चंट असोसिएशन संस्थे'चे जाळे विस्तारायची असेल, तर त्यासाठी सभासद असणे आवश्यक आहे. हे राजाराम महाराजांनी ओळखले होते. म्हणून त्यांनी तीन प्रकारचे सभासद ठेवले होते. १. साधारण सभासद, २. आश्रयदाते सभासद, ३. सन्मानार्थ सभासद.

**१) साधारण सभासद–** यामध्ये राजाराम महाराजांनी तीन वर्ग पाडले होते.

अ) शाहूपुरी दुकान ॲग्रो ऑफिस ठेवून वार्षिक १५ रुपये वर्गणी देणारे परंतु जॉईन स्टॉक कंपनीचे बाबतीत मात्र पंचवीस रुपये द्यावे लागतील

ब) शाहूपुरीबाहेरील शाहूपुरीत व्यापार संबंध ठेवणारे व वार्षिक पंचवीस रुपये देणारे

क) इतर कोणत्याही संस्था वार्षिक ५० रुपये वर्गणी देतात, अशाप्रकारे साधारण सभासदाची निवड आणि निकष राजाराम महाराजांनी निश्चित केले होते.

**२) आश्रयदाते सभासद** – शाहू महाराजांनी कोणत्याही व्यापारी संस्था किंवा कोणतेही व्यापारी यांना या संस्थेच्या आश्रयदाते होता येईल, आश्रयदाते होणाऱ्या व्यापारी संस्थेला पाचशे रुपये व व्यापारी व्यक्तीला २५० रुपये देणगीदाखल द्यावे व ही सर्व रक्कम एका कॅपिटल फंडामध्ये जमा

केली जाईल व त्यांचा महसूल या सदराखाली व्यय केले जाणार नाही; परंतु त्यापासून मिळणारे व्याज मात्र महसूल या सदराखाली दाखवले जाईल.

**३) सन्मानार्थ सभासद–** सार्वजनिक कामात पुढे असलेल्या अगर व्यापार धंद्यात प्रसिद्धीस आलेले लोक यांना जनरल मिटिंगच्या दोन तृतीयांश बहुमताने निवडता येईल, व त्यांना वर्गणी माफ असावी. त्यांना सल्ला देता येईल; परंतु असोसिएशनच्या कोणत्याही मिटिंगमध्ये मत देता येणार नाही किंवा कोणत्याही कमिटीवर काम करता येणार नाही.[३]

'शाहूपुरी मर्चंट असोसिएशन' या संस्थेने कोल्हापूर संस्थानात व्यापारी वर्गाचे हितसंबंध साध्य करण्यात व त्यांचे जाळे विस्तारण्यास खूप महत्त्वाचे योगदान दिले आहे. कोल्हापूर हे शहर व संस्थान यामधील अनेक व्यापारी वर्ग या संस्थेच्या माध्यमातून आपल्या व्यापारी क्षेत्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणात योगदान दिले. त्यामुळे राजाराम महाराज आणि त्यांचे हे ऐतिहासिक योगदान कोल्हापूर संस्थांनपुरतेच मर्यादित नाही. तर भारतामध्ये व्यापारी वर्गांमध्ये परस्पर मैत्री भाव व सहकार्याची भावना निर्माण करून व्यापारी व उद्योगधंद्यांना चालना कशी देता येईल, याचे उत्तम उदाहरण म्हणून या संस्थेकडे पाहता येईल हे राजाराम महाराजांचे योगदान आहे.

## २. शेतकी शिक्षणास प्रोत्साहन

राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त शिक्षणामध्ये गोडी निर्माण व्हावी, शेतीचा विकास व्हावा ही दूरदृष्टी ठेवून शेती शिक्षणासाठी वेगवेगळे कॉलेज आणि शाळा यांचे एकत्रीकरण करून, कोल्हापूर संस्थानामधील मुला–मुलींना शेती शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यास सुरुवात केली. राजाराम महाराज यांनी 'करवीर येथील ॲग्री स्कूल'मध्ये दरमहा दहा रुपये प्रमाणे व राधानगरी या भागातील शाळेमध्ये दरमहा आठ रुपये प्रमाणे स्कॉलरशिप देण्यात आली.[४] अशा प्रकारची तरतूद करून विद्यार्थ्यांना शेतकी शिक्षण घेण्यास प्रोत्साहन दिले.

### ३. शेतकऱ्यांसाठी कर्ज योजना

राजाराम महाराजांनी शेतकरी कर्जासाठी अनेक योजना राबविल्या होत्या. शेतकरी हा वेगवेगळ्या कारणामुळे अडचणीत येत होता. दुष्काळ, शेतीचा विकास करण्यासाठी किंवा इतर जो खर्च आहे, तो भागवणे त्याला अशक्य होते. शेतकऱ्यावर येणारे संकट हे नैसर्गिक व आसमानी होते. त्यामुळे राजाराम महाराज यांनी ही दूरदृष्टी ठेवून नैसर्गिक संकटावर मात करून शेतकऱ्यांना सुरक्षितता दिली. यासाठी शेतकऱ्यांकरिता अनेक योजना जाहीर केल्या होत्या. त्यापैकी त्यांनी शेतकऱ्यांना किंवा जनतेला कर्ज उपलब्ध प्रामुख्याने खालील तीन बाबींसाठी देण्याचे निश्चित केले

१) शेतीच्या जमिनीवरील पूर्वीचे गहाण कर्ज फेडणे.

२) शेतीची सुधारणा, विहिरी काढणे, पंप लावणे, नवीन औत घेणे.

३) दुष्काळाचे साली आवश्यक असलेल्या निर्वाहाची साधने घेणे.[५] शेतीच्या कर्जामुळे शेतकऱ्यांमध्ये शेतीबद्दल निर्माण झालेली अनास्था ही आस्थेमध्ये रूपांतरित झाली. शेतकऱ्यांनी शेतीच्या कर्जामुळे शेतीतील गुंतवणूक व विकास यावर जास्त भर दिला. शेतीतील गुंतवणुकीमुळे शेतकऱ्यांना नवनवीन यंत्रे, शेतीतील अवजारे किंवा शेतीबद्दल अद्यावत तंत्रज्ञानाचा वापर करणे शक्य झाले व कोल्हापूर संस्थानातील शेतीचा विकास हा छत्रपती राजाराम महाराज यांच्या कारकीर्दीत खूप मोठ्या प्रमाणात झाला.

### ४. शेतीपूरक व्यवसायाला चालना

''राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या औद्योगिक विकासासाठी खूप महत्त्वाचे प्रयत्न केले. त्यातील एक महत्त्वाचा प्रयत्न म्हणजे शेतीतील उत्पादन हे औद्योगिक विकासासाठी विकसित झाले पाहिजे किंवा त्याचा वापर झाला पाहिजे किंवा शेतीपूरक इतर व्यवसाय हाच औद्योगिक क्रांतीसाठी किंबहुना व्यापारी क्रांतीसाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका आहे. हे राजर्षी शाहू महाराजांनी ओळखले होते, त्यामुळे तोच वारसा पुढे चालवत राजाराम महाराज आणि औद्योगिक विकासाला कोल्हापूर संस्थानमध्ये प्राधान्यक्रम दिला आहे. औद्योगिक विकास झाल्याशिवाय

संस्थानाचा आणि राज्याचा विकास होणार नाही. लोकांना रोजगार भेटणार नाहीत, समाजामध्ये आर्थिक भांडवल तयार होईल ही जाणीव ठेवून राजाराम महाराजांनी औद्योगिक विकासाला खूप मोठ्या प्रमाणात चालना दिली.

त्यातील प्रामुख्याने राजर्षी शाहू महाराजांची कामे आहेत. उदाहरणार्थ राधानगरी धरण शाहू महाराजांनी एका उदात्त हेतू आणि ध्येयाने बांधलेले होते. त्या जवळच भोगवती नदीवर धरण बांधण्याचे काम घेतलेले होते. ते काम राजर्षी शाहू महाराजांच्या काळामध्ये पूर्ण होऊ शकले नाही. त्यामुळे राजाराम महाराजांनी पुढे होऊन त्या धरणाची उंची वाढवली. त्याची उंची वाढल्यामुळे राधानगरी तालुक्यातील शेतकऱ्यांना आपल्या शेतीसाठी अधिक पाणी उपलब्ध झाले आणि या पाण्याचा उपयोग शेतकऱ्यांनी नगदी पीक घेऊन विशेषतः उत्पादन करून जास्तीत जास्त शेतीमध्ये विकास करून घेतला. शेतीमध्ये प्रामुख्याने कोल्हापूर संस्थानात ऊस उत्पादक शेती असल्यामुळे उसातून गूळ निर्मिती करणे हे अत्यंत आवश्यक होते. त्यासाठी शाहू महाराजांनी गूळ उत्पादनाला अधिकाधिक चालना दिली व कोल्हापूर संस्थानातील गूळ उत्पादन हे जगाच्या नकाशावर किंबहुना भारताच्या सर्व मालाच्या बाजारपेठेमध्ये खूप महत्त्वाची भूमिका पार पाडली. या उत्पादनामुळे शेतकऱ्यांचा आर्थिक विकास झाला आणि शेतकरी खऱ्या अर्थाने आपल्या विकासाला चालना देण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडू लागले. आज पश्चिम महाराष्ट्रामध्ये कोल्हापूर हे शहर गूळ उत्पादनासाठी जगाच्या बाजारपेठेमध्ये एक प्रसिद्ध बाजारपेठ म्हणून गणली जाते याचे सर्व श्रेय राजाराम महाराजांकडे असलेल्या दूरदृष्टीला जाते.[६]

तत्कालीन परिस्थितीत शेतकऱ्यांच्या शेतमालाला बाजारपेठेत अनेक संकटांना सामोरे जावे लागत होते. म्हणजे त्या काळामध्ये शेतमालाची चांगली बाजारपेठ उपलब्ध नव्हती. ज्या बाजारपेठा उपलब्ध होत्या, त्यांचे नियम, निकष यामुळे मोठ्या संकटांना सामोरे जावे लागत होते. याची पूर्ण जाणीव छत्रपती राजाराम महाराज यांना होती. आपल्या संस्थानातील शेतमाल आणि इतर उत्पादनांना चांगली बाजारपेठ लाभावी आणि त्यांना चांगला दर मिळावा, यासाठी देशातील नामांकित बाजारपेठेपर्यंत त्यांचा माल पोहोचायला हवा. नामांकित बाजारपेठेपर्यंत संस्थानातील शेतमाल पोहोचण्यासाठी रेल्वे ही सुविधा फायदेशीर ठरू शकेल, याची पूर्ण कल्पना राजाराम

महाराजांना होती. म्हणून त्यांनी संस्थानामध्ये रेल्वेमार्गाचे बळकटीकरण करण्याचे ठरवले. रेल्वेमार्गाच्या बळकटीकरणाच्या अनुषंगाने एके ठिकाणी छत्रपती राजाराम महाराज म्हणतात की "Last year I was thinking of organizing the agricultural department in my state and when I decided that a good model form and comprehensive show room which could exhibit to the ryots the up to date improvements in agriculture machinery manual and result of scientific agriculture it did not take me long to decide which name would be most fittingly associated with the Institutions such as I wish to start but I was an anxious as to whether the Institutions would be great enough to justify me in his requesting his excellence."[७] शेतीच्या विकासामुळे कोल्हापूर संस्थानमध्ये कशा प्रकारे विकासाला चालना दिली, हे खुद्द छत्रपती राजाराम महाराजांनी आपल्या शब्दात व्यक्त केले आहे.

## ५.कोल्हापूर शुगर मिलची स्थापना

राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतल्यानंतर 'कोल्हापूर शुगर मिल'ची स्थापना केली. शेतीचा आणि शेतीपूरक उद्योगांचा विकास करण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांकडून काही ठोस धोरणे प्राधान्याने घेण्यात आली. त्यातील एक म्हणजे शेतमाल उत्पादनावर संस्थानातच प्रक्रिया होणे. वास्तविक परिस्थितीत शेतमाल प्रक्रिया करण्याची कोणतीही यंत्रणा कोल्हापूर संस्थांनामध्ये उपलब्ध नव्हती. त्यावर तत्कालीन तंत्रज्ञानाच्या विकासाच्या मर्यादा होत्या. राजर्षी शाहू महाराज आणि त्यानंतर राजाराम महाराज यांनी देशातील सामाजिक आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीचा आढावा घेतला होता. जगभरात सुरू असलेल्या आधुनिक शेती तंत्रज्ञान कोल्हापूर संस्थानात आणून शेती आणि शेतीपूरक व्यवसायाला चालना दिली. छत्रपती राजाराम महाराजांनी आधुनिक शेती तंत्रज्ञानाचे शिक्षण घेतले होते. त्यामुळे आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर केल्याशिवाय आणि इथला शेतमाल जागतिक बाजारपेठेत पोहोचल्याशिवाय इथला शेती व्यवसाय आणि शेतीवर आधारलेले इथले विविध व्यवसाय भरभराटीला लागू शकणार नाहीत, याची जाणीव त्यांना होती. त्यादृष्टिकोनातून राजाराम महाराजांनी अनेक महत्त्वाची धोरणे हाती घेतली. त्यापैकी महत्त्वाचे एक धोरण म्हणजे कोल्हापूर शुगर मिलची स्थापना होय. शुगर मिल स्थापन होण्यामागे काही तात्कालिक कारणेसुद्धा आहेत. उदाहरणार्थ कोल्हापूर संस्थानामध्ये गूळ

उत्पादनाला सर्वाधिक चालना देण्यात आलेली होती. त्यामुळे जागतिक बाजारपेठेमध्ये गूळ उत्पादन हे कोल्हापूरचे एक अत्यंत महत्त्वाचे उत्पादन म्हणून मानले गेले होते. पण जागतिक बाजारपेठेमध्ये तेजी–मंदीच्या प्रभावामुळे गूळ उत्पादनाला ज्या पद्धतीने भाव किंवा बाजारपेठेत असायला हवे, त्या पद्धतीने मिळत नव्हते. त्यामुळे गूळ उत्पादक शेतकरी हा खूप मोठ्या प्रमाणात संकटात किंवा अडचणीत येऊ लागला ही बाब लक्षात घेऊन राजाराम महाराजांनी 'कोल्हापूर शुगर मिल'ची स्थापना केली.[८] शुगर मिलच्या माध्यमातून, उसाच्या माध्यमातून साखरेची निर्मिती करणे हा त्यामागचा उद्देश होता. त्यामुळे राजाराम महाराजांनी साखरेच्या उत्पादनाला अधिकाधिक चालना मिळावी आणि जागतिक बाजारपेठेमध्ये साखर उत्पादनाची गरज पूर्ण व्हावी ही भूमिका ठेवून शुगर मिलची स्थापना केली. 'कोल्हापूर शुगर मिल'ची स्थापना केल्यानंतर सुरुवातीला या कारखान्याची गाळप क्षमता प्रतिदिन ५०० टनांपर्यंत होती. त्यातून ५०० पोती तयार होत असत. त्यामुळे या उत्पादनाला भारतातील इतर बाजारपेठेमध्ये आणि जागतिक बाजारपेठेमध्ये साखरेची जास्तीत जास्त निर्यात झाली पाहिजे आणि शेतकऱ्याचा त्याचा जास्तीत जास्त मोबदला मिळायला पाहिजे, हा उदात्त हेतू राजाराम महाराजांनी ठेवलेला होता. आज पश्चिम महाराष्ट्र किंवा कोल्हापूर संस्थान साखर उत्पादनामध्ये प्रथम क्रमांकावर आहे, त्यामागे राजाराम महाराजांची दूरदृष्टी होती याबाबत कोणतीच शंका नाही.

### ६. कोल्हापूर बँकेची स्थापना

शेती आणि शेतीपूरक व्यवसायांना अर्थसाह्य व्हावे यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी अनेक सोसायट्या आणि पतपेढ्या निर्माण केल्या होत्या. संस्थानाची सुत्रे छत्रपती राजाराम महाराज यांच्याकडे आल्यानंतरही या लघुस्तरावर अर्थसाह्य करणाऱ्या सोसायट्या आणि पतसंस्था सुरू होत्याच पण छत्रपती राजाराम महाराजांनी आधुनिक बँकिंग तंत्रज्ञानाचा आणि पद्धतीचा वापर करून संस्थानामध्ये बँक व्यवस्था उभारण्याचे ठरवले. आधुनिक बँकिंग व्यवस्थेचे महत्त्व पटवून देताना छत्रपती राजाराम महाराज म्हणतात, "I am glad to have this opportunity for congratulations you upon the success you have so far achieved in organizing this bank and putting your own ideas about it's in a solid form will begin as they say is half done

and I feel sure that the good begun which you have made will lead to great results in the future and to great good of the people of Kolhapur who must naturally be expecting the bank to be material assistance to them in the furtherance of their trade and industries" [९] खरे तर छत्रपती शाहू महाराजांनी सहकारी तत्त्वांवर अनेक सोसायट्या आणि पतसंस्था निर्माण केल्या होत्या. ज्यामुळे कोल्हापुरातील शेतकरी व्यापारी किंवा उद्योगपती यांच्या आर्थिक गरजा भागवून त्यासोबतच त्यांची बचत होणे हा त्यामागचा हेतू होता. तीच भूमिका कायम ठेवून राजाराम महाराजांनीसुद्धा १९२६ मध्ये कोल्हापूर बँकेची स्थापना केली. या बँकेच्या माध्यमातून त्यांनी शेती, शेतीपूरक व्यवसाय आणि नवनवीन उद्योगाला चालना देऊन या क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विकास घडवून आणला. अर्थात छोटे उद्योजक, शेतकरी यांसाठी लागणाऱ्या खेळत्या भांडवलाची गरज या बँकेद्वारे पूर्ण होत होती. कारण कोल्हापूर बँकेच्या स्थापनेमुळे अनेक व्यापाऱ्यांना उद्योगांना मोठ्या प्रमाणात कर्ज मिळू लागले. या कर्ज उपलब्धीमुळे आपल्या शेतीचा, उद्योगाचा विकास करणे शक्य झाले. किंबहुना कोल्हापूरच्या एकूण औद्योगिक व शेतीच्या विकासामध्ये कोल्हापूर बँकेने खूप महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. दुबार पेरणीचे संकट असून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव असल्यामुळे तेथील शेतकऱ्यांना पारंपरिक पद्धतीने शेती करावी लागत होती. कमी भागभांडवलामुळे शेती क्षेत्राच्या आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध करता येत नव्हते. मात्र कोल्हापूर बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना व शेतकऱ्यांसोबत व्यापाऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्याची सोय होऊ शकली.[१०]

### ७. ॲल्युमिनियम कारखाना

तत्कालीन परिस्थितीत राधानगरी धरणाचे काम सुरू होते. त्या धरणाच्या आजूबाजूला असलेल्या जंगलात बॉक्साईटचे प्रचंड साठे असल्याची माहिती महाराजांना मिळाली. यातूनच त्यांना या भागात आपण अल्युमिनियम उत्पादनाचा कारखाना सुरू करू शकतो, याची कल्पना आली. ही कल्पना त्यांनी लगेच मनावर घेतली आणि या बॉक्साईडचा दर्जा तपासणीसाठी कर्नाटकचे तत्कालीन प्रसिद्ध अभियंता सर विश्वेश्वरय्या यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. या समितीनेही लवकरात लवकर या परिसराचाा अभ्यास करून कारखाना सुरू

करण्यास अनुकूलता दर्शवली. राधानगरी परिसरातील जंगलामध्ये बॉक्साईडचे इतके प्रचंड साठे आहेत की, यातून जगातील सर्व अल्युमिनिअम निर्मितीचे कारखाने तब्बल हजार वर्षे चालू शकतील, असे मत समितीचे अध्यक्ष सर विश्वेश्वरया यांनी आपल्या अहवालातून व्यक्त केले. साहजिकच हा कारखाना उभारण्याचा निर्णय राजाराम महाराजांनी पक्का केला आणि तो कारखाना उभारण्याची जबाबदारी तत्कालीन प्रसिद्ध उद्योगपती शेठ वालचंद हिराचंद यांच्याकडे सोपवली. कारखाना सुरू करण्यासाठी त्याकाळी विजेची आवशकता होती. ती गरज पूर्ण करण्यासाठी राधानगरी धरणातील तोंडघाटाजवळ वीज निर्मिती प्रकल्प सुरू केला. अशा प्रकारे कोल्हापूर संस्थान उद्योगाच्या क्षेत्रात, खनिज संपत्तीच्या क्षेत्रात एक नावारूपाला आलेले संस्थान म्हणून जगभरामध्ये आणि भारतातील सर्व उद्योजकाचे लक्ष वेधले.

### ८. राजाराम तलावाचे बांधकाम

राजर्षी शाहू महाराज यांनी कोल्हापूर संस्थानाच्या विकासासाठी आपल्या आयुष्याची तब्बल पंचवीस वर्षे दिली. संस्थानाच्या विकास प्रक्रियेचा एक भाग म्हणून त्यांनी अनेक छोटी–मोठी धरणे, तलाव विहिरी बांधण्याचे काम त्यांनी हाती घेतले. पण त्यांचे लवकरच निधन झाल्यामुळे काही प्रकल्प हे अपूर्ण राहिले. राजाराम महाराज तलाव हे राजर्षी शाहू महाराजांचे अपूर्ण राहिलेले काम होते. हा तलाव बांधण्यामुळे संस्थानातील सिंचनाखालील क्षेत्रात भरीव वाढ होणार होती. त्याचबरोबर इतर विविध क्षेत्राना शेतीपूरक व्यवसायांना लागणाऱ्या पाण्याची गरज भागणार होती. त्यामुळे एकूण शेती व्यवसायाला आणि शेतीपूरक व्यवसायाला अधिक गती मिळणार होती. म्हणून राजाराम महाराजांनी हा तलाव बांधून शाहू महाराजांचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प पूर्ण केला.

## छत्रपती राजाराम महाराजांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान

शाहू महाराजांनी शैक्षणिक क्रांती केली. दलित, बहुजन समुदायांना शिक्षणाच्या प्रक्रियेत आणण्याची महत्त्वाची बाब म्हणून शिक्षणाकडे पाहिले. प्राथमिक शाळा, प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे, सर्वांना शिक्षणाची समान संधी, आरक्षणाची समान तत्त्वे यामुळे जनसामान्यांमध्ये

शिक्षणाबद्दलची आस्था आणि प्रतिनिधित्व वाढत गेले. तोच वारसा पुढे चालवत छत्रपती राजाराम महाराजांनी सुद्धा शिक्षणामध्ये खूप मोठ्या प्रमाणात क्रांती केली. छत्रपती राजाराम महाराज म्हणतात की "The education and uplift of the masses was the one great aim for the accomplishment of which my late father reyerd laboured thorought his life. This was the goal of his ambition and the first step towards its fulfillment he gave order for the introductions of free and compulsory education into the state. The initiative has already been taken but task of carrying out the measure in full has fallen of my young shoulder since I took up the reins of government a substantial step has been taken towards its achievement resulting in a large accession to the number of schools and people it was a difficult however to provide trained teachers for the numbers schools open in village of the state and our Training College. I had to be place placed on the better footing and conducting on the more practical life. In the speed of Higher Education too I had to take up the more work and unfinished. "[11]

जातीव्यवस्था आणि मागासलेपण घालवण्याचे महत्त्वपूर्ण साधन म्हणजे शिक्षण आहे. त्यामुळे प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे आणि मोफत करण्याची अत्यंत आवश्यकता आहे, असे छत्रपती राजाराम महाराजांचे ठाम मत होते. त्यामुळे त्यांनी छत्रपती शाहू महाराजांनी संस्थानामध्ये रोवलेली प्राथमिक शिक्षणाची मूहूर्तमेढ तर कायम ठेवली; पण प्राथमिक शिक्षणाबरोबरच माध्यममिक शिक्षण आणि उच्च माध्यमिक शिक्षण स्तरावर व्यावहारिक ज्ञान मिळाले पाहिजे, आणि मोफत व सक्तीचे शिक्षणाची तरतूद केवळ संस्थानापुरती मर्यादित न राहता तो संपूर्णपणे देशपातळीवर राबवली जावी, असा आग्रह त्यांनी सातत्याने धरला. कारण शिक्षणाचे गरीब हा स्वतःला शोषणमुक्त समाजातून मुक्त करू शकतो, यांवर त्यांचा विश्वास होता.

## १. गाव तेथे शाळा योजना

शाळा ही आधुनिक मूल्यांची निर्मिती असणारी महत्त्वाची संस्था आहे, याबाबत राजाराम महाराजांचे दुमत नव्हते. आधुनिक मूल्याच्या आधारे नागरिकांची जडणघडण करायची असेल, तर गावागावांमध्ये शाळा सुरू करणे गरजेचे आहे आणि ही बाब छत्रपती राजाराम महाराजांच्या

प्राधान्यक्रमाची होती.. आपल्या वडिलांच्या म्हणजेच राजर्षी शाहू महाराजांच्या निधनानंतर त्यांचा वारसा जपत शिक्षण व शिक्षणाच्या आधारे मानवतावादी समाज निर्मिती करणे हा प्राधान्यक्रम होता. ग्रामीण भागातील दलित, बहुजन समुदायाच्या लोकांची संख्या मोठी आहे. त्यांचे एकूणच ग्रामीण भागातील जीवन अतिशय हलाखीचे, मागासलेले व जातिव्यवस्थेने ग्रस्त अशा पद्धतीचे होते. त्यांना जातिव्यवस्थेतून बाहेर काढायचे असेल आणि आधुनिक मूल्ये त्यांच्यामध्ये रुजवायचे तर गावागावांत शाळा सुरू करावी लागेल, त्याशिवाय संस्थानाचा विकास होणार नाही, याची जाणीव छत्रपती राजाराम महाराजांना होती. त्यामुळे त्यांनी 'गाव तेथे शाळा' हे तत्त्व स्वीकारले. या उपक्रमासाठी प्रशिक्षित शिक्षकवर्ग असणे अत्यावश्यक आहे. तसा शिक्षक वर्ग उपलब्ध करण्यासाठी त्यांनी भरपूर खर्चही केलेला होता. राजाराम महाराजांच्या काळात प्रत्येक गावांमध्ये दलित, बहुजन समाजाच्या मुलांच्या शिक्षणासाठी शाळा स्थापन करण्यात आल्या. शाळेसाठी आवश्यक इमारत बांधकामाचा खर्च कोल्हापूर संस्थानाच्या माध्यमातून केला जात असे. अशा अनेक शाळांची निर्मिती राजाराम महाराजांच्या काळामध्ये झाल्याचे दिसते. उदाहरण घ्यायचे, असेल तर 'मोजे कणेरी बोरगाव पेट पन्हाळा या ठिकाणी नवीन शाळा स्थापन करण्याची मंजूरी राजाराम महाराजांनी दिली.' त्यासोबतच त्या शाळेच्या इमारतीसाठी बांधकाम करणे अत्यावश्यक असल्यामुळे राजाराम महाराजांनी त्या शाळेचा बांधकामाचा खर्च कोल्हापूर संस्थेच्या अंतर्गत करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय त्यांच्या काळामध्ये घेतला गेला.[१२] या शाळेतून विद्यार्थ्यांना सक्तीचे मोफत शिक्षण मिळावे म्हणून स्थापना करण्याचा मनोदय राजाराम महाराजांनी व्यक्त केलेला होता व त्यासाठी त्यांनी २८४ रुपये खर्च करण्याची तरतूद कोल्हापूर संस्थानांमध्ये त्यांच्या आर्थिक नियोजनात करण्यात आलेली होती. राजाराम महाराजांच्या काळामध्ये कोल्हापूर संस्थानातील सर्व ग्रामीण भागात व शहरी भागात म्हणजे कोल्हापूर शहरात शाळा स्थापन झाल्या. गाव तेथे शाळा सक्तीचे आणि मोफत शिक्षण या धोरणाची अंमलबजावणी राजाराम महाराजांनी केली. ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबातील व्यक्तींना मोफत व सक्तीचे शिक्षण उपलब्ध असल्यामुळे शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावण्यात आली. ग्रामीण भागात या शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्यामुळे शिक्षणाचे प्रमाण दलित, बहुजन समाजामध्ये खूप मोठ्या प्रमाणात वाढले.

प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण उपलब्ध करून देण्याची संधी कोल्हापूर संस्थानाने घेतली. एकोणिसाव्या शतकात हा क्रांतीकारी निर्णय दलित, बहुजन समाजाच्या जीवनावर परिणाम करणारा अत्यंत दूरगामी व क्रांतिकारक निर्णय होता. शिक्षणाचा फायदा घेऊन हजारो पिढ्या शासकीय आणि प्रशासकीय सेवेत आपले प्रतिनिधित्व करू लागले. शिक्षणामुळे कोल्हापूर संस्थानातील सामान्य माणसाचा विवेक विकसित होण्यात व बौद्धिक विकास होण्यात खूप महत्त्वाची भूमिका पार पडली. प्रचलित शासन व्यवस्थेचा आदर्श राजाराम महाराजांनी घालून दिला. लोककल्याणकारी राज्य शिक्षणाला प्रथम प्राधान्य करून देण्याचे धोरण भारताला घालून देण्यात व एक आदर्श निर्माण करण्यात यश आले.

## २. शाळेसाठी अनुदान उपलब्ध करून देणे

शिक्षण मोफत व सक्तीचे असेल अशी केवळ भूमिका घेऊन चालणार नाही. त्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करून दिला पाहिजे. ग्रामीण भागातील दलित बहुजन जनता अतिशय गरिबीत जीवन जगत आहे. जीवन जगण्यासाठी मूलभूत सुविधेचा अभाव असलेल्या समाजात शिक्षण शिकण्याची व आपल्या मुला–मुलींना शाळेत पाठवण्याचा विचार, तरी कसा येणार व तो विचार यायचा असेल, तर शिक्षण ही सरकारची किंवा शासनाची जबाबदारी असली पाहिजे हे महत्त्व ओळखून राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील किंबहुना कोल्हापूर संस्थानाच्या बाहेरील अशा अनेक शाळांना निधी उपलब्ध करून दिला.

## ३. लोक वाचन ग्रंथालयात प्राधान्य :

छत्रपती राजाराम महाराजांनी लोक वाचनालयांना प्राधान्य दिले होते, लोक वाचक जोपर्यंत होत नाही तोपर्यंत समाजाची प्रगती ही होणार नाही, ही बाब छत्रपती राजाराम महाराजांनी लक्षात घेऊन महत्त्वाच्या सुधारणा केल्या. कोल्हापूर संस्थानाचा विकास हा बौद्धिक आणि आर्थिकदृष्ट्या झाला पाहिजे. जोपर्यंत लोकांचे मानसिक व वैचारिक प्रबोधन होत नाही, लोक विवेकी पद्धतीने विचार करणार नाहीत, तोपर्यंत समाजामध्ये जागरुकता निर्माण होणार नाही. ही बाब लक्षात ठेवून राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक ग्रंथालये सुरू केली. कोल्हापूर संस्थानातील

सामान्य माणसाचा वैचारिक दर्जा जोपर्यंत सुधारत नाही, तोपर्यंत सुधारणा होत नाही. तोपर्यंत कोल्हापूर संस्थानाचा विकास हा खऱ्या अर्थाने होणार नाही, यासाठी महाराजांनी अनेक ठिकाणी ग्रंथालय निर्मिती करून लोकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, यासाठी अनुदानाची सुविधा सुद्धा उपलब्ध करून दिली. राजाराम महाराजांनी ग्रंथालयाला दरवर्षी सहाशे रुपये उपलब्ध करून देण्याची महत्त्वाची योजना हाती घेतली होती. ही योजना हाती घेण्यामागचा उद्देश राजाराम महाराजांना स्पष्ट करताना म्हटले होते की, लोकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी या उदात्त हेतूने ही संकल्पना रुजवण्यात सुरुवात करत असल्याचा दावा केला आहे. इतकेच नाही, तर कोल्हापूर संस्थानात सर्वाधिक प्रमाणात पुस्तक निर्मिती व्हावी व ते पुस्तक सर्वाधिक प्रमाणात वाचले जावे यासाठी राजाराम महाराजांनी खूप मोठ्या प्रमाणात ग्रंथनिर्मितीसाठी अनुदानाची सोय तत्कालीन काळामध्ये करण्यात आली होती. कोल्हापूर संस्थानामध्ये ग्रंथालय स्थापन करण्यासाठी राजाराम महाराजांनी शासकीय स्तरावर खूप मोठ्या प्रमाणात प्रयत्न केल्याचे आपणास दिसते.[१३] कोल्हापुरातील लोकांमध्ये वाचनाची आवड विस्तारली जावी व आपला बौद्धिक विकास व्हावा यासाठी त्यांनी हा प्रयत्न केल्याचे दिसते. महाराजांनी ब्रिटिशांनी केलेल्या भौतिक, सामाजिक, आर्थिक परिस्थितीचा अचूक वेध घेतला. ब्रिटनसारख्या पाश्चिमात्य देशांमध्ये साक्षरता व वैचारिक जडणघडण खूप मोठ्या प्रमाणात विकसित झाल्यामुळे त्या देशातील लोकांचा भौतिक आणि सामाजिक विकास झाला असल्याचे किंबहुना ते वैचारिकदृष्ट्या परिपक्व असल्याचे त्यांना दिसून आले. याच धर्तीवर आपल्या संस्थानातील नागरिकही वैचारिकदृष्ट्या परिपक्व व्हावेत, त्यांचा बौद्धिक स्तर वाढावा, त्यांनी आधुनिक मूल्यांची कास धरावी म्हणून राजाराम महाराजांनी कोल्हापूर ग्रंथालयाची उभारणी करून संस्थांनातील लोक वाचनचळवळ वाढवण्याचा प्रयत्न केला. राजाराम महाराजांचे शिक्षण हे पाश्चात्य देशात झाल्यामुळे त्या ठिकाणी वाचनाचे महत्त्व किती आहे हे त्यांनी त्यांच्या शैक्षणिक कालावधीमध्ये अचूकपणे वेधले आणि त्याच धर्तीवर ग्रंथालयाची चळवळ सुरू केली. 'कोल्हापूर जनरल लायब्ररी या संस्थेस दरबाराकडून दरसाल ६०० रुपये ग्रँट देण्यात येईल'असा आदेश काढण्यात आला.[१४]

## ४. मोफत पुस्तकाचे प्रकाशन :

छत्रपती राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानामध्ये लेखकांना आणि इतिहासकारांना प्रोत्साहित करण्यासाठी मोफत पुस्तक प्रकाशनाचा एक महत्त्वाचा प्रकल्प हाती घेतला होता. शिक्षणाच्या विस्तारामुळे दलित बहुजनांमध्ये एक वैचारिक समृद्धता निर्माण होते व त्यातून एक आत्मभान जागृत होते व त्या प्रेरणेने आपला इतिहास व आपल्या परंपरेकडे चिकित्सक बघण्याची प्रेरणा त्यातून मिळते, ही बाब राजाराम महाराजांच्या लक्षात आली होती. त्यामुळे त्यांनी अनेक नवलेखकांना प्रोत्साहित करण्यासाठी कोल्हापूर संस्थानाच्या माध्यमातून अनेक लेखकांना व इतिहासकारांना आपले पुस्तक कोल्हापूर संस्थानाच्या माध्यमातून मोफत स्वरूपात छापली जाईल ही हमी देऊन अनेकांना प्रोत्साहन दिलेले होते. राजाराम महाराजांनी यासाठी कोल्हापूर संस्थानामध्ये छापखाण्याची सुरुवात व्हावी यासाठी अनुदान देण्यात आलेले होते. छापखाण्याच्या माध्यमातून अनेक पुस्तके प्रकाशित करण्यात महत्त्वाचा हातभार लागला. अनेक लेखक व इतिहासकारांनी प्रेरणा घेऊन मोठ्या प्रमाणात इतिहास लेखनाला व आपल्या प्रेरणास्थान असणाऱ्या समाजसुधारकांना, वैचारिक स्वरूपात व लिखित स्वरूपात आणण्याचे महत्त्वाचे काम केले. अशा कार्याला राजाराम महाराजांनी मोठ्या स्वरूपात पाठिंबा दिला इतकेच नाही, तर लेखकांना व प्रकाशकांना मोठ्या स्वरूपात अनुदानाची तरतूद त्यांनी केली होती.[१५]

## ५. वसतीगृह सुधारणा चालना:

सत्तेची सूत्रे हाती घेतल्यानंतर शाहू महाराजांना ही गोष्ट लक्षात आली की, दलित बहुजन समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण वाढवायचे असेल, तर त्यासाठी शाळेसोबतच वसतिगृह असणे अत्यंत आवश्यक आहे. कोल्हापूर संस्थानामध्ये तत्कालीन सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत गरीब घरातील मुलांना किंवा मुलींना कोल्हापूर संस्थानामध्ये येऊन शिक्षण घेणे अशक्य होते. कोल्हापूर संस्थानामध्ये म्हणजेच कोल्हापूर या शहरांमध्ये शिक्षणासाठी आले, तरी त्यासोबत निवासाची व जेवण्याची सोय होत नसत. त्यामुळे गरीब घरातील व ग्रामीण पार्श्वभूमी असलेल्या लोकांना शिक्षण ही एक त्यांच्या कार्यक्षेत्राच्या बाहेर असलेली गोष्ट वाटत होती. या सर्व पार्श्वभूमीचा आढावा घेत

राजर्षी शाहू महाराजांनी वसतिगृहाची सुरुवात केली. तत्कालीन समाजामध्ये जातिव्यवस्थेचा खूप मोठ्या प्रमाणात प्रभाव होता. त्यामुळे सर्व जाती धर्मातील मुले आणि मुली शिक्षणासाठी कोल्हापूर शहरामध्ये येत असत. समाजात जातीव्यवस्था खोलवर रुजवली असल्याने सर्व जातीधर्मातील मुलामुलींसाठी एकत्र राहण्याची सुविधा असणे सर्वसामान्य लोकांना पचू शकेल, अशी परिस्थिती त्या काळात नव्हती. साहजिकच शाळा आणि वसतीगृहाचा नकारात्मक परिणाम झाला असता. असे नकारात्मक परिणाम टाकून संस्थानातील नागरिकांमध्ये शिक्षणाचे प्रमाण जास्तीत जास्त वाढावे याउद्देशाने शाहू महाराजांनी जातनिहाय वसतिगृहाची सोय उपलब्ध करून दिली. राजर्षी शाहू महाराजांनी वसतीगृह उभारणीची ही चळवळ कोल्हापूर संस्थानापुरती मर्यादित केली नाही, तर त्यासोबतच पुणे, नगर, नागपूर, अमरावती यांसारख्या शहरांमध्येही वसतीगृहे उभारण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणात हातभार लावला. त्यामुळे गरीब घरातील मुलामुलींना शिक्षण घेणे शक्य झाले. या वसतीगृहाच्या चळवळीमुळे शिक्षणाचे प्रमाण बरेच वाढले. शिवाय समाजात वंचित शोषित घटक असलेल्या समुदायांतील मुलांना शिक्षणांची संधी उपलब्ध होऊ शकली. ही चळवळ चालू असताना शाहू महाराजांचे अकल्पित निधन झाले. त्यांच्या निधनानंतर राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतली. वसतीगृह बांधण्याचे काम परत अविरतपणे सुरू झाले. कोल्हापूर संस्थानामध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या काळामध्ये जिथे अनेक मोठी वसतिगृहे बांधण्यात आली होती. ती वसतिगृहे कालानुरूप नष्ट होण्याच्या दिशेने जात होती, जे वसतिगृह राहण्यासाठी व अभ्यासासाठी निरुपयोगी होते, अशा वसतिगृहाला राजाराम महाराजांनी डागडुजी करून किंवा वसतिगृह दुसऱ्या ठिकाणी उपलब्ध करून देऊन ते वसतिगृह चालू करण्याचा महत्त्वाकांक्षी निर्णय घेतलेला होता. छत्रपती राजाराम महाराज एका वसतिगृहाच्या बांधकामाच्या उद्घाटनाच्या वेळी बोलताना म्हणाले होते की, "As you proceed we have the student hostel on both side which embody the great idea which my late father had before him all his they represent in a physically from the noble endeavour which he made for giving new life to some of the backward community in my state the hostels are communal but they are cosmopolitans in such as much as they do their educational work incomplete brotherhood the Maratha Jain and the Lingayat and Prabhu and the Saraswat representing various cultures all we all

working together as a sister community engaged in the pursuit of the common idea which inspire very one of them"[१६]

वसतिगृह प्रामुख्याने मागास समुदायातील मुलांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. मागास समुदायामध्ये शिक्षणाचे प्रमाण खूप कमी आहे. त्याचे कारण या व्यवस्थेतील आर्थिक दरी ही आहे, त्यामुळे वसतिगृहासारख्या महत्त्वाच्या माध्यमातून मागास जातीतील मुले व इतर जातीतील मुले एकत्र येऊन शिक्षण घेतील व आपल्या वेगवेगळ्या सांस्कृतिक व सामाजिक मूल्यांची देवाण–घेवाण करून नवीन समाज निर्मितीसाठी प्रयत्न करतील, असा आशावाद छत्रपती राजाराम महाराजांनी व्यक्त केलेला आहे.

**६. शैक्षणिक कर्ज मुदतवाढ :**

छत्रपती राजाराम महाराजांनी ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणामध्ये विशेषतः उच्च शिक्षणामध्ये संधी प्राप्त व्हावी, म्हणून शैक्षणिक कर्ज सुविधा उपलब्ध करून दिली. शैक्षणिक कर्ज उपलब्ध होणे ही एक ग्रामीण भागातील दलित–बहुजन समाजातील तरुणांसाठी उच्च शिक्षणासाठीची एक संधीच होती आणि या संधीचा फायदा घेत अनेक विद्यार्थ्यांनी शैक्षणिक कर्ज घेऊन उच्च शिक्षण प्राप्त करून उच्च शिक्षणातून मिळणाऱ्या लाभातून ते कर्ज परत केल्याचे कोल्हापूर संस्थानांमध्ये अनेक महत्त्वपूर्ण घटना आपल्याला दिसतील. अनेक विद्यार्थ्यांना आपण घेतलेल्या शैक्षणिक कर्जाची परतफेड वेळेवर करणे अशक्य होत असे. शिवाय त्यांना उच्च शिक्षणात फारशा प्रमाणात यश मिळाले नसेल, तरीही अशा विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज फरतफेडीचा कालावधी वाढवून देत असत. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी मिळत असे व ते विद्यार्थी चांगले शिक्षण घेऊन आपल्या पायावर उभे राहात. अशा वेळी आपण घेतलेल्या शैक्षणिक कर्जाची परतफेड करत असत. त्यामुळे कर्जाचा कालावधी वाढवून मिळणे ही आर्थिकदृष्ट्या गरीब समाजातील तरुण तरुणींसाठी एक अत्यंत महत्त्वाची सवलत होती. या सवलतीचा फायदा करून घेतलेल्यांनीही संस्थानाच्या विकासात आपले मोलाचे योगदान दिले.[१७] ''डॉक्टर गजानन विठ्ठल देसाई या डेंटल सर्जन असलेल्या पुण्यातील विद्यार्थ्याला पुढील शिक्षणासाठी अमेरिकेत जायचे

होते. त्यासाठी येणाऱ्या खर्चासाठी छत्रपती राजाराम महाराजांनी सात हजार रुपये बिनव्याजी कर्ज उपलब्ध करून दिले. कर्जाची परतफेड करताना त्याला शेवटचा हप्ता वेळेत भरणे अशक्य झाले, तेव्हा त्याला पुन्हा एकदा कालावधी वाढवून देण्यात आला.'' दुसरा एक विद्यार्थी डॉक्टर बी.जी. शिंदे यांना उच्च शिक्षणासाठी एक वर्षभर पगारी अभ्याससुट्टी पाहिजे होती. छत्रपती राजाराम महाराजांनी त्यांची सुट्टी मान्य केली. अशा धोरणाचा संस्थानाविषयी नागरिकांच्या मनावर दूरगामी परिणाम झाला. शिवाय कोल्हापूर संस्थानातील दलित व बहुजन समाजातील मुले आणि मुली उच्च शिक्षणामध्ये परदेशी शिक्षणात जाऊ लागले. त्यासोबतच त्यांना वैद्यकीय किंवा तत्सम क्षेत्रांमध्ये शिक्षणाची संधी देण्यात आली.

### ७. दलित आणि बहुजन विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क मुक्त आणि मोफत पुस्तके:

दलित बहुजन समाजामध्ये दारिद्र्याचे प्रमाण खूप होते, त्यामुळे जीवन जगण्यासाठी होत असलेल्या सर्व परिस्थितीची जाण ठेवून दारिद्र्य नष्ट करणे हा शाहू महाराजांचा व नंतर छत्रपती राजाराम महाराजांच्या जीवनाचा अंतिम उद्देश होता. त्यामुळे सामान्य माणसाच्या जीवनामध्ये येणाऱ्या अडीअडचणी सोडवत सामान्य माणसाच्या जीवनामध्ये एक सुखमय व भौतिक जीवनाची संधी उपलब्ध करून देण्यात महत्त्वाचे योगदान दिले. दलित–बहुजन समाजात शिक्षणाचे प्रमाण वाढावे, हा समुदाय शिक्षणाच्या प्रवाहात यावा, तसेच शिक्षणाच्या माध्यमातून आपल्या जीवनाचे प्रश्न सोडवावेत, यासाठी आवश्यक ती सर्व मदत छत्रपती राजाराम महाराज करत असत. त्याचाच एक भाग म्हणून मोफत शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. मात्र शिक्षणासाठी लागणाऱ्या शालेय साहित्यासाठी लागणारा खर्च परवडणारा नाही, म्हणून कुणी शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी शाळेची पुस्तके आणि पंचवीस रुपये अनुदान देण्यासारखा उपक्रम छत्रपती राजाराम महाराजांनी हाती घेतला. परिणामस्वरूप समाजातील दुर्लक्षित आणि वंचित घटकांनासुद्धा शिक्षणाची संधी उपलब्ध होऊ शकली.''[१८]

### ८. शाळेसाठी इमारतीचे मोफत बांधकाम :

गाव तेथे शाळा हा उपक्रम राजाराम महाराजांनी घोषित केला तरी गावागावामध्ये शाळांसाठी लागणाऱ्या इमारती उभारणे गरजेचे होते. ही शाळा इमारत शासनाकडून मोफत स्वरूपात बांधले जाई आणि त्या इमारतीतून मोफत आणि सक्तीचे शिक्षण मिळत असल्याने समाजातील अनेक घटक शिक्षणाच्या प्रवाहात येऊ लागले. गाव तिथे शाळा आणि गाव तेथे शिक्षण हे छत्रपती हे स्वप्न राजाराम महाराजांनी उराशी बाळगले होते. ते प्रत्यक्षात आणण्यात मोफत शाळा बांधणीच्या योजनेनेही महत्त्वाचा हातभार लावला. कारण अनेक ठिकाणी पावसामुळे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे शाळेची इमारत उध्वस्त होणे वा शाळेची इमारत पडण्यासारख्या घटना घडत. अशा इमारतीचे बांधकाम कोल्हापूर संस्थानाच्या माध्यमातून केले जावे, असा आदेश राजाराम महाराजांनी दिला होता. साहजिकच एखाद्या शाळेतील इमारत पडली असेल, तर त्या शाळेच्या इमारतीचे बांधकाम सुद्धा कोल्हापूर संस्थान करीत असे. हे तत्त्व छत्रपती राजाराम महाराजांनी स्वीकारलेले होते. काही घटना सांगता येतील, उदाहरणार्थ, 'वडगाव येथील मुलांची शाळा पडली होती. त्या शाळेकरिता नवीन शाळा बांधण्यासाठी सरकारकडून चार एकर जमीन उपलब्ध करून देण्यात आली. त्यासाठी बांधकामाचा जो काही आहे तो खर्च यांच्या निधीतून मंजूर करण्यात आला.'[१९] त्यामुळे अशा योजनांतून शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार मोठ्या प्रमाणात झाला.

### ९. शाळेकरिता गायरानातील जमीन मोफत :

'गाव तेथे शाळा' हे तत्त्व घेऊन छत्रपती राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानाचा शैक्षणिक विस्तार केला. सर्वांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण या शैक्षणिक विस्ताराचा व्यापक उद्देश होता. शाळेच्या बांधकामाचा खर्च कोल्हापूरच्या संस्थानाच्या तिजोरीतून केला जात होता. इतकेच नाही, तर ज्या ठिकाणी शाळेला जागा उपलब्ध नाही, त्या ठिकाणी कोल्हापूर संस्थानातील गायरान जमीन ही त्या शाळेच्या बांधकामासाठी देण्यात येत होती. छत्रपती राजाराम महाराजांनी 'कुंभोज येथे शाळेची इमारत बांधण्याकरिता जागा उपलब्ध नव्हती. तेव्हा राजाराम महाराजांनी शाळेकरिता गायरानातील चार एकर जागा बांधकामासाठी उपलब्ध करून दिली.[२०] त्यासोबतच त्या

शाळेकरिता बांधकामासाठी जो काही निधी उपलब्ध करून देण्याची गरज वाटत होती, तो सुद्धा इमारतीच्या कामांसाठी आवश्यक तेवढा निधीही त्यांनी उपलब्ध करून दिला.' त्यामुळे छत्रपती राजाराम महाराजांनी दूरदृष्टी ठेवून शिक्षण सुविधा उपलब्ध केल्या. त्यामुळे संस्थानाचा शैक्षणिक विकास साधून समाजात आमूलाग्र परिवर्तन होऊ शकले.

### **१०. खाजगी शाळेसाठी अनुदान :**

कोल्हापूर संस्थानामध्ये सरकारी आणि खाजगी शाळा होत्या. खाजगी शाळेचा खर्च हा प्रामुख्याने खाजगी संस्थाचालकाच्या माध्यमातून केला जात असे. अनेक खाजगी शाळेचे संचालक खाजगी शाळेचा खर्च करून शिक्षणामध्ये योगदान देत असत. खाजगी शाळेच्या संचालनालयामुळे शिक्षणाचा प्रसार आणि विस्तार होण्यामध्ये खूप महत्त्वाची मदत झाली. खाजगी शाळा संचालक अनेक वेळा निधीच्या अभावी किंवा अनुदानाच्या अभावी शाळा तेवढ्या गुणात्मक दर्जाच्या पातळीवर चालवू शकत नव्हते, त्यामुळे त्याच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होत होता. सर्वांना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी या उदात्त भूमिकेतून छत्रपती राजाराम महाराजांनी अशा अनेक शैक्षणिक खाजगी शाळांना अनुदान देण्याची महत्त्वपूर्ण भूमिका घेतली. यामुळे शाळेचा गुणात्मक दर्जा व शैक्षणिक दर्जा कायमच चांगला राहील व कोल्हापूर संस्थानमधील कोणीही शिक्षणापासून वंचित राहणार नाही, याची दखल नेहमीच घेतली गेली. त्यापैकीच एक उदाहरण म्हणजे 'जयसिंगपूर येथील रामचंद्र यशवंत देसाई हे शाळा संचालक होते. त्यांना शाळेसाठी किंबहुना संस्थेसाठी चारशे रुपये अनुदान छत्रपती राजाराम महाराजांनी दिले.'[२१]

### **११. स्कॉलरशिपची सुविधाः**

कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे होते. त्यासोबतच माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणावर छत्रपती राजाराम महाराजांचे विशेष लक्ष होते. शिक्षणात कौशल्याचा अभाव असेल, तर ते शिक्षण मानवी जीवनामध्ये पुरेशा प्रमाणात मूल्य निर्माण करू शकत नाही. त्यामुळे शिक्षणासोबत कौशल्याचा विकास झाला पाहिजे. कौशल्यआधारित शिक्षणाची संधी समाजातील विविध घटकांना उपलब्ध झाली, तर त्यांना रोजगारही उपलब्ध होईल आणि

त्यातून आपला विकास साधू शकतील, हा विश्वास छत्रपती राजाराम महाराजांना होता. त्यामुळे छत्रपती राजाराम महाराजांनी तांत्रिक किंवा कौशल्ये आधारित शिक्षणाचे प्रमाण जास्तीत जास्त वाढविण्यासाठी किंवा विद्यार्थ्यांचा कल कौशल्यआधारित शिक्षणाच्या दिशेने जाण्यासाठी स्कॉलरशिपची सुविधा उपलब्ध करून दिली. स्कॉलरशिपच्या सुविधेमुळे मुलांमध्ये शिक्षणाबद्दलची गोडी निर्माण होते. त्यातूनच तांत्रिक कौशल्याच्या शिक्षणामध्ये जास्तीत जास्त प्रमाणात मुलांचा व मुलींचा प्रवेश घेतला जाऊ शकतो. ही भूमिका घेऊन छत्रपती राजाराम महाराजांनी स्कॉलरशिप मंजूर केली. 'शाहू शेतकी शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप देण्यात आलेली होती.'[२२] त्या स्कॉलरशिपच्या माध्यमातून मुलांनी खूप मोठ्या प्रमाणात अभ्यास करावा आणि प्रगती करावी, अशी त्यामागची भावना होती.

### १२. स्त्री शिक्षणात प्राधान्य:

छत्रपती राजाराम महाराजांनी मुलांच्या शिक्षणासोबतच मुलींच्या शिक्षणाला प्राधान्य दिले. हीच बाब कोल्हापूर संस्थानाचा एक व्यापक अर्थाने विकास करण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली. मुलांच्या शिक्षणासोबतच मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण जास्तीत जास्त वाढले पाहिजे, ही बाब छत्रपती राजाराम महाराजांच्या लक्षात आली होती. साहजिकच सर्व समुदायातील मुलींना शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी यांसाठी खास मुलींसाठी वसतिगृहे उभारली. शिवाय मुलींचे शिक्षण ही प्राधान्याची बाब 'महाराणी लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूल'ची स्थापना केली. त्यामध्ये शिक्षकांनी मुलींच्या शिक्षणासाठी अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यात महत्त्वाचा हातभार लावला होता.[२३] त्या सोबतच इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे शिक्षण घेण्यात विद्यार्थिनींचाही सहभाग वाढला. साहजिकच शिक्षणामध्ये व्यापक अर्थाने समानता प्रस्थापित होण्यात खूप महत्त्वाचा हातभार या धोरणामुळे लागला.

### १३. ओब्रायन टेक्निकल स्कूल, १९२८

छत्रपती राजाराम महाराजांना कोल्हापूर संस्थांनामध्ये वाढत असलेला औद्योगिक विकास, त्यासोबतच उद्योगाचा विकास यासाठी कौशल्यावर आधारित मनुष्यबळाची आवश्यकता होती. ही

गरज लक्षात ठेवून राजाराम महाराजांनी १९२८ मध्ये 'ओब्रायन टेक्निकल स्कूल'ची स्थापना केली. व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करता यावीत यासाठी राजाराम महाराजांनी या शाळेची स्थापना केली. या शाळेच्या माध्यमातून मुलांना औद्योगिक व व्यापारी क्षेत्रांमधल्या अनेक घटकांच्या प्रात्यक्षिकांच्या आधारे शिक्षण घेता येईल एवढा उदात्त हेतू ठेवून ही शाळा चालू करण्यात आली. कोल्हापूर संस्थानामधील अनेक गरीब घरातील शोषित, वंचित मुलं–मुली या शाळेत प्रवेश घेऊन कौशल्यआधारित शिक्षण घेत होती. संस्थानाच्या विकासासाठी लागणारे कौशल्याआधारित मनुष्यबळाची गरज पूर्ण करीत होती. साहजिकच यातून संस्थानाचा आर्थिक विकास साधण्याचा मोठा प्रयत्न झाल्याचे दिसते. राजाराम महाराजांना पुस्तकी ज्ञानापेक्षा व्यवहारिक ज्ञान याच्यावरती जास्त विश्वास होता. ही शाळा चालू केल्यानंतर कोल्हापूर संस्थानातील प्रमुख आर्थिक खर्चामध्ये या शाळेचा सुद्धा समावेश करण्यात आला. या शाळेमुळे कोल्हापूरच्या अनेक विद्यार्थ्यांनी तांत्रिक शिक्षणाचा लाभ घेतला आणि कौशल्यआधारित शिक्षण मिळवून औद्योगिक व व्यापारी क्षेत्रात भरीव योगदान दिले. कारण यात शिक्षणाला कौशल्याची जोड मिळल्याने त्या कौशल्याच्या जोरावर अनेकांनी आपआपला व्यवसाय सुरू केला, तर कौशल्यप्राप्त व्यक्ती त्या त्या क्षेत्रात नोकरी मिळवू शकली. यातून कोल्हापूरच्या संस्थानाच्या आर्थिक विकासाला चालना मिळू शकली. राजाराम महाराजांचा दुसरा एक महत्त्वाचा दृष्टिकोन म्हणजे व्यवसायाच्या क्षेत्रामध्ये कोल्हापूर संस्थानातील मुलांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. यासाठी पुढाकार घ्यायचा असेल, तर त्यासाठी प्रामुख्याने दोन अडचणींना सामोरे जावे लागत होते. व्यावसायिक कौशल्याचा अभाव आणि दुसरे भांडवल. या दोन्ही गरजा पूर्ण करत राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील अनेक मुला–मुलींना व्यवसायाचे व व्यावसायिक कौशल्य आत्मसात करण्याचे या शाळेच्या माध्यमातून प्रयत्न केल्याचे दिसते.[२४]

### १५. कौन्सिल ऑफ लीगल एज्युकेशन, १९३२

राजाराम महाराजांच्या काळामध्ये कायद्याचे आणि आधुनिक लोकशाहीचे वारे जगभरामध्ये आणि भारतामध्ये वाहत होते. त्यामुळे कायद्याचा अभ्यास हा अत्यावश्यक बनलेला होता. ब्रिटिशांनी स्थानिक स्वराज्य संस्था १९१९ चा कायदा आणि १९३५ चा कायदा केला. या

कायद्याद्वारे कोल्हापूर संस्थानावरही अनेक महत्त्वाच्या अटी लादण्यात आल्या. कायद्याचे ज्ञान संपादन करायचे असेल, तर त्यासाठी ब्रिटिश सरकार किंवा ब्रिटिशांचा राजकीय एजंट यांच्यावर अवलंबून रहावे लागत होते. ही उणीव भरून काढण्यासाठी राजाराम महाराज यांनी '१९३२ मध्ये 'कौन्सिल ऑफ लीगल एज्युकेशन'ची स्थापना केली.'[२५] या संस्थेच्या स्थापनेमुळे कोल्हापूर संस्थानामध्ये कायद्याचा अभ्यास करण्यासाठी चालना मिळणार होती. हा उद्देश ठेवून राजाराम महाराजांचे कोल्हापूर संस्थानामध्ये सुरू केलेल्या शिक्षण संस्थेत कायद्याचे शिक्षण किंवा पदवी संपादन करण्यासाठी अनेक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. राजाराम महाराज यांच्या दूरदृष्टीमुळे कोल्हापूर संस्थानातील कायदेतज्ज्ञ व वकील यांचे योगदान कोल्हापूरच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रामध्ये खूप मोठे राहिलेले आहे. ते केवळ या कॉलेजच्या स्थापनेमुळे, शिक्षणाची संधी उपलब्ध असल्यामुळे इतका विकास करणे शक्य झाले.

### १६. महाराणी ताराबाई टीचर ट्रेनिंग कॉलेज, १९३४

१९३४ मध्ये 'महाराणी ताराबाई टीचर ट्रेनिंग कॉलेज'ची स्थापना करून राजाराम महाराज यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये शिक्षणाचे जाळे जास्तीत जास्त विस्तारण्याचा प्रयत्न केला. दलित बहुजन समाजातील अनेक मुलं–मुली शिक्षणामध्ये सक्रिय सहभाग नोंदवू लागले. गावोगावांमध्ये शाळा सुरू करण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक हे उपलब्ध होणे आवश्यक होते. ही उणीव आधुनिक शिक्षण घेतलेल्या राजाराम महाराजांसारख्या राजांना वाटणे स्वाभाविकच होते. ग्रामपंचायत तालुका किंवा कोल्हापूर संस्थानामध्ये प्रत्येक ठिकाणी शिक्षकाची गरज होती. त्यामध्येही शिक्षक प्राधान्यक्रमाने उपलब्ध होणे गरजेचे होते. म्हणून या शाळेची, कॉलेजची स्थापना राजाराम महाराजांनी केली. या कॉलेजला नंतर मुंबई विद्यापीठाशी संलग्न करण्यात आले. हे कॉलेज कोल्हापूर संस्थानामध्ये आणि मुंबई विद्यापीठमधील पहिले कॉलेज होते. कॉलेजमधून शिक्षक बनण्याचे आधुनिक ज्ञान आणि तंत्रज्ञान आत्मसात करण्याची संधी कोल्हापूर संस्थानांमधील किंबहुना त्या बाहेरील मुला–मुलींना प्राप्त झाले. त्यासाठी शिक्षकांना केवळ पुस्तकी ज्ञान असून चालत नाही, तर प्रात्यक्षिक ज्ञान घ्यावे, यासाठी त्यांनी 'मॉडेल हायस्कूल'ची स्थापना केली, जी या कॉलेजच्याच इमारतीच्या खालच्या बाजूला होती. मॉडेल हायस्कूलमध्ये येणाऱ्या शिक्षकांना

शिकवण्याची संधी म्हणजेच शिक्षक बनण्यासाठी प्रात्यक्षिक ज्ञानाचा व्यवहार म्हणून या शाळेमध्ये शिकवण्याची संधी घेतली.[२६] या कॉलेजमधून अनेक नामवंत शिक्षक निर्माण होऊन ग्रामीण भागामध्ये शिक्षणाचे जाळे विस्तारण्यात व शिक्षणाचे प्रमाण वाढवण्यात महत्त्वाची भूमिका पार पडली. हे राजाराम महाराजांच्या दृष्टिकोनातून घेतलेला निर्णय होता. याची फळे अनेक पिढ्या कोल्हापूर संस्थानातील लोकांनी घेतली आहेत.

## १७. श्री महाराणी लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूल, १९२९

कोल्हापूर संस्थानामध्ये मुलींच्या शिक्षणात लक्षणीय अर्थाने प्रगती झाली पाहिजे हे राजाराम महाराजांनी लक्षात ठेवले होते, त्यासाठी त्यांनी अनेक शाळा स्थापन केल्या. जास्तीत जास्त मुलींना शिक्षणासाठी संधी उपलब्ध व्हावी व शिक्षणाच्या प्रवाहामध्ये मुलींचे सुद्धा योगदान असावे, या एका महत्त्वाकांक्षी प्रकल्पाच्या भावनेने राजाराम महाराजांनी मुलींची शाळा चालू केली. या शाळेत मुलींना सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे कामसुद्धा राजाराम महाराजांनी पूर्ण केले. मुलींच्या शैक्षणिक खर्चामुळे अनेक पालक त्यांना शाळेत पाठवत नाहीत. किंबहुना मुलींच्या शिक्षणाकडे खर्चिक बाब म्हणून दुर्लक्ष केले जाते. हे शाहू महाराजांनी वेळीच लक्षात घेतले होते. तितक्याच तत्परतेने त्यांनी पुढाकार घेऊन मुलींची शाळा, शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'श्री महाराणी लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूल सुरू केले.'[२७] या शाळेमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थिनींची संख्या मोठी होती. याच शाळेतून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांनींनी उच्च शिक्षणही घेतले आणि शासकीय आणि बिगर शासकीय क्षेत्रातील अनेक पदावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला.

## १८. विज्ञान शाखेत शिक्षणास प्रोत्साहन

राजाराम महाराजांनी विज्ञान शाखेच्या शिक्षणास सर्वाधिक प्रोत्साहन दिले. कोल्हापूर संस्थानामध्ये प्रामुख्याने राजाराम कॉलेज हे एकच कॉलेज होते, ज्या माध्यमातून मुलांना आणि मुलींना कला शाखा आणि विज्ञान शाखांचे शिक्षण घेता येत होते; पण ज्यांची इच्छा विज्ञान शिकण्याची असते त्यांना विज्ञान शाखेमध्ये प्रवेश मिळणे अवघड होत होते. ही जाणीव व माहिती

राजाराम महाराजांना झाली. त्यामुळे त्यांनी विज्ञान शाखेस प्रवेश देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. त्यासाठी लागणाऱ्या शिक्षकांच्या, प्राचार्य यांच्या नेमणूका कोल्हापूर संस्थानाच्या माध्यमातून कला, विज्ञान शाखेसाठी लागणारी प्रयोगशाळासुद्धा कोल्हापूर संस्थानाच्या माध्यमातून देण्यात आल्या. त्यामुळे ग्रामीण भागातील गरीब आणि वंचित घटकातील मुला–मुलींना विज्ञान शाखेत प्रवेश घेणे सोपे झाले. त्यासोबतच ज्यांची इच्छा विज्ञान शाखेत शिकण्याची होती, पण त्यांना संधी मिळत नव्हती ही संधी राजाराम महाराजांनी सर्व मुलामुलींसाठी उघड करून सर्वांना विज्ञान शाखेत प्रवेश घेण्याची इच्छा पूर्ण केली. राजाराम महाराजांच्या धोरणामुळे प्रामुख्याने अतिशय सकारात्मक परिणाम झाला नगरपासून धारवाडपर्यंत आणि जमखंडीपासून ते रत्नागिरीपर्यंत ग्रामीण भागातील मुला–मुलींची विज्ञान शिकण्याची इच्छा यामुळे पूर्ण झाली.[२८] अनेक मुलं–मुली वैज्ञानिक शास्त्रज्ञ किंवा इतर महत्त्वाच्या पदावर गेले ते विज्ञान शाखेच्या विस्तारामुळे व विज्ञान तुकडीची सुरुवात करण्यामुळे झाले. आणि हे योगदानही राजाराम महाराजांचे होते.

### १९. वसतिगृह चळवळींना चालना :

शाहू महाराजांनी वसतिगृह चळवळीचा खूप मोठ्या प्रमाणात विस्तार केला. त्यामुळे ग्रामीण भागातील दलित–बहुजन समाजातील मुला–मुलींना शिक्षण घेणे हे सहज शक्य झाले. हाच वारसा पुढे चालवण्याचे काम राजाराम महाराजांनी केले. त्यासाठी त्यांनी अनेक वसतिगृह बांधण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला. हे शाहू महाराजांचे धोरण राजाराम महाराजांनी अतिशय प्रामाणिकपणे पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न कोल्हापूर संस्थानाच्या कार्यक्षेत्रामध्ये केला. अनेक मुला–मुलींसाठी वसतिगृह बांधून त्यांना प्राथमिक माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणासाठी चालना दिली. राजाराम महाराजांनी शाहू महाराजांचा वारसा पुढे चालवत वसतिगृह चळवळीला कोल्हापूर संस्थानामध्ये आणि कोल्हापूर संस्थानाच्या बाहेर चालना दिली. राजाराम महाराजांना दलित वंचित घटकांसाठी एक आपुलकी व सहानुभूती होती. त्यामुळे त्यांनी वसतिगृह चळवळीला खूप मोठ्या प्रमाणात चालना दिली. कोल्हापूर संस्थानांतर्गत अनेक वसतिगृहाची स्थापना केली. त्यासाठी आवश्यक निधी त्यांनी कोल्हापूर संस्थानाच्या आर्थिक तरतूदीमध्ये उभारण्याचा प्रयत्न केला.

इतकेच नाही, तर कोल्हापूर संस्थानाबाहेर अनेक शहरांमध्ये वसतिगृहे स्थापण्यासाठी आर्थिक मदत केली. नागपूर या ठिकाणी नवीन वसतिगृह व्यवस्थापनासाठी राजाराम महाराजांनी पुढाकार घेऊन, त्या ठिकाणी वसतिगृह चालू केले. अहमदनगरमध्ये नवीन वसतिगृह स्थापनेसाठी खूप प्रयत्न केले. आर्थिक मदत, प्रसंगी इमारत भाड्याने घेऊन चालू ठेवण्याचा व सुरू करण्याचा एक क्रांतिकारी निर्णय राजाराम महाराजांनी घेतला. 'पंढरपूर या ठिकाणी महाराणी लक्ष्मीबाई मराठा बोर्डिंग, पंढरपूर यांना त्यांनी आर्थिक मदत केली.' संस्थांना अंतर्गत आर्थिक तरतूदीची मदत करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय त्यांनी घेतला. 'डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'ऑल इंडिया डिप्रेस असोसिएशन'ला आर्थिक मदत केली.' ज्यामुळे अस्पृश्य समाजातील मुलं–मुली मुख्य प्रवाहामध्ये येतील व त्यांचा विकास होईल ही त्यामागची व्यापक भूमिका होती.[२९]

## २०. सक्तीचे, मोफत शिक्षण आणि स्त्रियांना शिक्षण

राजर्षी शाहू महाराजांनी पहिल्यांदा जगाच्या इतिहासात आणि भारताच्या इतिहासामध्ये सक्तीचा आणि मोफत शिक्षणाचा कायदा केला. ही त्या कायद्याच्या माध्यमातून गरीब वंचित घटकांनी शिक्षण घेतले पाहिजे. हा त्यामागचा उद्देश होता. हीच पार्श्वभूमी लक्षात ठेवून राजाराम महाराज यांनी सुद्धा गरिबांसाठी आणि वंचितांसाठी सक्तीचे आणि मोफत शिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी आपल्या कोल्हापूर संस्थानाच्या एकूण अर्थसंकल्पाच्या १५ टक्के खर्च केला. यामुळे गरीब आणि वंचित घटकातील मुला–मुलींना शिक्षणाच्या संधीमुळे मुख्य प्रवाहात येण्यास व आपले कौशल्य विकसित करण्याची संधी मिळाली. ती केवळ राजाराम महाराजांच्या एकूण दूरदृष्टीमुळे मिळाली हे वास्तव नाकारता येत नाही. राजाराम महाराजांनी अनेक स्कॉलरशिप, वसतिगृहे किंवा शाळेची सुरुवात करून ग्रामीण भागातल्या प्रत्येक व्यक्तीला शिक्षणाचा हक्क बजावता यावा यासाठी यंत्रणा तयार केली. या यंत्रणेच्या माध्यमातून ग्रामपंचायत, इलाका पंचायत यांनी संस्थानाच्या माध्यमातून शिक्षणाची जबाबदारी अधिक वेगाने पुढे नेली. प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे हा राजाराम महाराजांचा घोषित कार्यक्रम होता. कोल्हापूर संस्थानांमधील कोणताही मुलगा किंवा मुलगी शिक्षणापासून वंचित राहता कामा नये याची पुरेपूर काळजी राजाराम महाराजांनी केली. त्याकाळी असलेल्या बालविवाहासारख्या कुप्रथेमुळे अनेक मुला–मुलींना शिक्षणाची संधी नाकारली

जात होती. राजाराम महाराजांना ही गोष्ट लक्षात आली आणि त्यांनी बालविवाह प्रतिबंध कायदा तयार करून कोणताही बालविवाह होणार नाही, याची पुरेपूर काळजी घेतली. मुलांना आणि मुलींना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अनेक धोरणात्मक कायदे केले. त्याचाच फायदा कोल्हापूर संस्थानामध्ये प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणामध्ये आणि एकूण शिक्षणाच्या प्रमाणामध्ये जास्त गतिशीलता राजाराम महाराजांच्या काळात झालेली दिसते.

### २१. व्यावसायिक शिक्षणाला प्राधान्य

भारतीय समाज जातीग्रस्त समाज आहे. जातीच्या आधारे उच्चनीचता व शोषण होते. जातीवर आधारित व्यवसाय आहे. ते व्यवसाय कर्मपाकाच्या किंवा जन्मावर आधारित आहेत, असे बिंबवण्याचा प्रयत्न भारतातील धर्मशास्त्रांनी नेहमीच केला आहे. त्यामुळे गरीब घरातील हुशार मुलगा, मुलगी यांना आपल्या शिक्षणाच्या आणि गुणवत्तेच्या आधारे वर जाण्याची संधी मिळत नसे. ही बाब राजाराम महाराजांच्या लक्षात आली होती. समाजातील या शोषित आणि वंचित घटकांना शिक्षण आणि रोजगाराची समान संधी मिळण्याच्या हेतूने राजर्षी शाहू महाराजांनी शिक्षणामध्ये आणि प्रशासकीय भरतीमध्ये अशा घटकांसाठी आरक्षण ठेवण्याचा निर्णय घेतला. शाहू महाराजानंतर राजाराम महाराजांनी हाच वारसा पुढे चालवत सर्वांना आधुनिक शिक्षण प्रक्रियेत सहभागी होता यावे आणि आधुनिक तंत्रज्ञानाआधारे कौशल्ये आत्मसात करून आत्मनिर्भर होण्याची समान संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने व्यावसायिक आणि कौशल्याआधारित शिक्षणाला प्राधान्य दिले. राजाराम महाराज हे दूरदृष्टीचे नेते होते. कोल्हापूर संस्थान, किंबहुना कोल्हापूर संस्थानाच्या बाहेर अठरापगड जातीचा विकास झाला पाहिजे, त्यांच्या पारंपरिक व्यवसायाला आधुनिक शिक्षणाची जोड मिळाली पाहिजे ही व्यापक आणि उदात्त भूमिका घेऊन राजाराम महाराजांनी अनेक धाडसी आणि क्रांतिकारी निर्णय घेतले. त्यापैकी एक म्हणजे घरात पारंपरिक कौशल्य असलेल्या विद्यार्थ्यांना आपल्या कौशल्याचा विकास आधुनिक तंत्रज्ञानाआधारे करता यावा, या हेतूने शेतकी, सुतार, लोहार वगैरे सारख्या व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू करण्याचा निर्णय होता. अशा प्रकारच्या व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या शाळांची गरज लक्षात

घेऊन राजाराम महाराजांनी १९२७ ला 'श्री शाहू छत्रपती फंडा'तून चार शाळा बांधल्या ज्या प्रामुख्याने शिरोळजवळ आहेत. त्यासाठी त्यांनी तीन हजार रुपयांची तरतूद केली.[३०]

## २२. शेतकी शिक्षणाची मोफत सोय

कोल्हापूर संस्थानामध्ये राजाराम महाराजांनी शेतकी शिक्षणाची मोफत सोय केली होती. राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील जनतेसाठी १९३५–३६ मध्ये नवीन विद्यार्थ्यांना श्री शाहू शेतकी शाळेत मोफत शिक्षणाची सोय करण्याची नोटीस जाहीर केली होती. त्यासाठी त्यांनी काही नियम व अटी टाकल्या होत्या, त्या खालील प्रमाणे :

१. विद्यार्थी हा संस्थानातील प्रजाजन असावा,
२. विद्यार्थी हा प्रत्यक्ष शेतकरी वर्गापैकी किंवा जमीनदार वर्गापैकी असल्यास त्यास इतरांपेक्षा अगोदर पसंत करण्यात येईल.
३. विद्यार्थ्यांची मुलकी परीक्षा पास झाली असली पाहिजे किंवा इंग्रजी पाच इयत्तेपर्यंत अभ्यास झालेला असला पाहिजे,
४. विद्यार्थी शेतकाम करण्यास सशक्त असला पाहिजे.
५. विद्यार्थ्यांनी आपल्या हस्ताक्षरात अर्ज करावा. सोबत मुलकी पास असल्याचे तसेच इंग्रजी पाच इयत्तेपर्यंत शिक्षण झाल्याचे सर्टिफिकेट व मालकीची जमीन असल्याबद्दलचा गावकामगारांचा दाखला इन्स्पेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर यांच्याकडे जमा करावा.
६. अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना १/६/१९३५ ला सकाळी ८.०० वाजता श्री. शाहू शेतकी शाळेत हजर असले पाहिजे. त्या दिवशी प्रवेश परीक्षा घेण्यात येऊन ते शेतकी शिक्षण घेण्यास व शेतकाम करण्यास सशक्त दिसून येतील, अशांना शाळेत दाखल करून घेण्यात येईल.
७. प्रवेश परीक्षेत पास झालेल्या पहिल्या पाच मुलांकरता दरबाराकडून शिष्यवृत्ती, दुसऱ्या पाच मुलांना किंग ऑफ संस्थेकडून दरमहा आठ रुपये शिष्यवृत्ती मिळविण्याकरिता शिफारस करण्यात येईल .बाकीच्या पास झालेल्या मुलांना मोफत शिक्षण दिले जाईल. अशा

प्रकारच्या अटी घालून राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील शेतकरी घरातील मुला–मुलींना शेतकी शिक्षण मोफत करण्यासाठी प्रयत्न केले.[३१]

## छत्रपती राजाराम महाराजांचे सामाजिक सुधारणांतील योगदान

### १. जमीन संपादनाचा मोबदला

राजाराम महाराजांनी विकासाचे सूत्र ओळखून कोल्हापूर संस्थानाचा विकास केला. कोल्हापूर संस्थानातील पायाभूत सुविधा हा राजाराम महाराजांच्या विकासाचा जरी महत्त्वाचा आधार असला, तरी त्यामागे लोककेंद्री विकास ही संकल्पना होती. राजाराम महाराजांनी मोठी धरणे बांधली, कालवे तयार केले, विहिरी बांधल्या, रस्त्याचा विकास केला, औद्योगिक विकास केला, नवीन कारखाने उभे केले व बँकांची निर्मिती केली. या सर्व विकासातून कोल्हापूर संस्थानातील सामान्यातील सामान्य माणूस हा अतिशय सक्षम व या विकासाचा लाभार्थी झाला. राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानाचा विकास करत असताना रस्त्यांच्या बांधकामासाठी, नाले, कालवे खोदण्यासाठी किंवा धरणासाठी लागणारी जमीन त्या त्या भागातील शेतकऱ्यांकडून घ्यावी लागे. त्या भूसंपादनापोटी शेतकऱ्यांना चांगला मोबदला मिळाला पाहिजे आणि त्या प्रकल्पबाधित योग्य पुनवर्सन झाले पाहिजे, अशी तरतूद राजाराम महाराजांनी केली होती. भूसंपादनापोटी मिळणारी नुकसान भरपाई इतकी असे की एखादा शेतकरी आपल्याला हवा तो व्यवसाय त्यातून करू शके, ज्यातून संस्थानाच्या आर्थिक विकासात मोलाची भर पडत असे. त्यामुळे राजाराम महाराजांनी असे कोणतेही धोरण नव्हते, ज्यातून त्यांनी आखलेल्या धोरणातून उभा राहणाऱ्या प्रकल्पामुळे सामान्यातला सामान्य माणूस बहिष्कृत होत जाईल. खरे तर त्याची ही धोरणे सामान्यातल्या सामान्य मानसाच्या विकासाच्या प्रवाहात आणणारीच होती, गरीबांना बाजूला सारून श्रीमंत अथवा अभिजनांच्या हिताची अशी कोणतीच धोरणे त्यांनी  कधीही घेतली नाहीत. त्यामुळे त्यांना विविध प्रकल्पासाठी लागणाऱ्या जमीन संपादित करण्यासाठी कधीही अडथळा आला नाही. त्यातीलच एक महत्त्वाचं म्हणजे कृष्णा व पंचगंगा नदी घाट यांच्या बचावासाठी जमीन

घेण्यात आलेली होती. त्या जमिनीचा मोबदला म्हणून राजाराम महाराजांनी तेथील मूळ रहिवाशांना त्यांच्या जमिनीची नुकसान भरपाई देण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला जमिनीच्या मोबदल्यात आर्थिक मदत ही एक प्रकारे शेतकऱ्यांच्या मनामध्ये कोल्हापूर संस्थानातील विकासाच्या बाबतीत एक सहानुभूती व संवेदनशीलता निर्माण झाली. विकासाच्या प्रक्रियेत सर्वांनी आपल्या पद्धतीने मदत केली पाहिजे व कोल्हापूर संस्थानातील सामान्यातला सामान्य माणूस हा सुखी झाला पाहिजे. यासाठी सर्व स्तरातील बांधव एकत्र येऊन सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विकासासाठी खूप महत्त्वाचे योगदान दिले. या योगदानाचे खरे शिल्पकार हे राजाराम महाराज होते. ही बाब विसरून चालणार नाही. आज शासकीय स्तरावर अनेक पातळीवर एखाद्या शेतकऱ्यांची इतर समुदायाची जमीन किंवा शेती विकासाच्या प्रकल्पासाठी घेतली जाते, तेव्हा त्यातून होत जाणारे विरोध व त्याला मिळणारा मोबदला याचा विचार केला, तर राजाराम महाराजांनी आपल्या काळामध्ये केलेला होता व त्याची अंमलबजावणी त्या काळामध्ये आपल्या संस्थानामध्ये केली होती.

**२. ब्राह्मणेतर चळवळीचे नेतृत्व:**

राजर्षी शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर चळवळीला वैचारिक अधिष्ठान व राजकीय प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात ब्राह्मणेतर चळवळीचा वेग आणि विस्तार अधिक गतीने झाला. ब्राह्मणेतर चळवळ ही जाती व्यवस्थेच्या विरोधात व वर्णव्यवस्थेच्या वर्चस्वाच्या विरोधात सक्रियपणे संघर्ष करत होती. ही बाब लक्षात घेऊन शाहू महाराजांनी आर्थिक सामाजिक आणि राजकीय मदत केली. इतकेच नाही, तर कोल्हापूर संस्थानामध्ये ब्राह्मणेतर चळवळीला महत्त्वाची प्रतिष्ठा व विस्तार करून देण्यात त्यांचे योगदान आहे. ब्राह्मणेतर चळवळीला मदत करणे व त्यांना प्रतिष्ठा प्राप्त करून देणे व राजकीय अधिष्ठान मिळवून देणे हे कामसुद्धा राजाराम महाराजांनी पुढे चालवले. छत्रपती राजाराम महाराजांनी ब्राह्मणेतर चळवळीचे नेतृत्व केले. राजर्षी शाहू महाराजांच्या निधनानंतर महाराष्ट्रामध्ये ब्राह्मणेतर चळवळीची घडी खूप विस्कटली गेली होती. कारण ब्राह्मणेतर चळवळ ही बहुजनांची चळवळ होती. बहुजन समाज हा मूलतः आर्थिक आणि भौतिक साधनांपासून वंचित आहे. त्यांना आपल्या मूलभूत गरजा पूर्ण करणेही शक्य नाही. अशा

समुदायाची ब्राह्मणेतर चळवळ कोणत्याही समर्थ नेतृत्वाविना पुढे जाणे अवघड होते. जोपर्यंत छत्रपती राजश्री शाहू महाराज होते, तोपर्यंत ब्राह्मणेतर चळवळीला वैचारिक अधिष्ठान व त्यासोबतच राजकीय प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यात महत्त्वाचे योगदान त्यांनी दिले. मात्र त्यांचे अचानक निधन झाल्यामुळे ब्राह्मणेतर चळवळ ही एका अर्थाने पोरकी झाली. कोणत्याही साधनसंपत्तीशिवाय सामाजिक आणि राजकीय चळवळ विस्तारली जात नाही, हे लक्षात घेऊन छत्रपती राजाराम महाराज यांनी ब्राह्मणेतर चळवळीची धुरा सांभाळण्याचे निश्चित केले. छत्रपती राजाराम महाराज यांनी सातारा याठिकाणी भरलेल्या ब्राह्मणेतर सामाजिक परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारले. एका अर्थाने ब्राह्मणेतर चळवळीला पाठिंबा देण्याचे काम या माध्यमातून केले. त्यासोबतच अमरावती या ठिकाणी ब्राह्मणेतर चळवळीचे अध्यक्षपद स्वीकारून एका अर्थाने कोल्हापूर संस्थानाच्या बाहेर ब्राह्मणेतर चळवळीला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. छत्रपती राजाराम महाराजांच्या अध्यक्षपदाच्या स्वीकारामुळे ब्राह्मणेतर चळवळीत चैतन्याचे वारे फिरू लागले व महाराष्ट्राबाहेर ब्राह्मणेतर चळवळ विस्तारण्यास वेग आला.

### ३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आर्थिक मदत आणि महात्मा फुले चरित्र ग्रंथासाठी अर्थसाह्य

शाहू महाराजांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती दिली होती. त्यासोबत त्यांना संस्थानामध्ये सन्मानाचा व्यवहार व वागणूक दिली होती. त्यामुळे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीला मोठा वेग येण्यास, गतिमानता येण्यास हातभार लागला. हे ऐतिहासिक योगदान होते इतकेच नाही, तर शाहू महाराजांनी अस्पृश्यांचे नेते म्हणून सार्वजनिक मानसन्मान डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचा केला होता. त्याचा एक व्यापक वारसा चालवत राजाराम महाराजांनीसुद्धा डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या 'ऑल इंडिया डिप्रेस असोसिएशन'ला आर्थिक मदत दिली. त्यामुळे डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांची चळवळ खूप वेगाने पुढे जाण्यास व अस्पृश्य चळवळीला जातिमुक्त करण्यात राजाराम महाराजांनी खूप महत्त्वाचे योगदान दिले. हा आपल्या वडिलांचा ऐतिहासिक वारसा पुढे चालवत सामाजिक न्यायाची प्रस्थापना करण्यात राजाराम महाराजांनी मोठे योगदान दिले.[३२] राजाराम महाराजांनी आपल्या वडिलांचा वारसा म्हणून ब्राह्मणेतर चळवळीच्या नेतृत्वामध्ये एक महत्त्वाचे योगदान दिले आहे. राजाराम महाराज यांनी

महात्मा फुले यांचे चरित्र लिहिण्यासाठी आपल्या संस्थानात अनेक लेखकांना व अभ्यासकांना नेहमीच प्रोत्साहन दिले. महात्मा फुल्यांमुळे वा सत्यशोधक समाजामुळे किंबहुना जाती व्यवस्थेच्या विरोधात संघर्ष करण्याची महत्त्वाची प्रेरणा शाहू महाराजांना भेटली. हा इतिहास राजाराम महाराजांनी न विसरता आपल्या संस्थानमध्ये महात्मा फुले यांचे चरित्र लिहिण्यासाठी आर्थिक मदत व त्यासोबत प्रकाशनासाठीचा जो काही खर्च आहे तो खर्च करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.[३३] डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना विविध वसतिगृहासाठी व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या 'डिप्रेस्ड क्लास मिशन'साठी आर्थिक मदत केली. त्यासोबत पन्हाळा विभागातील जमीन मिळावी यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी अर्ज केला होता. राजाराम महाराजांनी त्वरित मान्य करून त्यांना आवश्यक ती जमीन उपलब्ध करून देण्याची तरतूद केली. ती उपलब्ध होईपर्यंत राजाराम महाराजांनी केलेला पाठपुरावा आणि त्यामुळे बाबासाहेब आंबेडकर यांना जमीन मिळाल्याचे संदर्भ विविध नोंदीतून दिसून येते.[३४]

### ४. सन १९२६ चा कोल्हापूर स्टेट बालविवाह प्रतिबंध कायदा

छत्रपती राजाराम महाराजांचा हा कायदा सुधारणा कोल्हापूरच्या जनमानसामध्ये अत्यंत आमूलाग्र परिवर्तन करणारा होता. कोल्हापूर संस्थानामध्ये किंबहुना भारतामध्ये एक क्रांतिकारी कायदा म्हणून हा कायदा ओळखला जातो. कोल्हापूर संस्थानामध्ये जातीग्रस्त मानसिकता, अंधश्रद्धा, कर्मकांड व तसेच पितृसत्ताक कुटुंबव्यवस्था असल्याने बालविवाह कोल्हापूर संस्थानांमध्ये सामाजिक आरोग्याच्या दृष्टिकोनातून कलंक होता. त्यामुळे महिलांना सन्मानाचे स्थान तर नव्हतेच, लवकर लग्न केल्यामुळे अनपेक्षितपणे कमी वयाच्या असल्यामुळे खूप मोठ्या आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत होते. बालविवाह हा भारतातील एक सर्वात महत्त्वाची समस्या होती या समस्येमुळे लहानपणापासूनच मुलींचे जीवन हे उध्वस्त केले जात होते. त्यासाठी त्यांनी हा कायदा अस्तित्वात आणला बालविवाहामुळे कोल्हापूर संस्थानात लहानपणापासूनच मुलींचे लग्न करण्यामध्ये आघाडीवर होते. त्यामुळे वयात न येता मातृत्व त्यांच्या जीवनात येत असे. त्यामुळे संपूर्ण जीवन जगण्याची उर्मी नष्ट केली जात होती. लहानपणापासूनच खूप मोठ्या प्रमाणात आर्थिक जबाबदारी मुलावर किंवा मुली घेत असत. अवेळी मृत्यूचे प्रमाण सुद्धा कोल्हापूर

संस्थानामध्ये घडत होते. त्यामुळे राजाराम महाराजांनी बालविवाह प्रतिबंधक कायदा आणून समाजामध्ये एक महत्त्वाचा क्रांतिकारक निर्णय घेतला. बालविवाह प्रतिबंधक कायद्यामुळे बालविवाह व विजोड विवाह प्रतिबंध कायदा आला.[३५] हजारो मुलींचे जीवन यामुळे सुकर झाले. त्यांना चांगल्या पद्धतीचे जीवन व शिक्षण प्राप्त झाले. बालविवाह प्रतिबंधक कायद्यामुळे मुलं आणि मुली शिक्षणात सक्रिय होऊ लागल्या. शिक्षण शिकून स्वतःचा आणि एकूणच कोल्हापूर संस्थानाच्या विकासामध्ये महत्त्वाचे योगदान देऊ लागल्या. बालविवाह प्रतिबंधक कायद्यामुळे महिलांच्या अवेळी मातृत्वाची प्रकरणेही कमी होऊ लागली. याचा दूरगामी परिणाम महिला विकासामध्ये झाला. राजाराम महाराजांनी बालविवाह प्रतिबंधक कायद्याच्या नियमानुसार कोणत्याही व्यक्तीने, जर बालविवाह केला असेल, तर त्यांना शिक्षा करण्याची तरतूद सुद्धा या कायद्यामध्ये नमूद करण्यात आली होती. बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार विवाहाचे म्हणजेच लग्नाचे वय निश्चित करण्यात आले होते. या कायद्यामुळे छत्रपती राजाराम महाराज यांचा महिलांविषयक दृष्टीकोण स्पष्ट होतो. राजाराम महाराजांनी महिलांच्या सन्मानासाठी व न्यायासाठी योग्य तो आदर केला पाहिजे, त्यासोबत महिलांचा सन्मान व शैक्षणिक सहभाग वाढवला पाहिजे व कोल्हापूर संस्थानमध्ये महिलांच्या न्यायपूर्ण व योग्य वर्तनातून व्यवहार केला पाहिजे. यासाठी महत्त्वाचे नियम तयार करण्यात आले होते. या कायद्यामध्ये प्रमुख तरतुदी खालीलप्रमाणे

१. या कायद्याचे नाव सन १९२६ चा कोल्हापूरचा बालविवाह प्रतिबंधक कायदा असे असेल
२. हा कायदा सर्व कोल्हापूर इलाख्यात व कोल्हापूर इलाख्यातील सर्व धर्माच्या व सर्व जातीच्या प्रजाजनांसाठी लागू होईल
३. ज्या व्यक्तीचे कोल्हापूर स्टेट चे हद्दीत सहा महिने सतत वास्तव्य असेल, त्यास कायद्या पुरते कोल्हापुर स्टेटस चे प्रजाजन असे मानण्यात येईल.
४. कोल्हापूरच्या कोणाही प्रजाननाने कोल्हापूर स्टेट्चे हद्दीत अगर या कायद्याचे उल्लंघन करण्याच्या हेतूने परहद्दीत जाऊन या कायद्याचे उल्लंघन केल्यास शिक्षेस पात्र होतील.

५. जो कोणी पुरुष अगर स्त्री स्वतःच्या अगर स्वतःच्या पालकत्वासाठी असलेले आणि वयाच्या पूर्ण १४ वर्ष पूर्ण न झालेल्या मुलीचा अथवा विवाह करील अगर करतील, त्या कायद्याचे तसे करण्यास मनाई करण्यात येत असून, ते त्याचे कृत्य गुन्हा ठेवण्यात येत आहे.

६. वरील सर्व कृत्य जो कोणी स्त्री अगर पुरुष गुन्हा करत असतील त्यांना जास्तीत जास्त दोन हजार रुपये दंड पात्र होईल.

७. पोलिसाच्या रिपोर्टवरून अगदी एखाद्या अर्जाच्या अर्जावरुन अर्जदाराच्या अर्जावरून अगर अन्य मार्गाने मिळालेल्या माहितीवरून कोल्हापूर इलाख्यातील मॅजिस्ट्रेट वर्ग १ चा अधिकारी असलेल्या कोणत्याही कोर्टात त्या कोर्टाच्या स्थळसीमेत राहणाऱ्या इसमाने बेकायदेशीरपणे ठरवलेली कृती केल्यास त्याची चौकशी करण्याचा अधिकार या कायद्याने देण्यात येत आहे.

८. या कायद्याखाली गुन्हा झालेली बातमी ज्या मॅजिस्ट्रेटला कळेल, त्या मॅजिस्ट्रेटास माहिती देणारा काम चालवण्यास तयार असेल, तर त्यास तसे करण्याची परवानगी द्यावी आणि पुढची कामे समन्स केल्याप्रमाणे चालवावे.

९. कोणीही इसम फिर्यादीचे काम चालवण्यास तयार नाही, असे मॅजिस्ट्रेट यास वाटेल, त्यावेळी सदर मॅजिस्ट्रेट याने पोलीस सब–इन्स्पेक्टर यास प्रोसिक्यूशन करणेस हुकूम द्यावा.

१०. या कायद्याखाली चालणारे खटले फौजदारी खटले समजून त्यास क्रिमिनल प्रोसिजर या कायद्याखाली चालणारे कोडचे सर्व नियम लागू करण्यात आलेले आहेत.

**५. पूरग्रस्ताचे पुनर्वसन:**

छत्रपती राजाराम महाराज हे प्रशासकीयदृष्ट्या अतिशय संवेदनशील होते. कोल्हापूर संस्थानातील सर्वसामान्य नागरिकांच्या हितासाठी व विकासासाठी धोरण राबवणारे दूरदृष्टीचे छत्रपती होते. छत्रपती राजाराम महाराज यांनी पुनर्वसनाचे धोरणसुद्धा याच अनुषंगाने राबवल्याचे आपल्याला दिसते. कोल्हापूर संस्थानामध्ये नदीच्या महापुरामुळे अनेक सामान्य नागरिकांना व शेतकऱ्यांना या महापुराचा त्रास सहन करावा लागत होता. या महापुरामुळे सर्वसामान्यांचे जीवन विस्कळीत व त्रासदायक होत होते. महापुरामुळे १५ ते २० दिवस त्यांना महापुराचा फटका बसल्यामुळे अतिशय दयनीय अवस्था झाली होती. राजाराम महाराजांच्या हाती कोल्हापूर

संस्थानाची सूत्रे असल्यामुळे मौजे चिंचवाड गावातील नागरिकांचे पंचगंगेच्या पुरामुळे अनेक मोठ्या प्रमाणात आर्थिक सामाजिक व जनजीवन विस्कळीत होत होते. छत्रपती राजाराम महाराजांनी या सर्व गावातील नागरिकांचे महापुरामुळे होणाऱ्या त्रासामुळे त्यांचे सुरक्षित ठिकाणी पुनर्वसन करणे अत्यंत गरजेचे होते. पंचगंगा नदीच्या महापुरामुळे सर्व गाव दुसऱ्या गावात पुनर्वसन करणे अत्यंत आव्यवहारिक व लोकहिताला साजेसे नव्हते. त्यामुळे राजाराम महाराजांनी चिंचवाड गावातील सर्व नागरिकांना गावठाणाच्या जागेवर पुनर्वसन करण्याचे महत्त्वाचे धोरण आखले व त्यासाठी प्रशासनाला पंधरा दिवसांत संबंधित गावच्या पुनर्वसनाचा अहवाल सादर करण्यास सांगितले. पुनर्वसन ही संकल्पना आधुनिक असली तरी नैसर्गिक आपत्तीमुळे मानवी जीवन धोक्यात आल्यानंतर त्यांचे योग्य ते व त्यांच्या उपजीविकेचे साधन व गतिशीलतेला कोणत्याही प्रकारचा हात न घालता त्यांना सोयीचा अशा प्रकारचे पुनर्वसन करण्याचा एक महत्त्वाचा आदर्श घालून दिला. मानवकेंद्री पुनर्वसन हा राजाराम महाराजांचा प्रशासनाचा व राज्यकारभाराचा मूलमंत्र होता. निसर्गाच्या आपत्तीमुळे मानवी जीवन विस्कळित होता कामा नये. माणसांना कोणत्याही प्रकारचा त्रास होता कामा नये. माणसांचे योग्य ते पुनर्वसन झाले पाहिजे व निसर्गाच्या आपत्तीपासून मानवाचे संरक्षण केले पाहिजे हे त्यांच्या राज्यकारभाराचे मूलभूत तत्त्व होते आणि याच तत्वाच्या आधारे त्यांनी चिंचवाडगावातील लोकांचे योग्य त्या ठिकाणी पुनर्वसन करून आदर्श घालून दिला.[३६]

### ६. धरण बांधणेसंबंधी सार्वजनिक अडथळा होऊ नये म्हणून केलेली उपयोजना

शेतीसाठी पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टिकोनातून स्थानिक स्तरावरील लोक नदी–नाले–ओढे यांच्यावर छोटे छोटे बांध घालून पाणी अडवत असत. ज्याचा परिणाम नाल्या–ओढ्यांमार्फत नदीला येणाऱ्या आणि नदीमार्फत सर्वदूर पोहोचणाऱ्या पाण्याच्या वितरणावर होत असल्याचे दिसून आले. परिणामी हा सार्वजनिक जलवाटपासमोरील मोठा अडथळा असून, सार्वजनिक कामांत अडथळा आणण्याचा हा प्रकार असल्याचे राजाराम महाराजांच्या लक्षात आले. मात्र सिंचनासाठी शेती क्षेत्राला पाणी पुरवठा करण्याची गरज पाहता असे छोटे छोटे बांध बांधण्याची आवश्यकता आहे, असे त्यांच्या निदर्शनास आले. त्यादृष्टिकोनातून त्यांनी सिंचनासाठी पाणी उपलब्ध

करण्याच्या हेतूने नद्या, नाल्यांवर, ओढ्यांवर शासनामार्फत छोटे बांध-बंधारे, छोटी धरणे बांधण्याचे काम हाती घेतले. त्यासाठी खास नियमावली तयार केली. ती पुढीलप्रमाणे :

१) धरण ज्या गांवचे हद्दीत बांधावयाचे असेल, त्या गांवचे लोकांनी (दोन्ही बाजूचे लोकांनी मिळून) ज्या ठिकाणी धरण बांधवायाचे आहे ती जागा ठरवून परवानगी मिळणेबद्दल पेठयाचे मामलेदार अगर महालकरी यांच्याकडे अर्ज करून परवागी घेऊन नंतर धरण बांधण्यास सुरुवात करणे, त्याखेरीज धरण बांधावयाचे नाही.

२) धरण बांधणेबाबतीत मामलेदार अगर महालकरी यांचेकडे अर्ज करावा. अर्ज दाखल झालेल्या तारखेपासून पंधरा दिवसांचे आंत धरणाबाबतीत हुकूम न दिल्यास परवानगी आहे, असे समजून लोकांनी धरण घालण्यास सुरवात करावी. सदर मुदतीत मामलेदार अगर महालकरी यांजकडून उलट निकाल मिलेस धरण घालणारे लोकांनी मे. रा. ब. सरसुभे साहेब यांचेकडे अपील करावा, अपिलाचा निकालही उलट झाल्यास हुजूर तपसाणी करणेची आहे.

३) अपीलाचा व तपासणीचा निकाल अर्ज दाखल झाले तारखेपासून पंधरा दिवसाचे आंत होईल. सदर मुदतीत निकाल न लागल्यास परवागी आहे असे समजून लोकांनी धरण घालणेचा आहे.

४) अपिलाची व तपासणीची मुदत प्रत्येकी पंधरा दिवस ठरविण्यात आली आहे.

५) धरणाबाबतीत कामाचा उलट निकाल ज्या कोर्टातून होईल त्यांनी निकाली कागद २४ तासांत आपले वरिष्ठ कोर्टाकडे पाठवावेत म्हणजे अपील अगर तपासणी कोर्टास काम आणण्यास वेळ जाणार नाही. अपील अगर तपासणी न झालयास मुदतीनंतर काम जिकडील तिकडे जाईल.

६)धरण घालण्याचे सुरूवात पावसाळेच्या ऋतुमानाप्रमाणे व नदीचे प्रवाहाचा ओघ लहान मोठा असेल त्या मानाने तारीख १ नोव्हेंबरपासून ते डिसेंबर अखेरचे आतमध्ये पुर्ण करावे सदर मुदतीत धरणाचे बांधकाम सुरू न केल्यास डिसेंबर अखेर नंतर कोणासही परवानगी दिली जाणार नाही.

७) ज्या धरणावरून गाड्या, टांगे, जाण्यायेण्याचा रस्ता असेल त्या ठिकाणी धरणाचा वरचा मथळा पंधरा फूट रुंद ठेवण्यात यावा, व धरणाची उंची नदीचे खोलीचे मानाने मर्जीनुरुप कमी जास्त जसे नदीचे पात्र असेल त्या मानाने असली पाहिजे.

८) ज्या धरणावरून फक्त गोणीचे बैल, घोडी, जनावरे, माणसे, जाणेयेणेची असतील त्या ठिकाणी धरण निदान सात फूट रुंद असले पाहिजे, त्यापेक्षा कमी असता कामा नये,

९) धरणावरून पलीकडे व अलीकडे जाण्या–येण्याची वाट नदीचे काठाने असते, व तेथे मळई जमीन असली म्हणजे कुंप लाऊन अकुंचित केली जाते, त्यामुळे जनावरे, गाड्या, माणसे, जाण्यास अडचण होते, अशा ठिकाणी धरणावाल्या लोकांनी आपल्या खर्चाने बारा फूट रुंद इतका रस्ता मुख्य रस्त्यांस मिळेपर्यंत नदीचे दोन्ही बाजूंनी करून दिला पाहीजे.

१०) खालचे धरण असणारे लोक ज्यांचे धरणांतील पाणी संपल्यामुळे वरील धरणांतील पाणी मागेल, तर त्या धरणावर असणारे पिकांस पुरेसे पाणी ठेवून बाकी खालील लोकांस पाणी ताबडतोब दिले पाहिजे, तसे न दिल्यास पंचाकडे अर्ज द्यावा.

वरील बाबी या संस्थानातील शेतकरी वर्गाला शेती पिकविण्याकरिता केलेल्या उपयोजना आणि त्यानुसार केलेले तरतुदी विचारात घेता शेतकऱ्यांचे आपसांत भांडण होऊ नये, म्हणूनही घेतली निर्णय वरील मुद्द्यांवरून दिसून येतो, तसेच यावर काही वादविवाद उद्भवू नये, म्हणून खालचे धरणवाले लोकांतील दोन पंच वरील धरणवाले लोंकांतील दोन पंच व ज्या गांवामध्ये धरण आहे, त्या गावचा पाटील सरपंच असे पंच निवडून त्यांचेमार्फत यावर तोडगा काढावयाचे उपयोजना करण्यात आली होती, पंचाची निवडणूक ज्या त्या धरणावाले लोकांनी तीन दिवसांचे आंत करून पाटलाकडे अर्ज द्यावा, तसे मुदतीत अर्ज न आल्यास पाटील यांने तीन दिवसांचे आंत योग्य तो ठराव करावा, पंचाच्या मुदतीत निवडणूक होऊन पंचानी अगर पाटील यांने ज्यांचे उलट निकाल दिला असेल, त्यांनी अगर पंचायतीने ठराव मुदतीत केला नाही अथवा मुदतीत पंच निवडून दिले नाहीत अथवा पंचाची तक्रार असेल त्या प्रसंगी ज्यांनी नुकसान असेल त्यांनी मामलेदार अगर महालकरी यांचेकडे तीन दिवसांचे आंत अर्ज करावा त्याचा मामलेदार अगर महालकरी यांनी योग्य

तो निकाल करावा, यावरून लोकांमध्ये आपसांत भांडण न होता तेथील शेतीला योग्य प्रकारे पाणी मिळून तेथील जनता सुखी आणि समृद्ध होईल, याची उपयोजना महाराजांनी केली असल्याचे प्रकर्षाने दिसून येते.[३७]

### ७. गरीब लोकांना रेल्वे प्रवासाची सुविधा

कोल्हापूर संस्थानामध्ये शाहू महाराजांनी रेल्वेची सुरुवात केली असली, तरी ती रेल्वे प्रामुख्याने ब्रिटिश अधिकाऱ्यांसाठी व संस्थानामधील सरकारी कर्मचाऱ्यांच्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांसाठी होती. त्यामुळे सामान्य माणसाला रेल्वेमधून प्रवास करणे अशक्य होते; पण राजाराम महाराजांनी हे शक्य करून दाखवले. जे प्रवासी आजारी आहेत किंवा कुत्रा चावल्यामुळे आजारी असतील, त्या गरीब कोल्हापूर संस्थानातील नागरिकाचा प्रवासाचा खर्च आणि रेल्वेच्या तीन नंबर जागेवर त्यांची सोय करण्याची तरतूद राजाराम महाराजांनी करून दाखवली. त्यामुळे सामान्य माणसाला दवाखान्याच्या ठिकाणी किंवा इतर महत्त्वाच्या आरोग्याच्या सुविधेसाठी जाणे सोयीचे झाले आणि आपला जीव वाचविण्यासाठी महत्त्वाचे योगदान राजाराम महाराजांनी केले.[३८] जनसामान्य माणसाच्या रेल्वे प्रवासामुळे सामान्य लोकांना एका गावाहून दुसऱ्या गावाला, एका शहरातून दुसऱ्या शहरात जाण्यासाठी खूप सोपे आणि कमी वेळेमध्ये लवकरात लवकर पोहोचणे शक्य झाले.

## छत्रपती राजाराम महाराज यांचे सांस्कृतिक व वैचारिक क्षेत्रातील योगदान

### १. लोक उत्सवास प्राधान्य

कोल्हापूर संस्थान सांस्कृतिकदृष्ट्या लोक उत्सवाला प्राधान्य देणारे संस्थान आहे. कोल्हापूर संस्थानाचा इतिहास हा एका लोक उत्सवाच्या व लोकसंस्कृतीच्या आधारेच निश्चित झाला आहे. त्यामुळे राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्या कालावधीत लोकउत्सवाला राजकीय आश्रय दिला. कोल्हापूर संस्थानातर्फे नवरात्र उत्सव, लक्ष्मी महामंदिराचा उत्सव हा लोकउत्सव म्हणून साजरा केला जातो. राजाराम महाराजांनी ह्या लोकोत्सवाला प्रामुख्याने राजकीय आश्रय देऊन

लोकउत्सव खूप मोठ्या प्रमाणात साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यासाठी निधीची उपलब्धता करून देण्यात आली. एका बाजूला त्र्यंबक देवीचा समारंभ असो किंवा करवीर निवासिनी शारदा नवरात्र उत्सव यासाठी त्यांना मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद करून हा उत्सव कोल्हापूर संस्थानाचा उत्सव आहे. त्यामध्ये सर्वांनी सहभागी झाले पाहिजे. ही राजाराम महाराजांची इच्छा असे. त्यानुसार हा उत्सव शासकीय पाठिंब्याच्या आधारे जनमानसामध्ये मोठ्या प्रमाणात साजरा केला जात असे. नवरात्र उत्सव हा कोल्हापूर संस्थानाचा प्रमुख उत्सव असल्याचा राजाराम महाराजांच्या ठरावामध्ये स्पष्ट झाला आहे. त्यानुसार राजाराम महाराजांनी या उत्सवासाठी उपलब्ध करून देण्यात येणारा खर्च आहे. तो खर्चसुद्धा शासकीय पातळीवरून केला जावा, ही राजाराम महाराजांची इच्छा होती आणि तशाच प्रकारचा धोरणात्मक निर्णय घेऊन राजाराम महाराजांनी 'या उत्सवाला ३,३०० रुपये मंजूर करण्याची मान्यता देण्यात आलेली होती.'[३९] त्यासोबतच त्यासाठी लागणाऱ्या इतर कुशल मनुष्यबळाचीसुद्धा शासकीय पातळीवर म्हणजेच कोल्हापूर संस्थानाच्या पातळीवर उपलब्ध करून देण्यात येईल. यासाठी सुद्धा एक महत्त्वाचा निर्णय राजाराम महाराजांनी केलेला होता. हा उत्सव केवळ कोल्हापूर संस्थानामध्ये दोन–तीन आठवडे साजरा केला जात असे. हा उत्सव शासकीय पातळीवर साजरा करावा हा राजाराम महाराजांचा आदेश होता. श्री क्षेत्र नरसिंहवाडी येथे निमित्ताने महाभोजनाचा कार्यक्रम नरसिंहवाडी येथे श्री. दत्ताच्या घाटावर, देवळासमोर पूजेचा खर्च होता. 'प्रसिद्ध गड रांगणा येथील श्रीराम देवी रांगणाई देवीचे देवालय बांधण्यासाठी राजाराम महाराजांनी पुढाकार घेऊन ते मंदिर बांधण्याचा प्रयत्न केला होता.[४०] त्यासोबत त्यासाठी लागणारा निधी शासकीय स्थळावर उपलब्ध करून देण्याचा धोरणात्मक निर्णय राजाराम महाराजांनी घेतलेला होता. या धोरणामुळे एका बाजूला उत्सवाला, लोककलेला प्राधान्य देऊन लोकांमधील आध्यात्मिक शक्तीचा विकास करण्याचा प्रयत्न राजाराम महाराजांनी केलेला होता व त्यासोबतच उत्सवाला प्राधान्य देऊन दलित–बहुजन समाजातील देव देवता व सांस्कृतिक सण–उत्सव यांना शासकीय मान्यता देण्याचा महत्त्वाचा प्रयत्न राजाराम महाराजांनी या कालावधीत या काळात घेतलेला होता.

## २. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाचा गौरव आणि इतिहासलेखन

शककर्ते शिवाजी महाराज कोल्हापूर संस्थानाचे मुख्य प्रेरणास्थान होते. छत्रपती घराण्याचा इतिहास हा शिवाजीमहाराजांपासून सुरूवात होतो. त्यामुळे कोल्हापूर संस्थानांनी नेहमीच शिवाजी महाराजांच्या विचारांचा आणि व्यवहाराचा गौरव करून त्यांच्या धोरणाची त्या काळानुसार अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न कोल्हापूर छत्रपतींनी केल्याचे आपणाला दिसते. शिवाजी महाराज हे राजाराम महाराजांचे प्रेरणास्थान होते. शिवाजी महाराजांनी लोककल्याणकारी राज्य स्थापन केले. त्यासाठी त्यांच्या संस्थानामध्ये अठरापगड जातींना योग्य तो न्याय दिला. समानतेची वागणूक दिली व मोगलांविरुद्ध संघर्ष केला. त्यामुळे शिवाजी महाराज यांना जात आणि धर्माच्या पलीकडील एक धर्मनिरपेक्ष राजे म्हणून कोल्हापूर संस्थानमध्ये महत्त्वाचे आदराचे स्थान होते. राजाराम महाराजांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा वैचारिक वारसा जपण्याचा प्रयत्न केल्याचे दिसतो. त्यातील महत्त्वाच्या अनेक घटना या ठिकाणी नमूद करण्यासारखे आहेत. शककर्ते छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बांधण्याचा महत्त्वाचा निर्णय राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानात घेतल्याचे आपणाला दिसते व त्यासाठी येणारा खर्च पाचशे रुपये आपल्या कोल्हापूर संस्थानाच्या आर्थिक बजेटमधून दिल्याचे आपणास दिसते.[४१] याचा सकारात्मक परिणाम कोल्हापूर संस्थानामध्ये शिवाजी महाराजांच्या विचारांचा आणि व्यवहाराचा गौरव व्हावा व शिवाजी महाराजांचा आदर्श कोल्हापूर संस्थानातील सर्व लोकांनी घ्यावा, हा होता. शिवाजी महाराजांविषयी ऐतिहासिक लिखाण व्हावे यासाठी राजाराम महाराजांनी शिवाजी महाराजांच्या चरित्राच्या ऐतिहासिक लिखाणासाठी अनुदान देण्याची व संबंधित लेखकांना लेखनासाठी प्रोत्साहित करण्यासाठीसुद्धा तरतूद राजाराम महाराजांनी केली होती.[४२] इतकेच नाही तर शिवाजी महाराजांच्या नावाने अनेक स्कॉलरशिपची सुरुवात राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानामध्ये केली होती. या ना त्या प्रकारे शिवाजी महाराज सामान्य माणसाला माहीत व्हावेत आणि शिवाजी महाराजांचे कर्तृत्व हे प्रत्येक कोल्हापूर संस्थानातील नागरिकांच्या मनामध्ये प्रचलित व्हावे यासाठी राजाराम महाराजांनी खूप महत्त्वाचे निर्णय घेतले. शिवाजी महाराज हिंदवी स्वराज्याचे संस्थापक होते, याबाबत शंकाच नाहीये. पण त्यासोबतच त्यांचे महत्त्वाचे कर्तृत्व म्हणजे अठरापगड जातीला

सोबत घेऊन कोणताही जातीभेद न करता किंवा धर्मभेद न करता हिंदवी स्वराज्याची स्थापना ही राजाराम महाराजांना एक महत्त्वाची प्रेरणा वाटत होती. त्यामुळे राजाराम महाराजांनी शिवाजी महाराजांच्या स्मरणार्थ अस्पृश्य समाजाच्या शिक्षणासाठी आणि लोकांना शैक्षणिक कामाला उत्तेजन देण्याकरिता रक्कम शाळेकरिता मंजूर करण्यात आली.[४३]

### ३. राजर्षी शाहू महाराजांच्या कर्तृत्वाचा गौरव:

राजाराम महाराजांनी राजर्षी शाहू महाराजांच्या विचाराचा वारसा आणि वसा हा पुढे चालवला. राजर्षी शाहू महाराजांनी जगभरामध्ये व भारतामध्ये पहिल्यांदा सामाजिक न्यायाच्या आणि समतेचा पुरस्कार केला. त्यासोबतच शेती, औद्योगिक विकास, भौतिक विकास यासारखे अनेक महत्त्वकांक्षी प्रकल्प हातात घेऊन कोल्हापूर संस्थानाचा कायापालट केला. भारताला एक आदर्श निर्माण करून भारतासारख्या देशांमध्ये ज्या देशात जातीवर आधारित भेदभाव केला जातो. धार्मिक कर्मकांड व अंधश्रद्धेच्या आधारे माणसामाणसांमध्ये भेदभाव करून दलित–बहुजन जनता भौतिक सुखापासून व मानवी जीवनापासून वंचित ठेवले जाते. त्या परंपरा नष्ट करून सर्वांना समान स्थान देऊन देशांमध्ये आदर्श निर्माण केला. राजाराम महाराजांनी हे सर्व शाहू महाराजांची कर्तृत्व जवळून पाहिलेले होते. त्यासाठी त्यांच्यावरती शाहू महाराजांचा वसा व वारसा व त्यांचा वैचारिक प्रभाव पडणे साहजिकच होते. तोच वारसा पुढे चालवत राजाराम महाराजांनीसुद्धा अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प हातात घेऊन कोल्हापूर संस्थानातील दलित–बहुजन जनतेचा विकास करण्यात मोलाचा वाटा उचलला होता. छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे कर्तृत्व पुढे चालावे म्हणून राजाराम महाराजांनी शाहू महाराजांच्या नावावरती अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतले होते. नवीन पिढीला हा इतिहास माहीत व्हावा व तो वैचारिक वारसा पुढे चालवावा, ही उदात्त भावना त्यामागे होती. छत्रपती शाहू महाराज यांच्या नावाने दलित–बहुजन विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिपची योजना त्यांनी चालू केली होती. या स्कॉलरशिपच्या योजनेसाठी राजर्षी शाहू महाराजांच्या नावाने विशिष्ट रक्कम निश्चित करून त्या रकमेच्या व्याजाच्या आधारे स्कॉलरशिपची कामे चालू केली होती. राजर्षी शाहू महाराजांचे ऐतिहासिक चरित्र असावे, त्यांचा इतिहास लिहिला जावा व तो इतिहास नवीन पिढीसाठी वाचण्यासाठी प्रकाशित केला जावा, म्हणून राजाराम

महाराजांनी शाहू महाराजांच्या चरित्र प्रकाशित केले. त्यासाठी मोठ्या प्रमाणात रक्कम खर्चही केली. राजाराम महाराजांच्या काळामध्ये बी. एल. पाटील यांच्या जमा खर्चातून हा खर्च करण्यासाठी मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता.[४४]

## ४. ग्रंथ निर्मितीस अर्थसाह्य :

एकोणिसाव्या शतकामध्ये ब्रिटिशांची सत्ता भारतात आल्यानंतर भारतामध्ये खूप मोठ्या प्रमाणात देशाअंतर्गत देश सुधारण्याच्या चळवळीला सुरुवात झाली. भारतातील अनेक समाज सुधारक व महाराष्ट्रातील समाज सुधारक धर्माअंतर्गत समाज सुधारणा करण्याचे महत्त्वाचे कार्य हाती घेतले होते. समाजसुधारणा करण्यासाठी वर्तमानपत्र व मासिके हे एक महत्त्वाचे प्रबोधनाचे व वैचारिक हत्यार होते. वर्तमानपत्र आणि ग्रंथाच्या आधारे भारताच्या किंबहुना महाराष्ट्राच्या इतिहास लेखनाची परंपरा विकसित झाली. भारताचा इतिहास, महाराष्ट्राचा इतिहास, आधुनिक इतिहास अशा अनेक प्रकारे इतिहास लेखनास सुरुवात झाली. तीच परंपरा कायम ठेवत राजाराम महाराजांनीसुद्धा ग्रंथनिर्मिती आणि चरित्र लिखाण करून घेतले. इतिहासातील उदात्त परंपरेचे इतिहास लेखन झाले पाहिजे. या प्रेरणेतून राजाराम महाराजांनी अशा अनेक महत्त्वाच्या ग्रंथनिर्मितीचे प्रकाशन करण्याचा प्रयत्न केला. त्याचाच एक भाग म्हणून कोल्हापूर संस्थानातील अनेक प्रकाशकांना व इतिहास लेखन करणाऱ्या इतिहासकारांना व चरित्र ग्रंथ लिहिणाऱ्या अनेक लेखकांना त्यांनी आर्थिक मदत केली. छत्रपती शिवाजी महाराजांचे दोन जीवन चरित्र लिहिणारे श्रीपादशास्त्री हसुरकर इंदूरकर यांना महाराजांनी शंभर रुपये मंजूर केले होते. त्यासोबतच कैलासवासी राजाराम महाराज यांचे चरित्र मराठीमधून अनुवादित करण्यासाठी दहा हजार रुपयांची तरतूद शाहू महाराजांनी केली होती. संत तुकाराम महाराज, महात्मा फुले अशा अनेक महत्त्वाच्या महापुरुषांवर ग्रंथलेखन करणाऱ्या लेखकास अर्थसाह्य करण्याची भूमिका राजाराम महाराजांनी घेतली. त्यामुळे कोल्हापूर संस्थानामध्ये इतिहासकार, लेखक, विचारवंत व प्रकाशक यांना एक प्रकारे राजकीय आश्रय प्राप्त करून देऊन, महाराजांनी खूप मोठ्या प्रमाणात इतिहासलेखनाला अर्थसाह्य दिले. महाराष्ट्रातच नाही, तर महाराष्ट्राच्या इतिहासातील दलित–बहुजन समाजातील प्रेरणास्थान असणारे अशा सर्वांसाठी महत्त्वाचे योगदान दिले. ही बाब महाराष्ट्राच्या इतिहासात

भारताच्या इतिहासामध्ये मोलाची भर घालणारी आहे. इतिहास लेखनाला प्रोत्साहन देणे, कोल्हापूर संस्थानातील महापुरुषांचा इतिहास लिहिणे ही बाब भविष्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची होती. अशा प्रकारचे अर्थसाह्य राजाराम महाराजांनी केल्यामुळे जनमानसामध्ये त्यांची सकारात्मक प्रतिमा निर्माण होण्यास व पुढील अनेक पिढ्यांना आपल्या इतिहासातल्या कर्तृत्वसंपन्न व्यक्ती कशा होत्या हे समजण्यास खूप मोठ्या प्रमाणात मदत झाली. राजाराम महाराजांच्या या धोरणामुळे कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक इतिहासकारांना व विचारवंतांना मोठे पाठबळ मिळाले. राजाराम महाराजांनी श्रीपादशास्त्री हसुरकर इंदुरकर यांना शंभर रुपये ग्रंथनिर्मितीच्या कामाकरिता देण्याचा निर्णय घेतला. श्रीपादशास्त्री इंदुरकर हे इंदूर संस्कृत पाठशाळेत अध्यापक होते. त्यांनी शिवाजी महाराजांची दोन पुस्तके संस्कृत भाषेत लिहिलेली होती. या पुस्तकाचे स्वरूप प्रामुख्याने जीवनचरित्र या आधारे होते. त्यामुळे या पुस्तकाच्या निमित्ताने शिवाजी महाराजांच्या इतिहासावर, कर्तृत्वावर प्रकाश टाकण्यात महत्त्वाचे योगदान दिले.[४५] संस्कृत पंडितांना राजकीय आश्रय मिळणे ही बाब तत्कालीन समाजामध्ये खूप मोठ्या प्रमाणात कौतुकास्पद होती.

### ५. मराठी भाषेला प्रोत्साहन

छत्रपती राजाराम महाराज यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये मराठी भाषेला लोकभाषा आणि प्रशासकीय भाषा म्हणून मान्यता दिली होती. कोल्हापूर संस्थानात प्रामुख्याने कानडी आणि मराठी या दोन भाषा बोलणारे लोक होते. राजाराम महाराजांनी मराठी भाषा ही लोकभाषा आहे व लोकभाषेला राजकीय आश्रय मिळवून देऊन मराठी भाषेचा विकास आणि विस्तार केला होता. भाषा ही लोकांच्या वैचारिक विकासात महत्त्वाचे स्थान देत असते. म्हणून छत्रपती राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानामध्ये प्रामुख्याने मराठी भाषेला प्राधान्य देण्याचे निश्चित केले. त्याचा एक भाग म्हणून मराठी भाषेतील अनेक प्रमुख ग्रंथनिर्मितीचे काम हाती घेतले होते. संस्कृतमधी ग्रंथ व वैचारिक वाङ्मय हे मराठी भाषेमध्ये आले पाहिजे आणि सामान्यातल्या सामान्य माणसाला त्या ग्रंथाचे वाचन करता आले पाहिजे, यासाठी राजाराम महाराज आग्रही होते. राजाराम महाराजांनी 'शाहू महाराजांचे इंग्रजीत असलेले चरित्र मराठीमध्ये अनुवादित करण्यासाठी दहा हजार रुपये खर्चाची तरतूद केली होती.'[४६] मराठी भाषेला चालना देण्यासाठी राजाराम महाराजांनी

प्रकाशन संस्था सुरू केली होती. छपाईसाठी छपाई संस्थेला अनुदान वितरित करीत. राजाराम महाराजांचा सर्व राजकीय कारभार व धोरणे ही मराठी भाषेमध्ये चालत असत. इंग्रजांचे राज्य असल्यामुळे त्यासाठी त्यांनी महत्त्वाचा राज्यकारभार हा इंग्रजीमध्ये चालवावा लागत असे. इंग्रजांचे प्रस्थ कोल्हापूर संस्थानामध्ये असल्यामुळे त्यांचा राजकीय प्रतिनिधी कोल्हापूर संस्थानाच्या दरबारी होता; पण याचा अर्थ असा नाही की राजाराम महाराजांनी मराठी भाषेला चालना दिली नाही. उलट मराठी भाषा अधिक समृद्ध व्हावी व विस्तारित व्हावी यासाठी शासकीय पातळीवर ग्रंथनिर्मिती, प्रकाशन संस्था, चरित्रलेखन, इतिहासाचे विविध पुस्तके आणि वर्तमानपत्र यासारख्या महत्त्वाच्या साधनांच्या आधारे मराठी भाषेच्या विस्तारासाठी महत्त्वाचा प्रयत्न केल्याचे दिसते. हे राजाराम महाराज यांचे महत्त्वाचे योगदान आहे. राजाराम महाराज केवळ प्रशासकीयदृष्ट्या सक्षम होते, असे नाही तर राजाराम महाराजांनी उलट मराठी भाषेला सर्वाधिक प्रमाणात चालना देण्यासाठी धोरणात्मक निर्णय पातळीवर राजकीय पाठिंबा दिला. मराठी भाषेतील पुस्तकाचे प्रकाशन करायचे असेल, तर त्यासाठी छापखाने आवश्यक आहेत. म्हणून राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानामध्ये छापखाना टाकण्यासाठी अकरा हजार रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली.

**६. संत तुकाराम महाराज यांच्या चरित्र लेखनासाठी अनुदान .**

संत तुकाराम महाराज यांच्या प्रेरणेने राजे छत्रपती शिवाजी महाराज यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. संत तुकाराम महाराज हे परिवर्तनवादी संत होते. समाजातील अंधश्रद्धा व दांभिकता नष्ट व्हावी, यासाठी बुद्धीने विचार करावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले. संत तुकारामांच्या कर्तृत्वाचा आलेख त्यांच्या विविध अभंगातून कार्यातून दिसतो. राजाराम महाराजांना संत तुकाराम महाराजांच्या अभंगाच्या आधारे समाजपरिवर्तनाचा महत्त्वाचा धागा सापडलेला होता. राजाराम महाराजांच्या काळामध्ये पंढरपूर वारीला प्रोत्साहन देण्यात आले होते. त्यासोबतच संत तुकाराम हे महत्त्वाचे संत आहेत. समाजपरिवर्तनाच्या दृष्टिकोनातून व जाती व्यवस्थेवर प्रहार करण्यासाठी अभंगाच्या आधारे खूप मोठ्या प्रमाणात लोकचळवळ व प्रबोधनाची भूमिका पार पाडली होती. या आधारे राजाराम महाराजांनी संत तुकारामांच्या चरित्राची निर्मिती करण्याचा एक

महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला होता. हरिश्चंद्र नारायण नवलकर यांनी लिहिलेल्या सत्यशोधन महासाधू श्री तुकाराम महाराज या पुस्तकाच्या छपाईसाठी राजाराम महाराजांनी मदत केली होती. ती मदत करण्यासाठी काही महत्त्वाच्या अटी टाकण्यात आल्या होत्या. त्यापैकी सदर पुस्तकाच्या ५० प्रति दरबारात मोफत देण्यात याव्यात या अटीवर हे पुस्तक प्रकाशित करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आलेला होता.[४७]

### ७. महात्मा फुले यांच्या चरित्राच्या निर्मितीस अनुदान

राजर्षी शाहू महाराज यांच्यावर महात्मा फुले यांच्या सामाजिक आणि आर्थिक चळवळीचा प्रभाव होता. महात्मा फुले यांनी स्थापन केलेल्या शाळा, महात्मा फुलेंची सत्यशोधक समाजाची निर्मिती, जातिव्यवस्थेच्या विरुद्ध महात्मा फुलेनी पुणे शहरामध्ये खूप मोठ्या प्रमाणात सामाजिक आणि राजकीय चळवळ उभा केली होती. त्यासोबतच ब्रिटिश साम्राज्यवादाच्या विरोधात महात्मा फुलेंनी खूप मोठा संघर्ष केला होता. याचा प्रभाव शाहूमहाराजांवर होता. म्हणून शाहू महाराजांनी महात्मा फुलेंच्या अनेक वैचारिक व व्यवहारिक चळवळीचा वारसा कोल्हापूर संस्थानात चालवला. मोठ्या प्रमाणात जाती व्यवस्थेच्या विरोधात दलित–बहुजनांच्या मुक्तीसाठी महत्त्वाचे कार्यक्रम हाती घेतले होते. ते पूर्णपणे यशस्वी करून दाखवण्यात यश मिळाले, ब्राह्मणेतर समाज व सत्यशोधक समाज यांचा समन्वय साधत राजर्षी शाहू महाराजांनी आरक्षणाचे तत्त्व, प्रशासकीय सेवेत दलितांना बहुजनांना संधी मिळावी यासाठी प्रयत्न केले. राजाराम महाराजांनी महात्मा फुलेंच्या वैचारिक चरित्र निर्मितीची गरज असल्याची जाणीव झाली होती. त्यासाठी राजाराम महाराजांनी प्रथम कोणते काम हाती घेतले असेल, तर 'महात्मा फुले यांच्या चरित्र निर्मितीचा प्रकल्प हाती घेतला. या प्रकल्पाला राजाराम महाराजांनी आठशे रुपये अनुदान देऊन हा ग्रंथ ब्राह्मणेतर चळवळीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा असल्याचे मान्य करून हा ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला. या ग्रंथाचे वितरण राजदरबारामध्ये व प्रशासनामध्ये झाले पाहिजे.''[४८] यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. कोल्हापूर संस्थानातील सर्व दलित–बहुजन समाजात महात्मा फुलेंच्या विचारांचा विस्तार झाला पाहिजे, महात्मा फुलेंनी केलेल्या कर्तृत्वाची उजळणी झाली पाहिजे व महात्मा फुलेंच्या कार्यापासून आपण प्रेरणा घेऊन समाज बदलण्यासाठी व जातिव्यवस्था मोडून

काढण्याच्या त्यांच्या भूमिकेच्या दिशेने जाण्यासाठी काहीतरी प्रयत्न केला पाहिजे. ही भूमिका घेऊन कोल्हापूर संस्थानमध्ये महात्मा फुले यांच्या चरित्राचे वितरण खूप मोठ्या प्रमाणात झाले. यामुळे महात्मा फुलेंच्या विचारांचा परिचय कोल्हापूर संस्थानातील बुद्धिजीवी वर्गामध्ये झाला. कोल्हापूर संस्थानातील सुशिक्षित वर्गामध्ये या चरित्राच्या वाचनाने एक आत्मविश्वास व आत्मभान निर्माण झाले हे राजाराम महाराज यांचे हे महत्त्वाचे योगदान आहे.

महात्मा फुले हे छत्रपती शाहू महाराजांचे वैचारिक प्रेरणास्थान होते. भारतामध्ये जातीव्यवस्थेच्या विरोधात पहिला वैचारिक आणि व्यावहारिक संघर्ष महात्मा फुले यांनी केला. भारतीय समाजातील अंतर्विरोधाचा अचूकपणे वेध घेऊन महात्मा फुले यांनी शुद्रातिशूद्र आणि स्त्रिया विरूद्ध इतर समुदाय अशी विभागणी करून धार्मिक सत्तेच्या विरोधात बंड केले. ब्राह्मणी पितृसत्ताक वर्चस्वातून निर्माण होणाऱ्या समस्या उदाहरणार्थ, बालविवाह, सतीप्रथा, केशवपन यांसारख्या समस्या मुळापासून नष्ट करण्यासाठी न्हाव्याचा बंड, महिलांसाठी शिक्षणसंस्था आणि अनाथ आश्रमे काढून एक पर्याय दिला. या सर्व संघर्षाचा दूरगामी परिणाम छत्रपती शाहू महाराजांवर झाल्याचे दिसून येते. म्हणून शाहू महाराजांनी शिक्षणाचा अधिकार आणि शिक्षणाच्या माध्यमातून आत्मसन्मान निर्माण करण्यासाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले. महात्मा फुलेंप्रमाणेच शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार दलित आणि बहुजनसमाजांपर्यंत केला. कुलकर्णी वतने बरखास्त करून जातीव्यवस्थेचे संस्थात्मक आणि भौतिक अस्तित्वाच्या हितसंबंधांवर हल्ला करून प्रशासकीय व्यवस्था आधुनिक मूल्यांच्या आधारे निर्माण केली. या सर्व गोष्टींचा विचार केल्यानंतर महात्मा फुले आणि शाहू महाराजांचे अतूट नाते होते.

छत्रपती राजाराम महाराज यांनीसुद्धा काळानुरुप बदलत्या सामाजिक व्यवस्थेनुसार जातीव्यवस्थेच्या विरोधात प्रखर सामाजिक आणि राजकीय चळवळी उभी केली. छत्रपती राजाराम महाराज यांनी कोल्हापूर संस्थानामध्ये जातीप्रतिबंधक कायदा रद्द करण्यासाठी महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेतले. कोल्हापूर संस्थानामध्ये जातीव्यवस्थेला कोणत्याही प्रकारचे अस्तित्व नसता कामा नये, यासाठी झुणका–भाकर सहभोजनासारखे मूलगामी उपक्रम राबवले.

सन १९२६ मध्ये छत्रपती राजाराम महाराज यांनी संस्थानामध्ये बालविवाह प्रतिबंधक कायदा लागू केला. हा कायदा खऱ्या अर्थाने धर्माच्या जोखडातून हिंदु धर्मातील महिलांना मुक्ती देणारा कायदा असल्याचे मानले गेले. त्यामुळे ब्राह्मणी पितृसत्ताक व्यवस्था नष्ट करण्याचा एक महत्त्वाचा प्रयत्न म्हणून या कायद्याकडे पाहिले गेले. या कायद्यामुळे अनेक महिला शिक्षण प्रक्रियेत येऊ शकल्या. शासकीय नोकऱ्यांमध्ये महिलांना प्रतिनिधीत्व करण्याची संधी या कायद्यामुळे उपलब्ध झाली. कोल्हापूर संस्थानाच्या शैक्षणिक, आर्थिक व राजकीय विकासाच्या प्रक्रियेत महिलांचा सक्रिय सहभाग या कायद्यामुळे मिळाला. शुद्रातिशुद्रांना आणि स्त्रियांना शिक्षणाच्या प्रक्रियेत आणून त्यांचा सर्वांगीण विकास साधण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाचे योगदान देणाऱ्या या कायद्यामुळे महात्मा फुलें यांचे स्त्रीमुक्तीचे मिशन पूर्ण करण्यास हातभार लावला.

महात्मा फुले आणि छत्रपती शाहू महाराज यांचा आणखी एक वारसा छत्रपती राजाराम महाराजांनी चालवला, तो म्हणजे शेतकऱ्यांची भौतिक सुधारणा. महात्मा फुले यांनी आपल्या 'शेतकऱ्याचा असूड' आणि 'ब्राह्मणाचे कसब' या दोन ग्रंथातून शेतकऱ्याच्या दारिद्र्यावर प्रकाशझोत टाकला. या ग्रंथातून महात्मा फुले यांनी स्पष्टपणे सांगितले होते, 'शेटजी–भटजी–लाटजी' हेच शेतकऱ्यांचे खरे शत्रु आहेत.' त्यामुळे शेतकऱ्यांना कर्मकांड, सत्यनारायण पूजा यामाध्यमातून भटजीवर्गाकडून नाडले जात होते, ते थांबवण्यासाठी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यांनी निर्णायक संघर्ष केला. त्याचाच पुढचा भाग सावकारीच्या जाचातून मुक्त करण्यासाठी महात्मा फुले यांनी शेटजी वर्गाविरूद्ध निर्णायक संघर्ष दिला. राजाराम महाराजांनी हाच वारसा पुढे चालवत शेतकऱ्यांच्या दारिद्र्याचे खरे कारण हे त्यांची वैचारिक गुलामगिरी हेच आहे. त्यासाठी त्यांनी गावोगावी 'वाचनालये आणि ग्रंथालये' सुरू केली. शेतकऱ्यांसाठी रात्रशाळा आणि साक्षरतेचे वर्ग सुरू केले. शेतीसाठी लागणारे भांडवलासाठी शेतकऱ्यांना सावकारावर विसंबून राहायला लागू नये यासाठी छत्रपती राजाराम महाराजांनी गावोगावी सहकारी पतसंस्था आणि बँकांच्या उभारल्या. या माध्यमातून शेतीसाठी सहज आणि सुलभपणे कर्जपुरवठा उपलब्ध केला

शाहू महाराजांच्या निधनानंतर छत्रपती राजाराम महाराजांनी तो वारसा कायम ठेवला. आर्थिक विकासामध्ये कोल्हापूर संस्थान खूप मोठ्या प्रमुख प्रमाणात पुढे गेल्याचे आपल्याला

दिसते. शैक्षणिक क्षेत्रामध्ये मूलभूत आणि क्रांतिकारी बदल करून समाजामध्ये प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे करण्यामध्ये महाराजांनी खूप महत्त्वाचे योगदान दिले. बालविवाह प्रतिबंध कायदा करून एक प्रकारे महिलांना मुक्तीचे व जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून दिली. छत्रपती राजाराम महाराजांचे हे कार्य केवळ महिलांच्या मुक्तीसाठी, संस्थानातील महिलांना प्राथमिक शिक्षण, व्यवसायिक शिक्षण व कौशल्यावर आधारित शिक्षण मिळाले पाहिजे यासाठी शैक्षणिक संस्था उभ्या केल्या. महिलांच्या शिक्षणामध्ये खूप मोठ्या प्रमाणात भागीदारी निर्माण केली. छत्रपती राजाराम महाराज यांनी पुढे जाऊन शेतीच्या क्षेत्रात पाणलोटाच्या क्षेत्रात आणि औद्योगिक आणि व्यापारी क्षेत्रांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात पुढे गेल्याचे आपल्याला दिसते.

## संदर्भसूची


१. संपादक, (२०१८), छत्रपती राजाराम महाराज यांचे विचार, संचालक, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई पृ. २

२. करवीर सरकारचे गझेट, भाग १, दि. ९ एप्रिल १९२७, कोल्हापूर, पृ. ७०–७२

३. कित्ता पृ. ७२

४. करवीर सरकारचे गॅझेट, भाग १, दि. १२ जानेवारी, १९२९, कोल्हापूर, पृ. ०७

५. करवीर सरकारचे गॅझेट, भाग १, दि. ७ मे १९२७, कोल्हापूर, पृ. ९६

६. हेरवाडे श्रीधर,१९८३, छत्रपती राजाराम चरित्रग्रंथ, ॲड. महादेवराव आडगुळे, चिटणीस छत्रपती राजाराम प्रतिष्ठान कोल्हापूर, पृ. ९०

७. संपादक (२०१८), छत्रपती राजाराम महाराज यांचे विचार, संचालक, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई, पृ. ३०

८. हेरवाडे श्रीधर,१९८३, छत्रपती राजाराम चरित्रग्रंथ लेखक, प्रकाशन ॲड. महादेवराव आडगुळे, चिटणीस छत्रपती राजाराम प्रतिष्ठान, कोल्हापूर, पृ. ८९, ९०

९. संपादक, (२०१८), छत्रपती राजाराम महाराज यांचे विचार, संचालक, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई, पृ. २१

१०. हेरवाडे श्रीधर,१९८३, छत्रपती राजाराम चरित्रग्रंथ लेखक, प्रकाशन ॲड. महादेवराव आडगुळे, चिटणीस छत्रपती राजाराम प्रतिष्ठान, कोल्हापूर, पृ. ८९, ९०, ९१
११. संपादक (२०१८) छत्रपती राजाराम महाराज यांचे विचार, संचालक, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई पृ. १६
१२. धाटावकर भास्कर, (संपा.), २००६ छत्रपती राजाराम महाराज यांचे निवडक आदेश भाग १, संचालक, पुराभिलेख संचालनालय महाराष्ट्र शासन, कोल्हापूर, पृ. ३
१३. हुजूर ऑफिस, ठराव बुक क्रमांक ४४९, जनरल ठराव क्रमांक ५१९, दि. २६ मार्च १९२८, कोल्हापूर
१४. धाटावकर भास्कर, (संपा.), २००६, छत्रपती राजाराम महाराज यांचे निवडक आदेश भाग १, संचालक, पुराभिलेख संचालनालय महाराष्ट्र शासन, कोल्हापूर, पृ. ७९
१५. कित्ता पृ. १६
१६. संपादक, (२०१८), छत्रपती राजाराम महाराज यांचे विचार, संचालक, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई पृ. ४५
१७. धाटावकर भास्कर (संपा.), २०१०, छत्रपती राजाराम महाराज यांचे निवडक आदेश भाग २, संचालक, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन कोल्हापूर, पृष्ठ क्रमांक १
१८. कित्ता पृ. २४
१९. कित्ता पृ. २८
२०. कित्ता पृ. ५४
२१. कित्ता पृ. ७८
२२. कित्ता पृ. ११६
२३. कित्ता पृ. १४८
२४. हेरवाडे श्रीधर,१९८३, छत्रपती राजाराम चरित्रग्रंथ लेखक, प्रकाशन ॲड. महादेवराव आडगुळे, चिटणीस छत्रपती राजाराम प्रतिष्ठान, कोल्हापूर, पृ. ६३–७०
२५. कित्ता पृ. ७०

२६. कित्ता पृ. ७१
२७. कित्ता पृ. ७२
२८. कित्ता पृ. ७१–७३
२९. हुजूर ऑफिस, जनरल ठराव, ठराव बुक क्रमांक ४४८, ठराव क्रमांक ३९८, दि. १ डिसेंबर १९२७, कोल्हापूर
३०. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, ठराव बुक क्रमांक ३८०, मुलकी ठराव क्रमांक २५४, दि. ३० नोव्हेंबर १९२७, कोल्हापूर
३१. करवीर सरकारचे गॅझेट, भाग २, दि. २ मे १९३५, पृ. ५८, कोल्हापूर
३२. करवीर सरकारचे गॅझेट, भाग १, दि. ४ डिसेंबर १९२७, पृ. २७१, कोल्हापूर
३३. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव बुक क्र. ४४९, ठराव क्र. ४३८, १० डिसेंबर १९२७ कोल्हापूर
३४. संचालक, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन, छत्रपती राजाराम महाराज यांचे निवडक आदेश, भाग – २, एप्रिल २०१०, कोल्हापूर, पृ. क्र. ३९
३५. करवीर सरकारचे गॅझेट, भाग ४, दि. १२ जून १९२६, कोल्हापूर, पृ. ५८,५९
३६. धाटावकर भास्कर (संपा.) २०१० छत्रपती राजाराम महाराज यांचे निवडक आदेश भाग २, संचालक पुराभिलेख संचालनालय महाराष्ट्र शासन कोल्हापूर, पृष्ठ क्रमांक – ८
३७. हुजूर ऑफीस, करवीर सरकारचे गॅझेट, भाग–१, दिनांक २९ मे २९२६, कोल्हापूर, पृ. ६७ ते ६९
३८. करवीर सरकारचे गॅजेट, भाग १, दि. १८ डिसेंबर १९२६, कोल्हापूर, पृ. २५२ ते २५६
३९. हुजूर ऑफिस, देवस्थान खाते, बुक क्र. ३२२ ठराव क्र. ३४२, दि. १९ जुलै १९२२, कोल्हापूर
४०. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, मुलकी ठराव बुक क्र. ३७८ ठराव क्र. ४५९, १५ डिसेंबर १९२६, कोल्हापूर

४१. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव बुक क्र. ३४६, ठराव क्र. ६३, १३ जुलै १९२३, कोल्हापूर

४२. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव बुक क्र. ३४०, ठराव क्र. ३६८, २० डिसेंबर १९२३,, कोल्हापूर

४३. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव बुक क्र. ३१६, ठराव क्र. ७२२, दि. १३ ऑक्टोबर १९२२, कोल्हापूर

४४. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव बुक क्र. ४५५, ठराव क्र. ५७२, दि. ३० मार्च १९३०, कोल्हापूर

४५. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव बुक क्र. ३४०, ठराव क्र. ३६८, दि. २० डिसेंबर १९२३, कोल्हापूर

४६. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव बुक क्र. ३५६, ठराव क्र. ३२५, दि. १३ नोव्हेंबर १९२४, कोल्हापूर

४७. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव बुक क्र. ४५५, ठराव क्र. ५६१, दि. २ एप्रिल १९३०, कोल्हापूर

४८. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव बुक क्र. ४४९, ठराव क्र. ४३८, दि. १० डिसेंबर १९२७, कोल्हापूर

प्रकरण सहावे

# समारोप

## (सारांश आणि निष्कर्ष)

- प्रस्तावना

१) शैक्षणिक सुधारणांची फलनिष्पती

२) सामाजिक सांस्कृतिक सुधारणांची फलनिष्पती

३) शेती क्षेत्रातील सुधारणांची फलनिष्पती

४) आर्थिक, व्यापारी आणि वित्तीय सुधारणांची फलनिष्पत्ती

५) प्रशासकीय सुधारणांची फलनिष्पती

# प्रकरण सहावे

# समारोप

# (सारांश आणि निष्कर्ष)

## प्रस्तावना

भारताच्या इतिहासामध्ये छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या व सामाजिक आणि आर्थिक सुधारणांमध्ये खूप महत्त्वाचे योगदान दिले आहे. शाहू महाराजांच्या योगदानामुळे भारतातील दलित व बहुजन समाजामध्ये एक आशादायक व सन्मानाचे जीवन प्राप्त होण्याची संधी मिळाली. कोल्हापूर संस्थानाचा केवळ सामाजिक विकास केला गेला नाही, तर आर्थिक आणि व्यापारी क्षेत्रामध्ये कोल्हापूर हे संस्थान नावारूपाला आले. सामाजिक न्यायाचा पुरस्कर्ता व जनक म्हणून शाहू महाराजांचे नाव घेतले जाते. हरित क्रांतीचा जनक म्हणून, सहकार चळवळीचा पुरस्कर्ता म्हणून, समाज क्रांतिकारक म्हणून सुद्धा खूप मोठ्या प्रमाणात संबोधिले जाते. त्यांच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक सुधारणांचा वैचारिक वारसा म्हणून आज सुद्धा ऐतिहासिक संदर्भात पुनरावृत्ती केली जाते. शाहू महाराजांच्या अचानक झालेल्या निधनामुळे भारतभर व कोल्हापूर जनमानसामध्ये एक प्रकारची निराशेची व अंधःकारमय परिस्थिती निर्माण झाली होती.

शाहू महाराजांच्या निधनानंतर छत्रपती राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानाच्या राज्यकारभाराची सूत्रे हाती घेऊन कोल्हापूर संस्थानमध्ये आपल्या वडिलांचा सामाजिक आणि राजकीय चळवळीचा वारसा समर्थपणे पुढे चालवला, यापुरतेच हे मर्यादित नाही. प्रशासकीयदृष्ट्या कोल्हापूर शहरामध्ये व संस्थानांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात आमूलाग्र बदल केला. कोल्हापूर संस्थानाची आर्थिक आणि वित्तीय क्षेत्रामध्ये सातत्याने भरभराट घडवून आणली. एक सकारात्मक वाटचाल व आर्थिक विकासाचे केंद्र म्हणून ते ओळखले जाऊ लागले. शिक्षण आरोग्य व मनोरंजनासारख्या क्षेत्रामध्ये विकास करून कोल्हापूर संस्थान हे भारताच्या इतर संस्थांनांच्या दृष्टिकोनातून प्रगतिशील व प्रागतिक राहिले. बालविवाह प्रतिबंधक कायदा किंवा महिलांच्या शिक्षणाचा पुरस्कार करून शैक्षणिक संस्थांचा विस्तार ग्रामीण भागापर्यंत घेऊन जाणारा राजा म्हणूनसुद्धा छत्रपती राजाराम महाराज यांच्याकडे पाहिले जाते.

## १. शैक्षणिक सुधारणांची फलनिष्पत्ती :

शिक्षण हे एक मानवी जीवनामध्ये जाणीव जागृती निर्माण करण्याचे साधन आहे. शिक्षणामुळे मानवी जीवनाला सार्थकता प्राप्त होते. हे छत्रपती राजाराम महाराजांनी करून दाखवले. छत्रपती राजाराम महाराजांनी शिक्षणासारखे क्षेत्र हे कुशल मानवी गुंतवणुकीचे क्षेत्र आहे, हे ओळखले होते. त्यामुळे कोल्हापूर शहरामध्ये उच्चशिक्षित तरुणांची फळी निर्माण केली; पण त्यासोबतच बाहेरच्या देशांमध्ये या तरुणाने वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आपले नाव दैदिप्यमान केले. बालविवाहसारखी पद्धत नष्ट करून मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी महत्त्वाचा क्रांतिकारी निर्णय राजाराम महाराजांनी घेतला. ज्याचा परिणाम कोल्हापूर संस्थानाच्या साक्षरतेमध्ये लक्षणीय वाढ झाली. कोल्हापूर संस्थानाची एकूण लोकसंख्या ही १९४१ च्या जनगणनेनुसार १० लाख ९२ हजार ०४६ इतकी होती. त्यापैकी ९ लाख ५४ हजार १४३ हे निरक्षर होते. १ लाख ३७ हजार ९३३ लोक हे साक्षर होते. त्यापैकी १ लाख १९ हजार ५९५ पुरुष हे साक्षर होते आणि १८ हजार ३०८ इतक्या महिला या साक्षर होत्या. टक्केवारीच्या भाषेत बोलायचे झाले तर ६२–१२ याप्रमाणे साक्षरतेची संख्या होती.[१]

### प्राथमिक शिक्षण

कोल्हापूर संस्थानामध्ये शिक्षण संस्था सुरू करण्यामागे छत्रपती शाहू महाराजांची एक उदात्त भूमिका होती. समाजातील वंचित, शोषित बहुजन समुदायांना आधुनिक शिक्षण मिळाले, तर पारंपरिक जोखडातून ते मुक्त होतील, आधुनिक शिक्षणाच्या आधारे ते स्वतःचा विकास घडवून आणतील, असा त्यांचा विश्वास होता. त्यामुळे त्यांनी प्राथमिक शिक्षण सर्वांसाठी मोफत व सक्तीचे केले. शाहू महाराज भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अकराव्या अधिवेशनामध्ये आपले विचार व्यक्त करताना म्हणाले होते की, ''शिक्षण हाच तरणोपाय आहे, असे माझे ठाम मत आहे. शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही, असा इतिहास सांगतो. अज्ञानातच बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व लढवय्ये वीर कधीही निपजणार नाहीत म्हणून सक्तीच्या व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानाला अत्यंत आवश्यकता आहे.''[२] त्यासाठी त्यांनी प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे केले. छत्रपती शाहू महाराजांच्या राजकीय कारकिर्दीच्या उत्तरार्ध लक्षात घेतला, तर शिक्षणाच्या क्षेत्रांमध्ये शाहू महाराजांचे

योगदान लक्षात येते. कोल्हापूर संस्थानामध्ये शिक्षणाची एक संस्था सुद्धा अस्तित्वात नसताना शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणाचे जाळे व एकूणच शैक्षणिक संस्था स्थापन करण्यामध्ये खूप मोलाचा वाटा उचलल्याचे लक्षात येते.

सन १९२२ मध्ये शाहू महाराजांच्या धोरणांनुसार मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण उपलब्ध असलेल्या एकूण शाळांची संख्या ५५९ होती. प्राथमिक शाळेमध्ये उपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही १९२२ – २३ मध्ये २६,६४८ ते ३१,२७३ इतकी होती. १९२२ ते १९२३ मध्ये अनुदानित शाळा यांचे प्रमाण ३८ वरून ६० पर्यंत गेल्याचे दिसते. अनुदानित शाळेमध्ये उपस्थित राहणाऱ्या मुलांची संख्या ३,१७४ ते ३,७८८ इथपर्यंत गेली. दैनंदिन उपस्थितीचा विचार केला, तर एकूण १९३० ते २९३० यादरम्यान होती.[३] शाहू महाराजांच्या काळामध्ये मुलींच्या शाळांमध्ये मोठ्या प्रमाणात विस्तार झाला. ग्रामीण भागातील मुलींना शैक्षणिक सुविधा आणि शालेय संधी उपलब्ध करून देण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली होती.

शाहू महाराजांच्या राजकीय कारकिर्दीच्या उत्तरार्धामध्ये मुलींच्या शाळेमध्ये उपस्थितीमध्ये खूप मोठ्या प्रमाणात वाढ झालेली होती.१९२२–२३ मध्ये ३३ वरून ३५ वर गेले होते. मुलींच्या शाळेमध्ये एकूण १९१८ ते २०३८ इतक्या प्रमाणात प्रवेश घेऊन उपस्थिती असल्याचे आपणास दिसते, त्यामध्ये सुद्धा अहिल्याबाई मुलींची शाळा यामध्ये ३३८ ते ३४२ इतकी उपस्थिती होते. दैनंदिन उपस्थितीचा विचार केला तर २२५ ते २७१ इतकी असल्याचे दिसून येते.[४] मुलींच्या सर्व शाळा या अनुदानित असल्यामुळे शाहू महाराज दरवर्षी त्यासाठी लागणारा म्हणजेच शाळा बांधकाम, शिक्षकांचा पगार, पुस्तके व इतर शैक्षणिक सुविधा या माध्यमातून मुलींच्या शिक्षणासाठी लागणाऱ्या निधीत मोठ्या प्रमाणात वाढ होईल ही दूरदृष्टी ठेवून खर्च केल्याचे दिसून येते. हा खर्च सन १९२२–२३ मध्ये रु. १४,२२५ ते रु. १६,९६० इतका खर्च मुलींच्या शैक्षणिक शाळेसाठी व शैक्षणिक सुविधेसाठी करण्यात आलेला होता. मातृभाषेतून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्यासुद्धा लक्षणीय होती. शाहू महाराजांच्या उत्तरार्धामध्ये एकूण ४४० विद्यार्थी मातृभाषेतील परीक्षेसाठी पात्र झालेले होते. त्यापैकी ४१० पैकी २९० मुलांपैकी म्हणजेच विद्यार्थी परीक्षेसाठी पात्र झालेले होते. त्यातील १८३

विद्यार्थ्यांपैकी ९३ विद्यार्थी पास झाले आहेत. सौ. मीना कुलकर्णी व ब. शि. कुलकर्णी यांनी आपले निरीक्षण नोंदवताना म्हटले आहे की, ''कोल्हापूर शहरात व संस्थानात सक्तीचे शिक्षण देण्याची त्यांनी सप्टेंबर १९१६ मध्ये आज्ञा केली. १९१८–१९ मध्ये या वर्षात ही योजना विस्तृत स्वरूपात होऊन एकूण ९६ शाळा ठिकठिकाणी उघडण्यात आल्या. दि. ४ मार्च, १९१८ ला करवीर पेट्यात चिखली येथे मोफत व सक्तीचे शिक्षण देणारी पहिली शाळा महाराजांच्या हस्ते उघडण्यात आली. या योजनेच्या टप्प्यात सुमारे ७५ हजार रुपये खर्च झाले आणि ४ हजार ६३१ मुले शाळेत येऊ लागली. सुरुवातीच्या काळात १ लाख रुपयांपैकी फक्त ६ हजार रुपये खर्च झाले; परंतु हाच खर्च महाराजांच्या कारकिर्दीच्या शेवटच्या वर्षी ३ लाख रुपयापेक्षा जास्त होता. यावरून शैक्षणिक कार्याचा खूप विस्तार झाल्याचे दिसते. प्रथम मोठ्या गावांत शाळा सुरू करण्यात आल्या. कारण शिक्षणाची सोय नव्हती व लोकांमध्ये शिक्षणाबद्दल आवड निर्माण झाली नव्हती. तालुक्याच्या गावी मराठी व इंग्रजी इयत्तापर्यंत शिक्षणाची तजवीज केली. शेतकऱ्यांच्या मुलांना शाळेची फी माफ केली. पहिल्या दोन नंबर पर्यंत विद्यार्थ्यांना पुस्तके बक्षीस देण्याचा नियम केला. महाराजांच्या वाढदिवस समारंभात प्राथमिक शाळेतील मुलांसाठी काही रक्कम मंजूर केली. परीक्षा पास होणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळा मास्तर व नोकरी देण्याचे आश्वासन दिले. यामुळे शिक्षण प्रसाराला चालना मिळाली.[५]

छत्रपती राजाराम महाराजांनी शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे. शिक्षण हे ज्ञान निर्मितीचे केंद्र आहे. त्यांच्या माध्यमातून शिक्षणाच्या माध्यमातून ज्ञाननिर्मिती झाली पाहिजे आणि ज्ञाननिर्मिती होत असताना मराठी भाषा आणि इंग्रजी भाषा हे अध्ययन–अध्यापनात प्रमुख साधन असले पाहिजे. हा त्यामागचा एक उदात्त हेतू होता . छत्रपती राजाराम महाराजांच्या कालावधीमध्ये प्राथमिक शिक्षण आणि माध्यमिक शिक्षण यांचा विस्तार खूप मोठ्या प्रमाणात झालेला दिसतो. छत्रपती राजाराम महाराजांनी छत्रपती शाहू महाराजांच्या प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे या भूमिकेतून खूप मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागांमध्ये विस्तार केला. याची परिणती आपणास कोल्हापूर संस्थानात शिक्षण संस्थांची संख्या वाढल्याचे दिसते. सुरुवातीच्या काळात कोल्हापूर संस्थानामध्ये माध्यमिक शिक्षण देणाऱ्या बारा शाळा होत्या. त्यामध्ये दोन मुलींच्या शाळा होत्या. १९३१–३२ मध्ये अनुदानित शाळांची संख्या २३ तर खाजगी तत्त्वावर चालणाऱ्या माध्यमिक शाळांची संख्या ३ होती. एकूणच,

छत्रपती राजाराम महाराजांनी ७५२ प्राथमिक शाळा आणि १६ तांत्रिक आणि धार्मिक शिक्षण देणाऱ्या शाळांची निर्मिती केल्याचे दिसते.[६]

छत्रपती राजाराम महाराजांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर म्हणजेच १९२१ ते १९२२ यामध्ये एकूण शैक्षणिक संस्था आणि त्याच संस्थेतून निर्माण होणाऱ्या तज्ज्ञ व्यक्तींची आकडेवारी पाहिल्यानंतर आपणास कल्पना येते. १९२१–२२ या कालावधीमध्ये कोल्हापूर शैक्षणिक संस्थेतून निर्माण होणाऱ्या तज्ज्ञ व्यक्तींची संख्या ही वार्षिक हजार याप्रमाणे होती. ती १९२२–२३ मध्ये १० हजार झाली. १९२३–२४ मध्ये २०,००० झाली. त्याचा आलेख १९३१–३२ मध्ये प्रत्येक वर्षी ६०,००० तज्ज्ञ, अभ्यासू व्यक्ती कोल्हापूर शैक्षणिक संस्थेतून निर्माण झाल्याचे चित्र आणि आकडेवारी आपणास दिसते. छत्रपती राजाराम महाराज यांची बांधिलकी शिक्षण सक्तीचे आणि मोफत देणे हे होते. त्यासाठी छत्रपती राजाराम महाराजांनी शैक्षणिक खर्चसुद्धा वाढवल्याचे दिसते. १९२१–२२ या शैक्षणिक वर्षात शिक्षणावर एक लाख रुपये खर्च झाला होता. प्रामुख्याने हा खर्च वाढत जाऊन १९३१–३२ मध्ये वार्षिक खर्च हा ५ लाख ६७ हजार २६१ रुपयांपर्यंत गेल्याचे आपणास दिसून येते.[७]

छत्रपती राजाराम महाराजांच्या राजकीय कारकिर्दीच्या उत्तरार्धामध्ये प्राथमिक शिक्षण हे खूप मोठ्या प्रमाणात गावपातळीवर आणि शहराच्या पातळीवर विस्तारलेले होते. १९३९–४० मध्ये प्राथमिक शाळा या एकूण ७२१ होत्या. त्यामध्ये ४९ हजार ९०१ विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्यापैकी ३,०३१ विद्यार्थिनींचा समावेश होता. त्यातील कोल्हापूर संस्थानाच्या आणि राज्याच्या अंतर्गत ५१ शाळा होत्या. ५४७ शाळा इलाका पंचायतीच्या अंतर्गत होत्या आणि १२६ शाळा या जागी मा. जहागीरदार यांच्या व्यवस्थापनाच्या नियंत्रणाखाली होत्या. प्राथमिक शाळेसाठी एकूण खर्च हा ३ लाख ४९ हजार ९०९ इतका करण्यात आलेला होता.[८]

स्त्री शिक्षणाला प्राधान्य देऊन छत्रपती राजाराम महाराजांनी स्त्री वर्गाला शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात महत्त्वाचे योगदान दिले होते. १९३९ – ४० मध्ये एकूण मुलींची शाळांची संख्या ७१ इतकी होती, त्यामध्ये ४,३२१ मुली शिक्षण घेत होत्या. त्यापैकी पाठशाळा या कोल्हापूर शासनाच्या व्यवस्थापनाखाली होत्या. ५२ शाळा या इलाका पंचायतीतील व्यवस्थापनाच्या अंतर्गत होत्या आणि १० शाळा या जहागीरदार व्यवस्थापनाच्या अंतर्गत

होत्या. मुलींच्या शिक्षणासाठी छत्रपती राजाराम महाराजांकडून ३४,९६१ रुपये करण्यात आलेला होता. शाळेतील शिक्षकांचे प्रमाण हे सुद्धा छत्रपती राजाराम महाराजांनी खूप मोठ्या प्रमाणात भरती करून वाढवलेले होते. प्राथमिक शाळेतील एकूण शिक्षक १,६६५ ते होते. त्यामध्ये १,५३३ शिक्षक आणि १०२ महिला शिक्षिका होत्या.[९]

**माध्यमिक शिक्षण:**

शाहू महाराजांच्या राजकीय कारकिर्दीमध्ये माध्यमिक शिक्षणाला सुद्धा खूप मोठ्या प्रमाणात चालना देण्यात आली. माध्यमिक शिक्षणामध्ये प्रामुख्याने इंग्रजी माध्यमातील शिक्षण हा एक भाग होता. १९२२–२३ मध्ये इंग्रजी माध्यमातील माध्यमिक शाळांची संख्या प्रामुख्याने २३ वरून– २६ पर्यंत पोहोचली होती. या शाळांतील एकूण विद्यार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत होती. शाळांची विद्यार्थी पटसंख्या २,१३८ वरून २,७७२ या पर्यंत पाहोचली होती.[१०] यामध्ये प्रामुख्याने राजाराम हायस्कूल हेसुद्धा कोल्हापूर संस्थानातील अतिशय महत्त्वाचे माध्यमिक शिक्षणाचे केंद्र होते. हे केंद्र आर्य प्रतिष्ठान सभा, उत्तर प्रदेश यांच्याकडून चालवले जात असे. यामध्येसुद्धा ५०३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. दैनंदिन उपस्थितीबाबत जवळपास ४१५ विद्यार्थी उपस्थित राहत होते. दुसरे एक महत्त्वाचे माध्यमिक शिक्षणाचे केंद्र म्हणून ओळखले जात होते, ते म्हणजे 'छत्रपती शिवाजी महाराज बोर्डिंग हाऊस'. यामध्येसुद्धा प्रामुख्याने मागास जातींना शिक्षणासाठी स्कॉलरशिप देऊन शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन दिले जात होते. त्यामध्ये २२ विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप देण्यात आलेली होती, तर ४७३ मुले या संस्थेमध्ये प्रवेश घेतलेला होता. यामध्ये १०५ हे ब्राह्मण होते, ३०५ इतके हिंदू होते, २५ मुस्लिम होते आणि ३० मागास जातीचे होते व ८ इतर होते.[११] प्रामुख्याने माध्यमिक शिक्षण हे वयाच्या दहाव्या वर्षांपासून घेतले जात होते व ते दहावीपर्यंत पूर्ण करत असत. माध्यमिक शिक्षणासाठी शाहू महाराजांकडून मुलांना स्कॉलरशिप सुविधा उपलब्ध करून दिली. कोल्हापूर संस्थानामध्ये माध्यमिक शिक्षण प्रोत्साहन देण्यासाठी अशा प्रकारच्या स्कॉलरशिप दिल्या जात होता. त्यामुळे माध्यमिक शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्या लक्षणीय होती. १९२३ मध्ये प्रामुख्याने ३३ मुलांना स्कॉलरशिप दिली. ती स्कॉलरशिप प्रामुख्याने प्रति महिना ३ रुपये याप्रमाणे उपलब्ध करून दिली. हे सर्व विद्यार्थी राजाराम हायस्कूल या शाळेतील होते.

त्यासोबतच पाच विद्यार्थ्यांना प्रति महिना स्कॉलरशिप जहागीरदार ऑफ रयत यांच्याकडून दिली जात होती. बारा विद्यार्थ्यांना एकूण मासिक १५० रुपये याप्रमाणे स्कॉलरशिप दिली जात होती. माध्यमिक शिक्षणाच्या प्रायव्हेट इंग्रजी माध्यमातील शाळांनासुद्धा शाहू महाराजांकडून वेगवेगळ्या प्रकारे आर्थिक अनुदान दिले. शाहू महाराजांच्या राजकीय कारकिर्दीच्या उत्तरार्धामध्ये खाजगी इंग्लिश शाळांमध्ये ३३४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. या काळात अशा इंग्रजी शाळांसाठी शाहू महाराजांकडून वार्षिक ८०१३ रुपये अनुदान दिले जात होते. आणखी एक महत्त्वाची शाळा म्हणून सिटी हायस्कूल, कोल्हापूर ही माध्यमिक शिक्षणासाठी महत्त्वाची व नावाजलेली संस्था होती. यामध्येसुद्धा २६३ विद्यार्थ्यांनी १९२१-२२ मध्ये प्रवेश घेतला होता. याला सुद्धा शाहू महाराजांकडून अनुदान दिले जात होते. या संस्थेसाठी वार्षिक अनुदान म्हणून १९२२-२३ मध्ये ८ हजार ३३ रुपये इतके देण्यात आलेले होते.[१२] माध्यमिक शाळेतील एकूण विद्यार्थ्यांची स्थिती दर्शवणारा खालील तक्ता त्याच्या आधारे आपणास कल्पना येईल की, माध्यमिक शाळेतील परीक्षेत बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या आणि परीक्षेत पास होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या याच्या आधारे आपणाला लक्षात येईल.

**तक्ता १ : माध्यमिक शाळेतील परीक्षेत बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या**

| अ. क्र. | माध्यमिक शाळेचे नाव | परीक्षेसाठी पात्र १९२१-२२ | परीक्षेत पास १९२१-२२ | परीक्षेसाठी पात्र १९२१-२२ | परीक्षेत पास १९२१-२२ |
|---|---|---|---|---|---|
| १ | राजाराम हायस्कूल | ६८ | १६ | १११ | ६० |
| २) | प्रायव्हेट हायस्कूल | २६ | २३ | ६८ | २० |
| ३) | सिटी हायस्कूल | ११२ | ४१ | २६ | २३ |
| ४) | विद्यापीठ हायस्कूल | १२ | ०८ | ५५ | २२ |

स्रोत : कोल्हापूर संस्थानाचा प्रशासकीय अहवाल-१९२२-२३

छत्रपती राजाराम महाराजांनी माध्यमिक शिक्षणाला सुद्धा खूप मोठ्या प्रमाणात चालना दिलेली होती. छत्रपती राजाराम महाराजांच्या काळामध्ये सुद्धा शैक्षणिक संस्थांचा विस्तार खूप मोठ्या प्रमाणात झालेला होता यामध्ये प्रामुख्याने पुढील तक्त्याच्या आधारे आपणाला स्पष्ट करता येईल.

**तक्ता २**

**माध्यमिक शाळेतील परीक्षेत बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या**

| **अनुक्रमांक** | **संस्थेचे नाव** | **शासकीय** | | **जागीरदार क्षेत्र** | |
|---|---|---|---|---|---|
| | | **संस्थेची संख्या** | **विद्यार्थी संख्या** | **संस्थेची संख्या** | **विद्यार्थी संख्या** |
| १ | कॉलेज | १ | ६८३ | ---------- | ------- |
| २ | माध्यमिक शाळा | ३२ | ३०८३ | ६ | १३० |
| ३ | प्राथमिक शाळा | ६२७ | ३५,४७५ | १२५ | ६९११ |
| ४ | विशेष शाळा | ११ | ३६७ | ५ | १९९ |

स्त्रोत : कोल्हापूरचा प्रशासकीय अहवाल-१९३१-३२

**तक्ता ३**

**माध्यमिक शाळेतील परीक्षेत बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या**

| **अनुक्रमांक** | **संस्थेचे नाव** | **शासकीय** | | **जागीरदार क्षेत्र** | |
|---|---|---|---|---|---|
| | | **संस्थेची संख्या** | **विद्यार्थी संख्या** | **संस्थेची संख्या** | **विद्यार्थी संख्या** |
| १ | कॉलेज | ३ | ११३१ | ---------- | ------- |
| २ | माध्यमिक शाळा | ११ | २९३८ | २ | ३९९ |
| ३ | ए. व्ही. शाळा | २४ | १४३३ | ६ | २५९ |
| ४ | प्राथमिक शाळा | ६६१ | ४६१८१ | १४१ | ८५४३ |
| ५ | विशेष शाळा | १० | १४०३ | ७ | २६२ |

स्त्रोत : कोल्हापूरचा प्रशासकीय अहवाल-१९३९-४०

कोल्हापूर संस्थानामध्ये १९३९-४० मध्ये एकूण ३ महाविद्यालये, १३ उच्च माध्यमिक शाळा ज्यामध्ये मुलीसाठीच्या ०२ हायस्कूल आहेत. ३० मातृभाषेतील शाळा, ८०२ प्राथमिक शाळा आणि १७ तांत्रिक आणि धार्मिक शाळा होत्या. १९३९-४० यामध्ये प्रामुख्याने या वर्षामध्ये आजच्या ६५ शैक्षणिक संस्था निर्माण झालेल्या होत्या. त्यामध्ये ६२ हजार ७८२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला होता. एकूण विद्यार्थ्यांपैकी ५.६१ टक्के विद्यार्थ्यांना कोल्हापूर

संस्थानाकडून छत्रपती राजाराम महाराजांनी शिष्यवृत्ती दिली होती.[१३] सर्वांना शिक्षण मोफत आणि सक्तीचे हे दोन उपक्रम छत्रपती राजाराम महाराजांनी राबवले होते. पण त्यासोबतच शैक्षणिक खर्च हा सुद्धा कोल्हापूर संस्थानाच्या माध्यमातून चालवला जावा ही भूमिका घेऊन, छत्रपती शाहू महाराजांनी आणि त्यानंतर छत्रपती राजाराम महाराजांनी खूप मोठ्या प्रमाणात शैक्षणिक निधीसाठी कोल्हापूरचे आर्थिक बजेट खर्च करण्यात आलेले होते. यामुळे अनेक मुलं आणि मुली शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात येण्यास मदत झाली. खालील तक्ता हा आपणास स्पष्टपणे किती खर्च करण्यात आला याबद्दलचा तपशील दाखवतो.

**तक्ता ४**

**शैक्षणिक खर्च**

| अ. क्र. | शाळेचे नाव | शैक्षणिक खर्च (१९३९–४०) | शैक्षणिक खर्च (१९४०–४१) |
|---|---|---|---|
| १ | राजाराम हायस्कूल | ३६,४५६ | ३३,२५५ |
| २ | श्रीमती महालक्ष्मी लक्ष्मीबाई गर्ल्स हायस्कूल | १६,६४५ | १५४१५ |
| ३ | श्री महाराणी ताराबाई हायस्कूल | ६६०६ | ६४२४ |
| ४ | मॉडेल हायस्कुल | १०,८४६ | ११,०६६ |
| ५ | शाहू हायस्कूल | ७६३५ | ६८७७ |
| ६ | सिटी हायस्कूल | ८३०७ | ७५५४ |
| ७ | न्यू इंग्लिश हायस्कूल | १३,८७६ | १३,९८१ |
| ८ | प्रायव्हेट इंग्लिश हायस्कूल | १०,६७९ | १२,२८८ |
| ९ | विद्यापीठ हायस्कूल | ९०३१ | ८७०५ |
| १० | आयर्विन ख्रिश्चन हायस्कूल | १४,६५९ | १२,६३३ |
| ११ | इशर गर्ल्स ख्रिश्चन हायस्कूल | ८५३८ | ८७५८ |
| १२ | श्री शाहू हायस्कूल | ७८२४ | ६९०३ |
| १३ | गोविंदराव इंग्लिश हायस्कूल | ८६२० | ८६२० |

स्रोत : कोल्हापूर राज्याचे प्रशासकीय अहवाल १९३९–४०

**उच्च शिक्षण :**

कोल्हापूर संस्थानामध्ये उच्च शिक्षणालासुद्धा खूप मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन देण्यात आलेले होते. छत्रपती शाहू महाराजांनी उच्च शिक्षणाची दारे एक प्रकारे दलित आणि बहुजन समाजासाठी उघडी करून उच्चशिक्षित हजारो पिढ्या कोल्हापूर संस्थानाच्या अंतर्गत तयार केल्या. उच्च शिक्षणामुळे बहुजन आणि दलित समाजातील ही पिढी प्रशासकीय सेवेत पाश्चिमात्त्य देशांमध्ये शिक्षणासाठी किंवा नोकरीच्या महत्त्वाच्या पदावर खूप मोठ्या प्रमाणात नेतृत्व करू लागली. उच्च शिक्षणासाठी छत्रपती शाहू महाराज आणि राजाराम महाराज यांनी अनुदान देऊन खूप मोठ्या प्रमाणात अनेकांना उच्च शिक्षण मोफत उपलब्ध करून देण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली. राजाराम कॉलेज हे प्रामुख्याने मुंबई विद्यापीठाशी संलग्न होते. राजाराम कॉलेजचे प्रशासकीय नियंत्रण हे आर्य प्रतिष्ठान सभा उत्तर प्रदेश यांच्याकडून केले जात होते. राजाराम कॉलेजमध्ये प्रामुख्याने इंग्रजी, संस्कृत, पर्शियन, मराठी, गणित, इतिहास, अर्थशास्त्र आणि तत्त्वज्ञान या विषयाची पदवी कॉलेज अंतर्गत दिली जात असे. या कॉलेजसाठी शाहू महाराजांनी दरवर्षी एक लाख रुपये अनुदान दिले होते. या कॉलेजमध्ये प्रामुख्याने १९२२ मध्ये २८० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला होता. त्यापैकी पदवी प्रथम वर्षासाठी ९९ विद्यार्थी आणि द्वितीय वर्षासाठी ६३ विद्यार्थी आणि बीए ज्युनियर वर्गासाठी ३३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला होता व पदवी शिक्षण म्हणजेच बीएफ शिक्षण पूर्ण करण्यामध्ये १३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. उच्च शिक्षणामध्ये जातीच्या आधारे प्रवेशाचे प्रमाण पाहिले असता एकूण १७३ पैकी शंभर विद्यार्थी हे ब्राह्मण जातीतील होते, तर ७३ विद्यार्थी हे ब्राह्मणेतर जातीतील होते.[१४]

राजाराम कॉलेज हे कोल्हापूर संस्थानातील उच्च शिक्षणाचे एक महत्त्वाचे महाविद्यालय होते. छत्रपती शाहू महाराजांनी या कॉलेजला शासकीय अनुदान देऊन कोल्हापूर संस्थानातील दलित–बहुजन विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणामध्ये महत्त्वाचे योगदान दिले. छत्रपती राजाराम महाराजांनी सुद्धा यामध्ये खूप अशा पातळीवर संख्यात्मक आणि गुणात्मक कॉलेजचा विकास केला. १९२१–२२ मध्ये या कॉलेजची विद्यार्थी संख्या ही १७० इतकी होती. ती संख्या १९२४–२५ मध्ये मध्ये ४२० इतकी गेली, तर १९२९–३० मध्ये एकूण विद्यार्थी संख्या ही ५२२ इथपर्यंत गेली आणि १९३३ मध्ये ५४० विद्यार्थी संख्या झाली.[१५]

तक्ता ५

**शैक्षणिक प्रवेश**

| अ. क्र. | वर्ग | १९३१-३१ | १९३१-३२ | १९३९-४० | १९४०-४१ |
|---|---|---|---|---|---|
| १ | एफ. वाय. आर्ट्स | २११ | ३३४ | २०४ | १५७ |
| २ | एफ.वाय. सायन्स | | | ११९ | १०५ |
| ३ | इंटर आर्ट | १२६ | १३२ | १६३ | १९२ |
| ४ | इंटर सायन्स अ | ३३ | ३० | ५१ | ६५ |
| ५ | इंटर सायन्स ब | | | २३ | १९ |
| ६ | ज्युनियर बी. ए. | ७२ | ६२ | ९२ | १०१ |
| ७ | ज्युनियर बी.एससी. | | | २२ | ३४ |
| ८ | सीनियर बी. ए. | ५७ | ५९ | ७९ | ८० |
| ९ | सीनियर बी. एससी. | २२ | ८ | २३ | २१ |
| १० | ज्युनियर एम ए, | ० | १६ | ५१ | ६६ |
| ११ | ज्युनियर एम एससी. | १६ | ३८ | ५ | ४ |
| १२ | सीनियर,एम. ए | ३ | ४ | २९ | २५ |
| १३ | सीनियर एम. एससी. | | | ० | २ |

स्रोत : कोल्हापूरचा प्रशासकीय अहवाल-१९३१-३२-१९३९-४०

**तांत्रिक शिक्षण:**

छत्रपती शाहू महाराजांनी औद्योगिक शिक्षणाला खूप मोठ्या प्रमाणात चालना दिली होती. औद्योगिक शिक्षणासाठी अनेक मोठ्या प्रमाणात शैक्षणिक संस्था उभारण्यात महत्त्वाची कामगिरी केली गेली होती. प्राथमिक शिक्षण आणि माध्यमिक शिक्षण या आधारे अक्षर ज्ञान व मानवी दृष्टिकोन तयार होण्यासाठी मदत होते. वाचन संस्कृती व परीक्षा यातून विद्यार्थी पास होतात; पण बाजारपेठेमध्ये विद्यार्थ्यांना आपल्या कौशल्याच्या आधारे नोकरी मिळावी यासाठी

औद्योगिक शिक्षणाला म्हणजे तांत्रिक शिक्षणाला शाहू महाराजांनी खूप मोठ्या प्रमाणात चालना दिली. ग्रामीण भागातील विद्यार्थीवर्ग हा प्रामुख्याने शिक्षणाबद्दल निरुत्साही दिसत होता. कारण शिक्षण घेऊन जर आपली आर्थिक परिस्थिती सुधारत नसेल, तर शिक्षणाचा काहीही फायदा होणार नाही, अशी धारणा तत्कालीन परिस्थितीमध्ये जनमानसात होती. या मानसिकतेला तांत्रिक शिक्षण संस्था सुरू करून छत्रपती शाहूमहाराजांनी या मानसिकतेला खऱ्या अर्थाने तडा दिला. जयसिंगराव घाटगे तांत्रिक संस्था, ओब्रायन टेक्निकल स्कूल यांसारख्या अनेक तांत्रिक शिक्षण संस्था उभ्या करून मोठ्या प्रमाणात औद्योगिक क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यात शाहू महाराजांनी महत्त्वाचे योगदान दिले. १९२२ – २३ या वर्षी तांत्रिक शिक्षणसंस्थामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ५२ होती. त्यात १० विद्यार्थी ब्राह्मण तर ३४ विद्यार्थी ब्राह्मणेत्तर तर ८ विद्यार्थी मुस्लिम होते. १९२२–२३ या वर्षी तांत्रिक कुशल शाळांवर ५,३६१ रुपये इतका खर्च करण्यात आलेला होता. असे तांत्रिक शिक्षण देण्यासाठी पहिल्यांदा शाहू महाराजांनी ‘जयसिंगराव घाटगे तांत्रिक संस्था’ स्थापन केली. या संस्थेतून कौशल्य आधारित शिक्षण दिले जात होते.[१६] तांत्रिक कौशल्याचे शिक्षण घेण्यासाठी कोल्हापूर संस्थानामध्ये फारशा मोठ्या प्रमाणात उत्साह नव्हता. छत्रपती शाहू महाराजांनी तांत्रिक व कौशल्यपूर्ण शिक्षणासाठी सर्वाधिक चालना मिळावी यासाठी ‘जयसिंगराव घाटगे तांत्रिक निधी व तांत्रिक स्कॉलरशिप’ या नावाने विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप देण्यात आली.

कोल्हापूर संस्थानातील औद्योगिक क्षेत्राला लागणारे कुशल मनुष्यबळ तांत्रिक शिक्षण संस्थांद्वारे उपलब्ध होणार असल्यामुळे छत्रपती राजाराम महाराजांनी तांत्रिक शिक्षणसंस्थामध्ये मोठ्या सुधारणा घडवून आणल्या. तांत्रिक शिक्षणाकडे जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा कल वाढावा या उद्देशाने त्यांनी तांत्रिक शिक्षणासाठी स्कॉलरशिप देण्यासारख्या योजना प्रभावीपणे राबवल्या. `शेतकी शिक्षण, कारागीर शिक्षण, तंत्रज्ञानात्मक शिक्षण यासारख्या कौशल्याधारित शिक्षण देणाऱ्या संस्था उभ्या करून तांत्रिक शिक्षणाला खूप मोठ्या प्रमाणात चालना दिली. शाहू महाराजांच्या राजकीय कारकीर्दीच्या अंतिम काळामध्ये तर तांत्रिक शिक्षण संस्थातील विद्यार्थ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसून येते. त्याचबरोबर ‘ओब्रायन टेक्निकल स्कूल’सारख्या विविध तांत्रिक शिक्षण संस्था सुरू झाल्याने संस्थानातील औद्योगिक क्षेत्रासाठी मुबलक कुशल मनुष्यबळ उपलब्ध होत होते. शिक्षण हे परिवर्तनाचे साधन आहे याची जाणीव

छत्रपती राजाराम महाराजांना असल्याने त्यांनी कोल्हापूर संस्थानाच्या राज्यकारभाराची सुत्रे स्वीकारल्यानंतर प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण आणि उच्च माध्यमिक शिक्षण यावर अधिक लक्ष दिले. त्याचबरोबर अनेक शैक्षणिक संस्था स्थापन केल्या. कोल्हापूर संस्थानामध्ये १९२२ – २३ मध्ये ५५९ इतक्या शिक्षण संस्था होत्या. यामध्ये ३१ हजार ४६ इतके विद्यार्थी शिकत होते. छत्रपती राजाराम महाराजांनी घेतलेल्या विविध शैक्षणिक धोरणांमुळे १९३५ पर्यंत शैक्षणिक संस्थांची संख्या ८१८ पर्यंत पोहोचली आणि त्यातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या तब्ब ४८ हजार ९९४ इतकी झाली. तर१९३७ मध्ये संस्थानातील शिक्षणसंस्था संख्या ८३५ शिक्षण इतकी झाली आणि त्यामध्ये ५४ हजार ६१५ इतके विद्यार्थी शिकत होते. यावरून आपणाला कल्पना येते की, छत्रपती राजाराम महाराज यांनी आपल्या संस्थानात शिक्षण संस्थाचा विस्तार खूप मोठ्या प्रमाणात केला.[१७] छत्रपती राजाराम महाराजांनी उच्च शिक्षणाच्या क्षेत्रांमध्येसुद्धा खूप मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणला आणि उच्च शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्थांचे जाळ्याचा विस्तार केला. ज्यातून समाजातील सर्व घटकांना उच्च शिक्षणामध्ये प्रतिनिधित्व आणि शिक्षणाची संधी मिळवून दिली. छत्रपती राजाराम महाराजांची इतकीच अपेक्षा नव्हती त्यांना पुढे जाऊन कोल्हापूर संस्थानामध्ये एक मोठे विश्वविद्यालय स्थापन करायचे, हे त्यांचे स्वप्न होते. त्यांनी आपल्या ५६ व्या वाढदिवसानिमित्त १९३६ मध्ये म्हणाले होते की राजाराम कॉलेज केवळ महाराष्ट्रात नव्हे तर सर्व हिंदुस्थानात पहिल्या प्रतीचे कॉलेज व्हावे तसेच येथील निरनिराळ्या शिक्षण संस्था यांनी झपाट्याने वाढ होऊन त्या सर्वांचे एक स्वतंत्र विद्यापीठ केंद्र म्हणून आपल्या कोल्हापूरात लवकरात लवकर शिवाजी विश्वविद्यालयाची स्थापना व्हावी, अशी माझी महत्त्वाकांक्षा आहे. म्हणून मी व माझे मंत्री बाळकृष्ण कॉलेज इमारत व ग्रंथालय अधिकारी यासाठी मागेल तेवढी आर्थिक मदत सढळ हाताने देत आहोत.[१८] छत्रपती राजाराम महाराजांचे हे स्वप्न डॉक्टर बाळकृष्ण अर्थतज्ज्ञ इतिहासकारांनी ते वास्तवात आणून दाखवण्याचा प्रयत्न केला आणि १९६२ मध्ये शिवाजी विद्यापीठ, डॉक्टर अप्पासाहेब पवार यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाले. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री माननीय यशवंतराव चव्हाण यांनी या विद्यापीठाच्या रउद्घाटनप्रसंगी म्हटले होते की, आपल्या राज्यात सर्वप्रथम सर्व प्रकारचे शिक्षण सर्वांना सुलभ व सुगम व विपुल करून शिवाजी विद्यापीठाची स्थापना कोल्हापुरात करायची, हे स्वप्न राजाराम महाराजांचे होते. बाळकृष्ण यांनी हे स्वप्न साकार

करण्यासाठी उशिरा का होईना प्रयत्न केले, शिवाजी विद्यापीठाची डॉक्टर आप्पासाहेब पवार यांच्या नेतृत्वाखाली स्थापना होऊन अखेर राजाराम महाराजांचे स्वप्न साकार झाले.[१९]

**तक्ता ६**

**शाळेत पाठवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा व्यवसाय**

| अ. क्र. | वर्गवारी | १९३९–४० | १९४०–४१ |
|---|---|---|---|
| १. | ब्रिटिश शासकीय नोकर | ५० | ९४ |
| २. | राज्याचे नोकर | ६५ | ९२ |
| ३. | खाजगी नोकरी | १२७ | ७५ |
| ४. | ब्रिटिश शासकीय पेन्शन | ३४ | ३१ |
| ५. | राज्याचे पेन्शनधारक | १८ | २४ |
| ६. | जहागीरदार आणि इनामदार | १० | १२ |
| ७. | जमीनदार आणि शेतकरी | २१८ | २२२ |
| ८. | धर्मगुरू आणि भिक्षुक | ० | १ |
| ९. | लेखक आणि संपादक | १० | ७ |
| १०. | कलाकार | १ | २ |
| ११. | वकील | ३३ | ४६ |
| १२. | डॉक्टर | २६ | २० |
| १३. | इंजिनीयर | ० | ८ |
| १४. | ठेकेदार | ७ | ४ |
| १५. | बँकर्स | १ | २ |
| १६. | व्यापारी | ५८ | ७६ |
| १७. | छोटे व्यापारी | ५२ | ८ |
| १८. | हस्त उद्योग | ० | ४ |
| १९. | इतर | १५६ | १४३ |

स्रोत : कोल्हापूर राज्याच्या प्रशासकीय अहवाल–१९३९–४०

## २. सामाजिक सांस्कृतिक सुधारणांची फलनिष्पत्ती :

सामाजिक सुधारणा ही मानवी विकासाची पूर्वअट आहे, ही भूमिका घेऊन छत्रपती राजाराम महाराजांनी अनेक धोरणात्मक निर्णय घेतले. धोरणात्मक निर्णयाची अंमलबजावणी प्रशासकीयदृष्ट्या अतिशय गतिमान पद्धतीने करण्याचा प्रयत्न केला गेला. छत्रपती राजाराम महाराजांनी पारंपरिक जातीव्यवस्था आणि धर्मव्यवस्था ही प्रामुख्याने कोल्हापूर संस्थानातील किंबहुना मानव जातीतील विकासात खूप मोठी अडचण निर्माण करणारी आहे, ते लक्षात घेतले. जातीव्यवस्था आणि धर्मव्यवस्था या परस्परांशी निगडित आहेत. या दोन्हीमुळे कोल्हापूर संस्थानातील दलित बहुजन समाज हा आपली भौतिक प्रगती करू शकला नाही. त्यामुळे प्रगती करायची असेल, तर जातीव्यवस्था नष्ट केली पाहिजे. माणसामाणसांतील परस्पर व्यवहार हे समता आधारित असले पाहिजेत, ही भूमिका घेऊन त्यांनी सामाजिक सुधारणांना खूप मोठ्या प्रमाणात चालना दिली. प्रशासकीय सेवेमध्ये समाजातील वंचित, शोषित घटकाला संधी उपलब्ध करून दिली. बालविवाहासारख्या अत्यंत जाचक व स्त्रियांचे हक्क नाकारणारी परंपरा नष्ट करण्यासाठी १९२६ मध्ये बालविवाह प्रतिबंधक कायदा करून बालविवाह पद्धत कोल्हापूर संस्थानातून हद्दपार केली.

महिला या देशातील किंबहुना समाजातील महत्त्वाच्या भागीदार आहेत, जातिव्यवस्थेच्या आणि पितृसत्ताक समाजरचनेच्या त्या बळी आहेत. समाजामध्ये पुरुषाइतकेच स्त्रीवर्गाचे महत्त्वाचे स्थान असायला हवे; मात्र आपल्याकडील धार्मिक अधिष्ठान प्राप्त झालेल्या जातीव्यवस्थेने आणि पितृसत्ताक समाजरचनेने तिचे महत्त्व नाकारले आहे. वेगवेगळ्या रुढी, परंपरेत तिला जखडून ठेवले आहे. स्त्रीवर्गाला या सर्व जोखडातून बाहेर काढून तिला सर्व शोषणापासून मुक्ती देण्यासाठी आधुनिक मूल्याचा स्वीकार करणे अपरिहार्य आहे, याची जाणीव राजर्षी शाहू महाराज आणि छत्रपती राजाराम महाराज यांना होती. कारण आधुनिक मूल्यांच्या माध्यमातूनच समाजामध्ये पारंपरिक रुढी, कर्मकांड आणि धार्मिक यांच्याविषयी चिकित्सक मानसिकता निर्माण करता येऊ शकते. आधुनिक मूल्ये अर्थात स्वातंत्र्य, समता आणि बंधुता प्राप्त करायचे असतील तर शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे आहे. शिक्षणाचा आशय आधुनिक असला पाहिजे. त्यासोबत ते मातृभाषेतून दिले गेले पाहिजे ही भावना घेऊन छत्रपती राजाराम महाराजांनी 'गाव तेथे शाळा' आणि 'मोफत आणि सक्तीचे शिक्षण' या दोन बाबी प्राधान्याने संस्थानात

राबविल्या. त्यात स्त्रीवर्गाचे महत्त्वाचे स्थान लक्षात घेऊन मुलींसाठी स्वतंत्र शाळाही सुरू केल्या. स्त्रीमुक्तीचा प्राथमिक टप्पा किंवा पायरी हे शाळा असू शकते आणि शाळेतील आधुनिक अभ्यासक्रम असू शकतो, हे वैचारिक अधिष्ठान समजून छत्रपती राजाराम महाराजांनी खूप मोठ्या प्रमाणात शैक्षणिक संस्थांचा विस्तार केला. छत्रपती राजाराम महाराजांनी आधुनिक शिक्षणाच्या संदर्भात तांत्रिक आणि कौशल्यावर आधारित शिक्षण हे प्राधान्यक्रमाचे विषय बनवले. महिलांना पारंपरिक घरगुती कामापासून आधुनिक कामांमध्ये सक्रिय करायचे असेल, तर घरगुती कामाचेसुद्धा आधुनिक शिक्षण मिळाले पाहिजे, यासाठी गृह व्यवस्थापनासारख्या बाबी अभ्यासक्रमात समाविष्ट करण्याबरोबरते तांत्रिक कौशल्याच्या शिक्षणात त्यांना स्थान दिले. सर्व भेदभावरहीत अशा नवीन समाज निर्मितीचा ध्यास घेऊन राजाराम महाराजांनी स्त्रीमुक्तीचा विचार विकसित केला आणि तो व्यवहारात आणला.

छत्रपती राजाराम महाराजांनी मोठ्या प्रमाणात ब्राह्मणेतर चळवळीचे नेतृत्व केले. अमरावती येथे भरलेल्या अखिल भारतीय ब्राह्मणेतर परिषदेचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. सातारा येथे आयोजित केलेल्या ब्राह्मणेतर परिषदेचे प्रमुख नेतृत्व छत्रपती राजाराम महाराजांनी केल्याचे दिसते. ब्राह्मणेतर चळवळ ही प्रामुख्याने बहुजन समाजातल्या घटकांनी ब्राम्हणी व्यवस्थेच्या विरोधात संघर्ष करून सामाजिक समता आणि बंधुता प्रस्थापित करण्यासाठी चळवळ होती. शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर चळवळीला राजकीय आश्रय देऊन खूप मोठ्या प्रमाणात ब्राह्मणेतर चळवळीचा विस्तार भारताच्या कानाकोपऱ्यामध्ये केल्याचे दिसते. हाच वारसा पुढे ठेवत राजाराम महाराजांनी सुद्धा चळवळीला आर्थिक निधी देणे, ब्राह्मणेतर परिषदेचे अध्यक्षपद स्वीकारणे किंबहुना ब्राह्मणेत्तर राजकीय नेतृत्वाचे व समाजसुधारकांचे वैचारिक व तात्त्विक अधिष्ठान असलेली पुस्तके प्रकाशित करणे व चरित्र प्रकाशित करणे यासारख्या महत्त्वाच्या विषयाला छत्रपती राजाराम महाराजांनी हात घातलेला होता. तो यशस्वी करून दाखवला. छत्रपती राजाराम महाराजांनी ब्राह्मणेतर जातींमधील अनेक विचारवंतांना, लेखकांना वैचारिकदृष्ट्या आणि आर्थिकदृष्ट्या लिखाणाच्या संदर्भात प्रोत्साहित केले. ज्यामुळे आपला इतिहास व आपल्या परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित झाल्या. समाज पुढे गेला पाहिजे ही त्यामागची धारणा होती. अशा प्रकारे छत्रपती राजाराम महाराजांनी सामाजिक क्षेत्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणात सुधारणा करून बहुजन समाजाला, दलित आणि महिलांच्या मुक्तीसाठीचा

संघर्ष केला व नवीन इतिहास निर्माण करण्यात महत्त्वाचे योगदान दिले. सामाजिक सुधारणांच्या बाबतीत छत्रपती राजाराम महाराजांनी खूप मोठ्या प्रमाणात योगदान दिल्यामुळे कोल्हापूर संस्थान हे छत्रपती शाहू महाराजानंतर सुद्धा सामाजिक सुधारणांचे व ब्राह्मणेतर चळवळीचे केंद्र म्हणून ओळखले जाऊ लागले.

१९३६ मध्ये पॅलेस थिएटरमध्ये हरिजन परिषद परिषदेचे उद्घाटन करताना छत्रपती राजाराम महाराज म्हणाले होते की, ''आमचे कैलासवासी परमपूज्य पिता राजर्षी शाहू महाराजांनी हरिजन उद्धाराच्या कार्याला प्रथम सुरुवात केली. त्यांच्या उन्नतीकरिता आटोकाट असे अथक परिश्रम केले. त्यांच्या पश्चात त्यांच्या पावलावर पाऊल टाकून आम्ही हे कार्य चालवले आहे. आमची मनापासून अशी इच्छा आहे की, आमच्या राज्यामध्ये 'अस्पृश्यता' या शब्दाला थारासुद्धा मिळू नये, त्या दृष्टीने व हरिजनांच्या सामाजिक दर्जा वाढविण्यासाठी आम्ही कायदेही केले आहेत. तेव्हा सर्व हरिजन यांनी त्याचा निर्भयपणे उपयोग करून घ्यावा आणि स्पृश्य हिंदूनाही त्याचे मानवी हक्क ओळखून त्यांना निशंकपणे बरोबरीच्या नात्याने वागावे अशी आमची मनःपूर्वक इच्छा आहे. त्यादृष्टीने आपलीही परिषद सर्वतोपरी यशस्वी होवो असे आमच्या मातोश्री व भगिनी आणि आम्ही इच्छितो.''[२०] अशा प्रकारचा आशावाद व्यक्त करून छत्रपती राजाराम महाराजांनी जातीव्यवस्था आणि दलित बहुजन समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी व सामाजिक सुधारणा करण्यासाठी आपले कोल्हापूर संस्थान कटिबद्ध असल्याचा दावा आपल्या मांडणीमध्ये आणि व्यवहारांमध्ये केल्याचे आपणाला दिसते.

कोल्हापूर शहर हे सांस्कृतिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाचे होते. कोल्हापूर शहरामध्ये आणि संस्थानामध्ये छत्रपती राजाराम महाराजांनी मूक चित्रपटाच्या निर्मितीला खूप मोठ्या प्रमाणात चालना दिली, त्यामुळे अनेक कलाकार व भारतीय चित्रपट निर्माते या कोल्हापूर संस्थानमध्ये निर्माण झाले. महर्षी बाबूराव पेंटर, व्ही.शांताराम यांसारखे अनेक महत्त्वाच्या कोल्हापुरातील कलाकारांनी चित्रपट निर्मितीमध्ये खूप महत्त्वाचे योगदान दिले. छत्रपती राजाराम महाराजांनी हीच भूमिका घेऊन त्या काळामध्ये त्यांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे आणि दिलेल्या अर्थसाहाय्यामुळे १९३१ मध्ये प्रभात फिल्म कंपनी निर्माण होऊ शकली. छत्रपती राजाराम महाराजांनी १९३१ मध्ये 'कोल्हापूर सिनेटोन' या नावाचा भव्य आणि अद्यावत स्टुडिओ निर्माण केला. या स्टडिओमुळे कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक बोलपट चित्रपट निर्मिती होण्यास

मोठी चालना मिळाली. छत्रपती राजाराम महाराजांनी अशा चित्रपटाला प्रोत्साहन दिल्यामुळे बाबूराव पेंटर यांचा 'सावकारी पाश' हा भारताच्या चित्रपटसृष्टीमध्ये नावाजलेला मराठीतील बोलपट हा प्रसिद्ध झाला. कोल्हापुरात दोन स्टुडिओ छत्रपती राजाराम महाराजांनी निर्माण केले.

## ३. शेती क्षेत्रातील सुधारणांची फलनिष्पत्ती :

छत्रपती शाहू महाराजांनी शेतीच्या क्षेत्रामध्ये खूप मोठ्या प्रमाणात क्रांती केली. शाहू महाराजांना भारतीय अर्थव्यवस्थेची पुरेपूर कल्पना होती. शेतीचा विकास करणे म्हणजेच भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास करणे होय. त्यामुळे शेतीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, हे छत्रपती शाहू महाराजांनी जाणले होते. त्यामुळे त्यांनी शेतीला कोल्हापूर संस्थानाच्या विकासाचा मुख्य केंद्रबिंदू मानून अनेक महत्त्वाची धोरणे आखली.

छत्रपती राजाराम महाराज यांचा शेती विकास हा त्यांच्या राजकीय राज्यकारभाराचा महत्त्वाचा पैलू होता. कोल्हापूर संस्थानामध्ये ८० टक्के जनता ही शेती आणि शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून आहे, हे महाराजांच्या लक्षात आलेले होते. त्यामुळे शेतीचा जर विकास करायचा असेल, तर शेतीचे आधुनिकीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी महाराजांनी खूप महत्त्वाचा धोरणात्मक आणि आर्थिक पुरवठा करून शेती विकासाला एक प्रगतीशील केंद्र म्हणून नावारूपाला आणले. छत्रपती राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतल्यानंतर शेतीचा विकास व्हावा, यासाठी त्यांनी खूप महत्त्वाचे उपाय योजले. कोल्हापूर संस्थानामध्ये शेतीवर दोन संकटे येत होती. त्यातील पहिले म्हणजे नैसर्गिक संकट; बहुतांश कोरडवाहू असलेल्या शेतीला दुष्काळ, पूर, अनियमित पर्जन्यवृष्टी यांसारख्या अनेक नैसर्गिक संकटाचा सामना करावा लागत असे. ज्यामुळे चांगल्या कृषी उत्पन्नासाठी केलेले श्रम आणि काबाडकष्ट वाया जात असत. परिणामी निसर्गाच्या लहरीपणापुढे शेतकऱ्यांना नेहमीच शरणागती पत्करावी लागत असे. यावर मात करण्यासाठी छत्रपती राजाराम महाराजांनी शेतीसाठी पूरक भांडवलाची निर्मिती आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोडया माध्यमातून कोल्हापूर संस्थानातील शेतीचा विकास खूप मोठ्या प्रमाणात केला. कोल्हापूर संस्थानातील शेतकऱ्यांकडे प्रामुख्याने अत्याधुनिक सुविधा उपलब्ध नव्हती. त्यासोबतच त्याला लागणारे खेळते भांडवल हेसुद्धा उपलब्ध नव्हते. त्यामुळे महाराजांनी खूप मोठ्या प्रमाणात खेळते भांडवल आणि

अत्याधुनिक तंत्रज्ञानाची सुविधा त्यासोबतच बी–बियाणे याची सर्व निर्मिती करून शेतीचा विकास केला. हा जगाच्या किंबहुना भारताच्या इतिहासातील एक आदर्श प्रयत्न म्हणावा लागेल.

**शेती विकासाची वैचारिक भूमिका:**

छत्रपती राजाराम महाराजांच्या विकासामध्ये महत्त्वाचे योगदान देताना त्यामागची वैचारिक भूमिका महत्त्वाची होती. कोणत्याही पद्धतीचा विकास करायचा असेल, तर त्यामागचा विचार स्पष्ट असला पाहिजे, ही छत्रपती राजाराम महाराज यांची भूमिका होती. त्यामुळे त्यांनी शेतीच्या आधुनिकीकरणाची व शेतीला प्रगतिशील करण्यामध्ये त्यामागची भूमिका स्पष्ट करत असताना छत्रपती राजाराम महाराज म्हणतात की, ''I was thinking of organizing the agricultural department in my state and when I decided that a good model form and compare come comprehensive showroom which could exhibit to the ryots the up to date improvements in agriculture machinery maneres and result of scientific agriculture it did not take me long to decide which name would be most fittingly associate with the Institutions such as I wish to start but I was an anxious as to whether the Institutions would be great enough to justify me in his requesting his excellence.''[21] यासाठी छत्रपती राजाराम महाराजांनी शेतीचे आधुनिकीकरण आणि शेतीचा विकास हा कोल्हापूर संस्थानाचा महत्त्वाचा कृती कार्यक्रम असल्याचा दावा करून त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यात आली होती. छत्रपती राजाराम महाराजांना शेतीचा विकास करायचा असेल, तर शेती ही पारंपरिक पद्धतीने करून चालणार नाही, याची जाणीव होती. त्यामुळे छत्रपती राजाराम महाराजांनी प्रामुख्याने चार प्रकारच्या अडचणी या शेतीविकासाला व आधुनिकीकरणाला सामोरे जात आहेत असे नमूद केले होते १) शेतकऱ्याचे अज्ञान आणि त्यांचा अशिक्षितपणा २) भांडवलाची कमतरता ३) शेतकऱ्यांचे लहान आकार ४) शेतीमालासाठी चांगल्या बाजारपेठेचा अभाव या चारही गोष्टीवर मात करून शेतकऱ्यांच्या विकासासाठी व शेतीचे आधुनिकीकरण करण्यासाठी छत्रपती राजाराम महाराजांनी शेती विकासाला चालना दिली. शेती आणि शेतीपूरक व्यवसायाला चालना द्यायची असेल, तर त्यासाठी छोटे आणि मोठी धरणे अत्यंत आवश्यक आहेत. शेतीचे आधुनिकीकरणासाठी व आधुनिक पीक पद्धतीसाठी पाण्याची आवश्यकता लागते. राजाराम तलावाचे बांधकाम छत्रपती राजाराम महाराजांनी हाती घेऊन शेती सुधारणेला हात घातलेला

होता. त्या सोबतच कोल्हापूर बँकेची स्थापना छत्रपती राजाराम महाराजांनी केलेली होती. त्यामागची मूळ भूमिका ही होती की शेतीमध्ये अत्याधुनिक सुधारणा करायची असेल, तर त्याच्यासाठी भांडवलाची आवश्यकता लागते. 'कोल्हापूर शुगर मिल'ची स्थापना किंवा शेतीपूरक व्यवसायाला चालना शेतीसाठी कर्जपुरवठा केला. त्यासोबतच शेतीतील सुधारणा विहीर काढणे, लावणी नवीन आवश्यक असलेल्या निर्वाहाचे साधन घेणे, शेती कर्ज यासाठी प्रोत्साहन दिले. त्या सोबतच शेती शिक्षणाला प्रोत्साहन मिळण्यासाठी अनेक मुला-मुलींना शेतीची योजना छत्रपती राजाराम महाराजांनी उपलब्ध करून दिली होती. यासारख्या अशा अनेक सुधारणा करून ज्याच्या माध्यमातून कोल्हापूर संस्थानामध्ये खूप मोठ्या प्रमाणात शेतीचा विकास हा छत्रपती शाहू महाराजांनंतर राजाराम महाराजांच्या कालावधीमध्ये आपणाला झाल्याचे दिसते.

छत्रपती राजाराम महाराजांनी शेतीच्या क्षेत्रामध्ये प्रामुख्याने तीन महत्त्वाच्या सुधारणा केल्याने आपल्याला दिसते.

**१. आधुनिक पीकपद्धतीचा स्वीकार-** ज्यामध्ये ज्वारी, बाजरी, नाचणी, गहू आणि इतर यासारख्या पीकपद्धतीमध्ये खूप मोठ्या प्रमाणात सुधारणा केल्या आणि या क्षेत्रावर आधुनिकीकरणाचा व अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून कोल्हापूर संस्थानामध्ये शेतीच्या क्षेत्रात आमूलाग्र क्रांती केली. छत्रपती राजाराम महाराज यांच्या राजकीय कारकिर्दीमध्ये म्हणजेच सुरुवातीचा काळातील १९२२ वर्षापर्यंतच्या पाच वर्षातील ज्वारी पिकाची आवक ही २,२४,७७५ हेक्टर यावरती घेतली जात होते. ते वाढवून छत्रपती राजाराम महाराजांनी १९२३-२४ मध्ये प्रामुख्याने हे क्षेत्र २ लाख २५ हजार ५१० इतके केले. १९२२-२३ मध्ये बाजरी यांचे क्षेत्र हे प्रामुख्याने ४० हजार ३४७ इतके होते ते १९२३-२४ मध्ये ४०,६०३ इतके झाले नाचणी या पिकाचे क्षेत्रसुद्धा १९२२-२३ मध्ये १ लाख २७ हजार १८० इतके झाले. ते वाढून १९२३- २४ मध्ये १ लाख ते ३३ हजार ३७८ इतके झाले. गव्हाचे क्षेत्र हे १९२२-२३ मध्ये १५ हजार ९७६ होते. १९२३-२४ मध्ये १९ हजार ९७७ इतके झाले.[२२] छत्रपती राजाराम महाराजांनी सूत्रे हाती घेतल्यानंतर पीक पद्धती आणि लागवडीखालील क्षेत्र कशाप्रकारे वाढत गेले या वरील आकड्यांवरून आपणाला समजण्यास मदत होते.

**२. शेतीच्या सिंचनासाठी राधानगरी धरण बांधणी प्रकल्प–** भोगावती नदीखोऱ्यातील शेतकऱ्याना सिंचनासाठी पाणी उपलब्ध व्हावे आणि विविध पिके घेऊन शेती उत्पादन वाढावे या हेतूने राजर्षी शाहू महाराजांना राधानगरी धरण बांधण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला होता. मात्र पहिल्या महायुद्धाच्या काळामुळे कोल्हापूर संस्थानावर अनेक आर्थिक संकटे निर्माण झाली होती. यामुळे या प्रकल्पाचे काम संथगतीने सुरू होते; पण अचानक राजर्षी शाहू महाराजांचे निधन झाल्यामुळे हा प्रकल्प पूर्णतः थांबला. छत्रपती राजाराम महाराजांनी शाहू महाराजांच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे काम हाती घेऊन ते पूर्णत्वास नेले. त्यामुळे हे धरण भोगावती नदीखोऱ्यातील शेतकऱ्यांबरोबरच संपूर्ण कोल्हापूर संस्थानासाठी वरदान ठरले.

**३. आधुनिक शेती शिक्षणाचा प्रचार–प्रसार –** छत्रपती राजाराम महाराजांनी शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार व्हावा ही त्यामागची भूमिका घेऊन शेती आणि शेतीचे शिक्षण हे अत्याधुनिक पद्धतीने दिले जावे ही भूमिका घेतली. त्यामुळे छत्रपती शाहू महाराज शेतकी शाळेच्या माध्यमातून शेतकी शिक्षण वैज्ञानिक पद्धतीने देण्यासाठी व प्रशिक्षित करण्यासाठी छत्रपती शाहू शेतकी शाळेची सुरुवात केली होती. छत्रपती शाहू शेतकी शाळा ही आयर्विन म्युझियम फॉर्म यांच्याशी संलग्न करण्यात आली होती. या शाळेच्या माध्यमातून दोन वर्षांच्या वैज्ञानिक पद्धतीने शेती करण्यास संबंधित कोर्सची सुरुवात केली होती. त्यासाठी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शेतीचे व्यवहारिक ज्ञान मिळवणे व शाळेत उपस्थित राहणे या अटी पूर्ण कराव्या लागत असत. १९४०–४१ मध्ये एकूण २९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. २९ विद्यार्थ्यापैकी १४ विद्यार्थ्यांना प्रत्येक महिन्याला रुपयाप्रमाणे स्कॉलरशिप देण्यात आली होती. शेतकी शिक्षणामध्ये प्रामुख्याने दुग्ध व्यवसाय, वनस्पतिशास्त्र, हॉर्टिकल्चर आणि दुग्ध व्यवसाय यासारख्या अनेक विषयांचा या अभ्यासक्रमामध्ये समावेश केलेला होता.[२३]

## ४. आर्थिक, व्यापारी आणि वित्तीय सुधारणांची फलनिष्पत्ती:

छत्रपती राजाराम महाराज यांच्या राजकीय जीवनाच्या उत्तरार्धामध्ये कोल्हापूर संस्थान आर्थिकदृष्ट्या अतिशय सक्षम आणि वेगाने विकसित होणारे संस्थान होते. १९३१– ३२ या कालावधीमध्ये कोल्हापूर संस्थानाचे आर्थिक ताळेबंद एकूण रक्कम १ कोटी ४२ लाख ८७ हजार ३८९ रुपये इतकी होती. एकूण सकल उत्पन्न ज्यामध्ये उचल व जमा ७६ लाख १७

हजार ८८९ इतकी होती. एकूण कराची रक्कम ५४ लाख ३७ हजार ८१५ इतकी होती. यामध्ये प्रामुख्याने चार विभागाची कररचना विभागणी करण्यात आली आहे.[२४]

१) जमिनीचे कर ही रक्कम ५२ हजार ८६९ इतकी रक्कम या कालावधीत कोल्हापूर संस्थानाला कराच्या स्वरूपात मिळाली.

२) जंगलाच्या माध्यमातून १ लाख ४५ हजार २४० इतकी रक्कम कोल्हापूर संस्थानाला मिळाली.

३) इतर खर्च ज्यामध्ये १ लाख ३० हजार ५७६ रुपये इतकी रक्कम कोल्हापूर शासनाला मिळाली.

४) इतर विभागांमध्ये ज्यात प्रामुख्याने शैक्षणिक कर आणि कारखान्याच्या माध्यमातून २ लाख ४५ हजार ४२७ इतकी रक्कम मिळाली.

या कालावधीमध्ये कराची वाढ ही खालील विभागात झालेली आपणास दिसते.

१) एक्साइज कर यांची एकूण रक्कम १८ हजार ६०३ ही कोल्हापूर संस्थानला मिळाली.

२) स्टॅम्प ड्युटी यांच्या माध्यमातून करामध्ये २४ हजार ९१७ रुपये इतका कर मिळाले.

३) इतर खर्च ज्या सर्वसामान्यपणे विभागात समावेश केले जातात, त्यामध्ये १६ हजार ५५८ इतका खर्च मिळाला. १९३९–१९४० या कालावधीमध्ये कोल्हापूर संस्थानाचे एकूण कर हे एक कोटी ३६ लाख ७७ हजार २६० इतके गेले होते. किरकोळ नगदी कर यातून कर्ज वजा केले, तर त्याची एकूण रक्कम ६१ लाख ७४ हजार ४८६ इतकी होते. कोल्हापूर संस्थानाच्या एकूण खर्चाची रक्कम ही १ कोटी ४० लाख ३१ हजार १४४ रुपये इतकी होती. कररचनेमध्ये जमा झालेले कोल्हापूर संस्थानातील आकडेवारी व एकूण रक्कम विभागवार ही खालीलप्रमाणे

१) शेती करातून एकूण ९४ हजार ४१३ रुपये इतकी जमा झालेली होती.

२) अबकारी करामधून एकूण रक्कम ही ४१ हजार ५०७ इतकी रक्कम जमा झालेली होती.

३) साखर एक्साइज ड्युटी करामधून १२,३२८ इतकी जमा झालेली होती.

४) कोल्हापूर संस्थानाच्या व्याजापोटी विशेषतः शासकीय व्याज, कोल्हापूर साखर कारखाना यांना देण्यात येणाऱ्या व्याजात याचा समावेश आहे.

५) कोल्हापूर संस्थानात शैक्षणिक कर म्हणून जो विशेषतः कॉलेजच्या फ्री संरचनेमध्ये याचा समावेश करण्यात आले आहे. ती रक्कम ३९ हजार ५२२ इतकी रक्कम जमा करण्यात आली होती.

१९३१–३२ या कालावधीमध्ये कोल्हापूर संस्थानाचा आर्थिक ताळेबंद लक्षात ठेवला, तर आपणास दिसून येते की, छत्रपती राजाराम महाराज यांनी प्रामुख्याने खालील घटकांवर व विभागावर प्राधान्यक्रमाने कराच्या स्वरूपात मिळणारी रक्कम खर्च केली जाते

१) परत कराच्या स्वरूपात वापस करण्याच्या स्वरूपामध्ये १ लाख २९ हजार २३ इतकी रक्कम खात्यात जमा करण्यात आली.

२) वैद्यकीय सोयी आणि सुविधा यासाठी या कालावधीमध्ये प्रामुख्याने ८४७९ इतकी रक्कम खर्च करण्यात आली.

३) सार्वजनिक बांधकामासाठी या कालावधीमध्ये ९ लाख ५२ हजार ८९९ इतकी रक्कम खर्च करण्यात आली.

४) पेन्शन या सुविधेसाठी कोल्हापूर संस्थानाच्या खर्च हा ९ हजार ५२ इतका करण्यात आला.

५) इतर खर्च ७ लाख ८५ हजार ५३ इतका खर्च या कालावधीत वेगवेगळ्या विभागाच्या माध्यमातून करण्यात आला.

कोल्हापूर संस्थानाच्या उत्पन्नामध्ये खूप मोठ्या प्रमाणात १९४०–४१ मध्ये वाढ झाल्याचे दिसते. ज्या ठिकाणी कोल्हापूर संस्थानाचा बहुतेक आणि पायाभूत सुविधांचा विकास होतो. त्या ठिकाणी त्या राज्याला कराच्या स्वरूपामध्ये खूप मोठ्या प्रमाणात उत्पन्न होते. तशाच पातळीवर,

१) जमीन कर म्हणून कोल्हापूर संस्थानाला ९४ हजार ४१३ रूपये मिळाले होते.

२) अबकारी कर म्हणून कोल्हापूर संस्थानाला ४१ हजार ५६० रुपये मिळाले होते.

३) साखर कर म्हणून १२,३२८ रुपये मिळाले होते.

४) शैक्षणिक कर म्हणून ३९ हजार ५२२ रुपये मिळाले होते.

**१९३९–४० मध्ये–**

१) सार्वजनिक सूचना आणि प्रवेशासाठी १७,२०१ रुपये हे कॉलेज माध्यमिक शाळा आणि शैक्षणिक अधिकारी यांच्यावरती खर्च करण्यात आलेला होता.

२) पेन्शनवरती प्रामुख्याने १० हजार ९३० रुपये हा खर्च करण्यात आला होता. ज्यामध्ये ग्रॅज्युएटी आणि इतर याचा समावेश होता.

३) इतर खर्च म्हणून २३ हजार ७७९ इतका करण्यात आलेला होता.[२५]

औद्योगिक आणि व्यवसायासाठीचा एकूण आर्थिक ताळेबंद लक्षात घ्यायचा असेल जो प्रामुख्याने राजाराम महाराजांनी विस्तार आणि व्यापकता वाढवलेली होती. १९३१ मध्ये कॉटनच्या बाजारपेठेसाठी कोल्हापूर संस्थानाने खूप मोठ्या प्रमाणात खरेदी वाढवलेली होती. या कालावधीमध्ये जगभरामध्ये महामंदीचे सावट होते. त्याचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणाम कोल्हापूरच्या अर्थव्यवस्थेवर पडत होता. पण राजाराम महाराजांनी 'श्री शाहू छत्रपती स्पिनिंग अँड वेविंग मिल्स' या औद्योगिक क्षेत्रातून तोटा न होता कोल्हापूर संस्थानाच्या माध्यमातून १ लाख ५ हजार ८०२ इतका नफा झाल्याचे सांगितले आहे.[२६] कोल्हापूर संस्थानमध्ये या कालावधीत एकूण २० जिनिंग कारखाने होते, ३ शहापूर, ३ गांधीगंज, ४ जयसिंगपूर, १ चिखली आणि ४ वडगाव आणि ५ इचलकरंजी या ठिकाणी औद्योगिक विस्तारामध्ये निर्माण करण्यात आलेले महत्त्वाचे कापड कारखाने होते. १९३१–३२ मध्ये ३५ दळणयंत्राचे कारखाने होते. त्यापैकी ६ शाहूपुरीमध्ये, ६ गांधीगंजमध्ये, १ शिरोळमध्ये आणि १ जयसिंगपूरमध्ये असे १४ कारखाने होते. एक विद्युत पावरहाऊस जो प्रामुख्याने कोल्हापूर शहराला विद्युत पुरवठा करत असे. कोल्हापूर मध्ये वित्तीय क्षेत्रात खूप मोठ्या प्रमाणात छत्रपती राजाराम महाराजांनी वाढ केलेली होती. १९३१–३२ या कालावधीमध्ये बँक ऑफ कोल्हापूर लिमिटेड यांच्यात एकूण नफा हा ५४ हजार ८४१ इतकी झालेली होती. यामध्ये प्रामुख्याने बँकाचे भागीदार यांचे काम खूप समाधानकारक व नफा मिळवण्याच्या दिशेने जात असल्याचा दावा आर्थिक विभागाने केल्याचे आपणास दिसते.[२७] राखीव निधी १२ हजार रुपये इतकी रक्कम बँकेमध्ये जमा होते. काळा लोन किंवा काळे कर्ज ही रक्कम ५ हजार इतकी होती. बँकेसाठीची एकूण रक्कम ८ हजार इतकी होती. उत्पन्न कर म्हणून ही रक्कम ५५०० इतकी होती. मागच्या वर्षीची रक्कम जी या वर्षामध्ये पुढे चालविण्यात आली, ती प्रामुख्याने ३१३२ रुपये इतकी होती

**कोल्हापूर साखर कारखाना (Kolhapur Sugar Mills Limited)**

कोल्हापूर साखर कारखाना हा छत्रपती राजाराम महाराजांनी १९३२ पासून सुरु केला हातो. कोल्हापूर संस्थानामध्ये अत्याधुनिक पीकपद्धतीचा विस्तार छत्रपती शाहू महाराजांनी केला होता. धान्यांवर प्रक्रिया करणाऱ्या कारखान्याची निर्मिती राजाराम महाराजांनी केली. विशेषतः कोल्हापूर साखर कारखाना हा एक त्याचाच भाग होता. छत्रपती राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील उसाच्या माध्यमातून गुळाची निर्मिती होत होती. याला जागतिक बाजारपेठ आणि भारतातल्या बाजारपेठ खूप कमी प्रमाणात आवक होती. त्यामुळे छत्रपती राजाराम महाराजांनी या धोरणात बदल करून कोल्हापूर साखर कारखान्याची सुरुवात केली. सुरुवातीच्या वेळेस कोल्हापूर साखर कारखान्याचे भांडवल दहा लाख इतके होते. या कारखान्यासाठी लागणाऱ्या कुशल मनुष्यबळाची उपलब्धता छत्रपती राजाराम महाराजांनी केली होती. १९३६-३७ मध्ये साखर कारखान्याच्या मशीन या प्रत्येक दिवशी म्हणजेच २२ तासाला ४०० टन साखर उत्पादन करत असे. हा कारखाना हजार एकर जमिनीवरती उभा राहिलेला होता.[२८] या कारखान्याचे सर्व कुशल मनुष्यबळ विशेषतः कोल्हापूर संस्थानात तंत्रिक शिक्षण घेऊन किंवा शालेय शिक्षण घेऊन रोजगाराच्या संधी म्हणून या कारखान्यांमध्ये काम करत असे. या कारखान्याचे काम आठ तास याप्रमाणे चालत असे. या कारखान्याने वार्षिक म्हणजेच १९३६-३७ मध्ये ५१ हजार २५२ पोती साखरेचे उत्पादन झाले होते. ही पोती प्रत्येकी प्रामुख्याने दोन क्विंटल याप्रमाणे साखर भरली जात असे.[२९]

**श्री शाहू छत्रपती कताई आणि विणकाम मिल्स** (Shri Shahu Chatrapati spinning and weaving mills)

कोल्हापूर संस्थानातील हातमाग आणि विणकाम कारखाने हा सुद्धा कोल्हापूर संस्थानातील आर्थिक विकासाचा आणि रोजगाराचा महत्त्वाचा घटक होता. छत्रपती शाहू महाराजांनी आणि नंतर राजाराम महाराजांनी औद्योगिकरणाला चालना देऊन कोल्हापूर संस्थानातील आर्थिक विकास आणि रोजगार यामध्ये खूप महत्त्वाची भर घातली. १९३५ पासून अशा कारखान्याची निर्मिती राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानात केली. १९३६-३७ मध्ये कोल्हापूर संस्थानात या कारखान्याच्या निर्मितीपासून १५ हजार ९८८ इतके कापड निर्मिती केली जात असे. १२ लाख ९४ हजार ४९५ इतके सेंटीमीटर कापडाची निर्मिती केली जात

होती. यामध्ये प्रामुख्याने धोती मोठे कापड व त्यासोबतच इतर महत्त्वाची कापड निर्मिती या कारखान्याच्या माध्यमातून केली जात असे.[३०]

१९३६–३७ मध्ये कापड निर्मिती करणाऱ्या व त्यावर प्रक्रिया करणारे एकूण १३ कारखाने कोल्हापूर संस्थानामध्ये होते. २ शहापूरमध्ये, २ जयसिंगपूरमध्ये, तर ४ गांधीगंजमध्ये आणि १ चिंचोलीमध्ये अशा प्रकारे कोल्हापूर संस्थानातील वेगवेगळ्या भागात कारखाने होते. छत्रपती राजाराम महाराजांनी अशा कापड निर्मिती करणाऱ्या कापडाच्या माध्यमातून कापूस उत्पादक शेतकऱ्यांना खूप मोठ्या प्रमाणात बाजारपेठ उपलब्ध करून देऊन शेतकऱ्यांचे सक्षमीकरण व आर्थिक विकास या कारखान्याच्या माध्यमातून केला. या कारखान्यांमध्ये काम करणारे कामगार कोल्हापूर संस्थानातील विविध तांत्रिक शिक्षण पूर्ण केलेले कुशल कामगार होते. कोल्हापूर संस्थानांतर्गत रोजगार निर्मिती मिळेल आणि त्यातून दलित बहुजन समाजातील मुला–मुलींचे आर्थिकदृष्ट्या सक्षमीकरण करण्याचा महत्त्वाचा नवा आयाम छत्रपती राजाराम महाराजांनी घालून दिला. १९३९–४० मध्ये 'श्री शाहू छत्रपती कताई आणि विणकाम मिल्स'मध्ये २७ लाख ६८ हजार ७७८ सेंटीमीटर इतके कापड उत्पादन झाले. कोल्हापूर संस्थानामध्ये एकूण १९ कारखाने आणि ९ तेल काढणारे कारखाने होते. एकूण ८९ हातमागाच्या कारखान्याची निर्मिती झाली होती.[३१]

## कोल्हापूर संस्थानाची रेल्वे (Kolhapur state Railway)

छत्रपती राजाराम महाराजांच्या कालावधीत रेल्वेचा विस्तार आणि आर्थिक व्यवहारांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसते. छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात रेल्वेची सुरुवात केलेली होती. रेल्वेच्या सुविधेच्या माध्यमातून दळणवळणाला चालना, मालवाहतूक, आणि कोल्हापूर संस्थानातील प्रवाशांना इतर ठिकाणी जाण्यासाठीची सुविधा म्हणून पाहिले जात होते. कोल्हापूर रेल्वेमुळे कोल्हापूर संस्थानात रेल्वेच्या माध्यमातून खूप मोठ्या प्रमाणात आर्थिक फायदा कोल्हापूर संस्थानाला होत होता. १९३६–३७ मध्ये रेल्वेच्या एकूण २९२७ अशा एकेरी रुळपट्टी होत्या आणि १८९ या रुळपट्टी बाजूच्या दिशा होत्या. कोल्हापूर संस्थानातील रेल्वेचे एकूण भांडवल २३ लाख ६१ हजार १२२ इतके झाले होते. एकूण किरकोळ नफा मार्च, १९३७ मध्ये १ लाख ६५ हजार ३४६ रुपये इतका झाला होता. रेल्वेच्या माध्यमातून कोल्हापूर संस्थानातील अनेक लोकांनी प्रवास केलेला होता. मार्च,

१९३७ मध्ये ३,९३,११८ इतक्या कोल्हापूर संस्थानातील लोकांनी प्रवास केला होता. त्यामध्ये २९२ प्रवासी पहिल्या वर्गातून, १०,१४७ दुसऱ्या वर्गातून आणि इतर मध्यम व तिसऱ्या वर्गातून ३ लाख ७८ हजार ७०४ इतक्या प्रवाशांनी प्रवास केलेला होता.[३२] १९३९–४० मध्ये २९–२७ एकेरी दिशा, ८९ बाजूच्या दिशा होत्या. एकूण भांडवल २३ लाख ७१ हजार ७१ इतके झालेले होते. त्यासोबत ५,००,८७० इतके उत्पन्न रेल्वेला झालेले होते. एकूण खर्च २ लाख ३९ हजार ६४९ इतका झालेला होता. या कालावधीमध्ये ८ लाख ४९ हजार ६२९ प्रवाशांनी प्रवास केलेला होता. त्यापैकी प्रथम वर्गामध्ये ३६१ प्रवाशांनी प्रवास केला होता. ३,५०३ प्रवाशांनी दुसऱ्या वर्गातून प्रवास केलेला होता. तर २२,२११ प्रवाशांनी मध्यम वर्गातून प्रवेश केलेला होता आणि ८ लाख २३ हजार ८२ इतक्या प्रवास आणि तिसऱ्या वर्गातून प्रवास केलेला होता.[३३]

**५. प्रशासकीय सुधारणांची फलनिष्पत्ती:**

छत्रपती राजाराम महाराज यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये खूप मोठ्या प्रमाणात सुधारणा करून कोल्हापूर संस्थानामध्ये लागू केली, त्यातीलच एक महत्वाचा घटक म्हणजे पंचायत हा होय. छत्रपती राजाराम महाराजांनी पंचायत हा घटक तालुक्याच्या पातळीवर निर्माण करून तालुक्याची स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण केली. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून लोकशाही तत्त्वाच्या आधारे संस्थात्मक जाळे विस्तारले. एका बाजूला पंचायतीमध्ये लोकनिर्वाचित सदस्यांची सुरुवात केली, तर दुसऱ्या बाजूला पंचायतीमध्ये प्रशासकीय अधिकाऱ्यांना सुद्धा पुरेसे प्रतिनिधित्व दिले. कोल्हापूर संस्थानामध्ये मोठ्या प्रमाणात स्थानिक स्वराज्य संस्था या आकाराला आल्या. छत्रपती राजाराम महाराजांनी १९२९–३० या कालावधीत कोल्हापूर संस्थानातील अनेक ठिकाणी पंचायती स्थापन केल्या. करवीर, पन्हाळा, हतकणंगले, भुदरगड, रायबाग यामध्ये पंचायती स्थापन केलेले होत्या.

छत्रपती राजाराम महाराजांनी सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयाची स्थापना केली होती. सर्वोच्च न्यायालयाची निर्मिती आणि उच्च न्यायालयाची निर्मिती ही कोल्हापूर संस्थानातील लोकांना आधुनिक कायदा आणि सुव्यवस्थेचा फायदा मिळावा, ही त्यामागची भूमिका होती. कोल्हापूर संस्थानमध्ये कायदा हा सर्वांना समान आहे. या धोरणानुसार अनेक महत्त्वाचे निर्णय व प्रकरणे यामध्ये हाताळले गेल्याचे आपणास लक्षात येते. छत्रपती राजाराम महाराजांनी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश यांच्या नेमणुका केल्या. तालुका

पातळीवर ही न्यायालये सुरू केली होती. कोल्हापूर संस्थानाच्या पातळी होती कशा प्रकारे निर्माण होईल आणि न्यायव्यवस्था उपलब्ध करून दिली १९३१–३२ मध्ये कोल्हापूर संस्थानामध्ये एकूण पोलिसांच्या नोंदणी प्रमाणे ४६१ गुन्हे नोंदवले होते. पोलिसांकडून एकूण ४९० आरोपींना तुरुंगामध्ये टाकण्यात आलेले होते. ४५५ व्यक्तीने मॅजिस्ट्रेटपुढे हजर करण्यात आलेले होते. त्यापैकी १९६ सोडून देण्यात आले आणि २२८ कैद्यांना मुक्त करण्यात आले. [३४]

कोल्हापूर मुनिसिपलिटी ॲक्ट निर्माण करून कोल्हापूर शहरासाठी स्वतंत्र अशी महानगरपालिका छत्रपती राजाराम महाराजांनी सुरुवात केली होती. या महानगरपालिकेमध्ये लोकनिर्वाचित आणि शासकीय अधिकाऱ्यांना प्रतिनिधित्व देण्यात आलेले होते. छत्रपती राजाराम महाराजांनी कोल्हापूर मुन्सिपलिटी कायदा १९२५ यानुसार कोल्हापूर शहरामध्ये महानगरपालिकेची स्थापना केली. १९२५– २६ मध्ये या मुन्सिपलिटीचे एकूण उत्पन्न हे २ लाख ५२ हजार ५३४ रुपये इतके झाले. त्यामध्ये एकूण खर्च हा २ लाख ३९ हजार ५७३ इतका झाला.[३५] प्रत्येक गावात ग्रामपंचायत ही भूमिका घेऊन ग्रामपंचायतींची स्थापना छत्रपती राजाराम महाराजांनी करून खूप मोठ्या प्रमाणात सुधारणा केली होती. त्यासाठीची आवश्यक लोकसंख्या त्या गावातील ग्रामपंचायतीचा प्रशासकीय कारभार या सर्वांचा आढावा छत्रपती राजाराम महाराजांनी घेऊन कोल्हापूर संस्थानामध्ये अनेक गावांमध्ये ग्रामपंचायतीच्या स्थापना करून स्थानिक स्वराज्य संस्थेचा विकास केला होता. ग्रामपंचायतीच्या अधिकाराचे वाटप करण्यात आलेले होते. छत्रपती राजाराम महाराजांनी प्रशासकीय सुधारणा करून कोल्हापूर संस्थानाचा आर्थिक विकास खूप जलद गतीने केला. छत्रपती राजाराम महाराजांच्या लक्षात आले होते की, प्रशासकीय व्यवस्थेत सुस्पष्टता आणि कामाची विभागणी ही प्रशासकीय गती आणि कामातील पारदर्शकता येण्यासाठी सर्वात मोठी अडचण आहे. प्रशासकीय कामांमध्ये मुलकी न्याय आणि दिवानी या प्रमुख विभागांमध्ये समन्वयाचा अभाव असल्याचे सुद्धा छत्रपती राजाराम महाराजांनी नोंदवले आहे. यामध्ये समन्वय साधण्यासाठी त्यांनी प्रशासकीय विभागात खूप मोठ्या प्रमाणात बदल केले आणि प्रशासकीय कामाला आणि सुधारणेला गती मिळवून दिली. प्रशासकीय सेवेमध्ये दलित आणि बहुजन समाजाला प्रतिनिधित्व दिले जावे यासाठी सुद्धा छत्रपती राजाराम महाराजांनी खूप मोठ्या प्रमाणात सुधारणा केल्याचे दिसते.

राजर्षी शाहू महाराजांच्या अपुऱ्या राहिलेल्या विविध योजना पूर्ण करण्याचे मोठे कार्य छत्रपती राजाराम महाराजांनी केले. छत्रपती शाहू महाराजांना आयुष्य खूप कमी लाभले. तरीसुद्धा या आयुष्यामध्ये बहुजन वंचित समाजाची सेवा करण्यामध्ये व्यतित केले. त्यांनी अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प जे प्रामुख्याने कोल्हापूर संस्थानाच्या दूरगामी विकासात महत्त्वाचे देणार होते, ते अपूर्णच राहिले. तो वारसा व अपूर्ण राहिलेल्या कार्याचा पूर्णत्वास नेण्यास छत्रपती राजाराम महाराजांनी रात्र-दिवस एक करून ते कार्य पूर्ण केले. ते खालीलप्रमाणे-

१) पुण्यातील शिवस्मारक पूर्णत्वास नेले या शिवस्मारकाची पायाभरणी राजर्षी शाहू महाराजांच्या काळात झाली व याच ठिकाणी भव्य अशा अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराजांच्या तळ्याची उभारणी राजाराम महाराजांनी केली.

२) राजर्षी शाहू महाराजांचे जीवनकार्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राधानगरी धरणाच्या कामाची पूर्तताही राजाराम महाराजांच्या काळात झाली.

३) कोल्हापूरातील विमान सेवेचा प्रारंभ सुध्दा राजाराम महाराजांच्या काळात झाला.

४) कोल्हापूरातील लक्ष्मीपुरी या व्यापारी पेठेची निर्मिती, साईक्य एक्स्टेंशन, राजारामपुरी, या वसाहतींची निर्मितीही राजाराम महाराजांच्या काळात झाली.

५) कोल्हापूरातील उदयोग क्षेत्रातील महत्वाचे कार्य म्हणजे कोल्हापूर शुगर मिलची स्थापना व उभरणी राजाराम महाराजांच्या प्रयत्नातून झाली.

६) कोल्हापूरातील सध्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाची इमारत म्हणजे पुर्वीचे आयर्विन ॲग्रीकल्चरल म्युझीयम या शेती विषयक म्युझीयमची उभारणी राजाराम महाराजांच्या काळातच झाली आहे.

७) 'साईक्स लॉ कॉलेज' (सध्याचे शहाजी लॉ कॉलेज) याची स्थापना त्याचबरोबर श्री राधाबाई बिल्डींग (सध्याचे कोर्ट इमारत), श्री शालिनी निवास पॅलेस या कोल्हापूरच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या इमारतींची उभारणीही राजाराम महाराजांच्या काळातच झाली.

८) सरनोबतवाडी येथील श्री राजाराम तलाव याचीही उभारणी राजाराम महाराजांच्या काळातच झाल्याचे आपल्याला दिसून येईल.

९) सन १९२४ साली राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे पहिले स्मारक कोल्हापूरात ऐतिहासिक दसरा चौकात उभारले गेले, ते राजाराम महाराजांच्या प्रेरणेतून. या स्मारकाची पायाभरणी

गर्व्हनर सर लेस्ली विल्सन यांच्या हस्ते झाली. या समारंभाप्रसंगी राजाराम महाराज म्हणतात की, या ठिकाणी चोहोबाजूला राजर्षी शाहू महाराजांचे जीवनकार्य त्यांच्या कार्याची महती सांगत उभे आहे. ते म्हणजे मराठा वसतीगृह मुस्लीम, जैन, लिंगायत, सारस्वत व प्रभू या विविध समाजातील मुलांच्या शिक्षणाची सोय होण्यासाठी उभारलेली वसतीगृहे हीच खरी राजर्षी शाहू महाराजांची स्मारके आहेत.

अशा प्रकारे छत्रपती राजाराम महाराजांनी १९२२ पासून ते १९४० पर्यंत म्हणजे त्यांच्या जीवनाच्या अंतिम क्षणापर्यंत संस्थानाचा सामाजिक, आर्थिक आणि प्रशासकीय विकास करून जगाच्या किंबहुना भारताच्या इतिहासामध्ये एक मोलाचे आणि मौलिक स्थान निर्माण करून दिले. छत्रपती राजाराम महाराज अहोरात्र दलित बहुजन समाजासाठी आणि स्त्रियांच्या मुक्तीसाठी लढणारे एक समाज क्रांतिकारक होते. ब्राह्मणेतर चळवळीला, नवीन दलित बहुजन समाजातील विचारवंतांना, लेखकांना प्रोत्साहन देऊन कोल्हापूर संस्थानात मोठ्या प्रमाणात राजकीय आश्रय प्राप्त करून दिला. अशा या महान छत्रपती घराण्याच्या नावाचा इतिहास जगाच्या पाठीवर आणि भारताच्या इतिहासामध्ये लौकिकार्थाने स्थान निर्माण करणारा हा राजा छत्रपती शाहू महाराजांची कोणतीही उणीव दलित बहुजन समाजातील घटकांना भासू न देणारा एक महान योद्धा होता. भारताच्या सामाजिक सुधारणेच्या इतिहास लेखनामध्ये छत्रपती राजाराम महाराजांचे स्थान अग्रक्रमाने असेल याबाबत शंका नाही. शिक्षणाच्या माध्यमातून दलित–बहुजन समाजाला खूप मोठ्या प्रमाणात पुढे घेऊन जाणारा आपल्या कोल्हापूर संस्थानाच्या एकूण आर्थिक खर्चापैकी १३ टक्के खर्च हा शिक्षणावर केला पाहिजे. यासाठी ते आग्रही होते व त्याअनुषंगाने धोरणसुद्धा निर्माण करून त्याची अंमलबजावणी करून घेतलेला हा राजा होता.

१९३१ मध्ये छत्रपती राजाराम महाराजांना जी.सी.एम.आई. ही पदवी अर्पण करण्याचा समारंभ टाइम्स ऑफ इंडियाच्या वतीने घेण्यात आला. त्याप्रसंगी महाराजांचा गौरव करताना सांगितले होते की, ''हिंदुस्थान देश राजकीय अशांतता, जाती–जातींमधील वैमनस्य व आर्थिक हालाखीच्या सपाट्यात सापडला असताना करवीर इलाख्यात त्याचा मागमूसही नसून, उलट तेथे सुबत्तेचे साम्राज्य नांदत असून राजा व प्रजा यांच्यामध्ये जो अस्पृश्यतानिहाय एकोपा दिसून येतो, त्याचे सर्व श्रेय येथील विद्यमान प्रभू श्री राजाराम महाराज यांना दिले

पाहिजे. कोल्हापूर इलाख्यावर निसर्गाची विशेष कृपा असून अवर्षणाचा प्रसंग सहसा येत नाही, त्यातूनही सध्याचे महाराज यांनी आपल्या पूज्य वडिलांच्या नेतृत्वाखाली इंग्लंडसारख्या सुधारल्या. देशात जाऊन तेथे कृषीचे व इतरही शिक्षण संपादन केले असल्यामुळे त्याचा बिनमोल फायदा करवीरस्थ प्रजाजनांना साहजिकच झाला आहे. राजर्षी शाहू महाराज हे आपल्या पुत्राला युरोपियन शिक्षण देऊन थांबले नाहीत, तर त्यांनी श्री राजाराम महाराजांना राज्यकारभार चालवण्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, म्हणून आपल्या नेतृत्वाखाली राजकीय शिक्षण देऊन त्यांना राजकार्य कुशल केले आहे. अशा तऱ्हेची तयारी असल्यावर श्री राजाराम महाराजांनी आपल्या ८ वर्षाच्या कारकिर्दीत कोल्हापुरी इलाख्याची सर्वांगीण प्रगत करून दाखवावी, यात नवल काय? श्री राजाराम महाराजांनी राज्यधुरा आपल्याकडे येताच प्रत्येक खात्याकडे स्वतः लक्ष घातले व शक्य ती काटकसर करून व तरुण आणि उत्साही अधिकारी नेमून राज्य यंत्रणेचा गाडा मोठ्या धडाडीने चालू केला. राजाराम कॉलेजची व्यवस्था आर्य समाजाकडे होती, ती दरबाराकडे घेऊन कॉलेज फुल्ल केले व उच्च शिक्षणाची उत्तम सोय केली. आपल्या प्रजेमध्ये शेतकी शिक्षणाचा प्रसार करण्यावर महाराजांचा विशेष कटाक्ष होता. याकरिता त्यांनी विविध अशा बऱ्याच नमुनेदार शेती संस्था, शेतकऱ्यांच्या मुलांना प्रत्यक्ष व व्यवहारिक शिक्षण मिळविण्याची व्यवस्था केली असून, ठिकठिकाणी को-सोसायट्या चालू केल्या आहेत. त्या योगाने कोल्हापुर हे आदर्श संस्थान होण्याचा मार्गावर आहे, यात संशय नाही. आपल्या पूज्य वडिलांप्रमाणे श्री राजाराम महाराजांना माणसांची विलक्षण पारख असल्याने त्यांनी चतुराईने लायक माणसे वेचून योग्य ठिकाणी त्यांची नेमणूक केल्याने राज्यशकट व्यवस्थित चालवणे शक्य झाले आहे. राजर्षी शाहू छत्रपतींच्या अमदानीतील कार्यकुशल दिवाण सर सबणीस यांच्या सल्ल्याचा फायदा राजाराम महाराजांना आरंभी मिळाला व आता वयेपरत्वेमुळे ते जरी रिटायर झाले आहे, तरी त्यांचा अनुभाविक सल्ला वेळोवेळी त्यांना मिळत असतो, हे त्यांचे भाग्यच आहे.''[३६] अहोरात्र मेहनत करणारा, बहुजन समाजाच्या सुधारणेबद्दल आणि उन्नतीबद्दल कटिबद्ध असणाऱ्या अशा राजाचे २६ नोव्हेंबर, १९४० मुंबई येथे निधन झाले. आपल्या जीवनाची अंतिम यात्रा पूर्ण करून इतिहासाच्या पानापानावर त्यांनी आपले स्थान निर्माण केला आहे.

**छत्रपती राजाराम महाराजांच्या निधनाची विविध समाजातील प्रगल्भ नेतृत्त्वानी घेतलेली दखल[३७]**

छत्रपती राजाराम महाराजांच्या निधनानंतर तत्त्कालीन संपादक, विचारवंत, समाजसुधारक आणि राजकीय नेतृत्वांनी अशा प्रकारे आपल्या प्रतिक्रिया विविध वर्तमानपत्रात व्यक्त केल्या. यावरून छत्रपती राजाराम महाराजांच्या कर्तृत्वाचा आणि कार्याचा वेध घेऊन महाराज हे काळाच्या किती पुढे होते, त्यांनी केलेल्या सुधारणा मानवमुक्तीसाठी कशा महत्त्वाच्या होत्या, हे प्रकर्षाने दिसून येते. ते खालीलप्रमाणे–

**ज्ञानप्रकाश, पुणे (ता. २८.११.१९४०)**

अस्पृश्यता निवारणासारख्या, मंदिर प्रवेशसारख्या सामाजिक सुधारणांच्या बाबतीत श्री शाहू छत्रपतींनी घालून दिलेला दंडक श्रीमंत राजाराम महराजांनी अक्षरक्ष: पाळला आणि अधिकारी वर्गाला पाळावयाला लावला या वागणुकीने श्रीमंत राजराम महाराजांनी वैयक्तिक लोकप्रियता अखंड टिकली. परवा ग्वाल्हेरच्या माजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळयाच्या अनावरण समारंभाचे अध्यक्षस्थान त्यांना आग्रहपूर्वक स्वीकारावयास लावण्यास ग्वाल्हेरच्या महाराजांची श्री शिवाजी महाराजांच्या गादीबद्दलची निष्ठा जशी कारणीभूत झाली, तसाच त्या गादीवरील छत्रपतीविषयीचा वैयक्तिक परमादरभाव हाही त्यास कारणीभूत झाला आहे. श्रामंत महाराजांनी राजकन्यारत्नाचा लाभ होऊन फार महिने झाले नाहीत तोच ते कालवश व्हावेत हे दुदैव होय. श्रीमंत राजाराम महाराजांच्या अकाली निधनाने खरच अखिल महाराष्ट्रीय जनतेची मने शोकमग्न होतील, यात शंकाच नाही. शिवरायाच्या गादीवरील एक पुरूष आज काळाने आंढून नेला आहे. आणि महाराष्ट्राची मोठी हानी झाली आहे.

**तारका, मुंबई (ता. ३०.११.१९४०)**

करवीर संस्थानाचे अधिपती श्रीमंत सर राजाराम महाराज छत्रपती यांच्या आकस्मिक मृत्युची वार्ता वाचून सिनेमासृष्टीतील बऱ्याच लोकांना हळहळ वाटल्यावाचून राहणार नाही आपल्या १८ वर्षाच्या कारकीर्दीत श्रीमंत महाराजांनी सिने व्यवसायाच्या अभिवृद्वीसाठी जी आर्थिक व इतर स्वरूपाची मदत केली, ती इतकी बहुमोल आहे. की त्यांचा मृत्यू हा सिनेव्यवसायावर आलेले भयंकर गंडांतरच होय असे म्हटले पाहिजे.

करवीर संस्थान हे अनेक प्रसिध्द फिल्म कंपन्याचे जन्मस्थान आहे. महाराष्ट्र फिल्म कंपनी ही येथेच अस्तित्वात आली संस्थानाच्या बहुमोल सहाय्यामुळे तिला अनेक सुंदर ऐतिहासिक चित्रपट आपल्या प्रेक्षकांना सादर करता आल. आज नावारुपास आलेली प्रभात कंपनीही प्रथम तेथेच अस्तित्वात आली श्रीमंत महाराजांचे प्रोत्साहन या कंपनीला वारंवार मिळत गेले. याशिवाय इतर अनेक कंपन्याना माहराजानी आपल्या संस्थानाकडून जी काही मदत देता येणे शक्य होती ती दिलेली आहे.

कोल्हापूर सिनेटोन व शालीनी सिनेटोन या कंपन्याना राजश्रय देऊन महाराजांनी १०–१२ लाख रुपयांची आर्थिक् घस सोसली सिनेमा व्यवसायाला आपल्या संस्थानात महत्वाचे स्थान प्राप्त व्हावे आणि चांगले चांगले चित्रपट व कालावंत निर्माण करून करवीर संस्थानाचे नाव चित्रपट व्यवसाय अग्रेसरत्व पावावे, अशी महाराजांची मोठी इच्छा होती. त्या दृष्टीनेच त्यांनी वरील दोन प्रयत्न स्वत: करून पाहिले; परंतु त्यात त्यांना यश आले नाही. तथापि त्यांच्या प्रात्साहानाने तयार झालेले व पृढे आलेले अनेक कलावंत आज करवीर संस्थानाचे नाव उज्वल करीत आहेत.

सिनेमा व्यवसायाच्या अभिवृद्दीसाठी श्रीमंत महाराजांनी केलेली ही बहुमोल कामगिरी लक्षात घेऊन त्यांच्या उदार आश्रयावर नावारूपास आलेल्या व्यक्तीना व संस्थानी त्यांचे चिरस्थायी स्वरूपाचे स्मारक करणे, हे त्यांचे कर्तव्य आहे.

**स्वतंत्र बेळगाव (ता. ३०.११.१९४०)**

छत्रपतींच्या आकाली निधनाने महाराष्ट्रच नव्हे तर कर्नाटक प्रांतही शोकसागरात बुडून गेला असल्यास नवल नाही श्री शिव छत्रपतींच्या स्मारकभूत होऊन राहणाऱ्या या गादीबद्दल व ही गादी विभूषित करणात्या तत्कालीन वारसाबद्दल आदर व अभिमान महाराष्ट्रास वाटत राहणे साहजिकच आहे. परंतू करवीर प्रांत कर्नाटक प्रांतला अगदी लागून राहिला असल्याने करवीराधिपतींचे व कर्नाटकाचे संबंध बरेचसे निकट व प्रेमाचे आहेत, ही गोष्ट विसरून चालणार नाही कर्नाकट हेल्थ इन्सिटटयूट हुक्केरी या संस्थेच्या इमारतीची कोनशिला श्रीमत राजाराम महाराजांनी बसविली व चिकाडी येथे गतवर्षी भरलेल्यास कर्नाटक शारीरिक शिक्षण परिषदेचे अध्यक्षस्थान श्रीमंत राजाराम महाराजांनी भूषविले या दोनच घटना महाराजांवरील कर्नाटक प्रांताच्या असलेल्या प्रेमाचे व आदराचे घोतक आहेत.

**झंकार, पुणे (ता. १.१२.१९४०)**

१९२२ साली मुंबई येथेच राजर्षी शाहू महाराज शाहू महाराज कालवश झाले उभय पिता–पुत्रांची मरणभूमी मुंबईच ठरावी हा योगायोग विलक्षण तर खराच पित्याच्यानंतर राज्याधिष्ठित होऊन श्रीमंत छत्रपती राजाराम महाराजांची १८ वर्षे आपल्या दलिताद्वारक पित्याच्या पावलावर पाऊल टाकून अत्यंत वत्सलतेने राज्यशकट हाकला बहुजनसमाज सुशिक्षित झाल्याशिवाय राष्ट्राचा तरणोपाय नाही ही त्यांची ठाम समजूत होती व त्यासाठी आपल्या प्रजेला शिक्षण मिळावे म्हणून कोल्हापूरात त्यांनी अनेक नवीन शिक्षणसंस्था काढल्या व पुर्वीच्या संस्था संवर्धित केल्या त्यामुळे पुण्याच्या खालोखाल शैक्षणिकदृष्टया कोल्हापूर हेच महत्वाचे केंद्र असून आज अखिल महाराष्ट्रात बहुजन समाजातील जो एक सुशिक्षित वर्ग निर्माण झालेला दिसत आहे. त्यचे सर्व श्रेय छत्रपतींच्या उदार शैक्षणिक धोरणालाच देणे जरूर आहे. कोल्हापूर दरबारचा शिक्षणाचा जेवढा दरसाल खर्च होतो तितका खर्च इतर अनेक मोठमोठया संस्थानातुन तर होत नाहीच, पण ब्रिटीश हद्दीतील किती जिल्हे याबाबतीत कोल्हापूरची बरोबरी करू शकतील याचीही शंकाच वाटते.

**'निर्भीड'कार अनंत हरी गद्रे, मुंबई (ता. १८.११.१९४०)**

पुण्यश्लोक श्री छत्रपती राजाराम महराज यांच्या शोचनीय निधनाची वार्ता म्हणजे आम्हा हिंदुत्वनिष्ठ लोकांच्या मस्तकावर बसलेला कठोर वज्राचा तडाखाच होय श्री. राजाराम महाराजांसारख्या शिवपरंपरेचा अभिमानी आणि रोमारोमात श्रात्रधर्म बाणत असलेला हिंदू राजा पुन्हा लाभेल असले वाटत नाही महाराजांच्या निधनाने हिंदू राष्ट्राचे कधीही भरून न निघणारे नुकसान झालेले आहे. त्यांच्या निधनाने कोल्हापूरची अस्पृश्य जनता तर पोरकी झालेली आहेच सत्यवादीकार बाळासाहेब पाटील यांच्यासारख्या महाराजांच्या एकनिष्ठ भक्तांच्या मनाला केवढा धक्का बसला असेल याची कल्पना माझ्या शिवाय इतराना होणे शक्य नाही. श्री. राजाराम महाराजांच्या निधनामुळे मला तर असेच वाटू लागले आहे की, आमच्या चोहोबाजूनी आधीच पोखरून गेलेल्या हिंदू राष्ट्रावर परमेश्वराचाच कोप झालेला आहे.

ईश्वर श्री राजाराम छत्रपतींच्या आत्म्याला चिरशांती आणि आपणासारख्यांना दु:ख सहन करण्याचे मनोर्धर्य देवा, हीच प्रभुचरणी प्रार्थना

**काळ, पुणे (ता. २८.११.१९४०)**

कोल्हापूरच्या महाराजांचे स्थान दक्षिणेतील संस्थानामध्ये अग्रपूजेचे होते आणि हिंदूस्थानातील इतर मोठया संस्थानिकांच्या तोडीचे कोल्हापूर संस्थान सांपकिदृष्टया नसले तरी ऐतिहासिक दृष्टीने आणि भारताच्या राजकारणाच्या घडामोडीच्या दुष्टीने कोल्हापूरकरांचे स्थान फार वरच्यास दर्जाचे आहे. भारती राजकारणाचे भवितव्य काय ठरावयाचे असेल ते ठरो, त्याचे स्वरूप फेडरेशनच्या रूपाने निश्चित होवो किवा न होवो, तथापि भारतीय सेस्थानिकांपुढे आज अत्यंत महत्वाचा प्रश्न उभा राहिलेला असताना कोल्हापुरकरांसारखा महत्वाचा राजा नाहिसा व्हावा ही गोष्ट भारतीय राजकारणाच्या दृष्टीनेसुध्दा फार शोचनीय झाली आहे. आजच्या परिस्थितीत ब्रिटीश सरकारला सहाकार्य करण्यात संस्थानिकांमध्ये अहमहमिका लागली असली तरी या संस्थानिकांच्या कायमच्या राजकारणाच्या दृष्टीने हिंदू संस्थानिक व मुसलमान संस्थानिक असे गट पाडण्याच्या कारवाया व त्यास उत्तेजन देणारे संधिसाधू यांची कारस्थाने चालू असता कोल्हापूरकरांसारखा महत्वाचा हिंदू संस्थानिक मरण पावावा यामुळे हिंदू संस्थानिकांच्या संघटनेचे फार मोठे असे नुकसान झालेले आहे.

**विजय, सांगली (ता. २७.११.१९४०)**

श्री शाहू महाराज यांचा १९२२ साली असाच आकस्मिकरीतीने शोचनीय अंत झाल्यावर श्री राजाराम महाराजांना गादीवर बसविण्यात आले. ही त्यांची १८ वर्षाची कारकीर्द कोल्हापूरात अत्यंत चिरसंस्मरणीय मानली जाईल यात शंका नाही. पाश्चात्य देशातील शिक्षणसंस्था, कारखाने वगैरे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले असल्याने त्यांनी शिक्षणसंस्था व उदयोगधंदे याबाबतीत कोल्हापूर हे आदर्श शहर बनवून सोडले आहे. पुण्यानंतर इतक्या शिक्षणाच्या सोयी असलेले शहर दशिण महाराष्ट्रात तरी आढळणार नाही असे वाटते. उदयोगधंदयाच्या दृष्टीने राधानगरीमधील त्यांनी आखलेली विद्युच्छवित उत्पादनाची योजना अमंलात आल्यास तेच त्यांचे चिरस्थायी स्मारक होईल. महाराजांना खऱ्या हिंदुत्वाचा अत्यंत जाज्वल्य अभिमान असे, हे त्यांनी बॅ. तात्याराव सावरकरांच्या सुटकेनंतर कोल्हापूरात केलेले हार्दिक स्वागत व हिंदूना त्रास देणाऱ्या पठाण वगैरेच्या बंदोबस्तासाठी केलेले कायदे यावरून स्पष्ट होते. असे अनेक गुण त्याच्या ठायी दुग्गोचर होत होते, अशा ऐन उमेदीत महाराजांसारख्या उत्साही साहसी, धिप्पाड अशा नरेंद्राचा अंत व्हावा ही हिदुधर्माची व महाराष्ट्राची अत्यंत मोठी हानी होय.

## संदर्भसूची


१. Reports on the general administration of the Kolhapur state- 1939-40 पृ. 148

२. जाधव भगवान, राजर्षी श्री शाहू महाराजांची भाषणे (संपा.), महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक मंडळ, मुंबई, पृ. २

३. Reports on the general administration of the Kolhapur state- 1939-40 पृ. 57

४. Reports on the general administration of the Kolhapur state- 1922-23 पृ. 59

५. कुलकर्णी मीना, कुलकर्णी ब. शि., १९७५ श्री शाहू छत्रपतीच्या अर्थकारण, गौरी नंदन पब्लिकेशन कोल्हापूर पृ. ११६

६. Reports on the general administration of the Kolhapur state- 1931-32 पृ. 128

७. कित्ता– पृ. १२९

८. Reports on the general administration of the Kolhapur state- 1939-40 पृ. 173

९. कित्ता– पृ. १७२

१०. Reports on the general administration of the Kolhapur state- 1922-23 पृ. 59

११. कित्ता– पृ. ५९

१२. Reports on the general administration of the Kolhapur state- 1922-23 पृ. 60

१३. कित्ता–पृ. ५९

१४. कित्ता–पृ. ६२

१५. Reports on the general administration of the Kolhapur state- 1931-32 पृ. 129

१६. Reports on the general administration of the Kolhapur state- 1922-23 पृ. 69

१७. कित्ता–पृ. ५७

१८. हेरवाडे श्रीधर,१९८३, छत्रपती राजाराम चरित्रग्रंथ लेखक, प्रकाशन : ॲड. महादेवराव आडगुळे, चिटणीस छत्रपती राजाराम प्रतिष्ठान कोल्हापूर पृ. ७२

१९. कित्ता–पृ. ७२

२०. कित्ता–पृ. ७५

२१. संपादक(२०१८) छत्रपती राजाराम महाराज यांचे विचार, संचालक, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई पृ. ३०

२२. Reports on the general administration of the Kolhapur state- 1924-25 पृ. 536

२३. Reports on the general administration of the Kolhapur state- 1939-40 पृ. 102

२४. Reports on the general administration of the Kolhapur state- 1931-32 पृ. 28

२५. Reports on the general administration of the Kolhapur state- 1931-32 पृ. 28

२६. Reports on the general administration of the Kolhapur state- 1931-32 पृ. 98

२७. कित्ता–पृ. १०१

२८. Reports on the general administration of the Kolhapur state- 1936-37 पृ. 21

२९. कित्ता–पृ. १०३

३०. कित्ता–पृ. ९५

३१. Reports on the general administration of the Kolhapur state- 1939-40 पृ. 114

३२. Reports on the general administration of the Kolhapur state- 1936-37 पृ. 106

३३. Reports on the general administration of the Kolhapur state- 1939-40 पृ. 115

३४. Reports on the general administration of the Kolhapur state- 1931-32 पृ. 80

३५. Reports on the general administration of the Kolhapur state- 1925-26 पृ. 28

३६. हेरवाडे श्रीधर, १९८३, छत्रपती राजाराम चरित्रग्रंथ, अॅड. महादेवराव आडगुळे, चिटणीस, छत्रपती राजाराम प्रतिष्ठान कोल्हापूर पृ. १०८

३७. डॉ. जाधव रमेश, १९९७, छत्रपती रामाराम महाराज चरित्र ग्रंथ, नॅशनल बुक ट्रस्ट, दिल्ली, पृ. १२४ ते १२९

# संदर्भसूची

# संदर्भसूची

## प्राथमिक साधने : अस्सल ऐतिहासिक कागदपत्रे


१) राजाराम महाराज छत्रपती दप्तर १९२२–१९४० (गव्हर्नर व्हाईसराय रेसिडेंट व इतर जहागीरदार आणि करवीरच्या इतर अधिकाऱ्यांना केलेल्या पत्रव्यवहाराचे रूमाल) कोल्हापूर पुरालेखागार, कोल्हापूर

२) कोल्हापूर स्टेट सर्व्हे रिपोर्ट्स, कोल्हापूर पुरालेखागार, कोल्हापूर

३) बॉम्बे गव्हर्नमेंट गॅझेट, कोल्हापूर पुरालेखागार, कोल्हापूर

४) हुजूर ठराव बुक (१९२२–१९४०) कोल्हापूर पुरालेखागार, कोल्हापूर

१. हुजूर ऑफिस, जनरल खाते, आदेश क्रमांक ५५५, ठराव बुक क्रमांक, ३६१, दि. ७/०१/१९२५, कोल्हापूर

२. हुजूर ऑफिस, जनरल खाते, आदेश क्रमांक ६३, ठराव बुक क्रमांक, ३४६, दि. १३/०७/१९२३, कोल्हापूर

३. हुजूर ऑफिस, जनरल खाते, आदेश क्रमांक २१४, ठराव बुक क्रमांक, ३२२, दि. १२/०७/१९२२, कोल्हापूर

४. हुजूर ऑफिस, शाळा खाते, आदेश क्रमांक १६२, ठराव बुक क्रमांक, ४४८, दि. ०३/०८/१९२७, कोल्हापूर

५. हुजूर ऑफिस, जनरल खाते, आदेश क्रमांक ३७०, ठराव बुक क्रमांक, ३२२, दि. २४/०७/१९२२, कोल्हापूर

६. हुजूर ऑफिस, जनरल खाते, आदेश क्रमांक ३२५, ठराव बुक क्रमांक,३५६, दि. १३/११/१९२४, कोल्हापूर

७. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, आदेश क्रमांक ३७८, ठराव बुक क्रमांक,३७८ दि. २५/११/१९२६, कोल्हापूर

८. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, आदेश क्रमांक ५२२, ठराव बुक क्रमांक, ३७८, दि. २२/०१/१९२७, कोल्हापूर

९. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, आदेश क्रमांक २४२, ठराव बुक क्रमांक, ३८०, दि. ०४/११/१९२७, कोल्हापूर
१०. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, आदेश क्रमांक १६०, ठराव बुक क्रमांक, ३८०, दि. ०९/०८/१९२७, कोल्हापूर
११. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, आदेश क्रमांक १९३, ठराव बुक क्रमांक, ४४८, दि. २०/०८/१९२७, कोल्हापूर
१२. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव बुक क्रमांक, ३२२ ठराव क्रमांक २९०, दि. २७ जुलै १९२२, कोल्हापूर
१३. हुजूर ऑफिस, रिसाला खाते ठराव बुक क्रमांक ३१६, ठराव क्रमांक ७३८, दि. २४ ऑक्टोबर १९२२, कोल्हापूर
१४. .हुजूर ऑफिस जनरल खाते ठराव बुक क्रमांक ३४४, ठराव क्रमांक ५८८, दिनांक ११ मार्च १९२४, कोल्हापूर
१५. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, ठराव बुक क्रमांक ३७१, मुलकी ठराव क्रमांक ३४८, दि. ८ नोव्हेंबर १९२६, कोल्हापूर
१६. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव क्रमांक ४४९, ठराव क्रमांक ४३७, दिनांक १० डिसेंबर, १९२७, कोल्हापूर
१७. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, ठराव बुक क्रमांक ३८०, मुलकी ठराव क्रमांक २९०, दि. ६ डिसेंबर, १९२७, कोल्हापूर
१८. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, ठराव बुक क्रमांक ३८४, मुलकी ठराव क्रमांक ३०८, दि. २२ ऑक्टोबर १९२८, कोल्हापूर
१९. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, ठराव बुक क्रमांक ३९०, मुलकी ठराव क्रमांक ५९४, दि. १४ मार्च,१९३१, कोल्हापूर
२०. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, ठराव बुक क्रमांक ३९३, मुलकी ठराव क्रमांक ४९१, दि. १२ जानेवारी, १९३२, कोल्हापूर
२१. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव बुक क्रमांक ४४९, ठराव क्रमांक ५१९, दि. २६ मार्च १९२८, कोल्हापूर

२२. हुजूर ऑफिस, जनरल ठराव, ठराव बुक क्रमांक ४४८, ठराव क्रमांक ३९८, दि. १ डिसेंबर १९२७, कोल्हापूर

२३. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, ठराव बुक क्रमांक ३८०, मुलकी ठराव क्रमांक २५४, दि. ३० नोव्हेंबर १९२७, कोल्हापूर

२४. हुजूर ऑफिस, देवस्थान खाते, बुक क्र. ३२२ ठराव क्र. ३४२, दि. १९ जुलै १९२२, कोल्हापूर

२५. हुजूर ऑफिस, मुलकी खाते, मुलकी ठराव बुक क्र. ३७८ ठराव क्र. ४५९, १५ डिसेंबर १९२६, कोल्हापूर

२६. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव बुक क्र. ३४६, ठराव क्र. ६३, १३ जुलै १९२३, कोल्हापूर

२७. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव बुक क्र. ३४०, ठराव क्र. ३६८, २० डिसेंबर १९२३,, कोल्हापूर

२८. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव बुक क्र. ३१६, ठराव क्र. ७२२, दि. १३ ऑक्टोबर १९२२, कोल्हापूर

२९. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव बुक क्र. ४५५, ठराव क्र. ५७२, दि. ३० मार्च १९३०, कोल्हापूर

३०. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव बुक क्र. ३४०, ठराव क्र. ३६८, दि. २० डिसेंबर १९२३, कोल्हापूर

३१. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव बुक क्र. ३५६, ठराव क्र. ३२५, दि. १३ नोव्हेंबर १९२४, कोल्हापूर

३२. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव बुक क्र. ४५५, ठराव क्र. ५६१, दि. २ एप्रिल १९३०, कोल्हापूर

३३. हुजूर ऑफिस, जनरल खाते, ठराव बुक क्र. ४४९, ठराव क्र. ४३८, दि. १० डिसेंबर १९२७, कोल्हापूर

## ५) हुजूर ऑफीस, करवीर सरकारचे गॅझेट (१९२२–४०), कोल्हापूर पुरालेखागार, कोल्हापूर


३४. हुजूर ऑफिस, करवीर सरकारच्या गॅझेट भाग १, १८९४, कोल्हापूर

३५. हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट, कोल्हापूर पुरालेखागार कोल्हापूर , भाग १, २ ऑगस्ट १९०२

३६. हुजूर ऑफिस, करवीर सरकारच्या गॅझेट भाग १, दिनांक १३ मे, १९२२, कोल्हापूर

३७. हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅजेट, भाग १, फायनान्स डिपार्टमेंट विभाग, दि. ९ ऑगस्ट, १९२६, कोल्हापूर

३८. करवीर सरकारची गॅजेट भाग ४, दि. २१ /११/१९२५, कोल्हापूर

३९. हुजूर ऑफिस, करवीर सरकारचे गॅझेट, भाग १, फायनान्स डिपार्टमेंट, दि. ०९/०८/१९२६, कोल्हापूर,

४०. करवीर सरकारची गॅजेट भाग ४, दि. २७ डिसेंबर १९२६, लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट, कोल्हापूर

४१. करवीर सरकारची गॅजेट भाग–४, १८ जून १९२७, लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट, कोल्हापूर

४२. करवीर सरकारची गॅजेट भाग–४, दि. ३० जुलै १९२७, लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट, कोल्हापूर

४३. करवीर सरकारची गॅजेट भाग १, दि. ९ ऑगस्ट १९२६, फायनान्स डिपार्टमेंट कोल्हापूर,

४४. करवीर सरकारची गॅजेट भाग ५, दि. २३ एप्रिल १९३२, लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट कोल्हापूर,

४५. करवीर सरकारची गॅजेट भाग १, दि. ४ नोव्हेंबर १९२६, जनरल डिपार्टमेंट, कोल्हापूर, करवीर सरकारचे गॅजेट, भाग १, दि. १८ डिसेंबर १९२६, कोल्हापूर

४६. करवीर संस्थानचे गझेट, भाग १, दि. ९ एप्रिल १९२७, कोल्हापूर

४७. करवीर सरकारचे गॅझेट, भाग १, दि. १२ जानेवारी, १९२९, कोल्हापूर

४८. करवीर सरकारचे गॅझेट, भाग १, ७ मे १९२७, कोल्हापूर

४९. करवीर सरकारचे गॅझेट, भाग २, दि. २ मे १९३५, कोल्हापूर

५०. करवीर सरकारचे गॅझेट, भाग १, दि. ४ डिसेंबर १९२७, कोल्हापूर

५१. करवीर सरकारचे गॅझेट, भाग ४, दि. १२ जून १९२६, कोल्हापूर

**6) General Administration Reports (1922-40), कोल्हापूर पुरालेखागार, कोल्हापूर**

५२. Reports on the general administration of the Kolhapur state- 1921-22
५३. Reports on the general administration of the Kolhapur state- 1922-23
५४. Reports on the general administration of the Kolhapur state- 1923-24
५५. Reports on the general administration of the Kolhapur state- 1924-25
५६. Reports on the general administration of the Kolhapur state- 1925-26
५७. Reports on the general administration of the Kolhapur state- 1931-32
५८. Reports on the general administration of the Kolhapur state- 1936-37
59. Reports on the general administration of the Kolhapur state- 1939-40

**दुय्यम साधने :**

**ग्रंथसंपदा**

१. धाटावकर भास्कर (संपा.), छत्रपती राजाराम महाराज यांचे निवडक आदेश, भाग एक, एप्रिल २००६, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन, कोल्हापूर,
२. धाटावकर भास्कर (संपा.), छत्रपती राजाराम महाराज यांचे निवडक आदेश, भाग २, २०१० संचालनालय महाराष्ट्र शासन, कोल्हापूर
३. संपादक, छत्रपती राजाराम महाराज यांचे विचार, २०१८, संचालक, पुराभिलेख संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई
४. डॉ. देसाई संजीव, राजर्षी शाहू छत्रपती निवडक आदेश, भाग – २, एप्रिल १९७९, पुराभिलेख विभाग, कोल्हापूर
५. भिडे ग. रं., देशपांडे, पु. ल (संपा.१९७१), कोल्हापूर दर्शन, गर्गे स. मा, कोल्हापूरचा इतिहास, दीक्षित इंटरनॅशनल पब्लिशिंग हाऊस पुणे.
६. सूर्यवंशी गणपतराव, १९७८, राजा शाहू आणि समाज प्रबोधन, रणजीत प्रकाशन इचलकरंजी
७. कीर धनंजय,१९७९, राजर्षी छत्रपती शाहू एक समाजक्रांतिकारक राजा, पाप्युलर प्रकाशन, मुंबई,

८. Grahm D. C. , Statistical Reports of The Kolhakpur State, १८५४,
९. नाईक तु. बा. १९७८, छत्रपती राजर्षी शाहू महाराज , तरुण प्रकाशन, कोल्हापूर
१०. घुगे. व्ही. बी.१९७६, शाहूचे समाजवादी आर्थिक धोरण, द कोल्हापूर राईटर सोसायटी लिमिटेड, कोल्हापूर पृ.६
११. डॉ. पवार जयसिंगराव, २००१, राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ संपादक, महाराष्ट्र इतिहास प्रबोधनी, कोल्हापूर
१२. जाधव रमेश, २०१२ राजषी शाहू छत्रपती, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, दिल्ली पृ.६
१३. जाधव विलासराव – २०१३– छत्रपती शाहू छत्रपती संस्थान कोल्हापूर विस्मृतीतील,रावा प्रकाशन कोल्हापूर
१४. Ghuge V. B., Chhatrapati Shahu's Socialist Economic Policies (1894 to 1922) The Kolhapur Writers Co-operative Society Ltd
१५. कुलकर्णी मीना, कुलकर्णी ब. शि., १९७५ श्री शाहू छत्रपतीचे अर्थकारण, गौरी नंदन पब्लिकेशन, दि १९७६ कोल्हापूर
१६. भगत आर टी ,१९९९ , शिक्षण महर्षी राजर्षी शाहू महाराज, सिद्धराज प्रकाशन पुणे
१७. Khane B. D., Shri Shahu - study of Socio-Political Reforms, (1885 -1922), Shivaji University, Kolhapur, 1978.
१८. हेरवाडे श्रीधर, जानेवारी १९८३, छत्रपती राजाराम चरित्र–ग्रंथ लेखक,प्रकाशन ॲड. महादेवराव आडगुळे, चिटणीस छत्रपती राजाराम प्रतिष्ठान कोल्हापूर
१९. Selection from the Satara Rajas and the Peshwas Diary, South Chhatrapati Prepared by Rao Bahadur Ganesh Chimnaji, Sahakari Preess satara
२०. Latthe -. B. - Memoirs of His Highness Shri Shahu Chhatrapati - Maharaja of Kolhapur (Vol. I), Time Press, Bombay, १९२४

## वृत्तपत्रे व नियतकालिके

१. केसरी
२. टाईम्स ऑफ इंडिया, मुंबई
३. दै. सकाळ, पुणे
४. ज्ञानप्रकाश, पुणे

५. तारका, मुंबई

६. स्वतंत्र बेळगाव

७. झंकार, पुणे

८. लोकशक्ती, पुणे

९. काळ, पुणे

१०. विजय, सांगली

११. पुढारी, कोल्हापूर

**मुलाखत**

१. छत्रपती राजाराम महाराज यांचे वंशज छत्रपती शाहू महाराज यांची दि. २२ मार्च २०१९ रोजी कोल्हापूर येथील 'न्यू पॅलेस' येथे घेण्यात आलेली मुलाखत

# परिशिष्टे

- **परिशिष्ट १ :** मुलाखती आणि प्रश्नावली – विद्यमान छत्रपती शाहू महाराज
- **परिशिष्ट २ :** छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकीर्दीतील निवडक ऐतिहासिक दस्ताऐवज
- **परिशिष्ट ३ :** छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकिर्दीतील निवडक ऐतिहासिक छायाचित्रे
- **परिशिष्ट ४ :** छत्रपती शाहू महाराजांच्या निधनाची विविध वृत्तपत्रांनी घेतलेली दखल

# परिशिष्ट १

# मुलाखत अनुसूची

## मुलाखत अनुसूची नमूना क्र. १

**'छत्रपती राजाराम महाराज यांचे प्रशासकीय कार्य (१९२२ ते ४०) : एक चिकित्सक अभ्यास' या विषयासंदर्भात संशोधकाने अभ्यासक/संबंधीत यांचेकडून संकलित केलेली माहिती**

| **संशोधक** | **मार्गदर्शक** |
|---|---|
| नरेंद्र धावजी पाटील | डॉ. भास्कर धाटावकर |

---

मुलाखतदात्याचे नाव ---------------------------------- वय -----------

स्थळ : ---------------------------------- स्वाक्षरी -----------------

- छत्रपती राजाराम महाराजांच्या जडणघडणीमध्ये छत्रपती शाहू महाराजांचे कोणते योगदान आहे?
- छत्रपती राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सुत्रे हाती घेतल्यानंतर कोणत्या सुधारणांना प्राधान्यक्रम दिला?
- कोल्हापूर संस्थानाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून छत्रपती राजाराम महाराजांनी दिलेल्या योगदानासंदर्भात आपण काय सांगाल?
- छत्रपती राजाराम महाराजांच्या राज्यकारभाराचा महत्त्वाचा पैलू म्हणून आपण कोणत्या बाबीकडे लक्ष वेधाल?
- राजाराम महाराजांनी आधुनिक जगाला व भारताला आणि महाराष्ट्राला कोणते योगदान दिले?
- आपल्या मतानुसार, छत्रपती राजाराम महाराज यांच्या कोणत्या सुधारणा समकालीन काळामध्ये प्रासंगिक आहेत.
- आपल्या मतानुसार, छत्रपती राजाराम महाराज यांच्या कोणत्या सुधारणा समकालीन काळामध्ये प्रासंगिक आहेत.

# मुलाखत प्रश्नावली

**‘छत्रपती राजाराम महाराज यांचे प्रशासकीय कार्य (१९२२–१९४०) : एक चिकित्सक अभ्यास’** या विषयावर छत्रपती राजाराम महाराज यांचे वंशज विद्यमान छत्रपती शाहू महाराज यांची भेट घेऊन प्रस्तुत विषयासंबंधी मुलाखत घेण्यात आली. ती पुढीलप्रमाणे–

**१) छत्रपती राजाराम महाराजांच्या जडणघडणीमध्ये छत्रपती शाहू महाराजांचे कोणते योगदान आहे?**

छत्रपती शाहू महाराज हे लोककल्याणकारी राजे होते. त्यांनी कोल्हापूर संस्थान हे एक आदर्श संस्थान म्हणून जगाला ओळख निर्माण करून दिली. महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये हे त्यांचे महत्त्वाचे योगदान होते. छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती राजाराम महाराजांना अतिशय काळजीपूर्वक प्रशिक्षण दिले. आपला वसा आणि वारसा पुढे चालवावा, यासाठी त्यांनी परदेशी शिक्षणासाठी पाठविले. छत्रपती राजाराम महाराजांना चांगले आणि दर्जेदार शिक्षक मिळाले पाहिजेत. या दृष्टीकोणातून त्यांनी चांगल्या शिक्षकांची निवड केली. त्यामधूनच छत्रपती राजाराम महाराजांची वैचारिक जडणघडण होण्यामध्ये मदत झाली. कोल्हापूर संस्थान हे कृषीप्रधान संस्थान आहे. शेती क्षेत्रामध्ये सुधारणा करण्यासाठी अत्याधुनिक शेतीचे शिक्षण आवश्यक आहे, त्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी छत्रपती राजाराम महाराजांना शेती क्षेत्राचेसुद्धा शिक्षण घेण्यासाठी पाठवले. सोबतच राज्यकारभारात महत्त्वाची पदे देऊन त्यांनी राजकीयदृष्ट्या प्रशिक्षित केले.

**२) छत्रपती राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सुत्रे हाती घेतल्यानंतर कोणत्या सुधारणांना प्राधान्यक्रम दिला?**

छत्रपती राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सूत्रे हाती घेतल्यानंतर प्रथमतः प्रशासकीय सुधारणा आणि विकेंद्रीत प्रशासन यामध्ये महत्त्वाचे योगदान दिले. कोल्हापूर संस्थानातील प्रशासन हे लोकाभिमुख आणि लोककल्याणकारी असावे, यासाठी त्यांनी अनेक महत्त्वाची धोरणे स्वीकारली आणि त्यातून प्रशासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना शिस्त लावण्याचा आणि प्रशासकीय सुसूत्रता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. संस्थानाच्या सर्वांगीण

विकासासाठी प्रशासनात लोकसहभाग हा महत्त्वाचा आहे. लोकसहभागाआधारित प्रशासन चालवण्यात स्थानिक स्वराज संस्था महत्त्वाचे योगदान देऊ शकतात, याची जाणीव छत्रपती राजाराम महाराजांना होती. त्याअनुषंगाने त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या बळकटीकरणासाठी अनेक महत्त्वाची धोरणे घेतली. त्यासाठी त्यांनी पंचायत संस्थेचा कायदा करून तालुका पातळीवर तालुका पंचायत, गावपातळीवर ग्रामपंचायतीची स्थापना केली. त्यासोबत कोल्हापूर शहरामध्ये महानगरपालिकेसारखी संस्था निर्माण केली. अशा संस्थांच्या माध्यमातून त्यांनी प्रशासकीय सुधारणांचा पाया घातला. हे सर्व करत असताना लोकहित आणि लोककल्याण हाच त्यांच्या राज्यकारभाराचा केंद्रबिंदू राहिलेला आहे.

**३) कोल्हापूर संस्थानाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून छत्रपती राजाराम महाराजांनी दिलेल्या योगदानासंदर्भात आपण काय सांगाल?**

कोल्हापूर संस्थानाला मोठा इतिहास आहे. कोल्हापूर संस्थानाचा विकास करण्यासाठी शककर्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून आजपर्यंत अनेक प्रयत्न झाले आहेत. या प्रयत्नातूनच कोल्हापूर संस्थानाचा नावलौकिक जागतिक पातळीवर पोहोचला. महाराणी ताराबाईंसारख्या कर्तृत्ववान स्त्रियांनी कोल्हापूर संस्थानाची जडणघडणीत आणि कोल्हापूर संस्थान हे लोककल्याणकारी राज्य म्हणून पुढे येण्यात महत्त्वाचे योगदान दिले. छत्रपती शाहू महाराज हे लोककल्याणकारी आणि न्यायप्रिय राजे होते. त्यांनी आरक्षणासारखा निर्णय घेऊन समाजातल्या वंचित आणि शोषित घटकांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले. सामाजिक सुधारणांचा आणि संस्थानाच्या सर्वांगीण विकासाचा हा वारसा त्यांच्यानंतर छत्रपती राजाराम महाराजांनी समर्थपणे चालवला. मात्र या महत्त्वपूर्ण योगदानाची दखल इतिहासकार आणि अभ्यासक यांच्याकडून जितक्या प्रमाणात घ्यायला हवी तितक्या प्रमाणात घेतली गेली नाही. छत्रपती राजाराम महाराजांनी घेतलेल्या धोरणे ही आजच्या परिस्थितीतही लागू पडणाऱ्या आहेत; त्यामुळे त्यांच्या विचारांचा आणि धोरणांचा सखोल अभ्यास व्हायला हवा. त्यांनी घालून दिलेल्या आदर्शाचा अवलंब आजच्या धोरणकर्त्यांनी करायला हवा. तुमच्यासारखे संशोधक छत्रपती महाराजांच्या विचाराला आणि त्यांनी राबवलेल्या धोरणांवर प्रकाशझोत टाकून इतिहासकाराचे आणि राज्यकर्त्यांचे लक्ष वेधतील, यात शंका नाही.

**४) छत्रपती राजाराम महाराजांच्या राज्यकारभाराचा महत्वाचा पैलू म्हणून आपण कोणत्या बाबीकडे लक्ष वेधाल?**

प्रशासकीय सुधारणा हा छत्रपती राजाराम महाराजांच्या राज्यकारभाराचा एक महत्त्वाचा भाग होता. कार्यक्षम प्रशासन ही राज्यकारभाराची पूर्वअट आहे अशी त्यांची धारणा होती. या धारणेतूनच छत्रपती राजाराम महाराजांनी प्रशासनामध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा केल्या. या सुधारणांचा कोल्हापूर संस्थानाचा सामाजिक आर्थिक आणि राजकीय विकास होण्यास मोठा हातभार लागला. छत्रपती राजाराम महाराजांनी प्रशासकीय सुधारणांशिवाय राज्यकारभाराची सुधारणा अशक्य आहे, हे अचूक वेधले होते. त्यावर त्यांनी मोठ्या प्रमाणात लक्ष केंद्रित करून सुधारणा केल्या. जागतिक लोकशाहीची जननी म्हणून आपण ब्रिटनकडे पाहतो; पण आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, कोल्हापूर संस्थानाचा इतिहास पाहता इथली प्रशासकीय कार्यप्रणाली पूर्णतः लोकशाही तत्त्वांवर आधारलेली दिसून येते. त्यामुळे कोल्हापूर संस्थान हे खऱ्या अर्थाने लोकशाहीची जननी आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

**५) राजाराम महाराजांनी आधुनिक जगाला व भारताला आणि महाराष्ट्राला कोणते योगदान दिले?**

छत्रपती राजाराम महाराजांनी कोल्हापूर संस्थामध्ये आधुनिकीकरण करताना म्युनिसिपालीटी ॲक्ट निमार्ण करून लाकाभिमुख प्रशासन निर्माण केले, पंचायत कायदा निर्माण केला, हायकोर्ट स्थापन करून अपील कोर्ट सुरू केले, बालविवाह प्रतिबंध कायदा आमलात आणला तसेच महत्वाचे म्हणजे कृषी विषयक धोरण महाराजांनी राबविले. त्यामुळे कोल्हापूर संस्थान सुजलाम् सुफलाम् होण्यास मदत झाली सहाजिकच यासर्वाचा लाभ कोल्हापूर संस्थानाला तर झालाच पण इतर संस्थानालासुद्धा झाला. त्यामुळे याची प्रेरणा महाराष्ट्रालाच नव्हे तर जगालासुद्धा मिळाली. त्यामुळे आजही कोल्हापूर संस्थानाला तितकेच महत्व आहे.

**६) आपल्या मतानुसार, छत्रपती राजाराम महाराज यांच्या कोणत्या सुधारणा समकालीन काळामध्ये प्रासंगिक आहेत.**


छत्रपती राजाराम महाराजांनी प्रशासनातील भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या हेतूने भ्रष्ट प्रशासकीय व्यक्तीला शिक्षा देण्यासंदर्भात महत्त्वाच्या तरतुदी केल्याचे दिसून येईल. आज भारतामध्ये आणि महाराष्ट्रामधील मोठ्या प्रमाणात प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणाची आवश्यकता असतानाही अनेक गरीब आणि वंचित घटक बाजूला आहेत, त्यांना मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले, ते आजसुद्धा समाजाला दिशादर्शक आहेत, त्यासोबतच आज मोठ्या प्रमाणात शेतकरी आत्महत्या करत आहेत. आज शेतीतील उत्पादन खर्च वाढला आहे, शेतमालाला योग्य दर मिळत नाहीत, त्यामुळे शेतकरी वर्ग हा मोठ्या संकटात सापडलेला आहे. साहजिकच तत्कालीन परिस्थितीत छत्रपती राजाराम महाराजांनी घेतलेली शेतकरी हिताची धोरणे आठवल्याशिवाय राहत नाहीत. शेतकऱ्यांना शेतीसाठी कर्जपुरवठा होण्यासाठी त्यांनी कोल्हापूर बँकेची स्थापना, लघुउद्योगांना अर्थसाह्य होण्यासाठी स्थापन पतसंस्था, सोसायट्यांची स्थापना या बाबी दिशादर्शक आहेत.

**७) आपल्या मतानुसार, छत्रपती राजाराम महाराज यांच्या कोणत्या सुधारणा समकालीन काळामध्ये प्रासंगिक आहेत.**

इतिहास हा केवळ साधनांचा नसतो तर तो महापुरुषांच्या कर्तृत्वावर विकसित होत असतो, तसा इतिहास छत्रपती राजाराम महाराजांनी घडविला आणि जगासमोर एक आदर्श निर्माण केला. छत्रपती शिवाजी महाराज, छ. राजाराम महाराज, छ. शाहू महाराज यांचा गौरवशाली इतिहास लोकांसमोर यावा यासाठी त्यांच्या चरित्रलेखनासाठी अनुदान दिले. त्याचप्रमाणे त्यांनी केलेल्या अर्थसाहाय्यातून कोल्हापूरमध्ये छ. शिवाजी महाराजांचा पुतळा उभा राहिला. छ. शिवाजी महाराज, छ. शाहू महाराज यांच्या कर्तृत्वाचा इतिहास विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याच्या हेतूने आर्थिकदृष्ट्या आणि सामाजिकदृष्ट्या मागासलेल्या समाजातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्या सुरू केल्या. अशा विविध उपक्रमातून छत्रपती राजाराम महाराज यांनी आधुनिक भारताच्या इतिहास लेखनात योगदान दिले.

## परिशिष्ट २

# छत्रपती राजाराम महाराज यांच्या कारकिर्दीतील निवडक ऐतिहासिक दस्तऐवज



४ करवीर सरकारचें ग्याझिट, ७ मे १९२२. [ भाग १

### जाहीरनामा.

**स्वस्ति श्री राज्याभिषेक शके २४८ दुंदुभिनाम संवत्सरे वैशाख शुद्ध १० मंदवासरे श्रीमन्महाराज राजाराम छत्रपति स्वामी यांजकडून:—**

या जाहिरनाम्याच्याद्वारें कोल्हापूर इलाख्यांतील आमच्या तमाम प्रजाजनांस जाहीर करण्यांत येतें कीं, आमचे परमप्रिय, परमपूज्य व प्रजावत्सल तीर्थरूप श्रीमन्महाराज कर्नल हिज हायनेस सर शाहू छत्रपति, जी. सी. एस्. आय्., जी. सी. व्ही. ओ., जी. सी. आय. ई., एल्. एल्. डी., एम्. आर्. ए. एस., हे आजरोजीं सकाळीं सहा वाजतां मुंबई मुक्कामीं कैलासवासी झाले. तीर्थरूपांच्या निधनाचा आमचेवर हा अत्यंत शोककारक प्रसंग गुदरला आहे. तथापि परमेश्वरी योजनेस धैर्यानें तोंड देणें आम्हांस अवश्य आहे. या दुःखद प्रसंगामुळें सर्व राज्यकारभार व प्रजाजनांचें संरक्षण करण्याचें कर्तव्य आमचेवर पडल्यामुळें आम्हीं सर्व राज्याधिकारसूत्रें हातीं घेतलीं असून राज्याचा पूर्ण अखत्यार आज म्हणजे वैशाख शुद्ध दशमी शके १८४४ रोज शनिवार ( तारीख सहा माहे मे सन १९२२ ) पासून चालविण्यास सुरवात केली आहे.

आमची सर्व प्रजा सतत संतुष्ट राहून सुखी असावी, तिचे कल्याणाची सतत वृद्धि व्हावी व आमचे राज्याची हरएकप्रकारें सदोदित भरभराट होत जावी अशी आमच्या परमपूज्य कै० वा० तीर्थरूपांप्रमाणें आमचीही उत्कट इच्छा आहे. हा आमचा हेतु परिपूर्ण करण्यास आमच्या पदरचे सर्व लहानथोर जहागिरदार, आप्त, सरदार, मानकरी, इनामदार, कामगार आदिकरून तमाम प्रजाजन शुद्ध अंतःकरणापासून मोठ्या राजनिष्ठेनें आम्हांस साहाय्य करतील असा आम्हांस पूर्ण भरंवसा आहे. व आमच्या परमपूज्य वडिलांनीं ज्याप्रमाणें अहर्निश झटून प्रजाजनांचें कल्याण केलें व प्रेम संपादिलें तोच कित्ता गिरविण्याचा आमचा दृढ निश्चय आहे. ब्रिटिश साम्राज्याशीं आमचे संबंध आज तागायत चालत आल्याप्रमाणें पूर्ण सख्यत्वाचे व निष्ठेचे राहतील.

आमचें पवित्र कर्तव्य करण्यास आम्हांस ईशसाहाय्य व्हावें व आमची कारकीर्द दीर्घकालपर्यंत चालून प्रजाजनांस सर्व प्रकारें सुखकर व्हावी अशी आम्ही त्या जगन्नियंत्या परमात्म्याची अनन्यभावें प्रार्थना करितों.

कोल्हापूर नवीनराजवाडा

तारीख ६ माहे मे १९२२ इ०.

*Printed at the Jainendra Printing Press Kolhapur*

**छत्रपती राजाराम महाराज यांनी राज्य कारभार हाती घेताना प्रजेला उद्देशुन केलेले भाषण (जाहिरनामा)**

## लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट.

### जाहीरनामा नं० ४३.

तारीख १३ नोव्हेंबर १९२५ इ०.

सर्व लोकांस जाहीर होण्याकरितां प्रसिद्ध करण्यांत येतें की,


करवीर इलाख्यांत सुधारलेला म्युनिसिपल कायदा लागू करण्यासंबंधानें काम चालून अखेर श्रीमन्-महाराज छत्रपति सरकार करवीर यांचे हुजूरून हु. म्यु. ठ. नं. २८ ता. १२।११।१९२५ चा ठराव होऊन इकडे हु. म्यु. आ. नं. ७२ ता. १२।११।१९२५ नें खालील प्रमाणें आज्ञेत आले आहे:-

" कोल्हापूर म्युनिसिपालिटी इ. स. १८८९ सालीं स्थापन झाली. त्या वेळी तेव्हांच्या परिस्थितीस अनुसरून म्युनिसिपालिटीचे सर्व सभासद सरकारांतुन नेमण्यांत येत होते. ही व्यवस्था इ. स. १९०४ पर्यंत चालू होती. परंतु म्युनिसिपालिटीचे त्या वेळचे व्यवस्थेत बरेच दोष दिसून आल्यामुळें म्युनिसिपालिटी सस्पेंड करण्यांत येऊन तिचे ऐवजी सरकारांतून म्युनिसिपल सुपरिंटेंडेंट या नांवाचा एक अधिकारी नेमण्यांत आला; व त्याजकडे सर्व व्यवस्था सोपविणेंत आली. त्या नंतर इ. स. १९२० चे सुमारास कोल्हापूर शहरांतील लोकांमध्यें शिक्षणप्रसार बराच झालेला आहे, व स्थानिक स्वराज्याचे हक्क उपभोगणेची इच्छा उत्पन्न झाली आहे, असें कै० हुजूरांचें निदर्शनास आल्यावरून आतांपर्यंत चालू असलेल्या नियमां-प्रमाणें म्युनिसिपालिटीची घटना करणेंत आली; व म्युनिसिपालिटीचे सर्व सभासद निरनिराळ्या जातीच्या मतदार संघांकडून निवडून येणेची व्यवस्था करणेंत आली. या व्यवस्थेप्रमाणें निवडलेल्या म्युनिसिपालिटींत कोल्हापूरच्या नागरिकांचे लायख प्रतिनिधि येतील व त्यांच्या हातून म्युनिसिपालिटीचीं कामें कोल्हापूर शहरास भूषणास्पद होणेसारखी होतील, अशी कै. हुजूरांस आशा वाटत होती, आणि ही आशा सफल झाली असती तर आमच्या कै. परमप्रिय पित्याप्रमाणेंच आम्हांसही अत्यंत आनंद झाला असता; परंतु अलीकडे आलेल्या अनुभवावरून अद्यापहि म्युनिसिपालिटीचें काम समाधानकारक रीतीनें चालत नाहीं, असें दिसून येतें. म्युनिसिपालिटीचे सभासदांत दुफळ्या व व्यक्तिविषयक तंटे उत्पन्न होऊन कामाची नुक-सान होत असल्याचें वारवार दिसून आल्यामुळें ता. १५।१२।१९२४ इ. पासून पुनः म्युनिसिपालिटी सस्पेंड करून दरबारच्या अधिकाऱ्यामार्फत म्युनिसिपालिटीचें काम चालविणेबद्दल हुजूरांस आज्ञा द्यावी लागली. हा अनुभव बऱ्याच अंशानें निराशाजनक आहे. तथापि आपल्या प्रजेस आणखी एकदां संधि देऊन त्यांचेकडून म्युनिसिपालिटीचें सार्वजनिक हिताचें काम करून घ्यावें, व अशा प्रकारें नागरिकत्वाची जबाबदारी पार पाडण्याचें शिक्षण लोकांस प्राप्त करून द्यावें, अशी श्रीमन्महाराज छत्रपति सरकार यांना उत्कट इच्छा असल्यामुळें, कोल्हापूर म्युनिसिपालिटीची व्यवस्था कशा प्रकारें करावी याजबद्दल विचार करून हुजूरांस योग्य त्या शिफारसी सादर करण्याकरितां रावबहादूर सर रघुनाथराव सबनीस दिवाण, रावब. लठ्ठे ॲ. दिवाण, रावब. इंदूलकर सरसुभे, रावसा. भोसले फिन्यान्शियल सेक्रेटरी, रावसा. सबनीस लीगल ॲडव्हायसर व रावसा. कासमअली हकीम प्रेसिडेंट सिटी म्युनिसिपालिटी यांची कमेटी नेमण्यांत आली. सदरहू कमिटीचा ता.३१-१०-२५ चा रिपोर्ट व रावब. लठ्ठे ॲ. दिवाण यांचाही तत्संबंधी झालेला रिपोर्ट असे दोन्ही रिपोर्ट अवलोकनांत आले. त्यांचा विचार करून खाली लिहिल्याप्रमाणें नवीन व्यवस्था अमलांत आणण्याचें हुजूरून ठरविण्यांत आलें आहे:-

१ या हुकुमाचे तारखेपासून कोल्हापूर इलाख्यांतील म्युनिसिपालिटीसंबंधीचे आजपर्यंत अमलांत असलेल्या सर्व रद्द करून हिंदु इलाख्यांतील "The Bombay District Municipal Act (Bombay Act III

क्रमश

कोल्हापूर म्युनिसिपालटी ॲक्ट 1925



५८ करवीर सरकारचें ग्याझिट, १२ जून १९२६. [ भाग

लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट.

जाहीरनामा नं. ४

सन १९२६ चा बालविवाहप्रतिबंधक कायदा.

तारीख ११ जून सन १९२६ इ०

ज्यापेक्षां कोल्हापूर इलाख्यांत बालविवाहाची रूढी प्रचलित असून ती दिवसेंदिवस वाढत्या शिक्षणप्रसारानेंहि कमी होत असल्याचीं चिन्हें दिसून येत नाहींत व ज्यापेक्षां ही हानिकारक रूढी बंद पडल्याशिवाय समाजाची जोमदार प्रगति होणार नाहीं, अशी श्रीमन्महाराज छत्रपति सरकार करवीर यांची पूर्ण खात्री झालेली आहे; त्यापेक्षां यावरून खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा करण्यांत येत आहे.

१ या कायद्याचें नांव " सन १९२६ चे कोल्हापूरचा बालविवाहप्रतिबंधक कायदा " असें आहे.

२ हा कायदा सर्व कोल्हापूर इलाख्यास व कोल्हापूर इलाख्यांतील सर्व धर्माच्या व सर्व जातीच्या प्रजाजनांस लागू आहे.

३ ज्या व्यक्तीचें कोल्हापूर-स्टेटच्या हद्दींत सहा महिने सतत वास्तव्य असेल, त्यास ह्या कायद्यापुरतें कोल्हापूर-स्टेटचे प्रजाजन असें मानण्यांत येईल.

४ कोल्हापूरस्टेटच्या कोणाहि प्रजाजनांनीं कोल्हापूरस्टेटचे हद्दींत अगर या कायद्याचें उल्लंघन करण्याचे हेतूनें परहद्दींत जाऊन या कायद्याचें उल्लंघन केल्यास कलम ६ मध्यें लिहिलेल्या शिक्षेस ते पात्र होतील.

उदाहरण अ. जर एकादा मनुष्य आपलें कोल्हापूरस्टेटचे हद्दींतील वास्तव्य मोडण्याचे इरादानें परहद्दींत जाऊन बिऱ्हाड करून राहिला व नंतर आपल्या स्वतःच्या मुलाचें अगर मुलीचें अगर पालकत्वाखालीं असलेल्या मुलाचें अगर मुलीचें सहजगत्या जुळून आल्यानें लग्न लाविलें तर त्यानें हा गुन्हा केला असें मानूं नये.


ब. पण बिऱ्हाड बदलण्याचे इरादानें बिऱ्हाड सोडलेलें नसून ह्या कायद्यानें मनाई होत असलेलें लग्न घडवून आणण्याचे इरादानें बिऱ्हाड तात्पुरतें बदलेलें असल्यास तो ह्या कायद्यानें गुन्हेगार ठरेल.

५ जो कोणी पुरुष अगर स्त्री स्वतःच्या अगर स्वतःच्या पालकत्वाखालीं असलेल्या आणि वयास पूर्ण दहा १० वर्षे न झालेल्या मुलीचा अगर वयास पूर्ण चवदा १४ वर्षे न झालेल्या मुलाचा विवाह करील अगर करवील त्यास अगर तीस या कायद्यानें तसें करण्यास मनाई करण्यांत येत असून तें त्याचें अगर तीचें कृत्य गुन्हा ठरविण्यांत येत आहे.

६ कलम ५ यांत गुन्हा ठरविण्यांत आलेलें कृत्य जो कोणी ( पुरुष अगर स्त्री ) करील अगर करवील तो अगर ती ज्यास्तींत ज्यास्त दोन हजार रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल. तसेंच इंडियन पीनल कोड कलम १०७ प्रमाणें ज्या कृत्यास अबेटमेंट ( abetment ) म्हणतां येईल तें करून या कायद्याप्रमाणें गुन्ह्यास मदत करील, तर तो अगर ती २०० दोनशें रुपयेपर्यंत दंडास पात्र होईल.

क्रमशः

सन 1926 चा बालविवाहप्रतिबंद कायदा



२ करवीर सरकारचें ग्याझिट २३ एप्रिल १९३२ [भाग ५

## लेजिस्लेटिव्ह डिपार्टमेंट

जाहीरनामा नंबर १५.

### दिवाणऑफिस

कोल्हापूर, ३१ मे १९३१.

### कोल्हापूर स्टेट हायकोर्ट रेग्युलेशन
### (जा. नंबर ४७ चे दुरुस्तीसह)
### २४।१२।३१

ज्या अर्थी कोल्हापूर येथें हायकोर्ट स्थापन करणें योग्य आहे, त्या अर्थी श्रीमन्महाराज छत्रपतिसाहेब सरकार करवीर यांचेकडून खालीलप्रमाणें कायदा करणेंत येत आहेः—

लहान मथळा — १. या कायद्यास "सन १९३१ चा कोल्हापूर स्टेट हायकोर्ट रेग्युलेशन" असें ह्मणावें.

सुरुवात — २. तो सन १९३१ च्या जून महिन्याच्या पहिल्या तारखेस अमलांत येईल.

व्याप्ति — ३. तो फ्युडेटरी जहागिरीसुद्धां सर्व करवीर इलाख्यांस लागू आहे.

व्याख्या — ४. या कायद्यांत संदर्भावरून उलट अर्थ निघत नसेल तरः—

"हायकोर्ट" ह्मणजे या कायद्यान्वयें स्थापन केलेलें कोल्हापूर येथील हायकोर्ट असें समजणेंचे आहे;

"चीफ जस्टिस" याचा अर्थ या कायद्यान्वयें नेमणेंत आलेले सदरहू हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश असा आहे. व इलाखे मजकुरीं जारी असलेल्या कोणत्याही कायद्यांत, कानूंत अगर नियमांत जेथें जेथें हायकोर्ट असा उल्लेख येईल तेथें तेथें या कायद्यानें स्थापन करणेंत आलेले हायकोर्ट असें समजणेंचे आहे.


"फुलबेंच" ह्मणजे हायकोर्टाचे तीन जज्जीसहन कमी नाहीं इतक्या जज्जांचे बेंच.

हायकोर्टाची घटना — ५. कोल्हापूर येथील हायकोर्टात कायमचे तीन जज्जीस असतील व त्यांची नेमणूक श्रीमन्महाराज छत्रपतिसाहेब सरकार करवीर यांचेकडून होईल आणि हुजूरइच्छेस येईल तोपर्यंत ते आपले नेमणुकीचे जागी काम करतील. परंतु जरूरीच्या प्रसंगी हुजुरांस तात्पुरते मुदतीनें जादा चौथे जज्जाची नेमणूक करतां येईल.

हायकोर्टाचे न्यायाधिशांपैकीं एका न्यायाधिशास श्रीमन्महाराज छत्रपतिसाहेब सरकार करवीर यांजकडून हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश नेमणेंत येईल. मात्र हा कायदा अमलांत येण्याचे वेळीं "चीफ जज्जाचे" जागीं ज्यांची नेमणूक असेल तेच या कायद्याप्रमाणें स्थापन करणेंत आलेले हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश होतील. यासंबंधानें वेगळे हुकुमाची जरूरी नाहीं.

क्रमशः

सन 1931 चा कोल्हापूर स्टेट हायकोर्ट रेग्युलेशन



Registered No. B. 2538.

जय भवानी

KOLHAPUR GOVERNMENT.

RAJARAM CHHATRAPATI MAHARAJ

Kolhapur Government Gazette

कोल्हापूर गव्हमेंट गॅझेट

VOL. 51.] PUBLISHED BY AUTHORITY EVERY THURSDAY. [No. 21

वर्ष ५१.] प्रत्येक गुरुवारी हुकमाने छापून प्रसिद्ध केले जाते. [अंक २१.


गुरुवार तारीख २६ मे सन १९३८.

या भागास निराळे फाईल करिता यावे म्हणून पानास अनुक्रमांक घातले आहेत.

भाग १

अनुक्रमणिका

छत्रपती राजाराम महाराज यांच्या कार्यकाळात प्रसिद्ध होणारे कोल्हापूर गव्हमेंट गॅझेट



परठाण सनद नंबर

जमिनीचा सत्ता प्रकारः—
गांवठाण.
[मा] सारामाफी.

सरसुभे इलाखा करवीर यांजकडून.

रा. रा. राहणार कोल्हापूर यांस.

ज्यापेक्षां जमीनमहसुलाचा ठराव करण्यांत यावा, व जमिनीच्या मालकीचे व दुसरे जे हक्क त्यांचा दाखला राहून ते हक्क कायम रहावे, या हेतूनें कोल्हापूर शहर व त्यास लागून असलेले उपनगरांतील जमिनीची सर्व्हे करण्याविषयीं, मुंबईच्या जमीनमहसुलाच्या कायद्यांतील ठरावाअन्वयें श्रीमन्महाराज छत्रपति सरकार करवीर यांचे हुजूरचा म्यु. ठ. नं. ४१ ता. १६ फेब्रुवारी १९३१ अन्वयें म्यु. आ. नं. ९९ तारीख २१ फेब्रुवारी १९३१ यांत फर्माविलें आहे व त्यासंबंधी जरूर असणारी चौकशी करण्याचा हुकूम झाला आहे, त्यापेक्षां सदरहू कायद्याचें कलम १३३ अन्वयें ही सनद खाली लिहिल्याप्रमाणें दिली आहे; म्हणजे–कोल्हापूर शहर व त्यास लागून असलेले उपनगरांतील वार्डांतील पेठेच्या भागांतील जी जमीन तुमच्या वहिवाटींत आहे, व शीट नंबर चा जो नकाशा आहे, त्यांत त्या जमिनीचें परठाणाला नंबर देण्यांत आला आहे; त्याचें क्षेत्रफळ सुमारें चौरस यार्ड आहे. त्याची चतुःसीमेसह आकृति व लांबी रुंदी खाली लिहिल्याप्रमाणें:–

[ स्केल:– एक इंचास ४० फूट ]

[२] सदरहू परठाणाचें खातें तुम्हांकडे या सनदेवरून कायम केलें आहे. त्यावर जमीनमहसूल आकारलेला नाहीं. परंतु त्यावर, वेळोवेळी जी रकम कायदेशीर रीतीनें आकारण्यांत येईल ती रकम जमीनमहसूल म्हणून यापुढें देण्यास ते पात्र राहील.

[३] तुमच्या सत्ताप्रकारच्या शर्ती अशा आहेत की, तुमचें खातें दुसऱ्यास प्राप्त करून देण्याजोगें व वारसांकडे चालण्याजोगें आहे; आणि त्या खात्याचा वेळोवेळा जो कायदेशीर धारण करणारा असेल त्याकडे तें, हक्काबाबत कोणतीहि हरकत किंवा तक्रार न काढतां करवीर सरकार चालवितील.

[४] ही सनद श्रीमन्महाराज छत्रपति सरकार करवीर यांचे आज्ञेवरून, सरसुभे इलाखा करवीर यांच्या सहीशिक्क्यानिशी तारीख माहे सन १९ इसवी रोजी करून दिली आहे.

सर्व्हेअर
तयार करणार.

हेड सर्व्हेअर.


सर्व्हेअर
रुजवात घेणार.

सि. स. सेटलमेंट ऑफिसर.

सरसुभे,
इलाखा करवीर.

OCT 26 1939

छत्रपती राजाराम महाराज यांनी कोल्हापूर शहराचा सिटी सर्व्हे करून
प्रत्येक मिळकतधारकांना मालकी संबंधीच्या सनदा करून दिल्या त्या उताराची प्रत.



श्रीहुजूर ऑफीस.


जाहीरनामा

ता० ३० मार्च १९२८ इ०


डॉ० बी. आर. आंबेडकर बार अॅट लॉ रा० मुंबई यांनीं आपल्यास करवीर इलाख्यांतील सर्व कोर्टांत वकिली करण्याची सनद मिळणेबद्दल अर्ज केलेवरून हुजुरून दि० ठ० नं० ३२६ ता. १०।११।२७ नें अर्जदारयांस त्यांचे मागणीप्रमाणें तारीख १०।११।२७ इ० पासून करवीर इलाख्यांतील सर्व कोर्टांत वकिली करण्याची सनद देण्यांत आली आहे.

| | |
|---|---|
| दादो रावजी शिरके, | D. A. SURVE, |
| हेड् क्लार्क. | ची. से. टू हिज हायनेस. |

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कोर्टात वकिली करण्याची सनद दिल्याचा जाहिरनामा**




The Bank of Kolhapur Ltd.




Journal of orders from the Huzur Office :
जर्नेल हुजुर ऑफिसांतून झालेल्या हुकमाबद्दल

for the Fasli year 133 Calender year 192
सन १३३ फसली व इसवी सन १९२ . 3

| Serial No. बेच नंबर. | Date of receipt. दाखल तारीख | Minor Department. पोट खातें. | Subject matter. थोडक्यांत तात्पर्य. | Date of final order. निकाल तारीख. | Final order. निकाल हुकूम. |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| | | | मुन्सपालिटीने आपला अध्यक्ष निवडणेस मंजुरी द्यावी म्हणून आले उगाल— | | |
| ५३८ | १८.१०.२७ | जनरल | दिवाण अर्जी नं. ५१३ / १७.१०.२७ अर्ज:— महात्मा जोतिराव फुले यांचें ... चरित्र लिहिणेचे कामीं कांहीं तरी मदत मिळावी म्हणून वगैरे. खब. दिवाण:— सदरहू पुस्तकास आश्रय देणें आमुचेतर चळवळीच्या दृष्टीनें हिताचे आहे. केनश्री छत्रपती महाराज यांच्या चरित्राचीं बुकें 'श्रीराम ... प्रेस' बेळगांव यांजकडून छापून घेतली त्यावेळीं त्याबाबतींत त्या प्रेस कडून दरबारचे अजमासें (८००) रुपये येणें आहे. तरी सदरचीं बुकें सदरहू प्रेस छापून देणेस तयार होईल. यासाठीं ... यांजकडून छापून घेऊन छपाईचा खर्च ग्रँट म्हणून देणें सयुक्तिक होईल म्हणून आले उगाल:— | १०.१२.२७ A.P. | खब. दिवाण यांचे अभिप्राया प्रमाणें होणेचें मंजूर करणेंत आलें आहे. |
| ५३९ | १८।११।२७ | जनरल | दिवाण:— मि. पेंढारकर ग्रंथकार यांस रु. ९०० (शंभर) रुपये अदा करणें बद्दल समक्ष आज्ञेंत आले प्रे. तजवीजीस हुकूम दिला आहे. सदर पेंढारकर लिहित असलेले बुक पुरे होई पर्यंत दरमहा | १०.१२.२७ D.P. | खब. दिवाण यांचा अभिप्राय मंजूर करणेंत आला आहे |

महात्मा जोतीबा फुले यांचे चरित्र लिहिण्यासाठी महाराजांनी केलेली आर्थिक तरतूद


400/S-264

Journal of orders from the Huzur Office

जर्नल हुजूर ऑफिसांतून झालेल्या हुकुमाबद्दल

| Serial No. सिरा नंबर | Date of Receipt. दुखल तारीख | Minor Department. पेट खाते. | Subject matter. आणि कामांतील तपशील. |
|---|---|---|---|


400/S-265 524

for the fasli year 134 Calender year 193

सन १३४ फसली व इसवी सन १९३

| Date of final order. निकाल तारीख | Final order. निकाल हुकूम. |
|---|---|

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पन्हाळा येथे मोफत जागा देण्याबाबतचा ठराव



472/5-35

Journal of orders from the Huzur Office

जर्नल हुजूर ऑफिसांतून झालेल्या हुकुमाबद्दल

472/5-36 16

for the Fasli year 134 Calendar year 193

सन १३४ फसली व इसवी सन १९३

सरकारी कामात खाडाखोड केल्याने छत्रपती राजाराम महाराजांनी दिलेले बडतर्फ आदेश.

परिशिष्ट ३

# छत्रपती राजाराम महाराज यांच्या कारकिर्दीतील निवडक ऐतिहासिक छायाचित्रे



**राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्याची प्रेरणा घेऊनच छत्रपती राजाराम महाराजांनी आपली कारकिर्द सुरु केली.**



कोल्हापूरचे भाग्यविधाते- छत्रपती राजाराम महाराज




कोल्हापूर स्टेट मधील रेव्हेनु स्टॅम्प





राजाराम महाराजांच्या पत्रावरील मुद्रा




कोर्ट फी स्टॅम




जनरल स्टॅम्प
(एक बाजूला करवीर राज्य संस्थापिका
महाराणी ताराबाई व एका बाजूला शककर्ते शिवाजी महाराज
यांचे छायाचित्र उमटविण्यास सुरुवात केली)




छत्रपती राजाराम महाराजांची मराठी व इंग्रजीतून स्वाक्षरी



कोल्हापूरच्या उच्च न्यायालयाच्या तीन न्यायाधीशांचे खंडपीठ.
डावीकडून कृ. ना. पंडितराव, सर रघुनाथ, व्यंकोजी सबनीस, रामचंद्र रघुनाथ शिरगावकर.



कोल्हापूर म्युनिसिपालटी इमारतीची छायाचित्रातील बाजू म्युनिसिपालटीचा कट्टा म्हणून ओळखला जातो.
या कट्ट्याच्या बाजूला आलेली एक मिरवणूक. छायाचित्रात राजाराम महाराजही दिसत आहेत.



कोल्हापूर शुगर मिल.



कोल्हापूर रेल्वे स्थानकावर ब्रिटीश अधिकाऱ्यांसमवेत छत्रपती राजाराम महाराज



विमान तळाचे उद्‌घाटन प्रसंगी ब्रिटीश अधिकारी व छत्रपती राजाराम महाराज



कोल्हापूर शुगर मिलच्या उद्‌घाटन प्रसंगी उसाची मुळी टाकताना छत्रपती राजाराम महाराज

## परिशिष्ट ४

## छत्रपती राजाराम महाराजांच्या निधनाची विविध वृत्तपत्रांनी घेतलेली दखल

किंमत १ पैसा

कोल्हापूर न्यूजपेपर्स असोसिएशनचें दैनिक

Regd. N. B. 4242

# पुढारी

THE DAILY PUDHARI

वर्ष २ रें ] कोल्हापूर—रविवार ता. १ डिसेंबर १९४० इ० [ अंक २६८

शनिवारखेरीज दररोज प्रसिद्ध होतो

तारेचा पत्ता:–'पुढारी' कोल्हापूर

वर्गणीचे दर

श्रीमच्छत्रपति राजाराम महाराजांचें अंत्यदर्शन



मराठा समाज व करवीर नागरिक यांच्या दुखवट्याच्या सभा

कै. श्रीमच्छत्रपतींचें गुणगान.

करवीर मराठा समाजातर्फे दुखवट्याची सभा

कोल्हापुरच्या नागरिकांची दुखवट्याची प्रचंड सभा

खेळांचे सामने यंदा रहित

दुखवट्याचा ठराव

ग्वाल्हेर–नरेश येणार

राजकुटुंबाच्या समाचारासाठीं नृपतींचें आगमन

बावड्यांत दुःखप्रदर्शन

( आमच्या बातमीदाराकडून )

फिनॅन्स बिलाला व्हाइसरॉयांची संमति

पोस्टाचे नवे दर ता. १ पासून सुरू

राजकीय संप करूं नका म. गांधींचा विद्यार्थ्यांना संदेश

नाझी विमानांचे भयंकर हल्ले

रुमानियांतील अराजकांत हजारों लोक ठार

इटली–ग्रीसचें तुंबळ युध्द

जपानी अधिकाऱ्यांची ट्रेन उलथून टाकली

छत्रपती राजाराम महाराज यांच्या निधनाचे 'दै. पुढारी'मधील वृत्तांत



# केसरी

स्मरण संतत स्फुरणदायि आम्हा घडो । त्वदीय गुणकीर्तनध्वनि सुरम्य कर्णी पडो ॥
स्वदेशहितचिंतनाविण दुजी कथा नावडो । तुम्हाममाचि आसुनी तनुहि देशकार्यी पडो ॥

मिति कार्तिक व. ३० शुक्रवार शके १८६२

## कोल्हापूरच्या छत्रपतींचें शोचनीय निधन!

कोल्हापूरचे अधिपति श्रीमंत सर राजाराम महाराज छत्रपति यांना, मज्जातंतूंच्या विकारामुळे ... त्यांच्या निवासस्थानीं मंगळवार ता. २६ रोजीं दुपारीं एक वाजता हृदयक्रिया एकदम बंद पडून देवाज्ञा झाली. ही दुःखद वार्ता ऐकून आमच्याप्रमाणेंच अखिल महाराष्ट्रांतील आबालवृद्धांच्या ... दुःखाचा जबरदस्त धक्का बसल्यासिवाय राहणार नाहीं. ... सर राजाराम महाराज ... निमंत्रणावरून ... महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचें अनावरण करण्यास गेले असतांनाच तेथें त्यांच्या ... विषाद झाला व तेथून परत ... दाखल होतात न होतात तोंच ... काळानें त्यांच्यावर झडप घालून त्यांची ... यात्रा संपविली! कै. राजाराम महाराज ... गादीवर अधिष्ठित होते त्या गादीबद्दल अखिल ... नव्हे तर अखिल भारतास निरतिशय ... वाटत असल्यामुळे शिवरायांच्या ...

कै. श्री. राजाराम महाराज छत्रपति

छत्रपती राजाराम महाराज यांच्या निधनाचे ‘दै. केसरी’मधील वृत्तांत

THE TIMES OF INDIA

29-11-1940.



THE LATE MAHARAJA OF KOLHAPUR, Sir Shri Rajaram Chhatrapati, at an "At Home" given in his honour at the Jiwanji Club, Gwalior, a few days before his sudden death in Bombay. Seated on the left of his late Highness is His Highness the Maharaja of Gwalior.

## BARODA PLUNGED INTO GRIEF

### Ties With Ruling Family

FROM OUR OWN CORRESPONDENT.

BARODA, November 27.

Baroda was plunged into grief on receipt of the news, late last evening, of the sudden death of the Maharaja of Kolhapur, who was related to the ruling family of Baroda by ties of marriage. The Senior Maharani, Shrimant Tarabai, who a short time ago gave birth to a daughter, the only child of the late Maharaja, is the eldest sister of the present Maharaja of Baroda.

The Baroda flag was flown at half mast this morning, and all State offices, schools, colleges and public institutions have been ordered to be closed for three days. The Maharaja of Baroda, who is touring Kathiawar and North Gujerat, was on the way to Mehsana when the news of the death was communicated to him. He at once cancelled his programme, and is returning to Baroda this morning.

**GWALIOR:** The news of the tragic and sudden demise of the Maharaja of Kolhapur was received with very great sorrow in Gwalior. As a mark of respect, the Maharaja Scindia has ordered the closing of all Government ...fices and public institutions and ...ervance of a complete 'hartal' for ...e days at headquarters. Flags are ...g at half mast.

**...ALKARANJI:** A gloom has ... cast over the place by the un... ...ed death. All shops, offices and ... have been closed. The local ... Sabha has sent a message of ...ence.

**...VNAGAR:** Leaders throughout ...war unite in paying tributes to ...aharaja of Kolhapur's fine quali... ...s a ruler. All State offices, ...s and educational institutions ...re closed on Wednesday, and flags ...e flown at half mast.

**...ATARA:** Satara, of all districts ...he Deccan, is greatly overwhelmed ...he news of the death of the ...raja of Kolhapur, who only last ..., on his way to Gwalior, had ... at Satara Palace with Shri... ...ahu Raja. Satara is greatly in... ...to the late Maharaja, as the ...ng among the Mahrattas and ...d communities in this district ...argely to his efforts and dona-

## GAEKWAR ARRIVES IN KOLHAPUR

### Condolence Visit

FROM OUR OWN CORRESPONDENT.

KOLHAPUR, November 28.

His Highness Maharaja Gaekwar of Baroda arrived here by special train this morning to pay a condolence visit to the late H. H. Maharaja of Kolhapur's family. The Kolhapur and Baroda ruling families are closely related the senior Maharani of Kolhapur being the Baroda ruler's sister. The Gaekwar went straight from the station to the new palace at Kolhapur.

**BELGAUM:** All shops in the city and the Cantonment and all primary and secondary schools and colleges were closed on Wednesday. Talkie houses suspended the evening shows. The Maratha Samaj and a public meeting of citizens held in the evening passed condolence resolutions. A similar "hartal" was observed at Angol (Kurundwad, Senior State) Madhavpur and Vadgaon (Kurundwad, Junior State) and Shahapur.

## Jath's Tribute

Under the orders of His Highness the Rajasaheb of Jath State, all offices and schools in the State will be closed for three days as a mark of respect to the memory of His Highness the Maharaja of Kolhapur. Flags on State buildings in Jath flew half-mast on Wednesday.

The Rajasaheb of Jath was present when the Ruler of Kolhapur died, and later proceeded to Kolhapur to attend the funeral.

All schools conducted by the Bombay Education League were closed on Wednesday. Condolence resolutions were passed at meetings of students and teachers.

The offices of Messrs. James Finlay and Co., Ltd., in Bombay were closed on Wednesday.

THE TIMES OF INDIA

29-11-1940.

## Kolhapur Ruler's Funeral

### IMPRESSIVE SCENES

FROM OUR OWN CORRESPONDENT.

KOLHAPUR, November 27.

The remains of the late Maharaja of Kolhapur were cremated this morning. The funeral procession left the New Palace at 7 a.m. and large crowds joined the cortege as it wended its way to the Panchganga River ghat. The remains were placed on a sandalwood pyre and cremated at 10-45 a.m., after impressive religious rites and military honours.

A "Gazette Extraordinary" announcing the Maharaja's death, decrees 11 days' mourning and three days' closure of offices and schools throughout the State.

The remains arrived here at 10 p.m. last night, when a salute of 14 guns was fired. Immediately, thousands of subjects thronged the palace to pay their last respects.

छत्रपती राजाराम महाराज यांच्या निधनाचे 'टाईम्स ऑफ इंडिया'मधील वृत्तांत

NOVEMBER 28, 1940. (7)

# Kolhapur Ruler's Sudden Death In Bombay

## SOCIAL REFORMER AND LOVER OF THE TURF

WE REGRET to announce the death, owing to heart failure following a minor operation, of Col. Sir Shri Rajaram Chhatrapati Maharaja of Kolhapur, at his palace at Warden Road, Bombay, early on Tuesday afternoon.

The body of His Highness was taken from Bombay to Kolhapur a few hours later.

His Highness's Private Secretary, Rao Bahadur D. Y. Pawar, and Mr. Mamasaheb Mahagaokar, a Sardar of Kolhapur, were present at the bedside of the Maharaja when he passed away.

Lt.-Col. L. C. Palk, Military Secretary to the Governor of Bombay, called at the palace and conveyed His Excellency's condolences.

His Highness has one issue, a daughter, from the senior of his two Maharanis, who is a sister of the Maharaja of Baroda. His mother survives him.

Thousands of loyal subjects thronged the new palace at Kolhapur to pay their last respects to their Ruler and when the body was brought there on Tuesday night, a 14-gun salute was fired.

A special *Kolhapur Gazette* announced the sad news and stated that all public offices and schools would remain closed for three days.

### FUNERAL HELD

The funeral took place on Wednesday morning, thousands of the State subjects following the cortege.

It may be recalled that Sir Shri Shahu Chhatrapati Maharaj, father of Sir Shri Rajaram Chhatrapati, also died in Bombay of heart failure. Shri Shahu Chhatrapati had returned from Baroda after attending a wedding.

His Highness was the descendant of the younger branch of Shivaji the Great, Founder of the Maratha Empire. He ascended the *gadi* on the death of his father in 1922. He was educated privately at Kolhapur and at the Hendon Preparatory School and studied agriculture at the Ewing College, Allahabad.

Under His Highness, Kolhapur, which has an area of 3,217 square miles with a population of over 950,000 has shown striking progress in the past few years. In some things like the abolition of caste disability, Kolhapur has actually led the way. The State affords special facilities for the uplift of backward and Depressed Classes.

The expansion of educational facilities has been another special concern of the Ruler, and during his regime, several secondary schools, a law college, a teachers' college and technical and academic institutions were started. Female education is free up to the secondary stage and thereafter in the Arts and Science College, half fees are charged for State subjects, though Harijans are taught free.

### POLITICAL REFORM

His Highness was not slow in liberalising administration, and in 1926 a beginning was made by setting up taluka and village panchayets, making local self-government entirely in popular hands. The Illakha panchayet has been managing with success an annual grant from the State's revenue of Rs. 20,00,000 for sanitation, roads, village improvement and so on since 1926.

The progress made with these institutions prompted His Highness two years ago to announce his intention of giving his subjects increased participation in the functions of Government. As a first step to the establishment of democratic institutions working on an elected basis and sharing in the working of the State's administration along certain definite lines, a Legislative Assembly for the entire principality, including all the feudatory Jagirs, of whom there are nine, is in progress of inauguration. The Maharaja was being assisted in his administration by a Council headed by Rao Bahadur D. A. Surve, Prime Minister.

In recognition of the State's administrative advance, the Government of India in 1920 restored to the Kolhapur Durbar the powers of primary supervision of the Jagirs.

He reorganised the State troops, which comprise the Kolhapur State Infantry and the State Cavalry. After the outbreak of war, he helped in the recruitment of Marathas for the Army, apart from making large donations to the War Fund.

His Highness was a widely travelled man. Besides travelling over the greater part of India he had visited Great Britain, U. S. A. and Japan.

### KEEN SPORTSMAN

The Maharaja of Kolhapur was a great sportsman in every sense of the word. His interest in horses amounted almost to a passion, and he owned and raced the most powerful string in the East. He won practically every important prize on the turf in this country with the exception of the Eclipse Stakes of India, and the Viceroy and King-Emperor's Cups. It was his great ambition to win the Eclipse Stakes and for this purpose he brought out from England this year one of the finest horses racing there, Tant Mieux, after it had run fourth in the famous orange livery in the war-time substitute Derby at Newmarket. In addition he also purchased for handsome sums other classic animals.

His Highness was also a great lover of dogs, and he owned some of the finest [illegible] in India. Other forms of sport he loved were cheetah hunting and pig-sticking, and it was through the latter that he developed his love for horses.

The office of the Royal Western India Turf Club in Bombay was closed on Tuesday afternoon as a mark of respect to the memory of His Highness.

The Bombay Municipal Corporation adjourned on Tuesday, it is presumed as a mark of respect to the memory of the Maharaja.

## "Hartal" In Kolhapur

FROM OUR OWN CORRESPONDENT.

KOLHAPUR, November 26.

Kolhapur State was plunged into grief at the news of the death of the Maharaja in Bombay this afternoon. The city observed a complete *hartal*, all offices, schools, colleges, markets and shops being closed.

An Associated Press message, quoting a Press communique issued in New Delhi prior to the death of the Maharaja, says that His Highness who had already generously contributed to the Viceroy's War Purposes Fund, had now offered Rs. 2,40,000 to His Majesty's Government for the purchase of aircraft. The gift had been gratefully accepted by the Crown Representative.

## Poona's Tribute

The car carrying the body of the Maharaja of Kolhapur arrived in Poona shortly before 6 p.m., on Tuesday. Over 700 people had gathered at the gate of the city and many flowers and wreaths were laid on the body. The car left for Kolhapur at 6-30 p.m.

The news of the tragic and sudden demise of the Maharaja of Kolhapur was received with very great sorrow in Gwalior. As a mark of respect, the Maharaja Scindia has ordered the closing of all Government offices and public institutions and observance of a complete *hartal* for three days at headquarters. Flags are flying at half mast.

छत्रपती राजाराम महाराज यांच्या निधनाचे 'टाईम्स ऑफ इंडिया'मधील वृत्तांत

लोकशक्ति ता. २८।११।४०

# छत्रपतींची प्रचंड स्मशान यात्रा

## १५ मण चंदनाची चिता : १९ तोफांची सलामी

### रस्त्यांत चांदीचीं फुलें उधळलीं : शवाला ४ हजार पुष्पहार अर्पण

(आमच्या बातमीदाराकडून खास फोन)

कोल्हापूर, ता २७ —आज सकाळीं बरोबर ६ वाजून १० मिनिटांनीं नव्या राजवाड्यापासून राजाराममहाराजांच्या प्रेतयात्रेला सुरुवात झाली. महाराजांचें शव एका भव्य पालखींत ठेवण्यांत आलें होतें. या मिरवणुकींत अक्कलकोट, सांगली, मिरज व जत येथील अधिपति व तोरगल, कापशी, कागल, सरलष्कर आणि बावडे येथील जहागिरदार सामील झालेले होते.

#### स्मशानयात्रेंत एक लाख लोक

नवीन राजवाड्यापासून मिरवणूक सुरू झाल्यानंतर वाटेंत लोकांच्या झुंडीच्या झुंडी मिरवणुकींत सामील होत होत्या. टौनहॉलजवळ मिरवणूक आली तेव्हां जवळजवळ एक लाख लोक मिरवणुकींत सामील झाले होते. यानंतर पापाची तिकटी गंगावेस मार्गें हा प्रचंड जनसमुदाय पंचगंगेवर गेला.

#### शवास तीन हजार पुष्पहार

वाटेंत सराफ असोसिएशन, कापड असोसिएशन, मर्चंट असोसिएशन, डेक्कन एज्युकेशन सोसायटीतर्फे प्रो. गोकाक, विलिंग्डन कॉलेजतर्फे प्रो. शहा इत्यादि असंख्य संस्था व व्यक्ति यांनीं जवळ जवळ ३ हजार हार महाराजांच्या शवास घातले. ठिकठिकाणीं चांदीचीं फुलें उधळण्यांत येत होतीं. रस्त्यावरच्या प्रत्येक इमारतीच्या खिडक्यांतून व गॅलरींतून स्त्री-पुरुष व लहान मुलें यांची गर्दी उसळली होती.


#### पंचगंगेवर शवास अग्नि

बरोबर १०॥ वाजतां पंचगंगेवर राजस्मशान भूमीजवळ मिरवणूक गेली. त्या ठिकाणीं नगाऱ्याजवळ आवळीच्या झाडाशेजारीं १५ मण चंदनाची ४ हात लांब व ३ हात रुंद अशी भव्य चिता तयार करण्यांत आली होती. श्रीमंत आबासाहेब भोसले यांनीं महाराजांच्या शवाला अग्नि दिला. हा अग्निसंस्काराचा विधि क्षात्र जगद्गुरूंनी १२ मराठा पुरोहितांसमवेत पार पाडला. ६ मण कापूर व ८ मण खोबरें या चितेत घालण्यांत आलें. अग्निसंस्काराच्या समयी देवास सीनियरचे महाराज विक्रमसिंहजी (कै. राजाराम महाराजांचे भाचे.) हे स्मशान भूमीवर येऊन हजर झाले. मृताच्या सन्मानासाठीं या प्रसंगीं १९ तोफांची सलामी देण्यांत आली.

या प्रसंगी स्वतः ए. जी. जी. व कर्नल कूट हे हजर होते.

यानंतर जमलेली सर्व मंडळी दुःखद अंतःकरणानें व जड पावलांनीं परत फिरली.

छत्रपती राजाराम महाराज यांच्या निधनाचे ‘दै. लोकशक्ति’मधील वृत्तांत



लोकशक्ति ता. २८-३-४०

# महाराजांच्या अंत्यदर्शनासाठीं असंख्य लोक

कोल्हापूर, ता. २६—कोल्हापूरचे श्रीमत् छत्रपति राजाराम महाराज यांचें मुंबई येथें १२॥ वाजतां प्राणोत्क्रमण झाल्याची वार्ता येथें आल्यापासून साऱ्या शहरभर कमालीच्या दुःखाचें वातावरण पसरलें असून साऱ्या शहरांतील सर्व व्यवहार आपोआप बंद पडले आहेत.

### ग्वाल्हेरला असतांनाच प्रकृतींत बिघाड

महाराजांच्या अकस्मात् निधनाविषयीं असें समजतें कीं, त्यांचा मुक्काम ग्वाल्हेर येथें असतांनाच त्यांची प्रकृति एकाएकीं बिघडली. म्हणून ते काल दुपारी तातडीनें मुंबईस आले. मुंबई येथें डॉ. मुळगांवकर, डॉ. शिरोडकर, डॉ. तिरोडकर या प्रख्यात डॉक्टरांच्या सल्ल्यानें औषधोपचार सुरू करण्यांत आले. आज सकाळीं १० वाजेपर्यंत त्यांची प्रकृति ठीक होती. परंतु त्यानंतर मात्र ती ढासळून त्यांचें १२॥ वाजतां देहावसान झालें.

तातडीनें महाराजांचें शव कोल्हापूर येथें खास मोटारीनें नेण्याची व्यवस्था करण्यांत येऊन २॥ वाजतां त्या मोटारीनें मुंबई सोडली. मध्यंतरीं पुण्यास कांहीं मिनिटें मुक्काम केल्यावर शवाला घेऊन येणारी मोटार येथें रात्रीं बरोबर ९-४५ वाजतां येऊन दाखल झाली.

### अंत्यदर्शनासाठीं प्रचंड लोकसमुदाय

महाराजांचें शव नव्या राजवाड्यांतील मुख्य दिवाणखान्यांत ठेवण्यांत आलें असून त्यांच्या अंत्यदर्शनासाठीं शहरांतील असंख्य लहान थोर स्त्री-पुरुषांच्या झुंडीच्या झुंडी येत होत्या. रात्रीं ११ वाजेपर्यंत जवळ जवळ ५० हजार लोकांनीं त्यांचें अंत्यदर्शन घेतलें असावें. महाराजांच्या निधनाची वार्ता आजूबाजूच्या खेड्यांपाड्यांतून वाऱ्यासारखी पसरली असून असंख्य लोक मोटारीनें कोल्हापुरांत येऊन दाखल होत आहेत. कागलचे अधिपतीही येऊन दाखल झाले आहेत.

### ट्रेझरीला पडलेलें सील

गव्हर्नर जनरलच्या एजंटांनीं नेहमीच्या पद्धतीप्रमाणें ट्रेझरीला सील केलें आहे.

सर्व कचेऱ्या तीन दिवस बंद ठेवण्यांत आल्या आहेत.

### मुळव्याधीवरील शस्त्रक्रियेचा दुःखद शेवट

**खास फोन (रात्रीं १ वा.)**

कोल्हापूर, ता. २६—महाराजांवर आलेल्या शस्त्रक्रियेबाबत असें समजतें कीं, त्यांच्यावर मुळव्याधीसाठीं शस्त्रक्रिया करण्यांत आली होती. शस्त्रक्रिया झाल्यावर जवळजवळ अर्धा पाऊण तासपर्यंत महाराजांनीं, त्यांच्या समाचारासाठीं आलेले जतचे महाराज, जव्हारचे महाराज, श्री. दादासाहेब निंबाळकर यांच्याबरोबर गप्पागोष्टी केल्या.

दहा वाजण्याच्या सुमारास त्यांच्या छातींत एकदम कळ आली. आणि हीच कळ अखेरची ठरली. काल पहाटे श्री. आईसाहेब महाराज व श्री. अक्कासाहेब महाराज खास मोटारनें मुंबईला रवाना झाल्या होत्या.

महाराजांचें शव इथें आणण्यांत आल्यानंतर दुःखांत बुडालेल्या राजकुटुंबियांच्या सांत्वनसमाचारासाठीं श्रीमंत बावडेकर, बाबासाहेब सरलष्कर ही जहागिरदार मंडळी आली असून सातारचे महाराजही येणार आहेत असा नुकताच फोन आला आहे.

महाराजांच्या शवाची अंत्ययात्रा सकाळीं ७ वाजण्यापूर्वींच काढण्यांत येईल असें समजतें.

### पुण्यांत छत्रपतींच्या शवाचा सत्कार

पुणें, ता. २६—श्री छत्रपति राजाराम महाराज यांच्या निधनाची वार्ता येथें अडीच पावणे तीनच्या सुमारास रा. ब. दुबे यांचेकडे आली त्याबरोबर कोल्हापूरच्या राजघराण्याविषयीं आपुलकी बाळगणाऱ्या असंख्य व्यक्ति श्री. दुबे यांचे घरीं जमा झाल्या. छत्रपतींचें शव मोटारीनें कोल्हापुरास नेण्यांत येणार असल्याची बातमी समजल्याकारणानें सायंकाळीं ५॥ वाजण्याचे सुमारास स्वारगेटजवळ बरीच मोठी गर्दी मोटारीची मार्गप्रतीक्षा करीत उभी होती.


बरोबर ५॥ वाजतां छत्रपतींचें शव घेऊन येणारी खास मोटार स्वारगेटाजवळ आली. या मोटारीबरोबर श्री. आईसाहेब महाराज व श्री. अक्कासाहेब महाराज यांचीहि दुसरी एक मोटार होती.

उपस्थित असलेल्या प्रमुख मंडळींपैकीं नगराध्यक्ष रघुनाथराव बाळवेकर, बापूराव जेधे, श्री. केशवराव शिरोळे, श्री. बापूराव जगताप, श्री. नामदेवराव पाटील, श्री. आमदार मोरे, श्री. सहदेवराव दुबे, रा. ब. दुबे, श्री. नगरीकर श्री. डि. एल. शिंदे, म्यु. चीफ ऑफिसर श्री. तांबोळकर, म्यु. इंजिनियर श्री. दळवी, म्यु. हेल्थ ऑफिसर श्री. मोहिले, कर्नल कूट, सिटी इन्स्पेक्टर खेडकर, प्रभातचे डायरेक्टर श्री. शांताराम, सरस्वती सिनेटोनचे संचालक व सर्व कामगारवर्ग, श्री. नलावडे, श्री. किराड, महाराष्ट्र बँकेचे श्री. गोखले, नवयुगचे श्री. बापूराव राजगुरु इत्यादि अनेक व्यक्तींनी शवाचें अंत्यदर्शन घेऊन पुष्पहार समर्पण केले.

याशिवाय आर्यभूषण प्रेस, शिवाजी मराठा हायस्कूल, डेक्कन एज्युकेशन सोसायटी, प्रभात सिनेटोन, इत्यादि संस्थांतर्फेही शवास पुष्पहार अर्पण करून शवाचा सन्मान करण्यांत आला. थोडा वेळ मुक्काम केल्यावर मोटार कोल्हापूरला रवाना झाली व सर्व मंडळी दुःखद अंतःकरणानें माघारी परतली.

रा. ब. दुबे हे आज रात्रीं मेलनें कोल्हापूरला रवाना झाले आहेत.

छत्रपती राजाराम महाराज यांच्या निधनाचे 'दै. लोकशक्ति'मधील वृत्तांत



सकाळ ता. २७।११।१९४०

# कोल्हापूरच्या राजाराममहाराजांचे मुंबईस निधन
## शस्त्रक्रियेनंतर हृदयाक्रिया बंद पडून मृत्यु आला

मुंबई, ता. २६—कोल्हापूरचे श्रीमंत छत्रपती राजाराम महाराज जी. सी. आय. ई., जी. सी. एस. आय., हे आज दुपारीं मुंबई येथें निधन पावल्याची दुःखद वार्ता आली आहे. त्यांचेवर शस्त्रक्रिया करण्यांत आली होती.

राजाराम महाराज हे नुकतेच ग्वाल्हेर येथें गेले होते व त्यांचे हस्ते ग्वाल्हेर संस्थानचे माजी राजे कै. सर माधवराव शिंदे यांच्या अश्वारूढ ब्रॉंझ पुतळ्याचा अनावरण समारंभ ता. २२ नोव्हेंबररोजी झाला होता.

महाराजांना ५ आक्टोबर रोजी कन्यारत्न झाले होते. यावेळी महाराज पुण्याहून मुद्दाम विमानमार्गे कोल्हापूरला गेले होते. या कन्येचा नामकरण विधी अद्याप व्हावयाचा असून त्याची तारीख डिसेंबर २९ मुक्रर करण्यांत आली होती.

कै. शाहू महाराज यांचे हे ज्येष्ठ चिरंजीव होत. शाहूमहाराजांचे निधनानंतर १९२२ साली ते कोल्हापूरच्या सिंहासनावर अभिषिक्त झाले. त्यांचा जन्म ३१ जुलै १८९७ रोजी झाला होता. त्यांचे प्राथमिक शिक्षण खाजगीरीत्या कोल्हापूर येथेच झाल्यावर ते पुढील अभ्यासक्रमासाठीं इंग्लंडला गेले होते. परन्तु त्यावेळीं युरोपांत महायुध्द सुरू झाल्यामुळे त्यांना अवघ्या तीन वर्षांतच स्वदेशी परत यावे लागले. स्वदेशाचे मार्गावर त्यांनी अमेरिका, चीन आणि जपान या राष्ट्रांतील प्रमुख शहरांना भेटी दिल्या आक्टोबर १९१५मध्ये महाराज परराष्ट्रांतून कोल्हापुरी आले युरोपमधील अभ्यासक्रम अपुरा सोडून आपल्या मुलाला परत यावे लागल्यामुळे त्यावेळीं शाहूमहाराजांना अत्यंत वाईट वाटले. इंग्लंडमध्ये शेतकीचें शिक्षण द्यावे यासाठीं त्यांना विलायतेस पाठविण्यांत आले होते. हिंदुस्थानांत आल्यावर त्यांना हाच शेतकी शिक्षणक्रम पुरा करण्यासाठीं अलाहाबाद येथील यूइंग ख्रिश्चन कॉलेजमध्ये पाठविण्यांत आले होते परन्तु अलाहाबादमधील हवा त्यांच्या प्रकृतीला न मानवल्यामुळे अवघ्या एका वर्षांतच त्यांना स्वसंस्थानी परत यावे लागले. यानंतर आपल्या वडिलांच्या हयातीत कोल्हापूर संस्थानच्या राज्यकारभाराची माहिती करून घेण्यांत त्यांनी आपला वेळ खर्ची घातला होता.

महाराजांचे पहिले लग्न १९१८ साली बडोद्याचे कै. खपाजीराव महाराज यांची नात महाराणी ताराबाईसाहेब यांच्याबरोबर झाले.

त्यांचा दुसरा विवाह १९२५ साली तंजावरच्या राजघराण्यातील महाराणी विजयमालाबाईसाहेब यांच्या बरोबर झाला होता.


महाराजांनी आपल्या हयातींत संस्थानमधील राज्यकारभार सुधारण्यासाठी आणि प्रजेला सुखी करण्यासाठीं बरेच प्रयत्न केले. त्यांच्या कारकिर्दीत आणि विशेषतः गेल्या कांही वर्षांत कोल्हापूर शहराची विशेष सुधारणा झाली हे कोणीही कबूल करील. आपल्या प्रजेपैकी हा गरीब व हो श्रीमंत असा भेदभाव महाराज करीत नसत. त्यांची राहणी साधी असून कोणाही प्रजाजनाला त्यांची वाटेल त्या वेळी भेट घेता येत असे. १९३१ साली मरहूम बादशहा पंचम जॉर्ज यांनी त्यांना जी. सी. एस. आय. ही पदवी बहाल केली होती. यापूर्वीच म्हणजे १९२७साली त्यांना हिंदी लष्करांतील ऑनररी लेफ्टनंट कर्नल करण्यांत आले होते.

महाराजांना शिकारीचा नाद विशेष होता. घोड्यावर बसण्याची कला त्यांना चांगली अवगत होती. महाराजांचे जवळ उत्तम जातीचे घोडे होते. त्यांच्या निधनामुळें सर्व कोल्हापूर संस्थान दुःखात लोटले आहे.

## शव कोल्हापुरास नेले
### शस्त्राक्रियेनंतर हृदय क्रिया बंद पडून मृत्यु

मुम्बई, ता. २६—राजाराम महाराजांचे शव कोल्हापूरला नेण्यांत आले आहे. महाराज हे ग्वाल्हेरहून काल येथे आले होते. आज सकाळी त्यांचेवर छोटीशी शस्त्रक्रिया करण्यांत आली होती. परन्तु नंतर थोड्याच वेळांत हृदयक्रिया बंद पडून ते कालवश झाले.

छत्रपती राजाराम महाराज यांच्या निधनाचे ‘दै. सकाळ’मधील वृत्तांत



# कोल्हापूरच्या ताराबाई महाराणीसाहेबांना रीजंट नेमा
# सर्व व्यापारी संघांची हिंदुस्थान सरकारला विनंति

(आमच्या बातमीदाराकडून)

कोल्हापूर, ता. २३—आज येथील सर्व व्यापारी असोसिएशनच्या म्हणजे— (१) शाहुपुरी व्यापारी असोसिएशन, (२) सराफ, कापड, कोल्हापूर मर्चंट्स, तांबापितळ किराणा-भुसारी, टिंबर मर्चंटस, पेट्रोल डीलर्स, बुकसेलर्स वगैरे) खास सभा सकाळी ९ वाजतां आपआपल्या सभागृहांत भरल्या होत्या. त्यावेळी परमपूज्य श्री. पु. मातोश्री ताराबाई महाराणीसाहेब यांना साम्राज्य सरकारने सर्व करवीर संस्थानचा राज्यकारभार चालविण्याचे संपूर्ण अधिकार लवकर द्यावेत. या ठरावासंबंधी विचार करण्यांत येऊन आज संध्याकाळी ६॥ वा. प्रत्येक असोसिएशनचे २ प्रतिनिधि मेरीवेदर म्युनिसिपल हॉलमध्ये झालेल्या सभेस पाठविण्यांत आले होते. यावेळी कांही प्रमुख व्यक्तींची व्याख्याने होऊन, वरील ठराव सर्वानुमते पास करण्यांत आला. या सभेस आत्यंतिक महत्व असल्याने बरीच प्रतिष्ठीत नागरिक मंडळी हजर होती. ठराव पास झाल्यावर हिंदुस्थान सरकारकडे रवाना करण्यांत आला.

वरील सभेप्रमाणेच दुसरी सभा काल रोजी सायंकाळी ५ वाजतां येथील करवीर इलाखा मंडळाच्या विद्यमाने मे. डी. आर. मोरे यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यांत आली होती. यावेळी ४–५जणांची भाषणे होऊन खालील ठराव पास करण्यांत आले आहेत—(१) करवीर सरकार कै. राजाराममहाराज यांना पुत्रसंतति नसल्याने पुत्राच्या ऐवजी राजकन्येस राज्याधिकारारूढ होण्यास साम्राज्य सरकारची संमति मिळावी, (२) तसेच श्री. पु. मा. ताराबाई महाराणीसाहेब यांना रीजंट नेमून त्यांच्या हाती सत्वर अधिकार सुपूर्द द्यावेत. हे ठराव हिंदुस्थान सरकारकडे या मंडळाने आज पाठविले आहेत.

छत्रपती राजाराम महाराज यांच्या निधनाचे 'दै. सकाळ'मधील वृत्तांत

Political Secretary.

THE TIMES OF INDIA 30-11-1940.



The remains of His Highness Sir Shri Rajaram Chhatrapati, Maharaja of Kolhapur, being taken in a palanquin (indicated with a cross) through the streets of Kolhapur t- the cremation grounds